CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

Sahu's Compaign against
the sides of Jamjira.

G-1
69/3

Provincial Museum
LUCKNOW.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

पेशवे दप्तर डेलेले कागद

SHAHU'S

२

954.03
G-1
69/3

जंजिऱ्याच्या सिद्दीवर शाहूची मोहीम

१७३३-१७३६

[illegible]

[किंमत—२ रु. १ आ. किंवा ४ शिलिंग]

गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस, मुंबई
१९३०

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

Government do not share any responsibility for the comments and views expressed by the editor.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

"SHAHU'S CAMPAIGN AGAINST THE SIDIS OF JANJIRA," 1733-1736.

1. *Past History.*

The term Janjira meaning an "Island fort" has, during historical times, come to be applied to the great maritime depôt at Danda Rajpuri in the middle of which stands the fortified rock-island of Janjira. The rulers of the place known as Sidis, were originally Abyssinian settlers, who established themselves on the west coast about the beginning of the 17th century and were later confirmed in their possession by the Mughal Emperors, as Admirals of the Imperial fleet, receiving frequent assistance from the Mughal Governor of Surat. When Shivaji started his work of liberating Hindu territory from foreign control, he and his successors had to wage constant wars against the various Mohammadan powers who stood in their way. Thus the Sidis of Janjira on the west coast, like the Nizam in the east, were constantly engaged in a veritable struggle for existence, the accounts of which form some of the most thrilling Chapters of Maratha history. Shivaji died almost broken hearted at not having been able to subdue his unwelcome neighbour, to control whom he had to establish a rival naval base at Kolaba near Alibag, about thirty miles north of Janjira, which later became the headquarters of the Maratha Admiral Angria. Hence arose a keen rivalry between the two opposing naval powers, Sidi and Angria.

2. *Causes of the War.*

When later Aurangzeb invaded the Deccan, captured Sambhaji, and took possession of the Maratha capital Raigad, he handed it over along with the adjoining territory to the Sidi, thereby enormously raising his importance. In consequence Angria found himself thwarted at every step by the Sidi, so that on the assumption by Shahu of the Maratha Kingship, almost the first condition that Kanhoji Angria made when he submitted to Shahu, was, that his position on the west coast should be made secure from his two great rivals the Sidi of Janjira and the Portuguese of Bassein.* The Janjira Campaign and that against Bassein a few years later, were the direct consequences of this undertaking on the part of Shahu and his Peshwa, the latter having a personal grievance against the Sidi, as his own native place Shriwardhan was close to Janjira and subject to constant molestation. Both Shahu and the Peshwa had however to wait long before they could direct their attention to the Sidi, as they had to make their own position in the heart of Maharashtra secure, first from their great opponent the Nizam-ul-Mulak and secondly from Sambhaji, Shahu's own cousin. The Nizam was checkmated at Palkhed in 1728 and Sambhaji was reconciled to his position at Kolhapur by the treaty of the Varna in 1731. Plans were thereupon matured, after

* Treaties by Mawjee and Parasnis, page 197.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

a long deliberation during 1732 at Shahu's court, and the expedition was launched in the early months of 1733.

3. *Persecution by the Sidis.*

The immediate cause of the expedition was however religious rather than political. Shahu's Guru Brahmendra Swami, a widely respected ascetic, had established a shrine at Parasharam near Chiplun, within easy reach of Gowalkot, a small but strong fort on the creek, owned by the Sidis and commanded by a gallant Mohammadan officer named Sidi Sat. In 1727, during the Shivaratri festival, this famous shrine was suddenly attacked and destroyed by the latter. The outraged Swami complained to Shahu and exhorted him to take up arms at once and to extirpate the impious authors of this unprovoked attack on the Hindu religion. Bakaji Mahadik writes in the same strain on 16th July 1733 : " I started from Suvarnadurga to proceed against Anjanvel. Passing by the Parasharam temple on the way I found a Sidi officer intent on destroying this holy place, plundering and burning the houses of the Brahmins and slaughtering cows. I at once attacked the enemy and after a stubborn fight pushed him back across the river. " How the religious feeling ran high is shewn by the fact that the various communities inhabiting this region represented to the Peshwa that they were ready to collect funds of one lac by private contributions for preventing religious atrocities in future. (Purandare Daftar I).

4. *Geographical position and Maratha preparations.*

The Sidi ruled quite a narrow strip of land along the west coast south of Janjira, nearly the same in extent as it is now, between the creeks of Kundalika and Bankot, besides two outstations a little to the south, Anjanwel opposite Dabhol and the fort of Govalkot, already mentioned, which was equally coveted by both, the Sidi and the Marathas, as it commanded the rich and extensive trade of the great emporium Chiplun.

The opening of the year 1733 gave the Marathas a fresh opportunity to launch the expedition, as there were dissensions in the ruling Sidi family consequent on the death of Sidi Rasul Yakub Khan in the month of February. Shahu personally superintended the preparations and directed most of the prominent Maratha generals to join Bajirao who was appointed to conduct the operations. Kanhoji Angria had died in 1729 and his son Sekhoji, a brave and circumspect naval commander, enthusiastically concentrated all his power against the Sidi. Shripatrao Pratinidhi, Fatesing Bhonsle, Udaji Powar and his brothers, Pilaji Jadhav and the gallant Bakaji Naik Mahadik, a subordinate officer of the Angrias stationed at Suvarnadurg, and various others are found taking part in the campaign. The whole Angria family, *viz.*, Sekhoji's brothers Sambhaji, Manaji together with Laxmibai and Mathurabai, the two widows of Kanhoji, threw themselves wholeheartedly into the war. Writes Sekhoji to Bajirao : " Unless the sole charge of the campaign is given to one single commander with full control, you will be unsuccessful. You must take the full responsibility on yourself. With me at your side to serve and assist you, what

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
is impossible of attainment? It is immaterial whether the war lasts for one year or two or whether it costs one lac or ten and whether the British, the Portuguese and the Mughal officials at Surat render naval succour to the Sidi. With all these dangers we can confidently cope, provided you take the lead personally". But Sekhoji's sad and unfortunate death on 28th August 1733 was mainly responsible not only for the failure of the present campaign but for the ruin of the Angrias' house and with it the Maratha navy.

5. *Failure of the Marathas.*

The large number of eloquent letters, over 200 in number, here presented to the student, will speak for themselves and will be specially valued by the research-worker, as they afford him plenty of scope for drawing his own conclusions about the character of the persons and events involved. The war lasted for over three years, February 1733 to April 1736, and ended with the fall of Sidi Sat, who was killed in a hot action with Chimnaji Appa at Charhai.

The main objects of the Marathas were however not at all accomplished. The fierce tenacity and extreme resourcefulness of the Sidis became evident at every step. The Marathas could not extirpate them. Even Govalkot they failed to capture until 25 years later in 1760. Raigad, Anjanvel and a few small places inland were the only gains of the Marathas. The British at Bombay often intervened in favour of the Sidis as they cherished bitter enmity against the Angrias over the permits to trading vessels termed "Kolavan" in Marathi. The British had long cast a covetous eye on Janjira itself, which they once intended to make their chief base before they finally fixed upon Bombay. If therefore they could not capture Janjira for themselves they at least tried hard to prevent it falling into the hands of their rivals. Hence their interest in this war. They also quietly took possession of the island of Underi belonging to the Sidi at the mouth of the Bombay harbour while the struggle was raging between their two neighbours.

One thing that stands out prominently in reading these papers is the utter confusion and mismanagement on the part of the Marathas, due to lack of organization. Shahu himself was responsible for no small share of the result, as he failed to send in supplies of money, men and ammunition in time. He never trusted his generals, and the smallest rumour about their conduct, however baseless, was enough to cause him to vascillate. The Pratinidhi and Bajirao were constantly at variance and mutually whispered in Shahu's ear accusations against one another of secretly collaborating with the enemy. Shahu was driven desperate by these rumours and was at his wit's end what to do, to win the campaign. Bajirao evidently had no heart in the work possibly because, born leader though he was of roving guerilla armies over long distances, sitting down over a creek to win a naval fight was not to his taste. He patched up a provisional peace and retired in disgust at the end of the year leaving further work to his brother Chimnaji who was apparently better adapted to win the hearts of the people. Chimnaji's experience of this campaign

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

was invaluable to him in the second naval campaign which he undertook against the Portuguese and which was signalised by his heroic capture of Bassein in May 1739. Thus ends the chain of events in an undertaking which Shahu had set before himself in concert with the Peshwa at the beginning of his reign.

6. *New fields of research in history.*

For historical study this Maratha struggle against Janjira offers new fields of research of special value. In addition to the Marathi materials either already published or here presented, there may be unpublished papers at the Bombay Secretariat relating to the same subject, and possibly the Portuguese archives too may yield some results to enquiring students. The records of Janjira itself, which it may be presumed could not have perished, will, if properly ransacked, disclose ample evidence to prove how such a small power as the Sidis settling on a foreign coast could hold its own against terrific odds for hundreds of years, surely a unique example in history of such a phenomenon.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh



Radhabai's letter to her son, Bajirao.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 1] *[10-4-1733*

श्री.

राजमान्य राजश्री जिवाजी दादाजी गोसांवी यासी, सेवक बाजीराऊ बलाल प्रधान नमस्कार सुा सलास सलासैन मया अलफ निा राजश्री सेखोजी आंगरे सरखेल पैकीं जमा कोठी मुा पुणें बा जमा वर्कू मार तांदूळ मोठे असडी कैली चौसरी मापें गुा हाये

खंडी

२॥३॥ गुा चिंतोजी कोठवला भरीत खंडी ३८१

.....(फाटले).....

२॥=॥१॥ गुा गोविंद भरीत खंडी ३

६॥।=८१॥ ७॥।=

येकून पावणेसात खंडी दोन मण दीड पाइली कोठी मारीं जमा असे जाणिजे. छ ६ जिलकाद आज्ञा प्रमाण.

लेखन सीमा.

¶*The letter contains a list of provisions, probably for the Janjira campaign.*

No. 2] *[7-5-1733*

श्री.

श्रियासह चिरंजीव विजयीभव राजमान्य राजश्री बाजीराउ यांसी प्रति मातुश्री राधाबाई आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागाईत ज्येष्ट शुद्ध पंचमी इंदुवार जाणून स्वकीये लिहीत जाणें विशेष. तुम्ही पत्र पाठविलें तें पावलें, लिहिलें वर्तमान सविस्तर कळलें. राजपुरी व राजकोट व बलाराजा व खोकरी ऐशी हस्तगत जाली म्हणून लिहिलें, तरी हे गोष्ट उत्तमच जाली. सेखजी येऊन भेटला म्हणून लिहिलें तरी ते गोष्ट उत्तमच जाली. त्याचें बहुता रीतीनें समाधान रक्षून पुढें आपलें कार्य सिद्धीस पावें ते गोष्ट करणें. परस्थळीं जाणें जाहालें आहे, कोण्हाचा विश्वास न धरावा. बहुत सावधतेनें असणें. शरीरसंरक्षण करून सावधतेनें असत जाणें. बहुत काय लिहिणें हें आशीर्वाद.

¶*Radhabai congratulates Bajirao on his capture of Rajpuri and other places.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 3] [*12-5-1733*

श्रीशंकर.

श्रीमंत राजश्री राऊ स्वामीचे सेवेसी

पोष्य बाबूजी नाईक जोसी कृतानेक साा नमस्कार विनंती. येथील क्षेम ताा जेष्ट शुध १० पर्यंत औरगाबादेस स्वामीचे कृपावलोकने करून येथास्थित असो विशेष. आजीच पुणियाहून पत्रे आलीं. त्या पत्रीं लिहीले होते कीं, दंडा राजपुरी फते जाली. यैसियास स्वामी पुण्यवान आहेत आणि येशकीर्ती समग्र स्वामीच्या ठाई सदैव वास्तव्य करिते तेथे हा प्रकार काय थोर म्हणावा? याहून आणखी महद्यशे पदरी पडतील. हे वर्तमान यैकौन परम हर्ष जाला. याउपर त्या प्रांतीचे सविस्तर वृत्त पत्री लेहून विशेषात्कार हर्ष होये यैसे केले पाहिजे. श्रीमंत् राजश्री आपा स्वामीकडून पत्रे आली ती पाठविलीं आहेत. त्यावरून लेखनाभिप्राय समक्ष होईल. बहूत काय लिहिणें हे विनंती. जेष्ठ शु १० शनवार.

¶*Babuji Naik Joshi congratulates Bajirao on the capture of Danda Rajpuri.*

No. 4] [*30-5-1733*

श्री.

पुरवणी राजश्री नाना स्वामीचे सेवेसी.

विनंती उपरी. दरबारीचे वर्तमान तरी राजश्री पंतप्रतिनिधी महाडास गेले होते. किले रायगडास चौकी श्रीमंत राजश्री पंत प्रधान व फतेसिग बावा याजकडील लोक सात आठशे येऊन अगोधर पाचाडी राहिले होते. त्याजकडे बोलीचाली होती. त्यावर राजश्री पंतप्रतिनिधी यानी राजश्री स्वामीस पत्र पाठविले कीं रायगडचे अनुसंधान आम्हाकडे आले आहे, यास काय आज्ञा? यावरून राजश्री स्वामीनी राजश्री पंत प्रतिनिधी यांस पत्र पाठविले कीं तुम्ही किले रायगडचे राजकारण करून हस्तगत करणे त्यावरून महाडीहून प्रतिनिधी स्वार जाले ते छ २६ जिल्हेजी बुधवारी पाचाडास गेले ऐसे पत्र राजश्री स्वामीस आजि छ मजकूरी आले. याउपरी किले मजकूरचे राजकारण कोणाकडे लागेल याचे वर्तमान तहकीक आलियावर लेहून पाठऊन. विदित जाले पाहिजे. खुब नाईक (?) कालवातिणीची पोर पाठऊन दिली पाहिजे. नित्य नालिश होती. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Shahu orders Pratinidhi to capture Raigad.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 5] [*3-6-1733?*

श्री.

विनंती उपरी छ १ मोहरमी सोनाल्याचे बंदरावर इंग्रजाची गलबतें तीन आलीं. कांही लोक बाहेर निघाले होते. ही बातमी राजश्री चिमापास कळली. त्याजवरून रातोरात फौज पाठविली. त्यांची यांची गांठ पडली. लढाई चांगली जाली. बाणाचा मार आपले बाणदारानीं त्याजवर फार केला. त्याणीं जंबुरे-याचे गोळे सुरू केले. अशी लढाई जमली. आणि आपले लोकानीं उठावणी केली, आंत मिसळले. से सवाशे माणूस कापून काढिलें. कांही पळाले ते खाडीत बुडाले. इंग्रज कांहीं गलबतावर होते. त्याजवर बाण टाकिले. त्याणी खाडींत उड्या टाकिल्या. बुडाले. गलबत यानी जाळीले. गलबतांतील चीजबस्त यानी लुटून आणिली. आपले कडील दोन घोडी पडलीं, व दोन भले माणूस पडिले. व कांहीं जखमी जाले. या प्रो वर्तमान आहे. आपणांस कळावें म्हणून लिहिलें आहे. †

No. 5a] [*1733?*

श्री

दिगर. सुरतेहून सिदी मसूद आरमार सुधां येतात म्हणून जाहीर होते. ऐशांस सिदी माारनिले आरमार देखील येत असतील तर त्यास मुंबईस नेऊन आपणा-जवळ ठेऊन बिसालतपन्हा सिदीसाद यांस मोहिबी कलमी करावे. जरी सिदी माारनिलेस आरमार सुधा अंजनवेलीस बोलावितील तर तेथे पाठवावे. अगर जांजिरा जावयाचे वा(या)वयाचे लिहितील तर जांजिरा पाठवावे. लेकीन बिसालता-पन्हाचा[1] जबाब मोहिबास येइतलग[2] त्यास खोटी[3] करावे.

¶*These two letters speak of the English at Bombay helping the Siddi and of naval help coming from Surat.*

---

† हें पत्र वसई मोहिमेंतील असण्याचा संभव आहे.

१ स्नेह्याचा. २ येईपर्यंत. ३ थांबवून धरावें.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 6] *[4-6-1733?*

पौ छ २ मोहरम

श्री

पुरवणी राजश्री पंत प्रधान

स्वामीचे सेवेसी.

विनंती उपरि नवाब निजामन मुलुक याणी इंग्रेज यांस व सिदी साद यांस वस्त्रें पाठविलीं, तीं मुंबईस येऊन यांस पावलीं. ते दिवसीं वस्त्रें घेऊन इंग्रेज याणी परम खुशाली केली, तोफा मारल्या. नोबती वाजविल्या. सिदी साद आद्याप मुंबईसच हजार दीड हजार माणसानसी आहे. आपणास कलावें या करितां लिहिलें असे. बहुत काय लिहिणें? तादलाचे खानगी हजार अडथले पडोन श्रमी केले आहे. निदान पावतील न पावतील कलत नाहीं. स्वामीचे पुण्यें करून पावतील. चिंता नाहीं. कललें पाहिजे हे विनंती.

¶*Wasudeo Hari to Bajirao informing him how the Nizam was supporting Siddi Sat.*

No. 7] *[12-6-1733*

छ १३ मोहरम.

श्री

आपल्यें चिमाजीने कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ताा छ १० मोहरम मुकाम पुणे यथास्थित असे विशेष. रायगडावर निशाणें चढली यैसें साताराहून लिहिले येथे आले, परंतु स्वामीकडून पत्र न आले. ऐसियास किला तो फते जालाच असेल; परंतु किल्यावर लोक कोणाचे गेले, किला सांप्रत स्वाधीन कोणाचे आहे, ते ल्याहावयास आज्ञा केली पाहिजे. राा बापुजी गणेश आम्हाकडे राजश्री स्वामीनीं पाठविले ते वर्तमान पूर्वी स्वामीस लिहिलेंच आहे. बापुजी पंताचे पाठीमागें सवेच राजश्री दादोबास आम्हाकडे पाठविले ते छ ८ मोहरमी येथें आले. आम्हांस व राजश्री पिलाजी जाधवराऊ यास साताऱ्यास बोलाविलें आहे. तेथें गेल्यावर आम्हांस आपल्यापासी ठेवावें. पिलाजी जाधवराऊ यासी स्वामीकडे पाठवावे. ते तेथें आल्याने खटपट करितील व राा. सरखेलीसहि त्याचे हातून तेथें बोलाऊन आणावे तेहि उद्योगास लागतील ऐसा विचार चितात आणून आम्हास व त्यास बोलाविले.. त्यास आपल्यास तो बरें वाटत नाहीं.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

याकरितां राजश्री पिलाजी जाधवराऊ यास दादोबा समागमे सातारियास पाठवितों. तेथून लक्षा प्रकारें राजश्री स्वामी त्यास तुम्हाकडे रवाना करितील, ऐसा विचारच केला आहे. आपल्यास बरें वाटत नाहीं. तूर्त आपल्यास यावयास अनुकूल पडत नाहीं, याकरितां राजश्री पिलाजी जाधव रा दादोबासमागमे पाठविलें आहेत. आपल्यास सावकाश वाटल्यावर आपणही सेवेसी येऊं, ऐसें उतर राजश्री नारबावास लेहून पाठविलें आहे, ते राजश्रीस विदित करितील. राा दादोबा अद्याप येथेंच आहेत. सुभेदाराचा मुहुर्त करार होईल ते दिवसीं हे व ते समागमे जातील. जाले वर्तमान स्वामीस कळले असावे म्हणून लिहिलें असे. तीन च्यार दिवस येथून निघावयास लागतीलसे दिसते. हे विनंती.

¶*Letter from Chimaji, in his own hand, to Bajirao, communicating the changes in the commands contemplated by Shahu.*

No. 8] [*18-6-1733?*

पौ छ १६ मोहरम.

श्री.

राजश्री पंत प्रधान

गोसांवी यांसी.

॥ ℘ श्रीसकल गुणालंकरण अखंडितलक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नो पिलाजी जाधवराव दंडवत विनंती. येथील क्षेम जाणून * * * * * लेखन आज्ञा केली पाहिजे विशेष. पत्र पाठविले ते व राजश्री आपास पत्रें पाठविली ती छ ११ मोहरमी पावलीं. कितेक विचार मसलतीचे तिडणीचे लिहिले ते कळो आले. याचा विचार उभयेता पोख्ता करून उत्तर पाठवणे म्हणोन लिा. यैसियासी आम्ही छ ४ मोहरमी गावास येऊन पावलो. छ ५ मोहरमी राजश्री आपा पुणियास गेले तो दुसरे रोजी राजश्री स्वामीची आज्ञापत्रें व रा दादोबा आले. आज्ञा कीं हजार बाराशे लोक पायेउतारा करून व करोल बरकं(दा)ज यैसे राजपुरीस रवाना करून तुम्ही उभयेतां हुजूर येणे. त्यासी राजश्री आपाचे शरीरास सावकाश वाटत नाहीं. आम्ही राजश्री स्वामीस पत्र लेहून पाठविले आहे कीं लोक पायेउतारा घेऊन सातारियाकडून यावे तरी त्यामार्गे नद्या फार. दा बारा रोज लागणार. याकरितां आज्ञा होईल तरी याच मार्गे लोक घेऊन जाऊन म्हणून लिहिले आहे. त्याचे उत्तर आजी उद्या येईल. त्याप्रमाणें वर्तणूक

शिक्का
पिलाजी
जाधवाचा

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
करून. वरकड कितेक अर्थ लिहिला तरी मनसबा कठीण पडला हे गोष्टी परंतु जे गोष्टीने राजश्री स्वामीचा आग्रह आहे ते गोष्ट न करितां गत्यंतरी नाही. त्याहि वरी राजश्री * * मनसबियास गेले आहेत. त्याची तुमची भेटी जालियावरी त्याच्या तुमच्या विचारे जो मनसबा होईल तो करावा. नाहीतेपक्षी त्याणी आजणवेलीस बसावे. तुम्ही तो राजपुरीस आहांच, वरकड विचार राजश्री आपानी लिहा आहे त्यावरून विदित होईल. उताविली करावी यैसे नाहीं तो सावे सातवे रोजी आम्ही येऊन पोहोचतो. भेटीनंतर जैसा विचार निघेल तैसा केला जाईल. कृपा केली पाहिजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Pilaji Jadhao writes to Bajirao that he is proceeding to the seat of war by orders of Shahu.*

No. 9] [*24-6-1733*

श्री.

राजश्री बाजीराऊ गोसावी यांसी.

ऽ अखंडितलक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहा कृष्णाजी पवार विस्वासराऊ दंडवत विनंती उपर. येथील कुशल जाणऊन स्वकीय कुशल लिहिले पाहिजे विशेष. गोहा पत्र पहा ते पावले. लिहिला अर्थ कळोन समाधान जाले. गोवलकोटीचे वर्तमान काय व अंजनवेलीस मोर्चियांची तर्तूद कोणे रीतीची जाली आहे ते लिहिली पहा म्हणऊन लिहिले. यैसियासी गोवळकोटास मोर्चे चार नजीक गेले आहेत. रविवारी नवमीस लोक खाडीपलीकडे रात्रीभागी घातले ते जाऊन मेढीयासी ठेपले. मागाहून पाठी पुरोन आली नाहीं. याजकरितां मागें फिरोन आले. पुढेंहि जे तर्तूद होणे ते होत आहे. राजश्री स्वामीनी किले वासोटा येथील येक भांडें पहा ते येऊन पावले. साताराहून सामान सुहा पांच पहा आहेत. तीं घाटाखाले आलीं. आजि दाखल होतील. वरकड दर किलीयासी एकेक भांडें आणून द्यावे यैसी आज्ञा राजश्री पंतप्रतिनिधी व राजश्री पंतप्रधान व राजश्री पंतसचिव यासी जाली आहे. व तुम्हासहि बाणकोटीहून पाच भांडी आणून द्यावी यैसी आज्ञा जाली म्हणऊन लिहा

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आहे. भांडी आली म्हणजे लागू करून मारगीर होईल. स्थळ राा स्वामीचे प्रतापे फते होईल. अजनवेलीस राजश्री जीऊबा व आंगऱ्याकडील दीड हजार माणूस पांच सा तोफा येऊन सोमवारी दशमीस भांडी सुरु जाली तेथेहि मोर्चे कायम जाले. मागाहून राजश्री सेनापती याचीहि फौज रा केली आहे म्हणऊन राजश्री स्वामीची आज्ञा जाली. आपणांस कळावे म्हणऊन लिहिले असे. आपण सविस्तर लेहून परामृश करीत जाणे. लोभ असो दीजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Letter of Krishnaji Pawar to Bajirao giving details about the fighting at Gowalkot. Krishnaji is the adopted son of Tukoji Pawar of Dewas.*

No. 10] [*24-6-1733*

छ २६ सफर

श्री.

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे शेवेसी.

सेवक रघुनाथ हरी कृतानेक साष्टांग दंडवत प्रा विनंती उपरी येथील कुशल ता छ २२ मोहरम आशाढ वदी अष्टमी इदुवासर पर्यंत मो खेड यथास्थित असे विशेष. स्वामीनी दोन पत्रे पाठविलीं ती प्रविष्ट होऊन सविस्तर कलले. अजनवेल व गोवलकोटच्या * * * * अर्थ लिा यैशास आम्हास स्वामीची आज्ञा ते प्रमाण. बकाजी नाईक व आम्ही सामील चिपळूणास जाहल्यावरी राजश्री पंतप्रतिनिधी बहुता प्रकारें गोंजारीत होते, तथापि आम्ही निघोन आलों. त्याचा कारभार अगदी हरदम जाहला. श्रीच्या पर्वतावरी प्रतिनिधी आहेत. सिदीसाद भेटीस आला होता. भेटोन दगाबाजी करून गेला. आतां फिरोन जुझावयाची उमेद धरितो. हबसी कसा आहेसा प्रस्तूत प्रतिनिधीस कळत चालिला आहे. आम्ही बकाजी नाईक जमावानसी निघोन आलों. या उपरी आठापाचा दिवसांत शामल त्याजवरी छपाहि घालितो. दोन हजार माणूस जमाव त्याजपासी आहेत. धोरिणता हरयेक प्रसंगास बाबूराऊ याजवरीच आहे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
अजनवेल तों दूरच आहे, परंतु गोवलकोटचेहि त्याचे वस्तु काही होत नाहीं. दिवसांत शामल बरा अडला होता, उपराला मदत कोठून होणे नव्हती. प्रतिनिधीपंत आले नसते तरी इतकीया दिवसांत आम्ही मोर्चे देऊन भांडीयाच्या मारा खाले येक दोन बुरूज पाडिले असते. आणिखी पंधरा दिवसी कार्यासिधी होती यैसे असतां प्रजेचा भोग सबल व शामल अदृष्टवान तेणेकरून आम्ही निघोन आलो, पुढे भगवदीछा प्रमाण. पर्जन्याचा मोठा अतिशय, येकक नदीवरी तीनच्यार दिवस उतरावयास लागतात. मजल दरमजल येत असो. स्वामीचे दर्शन होईल तो सुदीन. बहुत काय लिहिणे. कृपा वर्धमान करावी हे विनंती.

¶*Raghunath Hari informs Bajirao that he does not think it possible for the Pratinidhi to capture Gowalkot.*

No. 11] [*25-6-1733*

श्रीराम.

राजश्री फतेसिंगबावा गोसावी यांसी.

ऽ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नो. रघुनाथ हरी रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन केले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन सविस्तर कलो आले. अंजनवेलीच्या मनसबियाचा अर्थ आपण लिहिला ऐशास राजश्री प्रतिनिधी गोवलकोटास आले. त्यांचा आमचा बनाव न बसे या निमित्य आम्ही जमाव सहवर्तमान कुलाबियास जावयाचा निश्चय करून चिपळुणाहून आजि भोमवारी खेडास आलों. येथून स्वार होऊन मजल दर मजल पुढें येतो. कलले पाहिजे. बहुत काय लिहिणें. लोभ असो दिल्हा पाहिजे हे विनंती.

¶*Raghunath Hari informs Fatesing Bhosle that having disagreed with the Pratinidhi he has been returning to Kolaba.*

No. 12] [*June 1733?*

श्रीराम.

श्रियासह चिरंजीव राजमान्य राजश्री चिमाजीपंत यांप्रति प्रीतिपूर्वक नारोराम विनंती, येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन केले पाहिजे विशेष. सांप्रत तुम्हांकडून कागदपत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तलेगावास आलेस म्हणून परस्पर वर्तमान ऐकिले, त्यावरून हे पत्र लेहून पाठविले आहे; तरी सविस्तर

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आपणाकडील वृतांत लेहून संतोशावाप्ति होय ते केले पाहिजे. यानंतर राजश्री फतेसिंग भोसले व राजश्री बाजीराव यास कोकणांत राजपुरीस रवाना केले हे वर्तमान परस्पर तुम्हास कळलेच असेल. पुढे त्यास तेथे छावणीस राहावे लागलें. जागा एक प्रकार आपले मजबुदीनें राहावे लागते. लोक जमाव पोख्ता असावा लागतो. येथून वरचेवरी लोक रवाना करणे ते करीतच आहों. राजश्री अंबाजीपंत यासहि सांप्रत माहाराज राजश्री स्वामीनी रवाना केले. राजश्री बाजीराव यांची पत्रे तुम्हांस येतीलच. परंतु ते लांब आहेत, याकरितां हे पत्र अगोदर लिहिले आहे. तरी दोन तीनसे तोफखाना, पायेचे लोक अथवा करोल व तीनच्यारसे सिपाई घोडे, जेथवरी जाईल तेथवरी न्यावे. पुढें पायउतारा होऊन तोफखाना व वरकड मिळोन पाच सातसे माणूस बरे कामाचे त्याजवळी जाऊन पोहचे असे करावे. विलंब न लावणे. पत्र पावतांच ये गोष्टीचा विचार करून, लोक रवाना करून, वर्तमान लिहिलें पाहिजे. जागा एक प्रकार खबरदारीनें राहिल्याविना कार्यास न ये, याकरितां तातडीनें लिहिलें आहे. कळले पाहिजे. त्याजवळ लोक पहिले गेले होते, ते न पुसत आले. जमाव निपट थोडका आहे. जागा कठीण आहे. दगेखोर शामल आहे. प्रजन्यकाल आहे. याजकरितां हे पत्र लिहिले असे. कळले पाहिजे. बहुत काय लिहिणें लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Naro Ram Mantri from Shahu's Court urges Chimaji Appa to send reinforcements to Bajirao into Konkan.*

No. 13] [पो*11-7-1733*

पौ छ १० सफर.

श्री.

पुरवणी राजश्री चिमाजीपंत आपा

गोसावी यांसी.

विनंती उपरी. हुजरातीकडील लस्कर काळोस्तियाच्या मोर्च्यास नेमिले आहेत, त्यास ते घरे बाधोन पागेवरी राहिले होते. ऐशास त्याणी काळोस्तियाकडे जाऊन छावणी करावी. ते अद्यापि तेथे नेहमी गेले नाहींत. आम्ही त्याजला रागे भरलो तेव्हा त्या लस्करपैकी राजश्री खंडराव जाधव व दुर्गोजी भोईटे ऐस दोघे नेहमी मात्र काळोस्तियास घरे बांधून आहेत. मानाजी जाधव अद्यापि पागेवरीच आहेत. वरकड इतर जे आहेत ते दिवसा काळोस्तियास पागेवरून

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
भाकरी नेऊन खाऊन राहतात. रात्रौ फिरोन लस्करास येतात, ऐसा अर्थ आहे. त्याजला अद्यापि भरवसा नवता. आम्ही जाऊन आंगरेकडील लोक आणिले तेव्हां सत्यसे भासले; तो हली प्रजन्यामध्ये राजश्री स्वामीची काल आज्ञा जाली की पागेवरी काळोस्तियाचे लस्करपैकीं सेभर स्वार व दोनसे माणूस व धामणीच्या मोर्च्यापैकीं देखील सरलस्कर वगैरे मिळोन सेभर स्वार व दोनसे माणूस पाठवावे आणि पागेचा जागा राखवणे म्हणून आम्हासहि पत्र आले. त्यांचा जाबसाल आम्ही लिहिला कीं आम्हाकडील लोक आहेत ते महाराजास विदित आहेत; आणि जागा जागा लोक ठाणीयास ठेऊन बदोबस्तहि केला आहे. आणि मोर्चेंहि कायम केले आहेत तेहि वृत सेवेसी विदित आहे. त्याणी अद्यापि मोर्चेंहि घातले नाहींत व कोठे नाकेबंदीसहि लोक ठेविले नाहींत. आणि महाराज त्याचेच रखवालीस माहाराज[1] लोक पाठवावे म्हणून आज्ञा करितात. आज्ञा जाली तरी ठाणेयास लोक ठेऊन ठाणी घातली आहेत. तेथील लोक उठऊन आणून त्याची रखवाली करून; परंतु ठाणी उठऊन आणिल्यास मार्ग चालेल न चाले सर्व विदीत आहे, येसे विनंतीपत्र लिहिले आहे हे वृत आपणास कळावे याजकरितां लिहिले असे. दोनसे राऊत दोही लस्करपैकी व चारसे माणूस दोही लस्करपैकी ऐसे पागेवरी ठेऊन वरकडानी काळोस्तियावरी जावे ऐसा मनसबा राजश्री स्वामीनी करून प्रस्तूत आज्ञापत्रे पाठविली आहेत. त्यापैकी आम्हाकडील जाबसाल इंदन्याये जाला. तिकडील लस्करचे कोण राहतील कोण जातील हा सर्व मनसबा अद्यापि होणेच आहे. चौघे जण चौकडील आहेत. एकाचे ऐकत नाहीं. तिकडे जाधव आहेत ते आपला कंठशोश कर्तव्य त करितात, परतु परिणाम इंदन्याये आहे. सविस्तर वृत आपणास कळावे याजकरितां लिहिले असे. विशेष काय लिहिणे, कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Some officer working in the campaign complained to Chimaji Appa about the conflicting orders received from Shahu direct.*

No. 14] [*11-7-1733*

पौ छ १० सफर.

श्री.

पु॥ राजश्री चिमाजीपंत आपा

गोसावी यांसी.

विनंती उपरी. आपणाकडील येथे जमाव आहे त्याचा तपशील पेशजी एकदोन वेळा लेहून पाठविलाच आहे. त्यावरून श्रवण जाहालाच असेल.

---

१ हा शब्द जास्त पडला आहे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
त्याज अलीकडील वर्तमान तरी पांढरे, गाईकवाड व लाड याचे राऊत तो कुली उठोन गेले. एक एक दोन दोन कोणाकोणाचे आहेत तेहि न पुसत. आजाराच्या धास्तीमुळें उठोन जातात. येथे धायभराचे पथक आहे त्यामध्ये चाळीस पनास राऊत आहेत, परंतु कुली दुखणेयाने पडिले आहेत. स्वारीस बाहेर निघतां दहावीस निघणार नाहींत. येथें राऊत म्हणावयासी दोन चार आमचे आहेत व देशमुख खासा एक दोन व मागे राऊत सात आठ जण इतुके भांडवल आहे. शत्रु दगेखोर आहे तोहि आपणास विदितच आहे. राउताविसी आम्ही वरचेवर लिहित गेलो परंतु अद्यापि राऊत येऊन येथे पोहचले नाहींत. तरी येथे राऊत सत्वर येऊन पोहचत ते केले पाहिजे. कोणी राऊत अगर खासा येंदां रिकामे घरी होते ऐसा अर्थ नाहीं; परंतु ऐसे असोन गोवलकोटची मसलत आली ती निभावली पाहिजे. याजकरितां दोनसे राऊत आगत्यरूप पाठविले पाहिजेत. सिलेदार आहेत ते यावयासी अनमान करतील तरी आधी आपली पागा रवाना करावी, मग सिलेदारहि रवाना करावे, परंतु राऊत अति-सत्वर येत ते करावे. येथील सोबती आहेत त्याची वर्तणूक पत्री लिहावी ऐसा अर्थ नाहीं. विशेष काय लिहिणें. कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Some officer asks more reinforcements for the fight against Gowalkot.*

No. 15] [*16-7-1733*

छ २४ सफर

श्री.

राजश्री पंतप्रधान स्वामी गोसावी यांसी.

॥ श्रीसकलगुणालंकरण अखंडीतलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकीत बकाजी नाईक माहाडीक कृतानेक रामराम विनंती येथील कुशल जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. आपण कृपा करून पत्र पा ते का चिपळून येथे प्रविष्ट होऊनु बहुत समाधान जालें. अजनवलीस मुर्चबदी केली आहे म्हणोन यैकितो त्याचे वर्तमान काहीच लेहून पाठविल नाहीं; व श्रम साहास तुम्ही कराल आण राजश्री पंतप्रतिनिधी आले आहेत हे येशास पात्र होतील तो विचार न करणें म्हणोन कितेक नीतिन्याये आज्ञा लिहिली. येशास स्वामीने जो विचार लेहून पाठविला त्यास किमपि अतराये नाहीं. जजिरे सुवर्णदुर्गीहून अजनवेलीचे कार्येभागास निघालो ते श्रीभार्गवस्थलावरून येतां गोवलकोटची स्वारी श्रीस्थळी येऊन अनाचार करणार व ब्राह्मणाचे घरचा गला व घरे दगध करावयास स्वारी

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
आली. हे वर्तमान मार्गी कलल्यानंतर श्रीस्थळी येऊनु, गनिमाचे स्वारीचा दाखला घेऊनु, युध्य प्रसंग केला त्याचा मोड करून, सेपनास माणूस त्याचे मारले. त्याउपर अजनवलीस तैसेच जावे तर श्रीस्थळी गोवध करणार हे तत्वता कळले. यास्तव गोवलाचे कोटास गाठून बसलो. दहा पाच रोज जाले. भाडी आणून जोगवितो. राजश्री प्रतिनिधी श्रीस्थलीं आले तेच रोजी अजनवलीहून सिदीसाद बारा पधरासे माणसानसी येऊनु आम्ही चारपांचसे जमावानसी जेथे होतो तेथे चालोन आला. आम्हाजवळ भाडे नव्हते त्याणी भाडी व जेजाला बाण होके जबूरे याची मारगिरी बहुत केली. त्यामुळें आपलेकडील लोकांचा मोड जाहल्यावर नदीआरता गनीम चालोन आला. केवल निदान वख्त यैसा जाहला तेव्हां खावंदाचे स्मरण करून गनिमावर चालोन घेतले. पधरावीस माणूस ठार केले व पचवीस तीस जखमी केले आण गनीम नदी आलाड आला तो माघारा नदीपार करून लाविला. आपलेकडीलहि येक सरदार व दाहावीस जखमी जाले. खासा सिदीसाद आला. त्याचे मोड व्हावा येसे नव्हते. परंतु धन्याचे पुण्येकरून हे गोष्ट थोरसी जाहली. त्या अलाकडे आम्ही चिपळूणात आलों. राजश्री प्रतिनिधी श्रीस्थळी आहेत. सिदीसादकडे राजकारण लाविले आहे. भेटीसहि सिदीसाद आला होता. सातारा जावयाची बोली घातली. त्यास येकवेळ भेट घेऊनु पुन्हा गोवलकोटांत सिदी गेला. पुढे त्याची याची बाली लागली असे. आम्ही प्रतिनिधी आल्यानंतर ये जागा बसावे यैसा अर्थ नाहीं. निघावयाचा मार केला. त्यास अजनवेल अगर गोवल दोघा किल्यातून येक किला तुम्हास देतो म्हणोन म्हणतात. त्यास येखादे ठिकाण स्वतंत्र आमचेच स्वाधीन केले. त्याचे लोक अथवा कोणी नसेल तर आम्ही मान्ये करून राहतो, नाही तर ठिकाणचे ठिकाणी स्वार होऊनु जातो. निरार्थक राहावे येसे नसे. समई स्वामीनेहि आज्ञा केली त्याचप्रमाणे वर्तणूक करून. निरंतर पत्री समाचार घेणार स्वामी समर्थ आहेत. विदित जाले पाजे छ १५ सफर हे विनंती.

¶*Bakaji Naik to Bajirao giving details of a skirmish he had with the Siddi near Chiplun.*

No. 16] [*16-7-1733*

श्री.

राजश्री मानाजी आगरे गोसावी यासि

ऽ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्रो बकाजी नाा माहाडीक नामजाद प्रां जंजिरे सुवर्णदुर्ग रामराम विनती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

कुशल लेखन करीत असले पाजे विशेष. पत्र पा ते पावोन सामाधान जाले. राजश्री पंतप्रधान याचे पत्र पा ते पावले. त्याचे उत्तर लेहून पा असे. अजनवेलीचे कार्ये-भागास निघालो हातो; परंतु दरम्याने श्रीभार्गवराम येथील स्थलास गोवलकोटकर काही उपसर्ग गोवधाचा करणार यास्तव गोवलकोटास गाठून बसलों, तो सिदी-साद बारा पधरासे लोकानसी चालोन आला. आम्हाजवल तोफ नव्हती. त्याणी तोफाचा व जेजाटा (ला?) बाण होके याची मारगीरी केली, त्यामुले इकडील मोड जाहाला. हे गनिमाने देखोन नदी आलाड चालोन आला. केवल निदान वख्त आम्ही च्यार पाचसे माणसानसी होतो. त्यास मोड जाहाला तो सावर करून तैसेच गनिमावर घेतले. पधरा वीस त्याचे मारले व पचवीस तीस जखमी केले. आम्हाकडीलहि एकजण बावाजी तलवणार ठार जाहाला. पधरा वीस जखमी जाले. चारदा खासा सिदीसानद याचा मोड खावदाचे पुण्ये करून केला. हे संतोशाचे वर्तमान आपणास कळावे म्हणोन लिा आहे. बहूत काये लिहिणे. लोभ असो दिल्हा पाजे छ १५ सफर हे विनंती.

¶Bakaji Naik gives Manaji Angre details of a skirmish he had with the Siddi near Chiplun.

No. 17] [*16-7-1733*

पौ छ २४ सफर

श्री.

राजश्री पिलाजी जाधवराऊ गोसावी यांसी.

ऽ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित बकाजी नाा महाडीक नामजाद प्रां जंजिरे सुवर्णदुर्ग रामराम विनंती. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन केल पाजे. विशेष आपण पत्र पाठविले ते पावोन सामाधान जाले. यैसेच सर्वदा पत्र पाठऊनु सतोश पावित असिल पाजे. वरकड राजश्री पंत-प्रधान यांचे पत्र पा ते पावले. त्याचे उतर लेहून पा असे. त्याजवरून कळो येईल. बहुत काय लिहिणे, लोभ असो दिल्हा पाजे, रा छ १५ सफर हे विनंती.

¶Bakaji Naik Mahadik, an officer of the Angrias, to Pilaji Jadhav, acknowledges letter of the Peshwa.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 18] [*16-7-1733*

नकल

श्री.

श्रीमंत माहाराज राजश्री छत्रपती स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक संताजी जाधव व दुर्गोजी भोइटे कृतानेक विज्ञापना. ता छ १९ सफर मुक्काम लस्कर पागा चिपळोण स्वामीचे कृपेकरून सेवकाचे व लस्करचे वर्तमान यथास्थित असे विशेष. संताजी सिरके व राणोजी भोसले घर हुजरे महाराजांची आज्ञापत्रें घेऊन आले. त्याबराबर लस्करची गणती व कुली तपसीलवार वर्तमान ऐसे लिहिले आहे. त्यावरून निवेदन जालेच असेल. त्याजवर सालोसकर अवघे खासे गेले. दहा पंधरा घोडी मात्र ठेविली आहेत, व रा द्वारकोजीराऊ पाटणकर यांचे लोक होते ते पोटास मुतलेख[1] नाहीं यामुळें तेहि झाडियानसी गेले. हणगोजी बोरगे यास समाधान वाटत नव्हते, यामुळें ते खासा खातगुणास म्हणोन कांही जमाव होता त्यांतीलही थोडा बहुत घेऊन गेले. तैसेच वरकडांचेहि थोडे बहुत स्वार गेले. याउपरी दोनसें घोडे राऊत मात्र आहेत. वरकडहि लहान तटु ठार (तटूवार? तटूस्वार?) चाळीस पंन्नास पावेतो असतील. रा येसाजी अनंत यांचा जमाव सासें माणूस होते; त्यांस तीन रुपयांचा सिरस्ता आइकतांच उठोन गेले. दोनअडिचसे माणूस होतें. त्यास ते बावाजी म्हसके याचे कुमकेस पाठविले. या उपरी पाये लोकांचा जमाव लस्करांत नाहीं. कांही राजश्री राणोजी भोसले यांजकडील आहेत परंतु ते त्याजवळच तितके पाहिजेत. व हणगोजी बोरेग याजकडील सेपंन्नास माणूस आहे. व राा जयसिंगराऊ सिरके हे मिरजोलीस आपले जमावानसीं आहेत. आंगरियाकडील जमाव कालुस्तरियास मोर्चेबंदी करून आहेत. परंतु सांप्रत शामलाच्या हुली रोज उठोन तीहिकडे पडतात. आंगरियाकडील जमावाचे च्यारपाचसे माणूस सीतज्वरानें पडिले आहे. व येसाजीपंत याजकडील सेंभर माणूस पडिले आहे. तैसेच राा जयसिंग सिर्के यांचे जमावाचे दोनसे माणूस पडिले आहे. लस्करांत आम्हाकडीलहि जमावाजमावाचे माणूस जेर जाले आहे. तीन्ही मोर्चे मिळोन निमे माणूस दुखणियांनी बेकार[2] आहे. आणिकहि रोजाचारोज पडतच आहेत. आपणास देखिल दुखणियांनीं हैरान केले आहे. ऐसा प्रसंग घडोन आला आहे. ईश्वर शरम कैसी राखेल ते नकळे, याहिमधें दाणा मुतलख मिळत नाहीं. कदांचित मिळाले तरी दोन अडीच पाईली मिळणें मुसकील आहे. येविसीं दोन च्यार

---

१ मुतलख–मुळींच. २ बेकार–हैराण.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

वेळां विज्ञापना लिहिली, महाराजांनाहि जागाजागा ताकीद करविली, परंतु येथें मुतलख रस्त पोहचली नाहीं. यामुळें बहुत लोक श्रमी आहेत, याची पैरवी[1] करून पाठवावी व फौजेची रवानगी करावी; नाही तर गनीम दगेखोर आहे. एखादे मोर्चियावरी पडला आणि आब गेला म्हणजे संकट आहे. याची बेहबुधी[2] करणार माहाराज समर्थ आहेत. सेवकानें कोठवर लिहावें! माहाराजांनी आंगरियाकडील जमावास अडिच हजार रुपये कृपा करून दिल्हे, यामधें या महर्गतेमधें बेगमी होते यैसे नाहीं. प्रज्येन्य तो अतिवृष्टी लागला आहे. नद्यानाले यास मुतलख उतार नाहीं. ऐसी चहुकडून मुसकील जाली आहे. व कासीबंदर इकडे कुली[3] रान[4] गनिमास रिकामे आहे. यामुळें घाटापावेतो गनिमाचा सेह आहे. यैसियास तिकडील मोर्चेबंदीस माहाराज सत्वर जमाव पोख्ता हशम दोन हजार व पाचसें स्वार नेहमी पाठवितात तर गनीम केवळ जेर होतो आणि आमचेहि मदतीस व राजा जयसिंगराऊ यांचे मदतीस ऐसा आणीक जमाव पाठवावा म्हणजे दिवसेंदिवस जो पोख्ता मोर्चेबंदीचा विचार कर्तव्य तो केला जाईल; व उतेकर व पेडामकर व पलांडे वगैरे खलाटीचे लोक आहेत, त्यास तिवरा व कुंभारली दोन्ही घाटांची ताकीद करविली पाहिजे; आणि रस्त सत्वर लस्करास पावेते करणार स्वामी समर्थ आहेत. राजश्री द्वारकोजीराऊ पाटणकर यांची स्थापना वतनाची करून त्यास येथें सत्वर रवाना करावें. तेहि आमची धडसोबती[5] आहेत. आणि कितेक विवेकाचे आहेत. त्यांचे ऊर्जीत करणे स्वामीसहि आगत्य आहे. स्वामीकार्याचे एकनिष्ठ आहेत. आमचेहि खर्चाची बहुत हैरानगत आहे. आम्हांस तो महाराजांचे चरणाखेरीज दुसरा आश्रय नाहीं. सर्व फिकीर करणार महाराज धणी मायबाप आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ति. महाराज! लस्करामधें मुतलख दारू सिसें नाहीं. नदीयास टोकरे[6] नाहीं. तर दारु सिसें व टोकरे व चंद्रजोतीची दारु यैसी सत्वर रवानगी करावी. गनिमाची आवाई बहुत बहुत आहे. अंजनवेलीकडून पायेउतारा निवड करून एक टोळी यणार व गोवलकोटात भारी जमाव होता. त्यापैकीं कांही जमाव नेला आहे त्याची येक टोळी ऐशा दोन टोळ्या वरलेकडून येणार, येक टोळी गोवलातील निघावी, येकूण खामखा[7] येके मोर्चावरी या चौ रोजांत घालितात हे तहकीक[8] आंगरियाचे मोर्चियामधें आली. त्यांनी

---

१ पैरवी—व्यवस्था.
२ बेहबुधी—तरतूद.
३ कुली—सर्व.
४ रान—प्रदेश.
५ धडसोबती—शेवटपर्यंत टिकणारे सोबती.
६ टोकरा—पडाव.
७ खामखा—खात्रीनें.
८ तहकीक—सत्य, निश्चित.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

रोजाचा रोज आम्हास सावधतेमधें असणे म्हणून चिठ्या पाठवितात. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति. बजिनेस चिठी सेवेसी आजची पाठविली आहे. विदीत जाले पाहिजे हे विज्ञाप्ति.

¶*Santoji Jadhao communicates to Shahu the difficult predicament of the fighting forces in the campaign against the Siddi.*

No. 19] [*18-7-1733*

छ २६ सफर.

श्री.

राजश्री पंतप्रधान.

स्वामी गो यासि.

ऽ श्रीसकलगुणालकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये स्नेहांकित बकाजी नाा माहाडीक नामजाद प्राा जजिरे सुवर्णदुर्ग कृतानेक रामराम विनती. येथील कुशल जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाजे विशेष. आपण पत्रें पाठविली तें पावोन साद्यतवृत कलोन समाधान जाले. अजनवेलीस जाऊनू मूर्चबंदी करून बैसलेत तो राा श्रीपतराऊ गेले. ते तुम्ही येक होऊनू काम करितां म्हणोन कलो येते. तर हे गोष्ट कार्याची नव्हे. आपले राजकारणात दुसरेयाचा पाये सिरू देऊ नये म्हणोन कितेक प्रकारें आज्ञा केली. यैशास अजनवेलीचे कार्याबदल आलो होतो. त्याचा सविस्तर अर्थ पेसजी जोडेकरी यासमागमे लेहून पाा आहे. त्याजवरून कलो आलोच असेल. वरकड आपण नीतिन्याये लेहून पाठविला तो यथार्थ असे. त्यास अंतर आहे यैसें नसें. वरकड आपले राजकारणात दुसरेयाचा पाये सिरको द्यावा ही गोष्ट आजताा होऊनू आली नाही, व याफुडेहि धन्यांच्ये पुण्येकरून त्याचप्राा चालेल. यास अंतर सर्वथा होणार नाही. सारांश स्वामीचे लिहिले आज्ञेप्राा कर्तव्य विचार करून उपस्थित मनसबा केला, त्याची साड केली, आण राजश्री प्रतिनिधी यांस साफ सागोन आपले जमावानसी निघालो. असो, च्यार पाच रोजी जजिरे माारी दाखल होऊनू जे स्वामीचे आज्ञा तेच राजश्री सरखेल साहेबाची समजोन कर्तव्यार्थ तो केला. सविस्तर आपणास विदित व्हावे म्हणोन लि॥ आहे. कृपा वर्धमान करावी. छ १७ माहे सफर हे विनती.

¶*Bakaji Naik informs Bajirao that he has disagreed with the Pratinidhi and is returning to Suvarnadurg.*

---

१ बजिनस—खुद. घरे हुजरे ?

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 20] *[18-7-1733*

छ २६ सफर

श्री.

राजश्री पिलाजी जाधवराऊ गोसावी

यासी.

ऽ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित बकाजी नाा माहाडीक नामजाद प्रां जंजिरे सुवर्णदुर्ग कृतानेक रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणुन स्वकीये कुशल लेखन करीत असिले पाहिजे विशेष. आपण पत्र पाा ते पावोन समाधान जाले. येसेच सर्वदा पत्र पाठऊनु परामर्श घेत जावा. आपण राजपुरीस आल्याचे वर्तमान लिाले, त्याजवरून हर्षयुक्त समाधान जाले. मनसबियाचा अर्थ राजश्री पंतप्रधान याणी लिाला असे. त्याजवरून कर्तव्य ते करणे म्हणोन लिा. येशास जे राजश्री पंतप्रधान याणी आज्ञा केली त्याच प्रो कर्तव्यार्थ करून * * मनसबा त्याची * * देऊनु निघालो. तर खावंदाचे पुण्येकरून होणे ते होऊनु येईल, आपणास कळावे म्हणोन लिा आहे. बहुत काय लिहिणे रा छ १७ सफर हे विनंती.

¶*Bakaji Naik to Pilaji Jadhao welcoming the latter's arrival at Rajpuri.*

No. 21] *[19-7-1733*

पौ छ २२ सफर

श्री

अखंडितलक्षुमीआलंकृत राजमान्य राजश्री बाजीराव बल्लाळ

गोसांवी यासि

प्रतिपूर्वक लक्षुमीबाई विनंती उपरी. येथील कुशल ताा आशाढ वदि पंचमी भृगुवार पावेतो जाणून स्वकीये कुशल लेहून पाठवीत गेले पाहिजे. यानंतर आपण पत्रे केसो भिकाजी व रत्नाजीराव खोपकर याजसमागमे पाठविली ती

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
पावोन लिहिले वृत कलो आले. पूर्वी येक दोन वेल लिहोन पाठविलें की रा श्रीपतराव अ (जन?) वेलचे मोइमेस गेले आहेत. रा बकाजी ना व ते येक हाते होऊन कार्य करितील याजकरिता त्यास जजिरा आणवावे. श्रम आपण करून येस त्यास नवजे हे गोष्ट न करावी म्हो कितेक तपसिले लिहिले ते कलो आले. त्याजवरून रा बकाजी ना यासि लेहून पाठविले की तुम्ही जंजिरा येणे; त्याजवरून त्याणी यावयाची तयारीमध्ये जाहाले, तो रा पंतप्रतिनिधी याणी भेटीचा मजकूर घालून सागोन पाठविले की तुम्ही चिपलुणास भेटीस येणे. त्याचे प्रतिउतर बकाजी ना याणी दिल्हे की खावंदाचे हुकुमाखेरीज भेटता येत नाही. गोवलकोटचे मनसबेयासि आलो होतो. परंतु आपण आले. आतां आम्ही कशास राहावे, निघोन जंजिरा जातो. त्याजउपरात दुसरे दिवसी परशरामीहून उठोन चिपलुणास बकाजी ना याचे भेटीस चालोन गेले. बकाजी ना यांचे चिती भेट घ्यावयाची नवती. परंतु चालोन आले. याजकरितां भेट घेतली; आणि बोली केली की, आम्ही कोट घ्यावयासि आलो; आणि आपणहि आले. तर दोहो जागेयातील येक जागा आमचे स्वाधीन करावा. येकें स्थली आपण बसावे, यैसे बोलिले. यावर रायानी उतर दिले जे आम्ही आजी परशरामी जातो आणि विचार करून. तुम्ही प्रातःकाली परशरामी येणे. तेथे सांगावयाचे ते सागोन. ऐसी बोली करून परशरामी आले. दुसरे दिवसी बकाजी ना ते स्थली आले. विचार काये तो सागणे. नाहीतर आम्हास जंजिरा येणे म्हौ बाईसाहेबाची आज्ञा आली असे. आम्ही निघोन जातो असे सागितले. यावर प्रतिनिधी याणी उतर केले की, तुम्ही नव जाणे. सारे मिलोन माहाराजाचे निशाण चटऊ. ऐसा जाब दिला. यावर बकाजी ना बोलिले जे किला येक आमचे स्वाधीन कराल तर हस्तगत करून. नाही तर जातो ऐसे पष्टवादे सागितले. यावर राव बोलले की जागे तुम्ही आम्ही मिलोन जागे फते करून करून सातारेयासि गेलेयावर माहाराजाजवली आर्ज करून जागे व मुलूग तुमचे स्वाधीन करितो ऐसे बोलले. परंतु त्याचा विस्वास नाही याजकरितां बकाजी ना याणी उतर केले जे हुकुमाप्रमाणे आम्हास जावे लागते. ऐसे सागोन आपले डेरेयासि चिपलुणास गेले; तों दुसरे दिवसी श्रीपतराव याणी सिदीसाद यासि भेटीस आणावयाकरिता पालकी पाठविली. त्याणी दादोबा नाईक व बालकृष्ण सेणवी ऐसे मध्यस्तीस घालून दोन तीसे जमाव गलबतावर घेऊन भेटीस आला. राव परशरामी होते सिदीसाद* * * * परशरामी आला. खाडीचे दरेवर उतरला. गलबते नजीक धरली. रायाचे भेटीस * * * * नये तेव्हा राव परशरामाचे देवालयातून

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

उठोन खाडीवर भेटीस गेले. तेथे भेटी जाहाल्या. उपरात रायानी मजकूर घातला की, जागेयाच्या मोईमीस माहाराजानी रा॥ केली असे. जागे आमचे स्वाधीन करावे यैसे बोलले. त्याउपर सिदीने उतर केले की आम्ही पोरके जाहालो. सारी स्तले घेतलीत. ही दोनी स्थले आहेत ही आपलीच आहेत. बकाजी नाईक आले. याणी आमचा फार नाश केला. सेखाचे दोहो झुजा मिलाले. लोक मारिले. ये वख्ती त्याणी चाल करावयाची नवती; आण केली. परंतु ते उठोन गेलेयावर जागे तुमचे स्वाधीन करितों म्हणऊन बोलोन गेला. बकाजी नाा याणी रायास पूर्वीच सागितले की आम्ही जातो. त्याजवरून बकाजी नाईक जातात असे सिदी सातास कललियावर वर आला. ते समई रायाचा * * * देखलियावर दुसरे दिवसी लेहून पाठविले की जागे आहेत हे तुमचेच असेत परंतु प्रस्तूत निशाण घेत नाही. दो महिनेयाने दसरा जालियावर घेईन म्हो लि॥ आणि कागद रायास पाठविले. याणी कागद वाचून फाडून टाकिला, असा अर्थ त्याचा जाहाला. याजकरिता काही मोर्चेयाची तयारी करून वरील किलेयाची भाडी आणावयाकरितां लोक रा॥ केले असेत. रायाच्यानी मोरचेबंदी करून भांडवते असा अर्थ दिसोन येत नाही. बरे जे होईल ते दुरून पाहावे, या अर्थे बकाजी नाा निघोन येतील आणि ते फजीत पावतील, असा अर्थ आहे व रा॥ रघुनाथ हरी चिपुलणास जयेगडीहून आले आहेत. समागमे भाडी आणी [त] होते परंतु ऐसा प्रसंग जाहाला. याजकरितां भाडी माघारे पाठऊन ते व बकाजी नाा असे जंजिरा येतील व आपणहि केसो भिकाजी व रत्नोजीराव यासि सिदीकडे पाठविलेत. ते येथे पावतांच चिपुलणास रा॥ केले असेत. जागेयास पावले असतील, आपणहि सिदीस पु * ता दिली आहे. याहि अर्थ प्रतिनिधीचा तग तेथे निघता दिसत नाही. हे सविस्तर वृत आपणास कलावे याजकरितां लि॥ असे. राजश्री बकाजी नाईक याणी रायासि सांगितले की, तुम्ही माहाराजाचे चाकर व आम्हीहि चाकर; तुम्ही येक जागा घेणे, येक जागा आम्ही जेर करून घेतो. ते म्हणतात की दोनी स्तलावर माहाराजाची निशाणे चडवावी लागता [त]. याजकरितां व आम्ही येणे म्हौ लि॥ याजकरिता निघोन येतील हे वर्तमान तुम्हास कलावे याजकरितां लि॥ असे. बहूत काय लिहिणे. कृपा आसो देणे रा॥ छ १८ माहे सफर हे विनंती.

¶*Laxmibai Angre to Bajirao gives important details of the Pratinidhi's dealings with the Siddi, his disagreement with Bakaji Naik, and other matters of the campaign. The letter contains an important resume of the whole affair.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 22] [*19-7-1733*

छ २३ सफर

श्री.

पुरवणी राजश्री बाजिराव बलाल पंडित प्रधान यांसि

प्रतिपूर्वक लक्ष्मीबाई विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिा असिले पाहिजे विशेष. सिदीसाद याचे उमेदवारीचा अर्थ तपसिले लिा असे. आपण स्वस्तचितेकरून पत्र श्रवण करून गैर उमेद होऊन सत्रू फजीत पावे तो अर्थ करावा. प्रस्तुत त्याचे चितीं असे कीं, राजश्री पंत प्रतिनिधी आले असेत. यांजसमागमें चार्तुमास विजया दशमी पावेतो किले तुमचे स्वाधीन करीत नाहीं. विजया दशमी जाल्यावरी दोनी स्थले तुमचे हवाला करून, ऐसे लौकीक अर्थे म्हणतो. परंतु बारिकाईने खबर घेतां त्याचे मनातील अर्थ ऐसा असे कीं, चातुर्मास ममता दाखऊन पुढे समुद्रास निवाती जाल्यावरी अर्कटास अरमार मोगलाचे असे, त्याचा सज करून सुर्तेस अरमार तयार केले असे, ते व हे येकत्र करून, काही जमाव आणऊन, खुसकीने व पाणियातून ऐसा दुतर्फा शह देऊन, माघारे फिरोन जात ऐसें करावें. ऐशा कितेक गोष्टी त्याणे योजिल्या असेत तर ऐसियासी शत्रूस आजीपासून बंदावरी ठेविल्याने हालखुद राहेल. नाहीं तर गनीम मायावी असे. काय करील न करी हे म्हणवत नाहीं. सुर्तेस शामलाचे ठाणे असे. त्यासी आपणाकडील अमलदार कोणी तेथे असतील त्यांसी ताकीद पत्र पाठऊन सत्रूचे लोकास बंद होई आणि अरमाराची काही तयारी जाहाली असिली तर त्याचा नाश करून प्रयोजनाचे नव्हे सारखे करावे. लोकांस बंद जोवरी ठेवावे ऐसे आपले अमलदारास ल्याहावे आणि त्यासी बंद जे होई ते गौष्ट करावी व अर्कटासहि मोगल असे त्यासी पत्रें पाठवावी की सिदीसाद यांज सांगाते सुलाखतखाने अरमार व जमाव देऊन मदतीस येणार म्हणौन परस्परे ऐकिले. त्यासी तुझा आमचा घरोबा चालत आला असतां शामलासी सूत्र करून त्याचे मदतीस येणार हे गोष्टी तुझे चितीं असिली तर बहूत बरे. तूर्त शामलावरी माहिमेस आलो असों हे काम येकीचकडे ठेऊन तुजवरीच मोहीम करून नस्तनाबूत केला जाईल. ऐशा कितेक गोष्टीने त्यासी लेहून पाठऊन तो न येई तो अर्थ केला पाहिजे. आम्ही अर्थ लिा असे. हा अर्थ आपण चिती * * पत्रदर्शनी दोही स्थलीं जोडेकरी रवाना करावे विस्तारे आपणांसी ल्याहावे सारिखे नाही. इतका तपसील ल्याहावयासि कारण कीं, गनिमास कुमक आल्यासी

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

गनीम जेर होतो हे गोष्टी तो सहसा होणार नाहीं. जरूर समजोन लिा प्रो पत्र पावतांच जोडे रवाना करणे, येविशीं विस्तारें ल्याहावें तर आपण सर्वज्ञ असेत. बहूत काय लिहिणे रा छ १८ माहे सफर हे विनंती.

¶*Laxmibai Angre to Bajirao giving details of the Pratinidhi's overtures of peace with the Siddi.*

No. 23] [*20-7-1733*

छ २३ सफर

श्री.

राजश्री बाजीराव पंडित

प्रधान दाजी गोसावी यांसि.

सकलगुणालंकरण अखडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रो सेखोजी आगर सरखेल रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लेखन केले पाहिजे विशेष. उंदेरीस इंग्रज पैवस्ता होऊन जंजिरेयाची (पुढे १ ओळ फाटली) आहे त्यावरून कललेच असेल. आलाकडील वर्तमान मनास आणिता मुबैकराने तर मना करून आरमारची व जमावाची तयारी करीत आहे. तैसाच फिरंगी वसइ दवण ये जागा मुस्तैद जाहाला. सुरतेस शामलाने जमाव ठेऊन अरमार तयार केले. त्रिवर्गाचा येक हात जाहाला आहे. निवाती पाहून श्रावणमासामध्यें किंबहुना पंधरा दिवसा आलीचकडे कुलाबा खांदेरी हिराकोट ये जागा येऊन वेढा घालावा. राजकोट चेऊल येथील विचार फिरंगियानें मनास आणावा. चौबुर्जीवरी इंग्रजाने येलगार करावा. नस्तावर मोठी तरांडी ठेऊन अरमारास शह द्यावा. येथील जमाव राजपुरीस व अंजनवेल प्रांते गुतला आहे. याच संधीत येलगार केला म्हणजे राजपुरीचा जमाव कुलाबाचे मदतीस येईल. अरमारचे दरखी माणूस ये जागा आलियावरी राजपुरीचा उपराला करून जमावाच्या बले तडीस उतरोन युधप्रसंग करावा. यैसा विचार केला आहे म्हणौन तहकीक वर्तमान कलो आले. इंग्रज टोपीकर त्यास सामील व्हावया कारण शामलाचे निर्मूल जाहालियावरी अनुक्रम आपलाही विचार याच प्रकारे होणार; यास्तव शामलास सामील जाहाले आहेत. यैशास विचारे पाहातां येथील जमाव जागजागा उतम आहे. याच संधीत गनीम सिताबी करून जागेयाचे गला पडेल. गनिमास यावयास दूर आहे यैसे नाहीं. प्रहराचा मार्ग, मुंबै गोले-

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

याच्या टपेयावरी उंदेरी व रेवदंडा संनिधच आहेत, येथे अरमारकरी वगैरा च्यार-पाचसे माणूस चौबुर्जी व बंदरकिनारा गुंतले. वरकड जागेयाहून बलकुबलीस जमाव आणावा तरी पेशजीच मसलतीच्या कार्यास रा॥ केले. गाठ पडिली तरी समई तमासा पाहावा यैसी संधी घडोन आली आहे. येथील खबरदारी मजबुदी होऊन हजारपंधरासे जमाव बाहेर उपरालियास व अरमार सजुदे असिल्याने तेथील उपराला होऊन मन-सबियाची उभारणी होईल. येथेच शह बैसला तरी ते जागाचा कार्यभागास अंतर पडो शके. यास्तव सविस्तर आपणास कलावे म्हणोन लेख केला असें. ये विशीचा विचार चितात आणून राजश्री पिलाजी जाधवराऊ यासी तीनच्यारसे जमावानिसी ये जागा रवाना करावे. मारनुले आलियावरी त्यांच्या आमच्या विचारे तरतूद करणे ते करून आपणास लेहून पाठऊन. व जमावाचा गाहा करून आठदाहा रोज मानमार्ग पाहून, जाधवरायास रवाना करून. कललें पाहिजे. जाणिजे रा॥ छ १९ माहे सफर बहुत काय लिहिणें. कृपा असों दीजे हे विनंती.

शिक्का

मोर्तब
सुद.

¶*Sekhoji Angre to Bajirao explains the difficulties of the Campaign owing to the enemy's combination.*

No. 24] [*20-7-1733*

छ २३ सफर

श्री.

पुरवणी राजश्री बाजिराव

पंडित प्रधान दाजी गोसावी यासी.

विनंती उपरी. मुख्य पत्रावरून टोपीकराकडील साद्यंत वर्तमान कलेल. जंजिरेयावरी येलगार जाहालाच आहे; परंतु येकाकी आयास येतो यैसे नाहीं; उदेरीचा उपराला व्हावा तो प्रसंग विलेस लागला. अजनवेलीकडून होणार त्यास इकडील जमावाचा शह. दुसरे राजश्री प्रतिनिधी गेलेच आहेत. यास्तव

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

त्याचे स्थल त्यास सांभालिता प्रयास होणार. तोहि उपराला होत नाही. इंग्रज फिरगी सुरतवाला शामल येक हात करून कुलाबियास शह देऊन जंजिरेयांचा उपराला करितील. त्या उपरालीयाने टिकाव नव्हे; तेव्हां जंजिरेयांत टोपिकराची मदत घेतील अथवा स्थलहि त्यास देतील. येवढेहि साहास करावया चुकणार नाहींत. तेव्हा टोपीकरावरी मोहीम करावी लागेल. कुलाबियास शह देतील तेव्हा अरमारचा उपराला ते जागा पावणार नाही. यैसा प्रसंग पडेल ते समई तेथील अरमारचा जमाव अरमार सजुदे करावया आणावा लागेल. अथवा आपण रा करितील आरमार तयार करून विजयदुर्ग प्रातीचे आरमार उपरालीयास आणऊन टोपीकराच्या आरमाराचा दाखला करून निघावे. तेव्हां नस्तावरील गनीम पाठीवर जाईल. नस्त मोकले जाहाले म्हणजे येथील गुराबा पाठीवर जाऊन दोनी आरमारचा येक हात करून त्यास गांठावा, माघारें पायाच्या जमावानिशी मुबैत सिरोन येलगार करावा. वरघाटच्या फौजा फिरंगणात रवाना कराव्या. जंजिरेयास मोर्चेबंदीची मजबुदी व जमाव ठेऊन येकसमयावछेदे चहूकडून यालगार करून जागजागा गनीम बुडऊन पायबंद द्यावे. जंजिरेयावरी येलगार करावा. तेव्हां साहासे कार्यसिधी होईल व टोपीकरहि तहास येतील यैसे मनसबे प्राप्त होतील. सश्याचे पारधीस वाघाचे पारधीचे साहित्य असावे यैसा आहाणा आहे. याजकरितां कुडालकर सावंत याजकडील दोन तीन हजार नली व वरघाटचे कानडे प्यादे च्यार हजार आणवावयाचा विचार करून राजश्री स्वामीस विनंती पत्रे पाठवावी आणि अविलंबेच जमाव येऊन पोहोचे व इग्रज फिरगी यास ताकीदपत्रे पाठवावयाविशी लिहावे. श्रीकृपे व धणियाचे पुण्यप्रतापे टोपीकराकरील मनसबा प्राप्त न जाहाला तरी उतमच जाहाले. गाठ येऊन पडली तरी आपणास व आम्हास माघार घेऊन जंजिरा फते केल्याविना कोणेक विचार करणे उचीत आहे यैसे नाहीं. आपण संपादिली कीर्ति ततोप्यधिक कीर्तीचा विस्तार व्हावा हेच मनोभिष्ट इछित असो. व आम्हीहि याजपेक्षा कीर्ती अधिकोतर काय संपादणे आहे. सुचला अर्थ आपणास श्रवण व्हावा, पुढे तरतूद करावी म्हणौन लिहिले असे व राजश्री स्वामीचे सेवेसी विनती पत्रे लेहून हैदर भालदार रवाना केला आहे. आपणहि लिहावयाचे ते लेहून खर्चाची अनकूलता व जमावाची भरती आणवावयाची ते आणविली पाहिजे. जाणिजे रा छ १९ माहे सफर बहूत काय लिहिणे कृपा असो दीजे. हे विनंती.

¶*Sekhoji Angre to Bajirao, explaining the difficulties of the Campaign due to the help which the British, the Portuguese and the Surat Admirals have agreed to render to Janjira.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 25] [*21-7-1733*

छ २३ सफर

श्री.

पुरवणी राजश्री बाजीराव पंडित प्रधान

दाजी गोसावी यासी.

विनंती उपरी अंजनवेलीच्या मनसबियास राजश्री प्रतिनिधी गेले आहेत, याजकरितां राजश्री बकाजी नाईक माहाडीक यांसी आणवावे म्हणोन आपण लि॥ त्यावरून माारनुलेस कार्य होत नसेल तरी येणे म्हणोन लेहून पा. साप्रत बकाजी नाा कडून पत्रे आलीं. त्याणे लेहून पाठविले की प्रतिनिधी परशरामी आहेत. सिदीसाद यांची व पंडीत माारनुलेची भेट होणार. दादोबा नाईक यास सिदीकडे पाठविला आहे, त्याजकडील राजकारण लागले आहे. आपणास स्थळ होत नसेल तरी भाडी घेऊन सुवर्णदुर्गास येऊन म्हणोन लि॥ आहे, येशास सिदीसाद याणे पंडीत माारनुलेकडे कार्याकारण राजकारण लाविले आहे. दहा पाच माणूस निशाण घेऊन चाकर म्हणवावे व ईले[१] (?) काढून घ्यावा. नौकामार्ग चालता जाहलीयावरी मुबैकराचा येक हात करून फिरोन गोष्ट सागावी, येसा विचार करील. त्याचा सारा दोरा मुबैस पुर्वीच आहे. याकुदखान याणी अंजनवेलीहून काढावा यैसा विचार केला होता, तेसमई आपला वितविषय मुबैस पाठऊन इंग्रजाचा श्नेह संपादिला आहे. सामोपचारे स्थळ सोडून प्रतिनिधी यांचे हवाला करीत नाहीं. माारनुले त्याचे इमानावर जाऊन त्यास ते जागा करार करितील, तेव्हां मुंबैकर वर्ता येक होऊन उपद्रव करितील. हली अजनवेलकराने मुलकांत स्वाऱ्या घालून तमाम रयेत उजाड केली. पुढें रयतीचा टिकाव होत नाहीं. आपले आज्ञेवरून माहाडीक माार भाडी घेऊन येतीलच. पुढे त्या स्थलाचा विचार आपण काय योजिला ? उपेक्षा करितां कार्यास येत नाहीं. प्रतिनिधी स्थल खालीं करून आपला जमाव चढवितील. येसे होत असिले तरी होऊ. हे गोष्ट होत नसेल तरी आजिच स्थलाचा विचार करणे तो करावा अथवा राजश्री फतेसिंग याचे पत्र पंडित माारनुले यास पाठऊन जागा तुम्हास हस्तगत होऊन आपला जमाव ठेऊन शामलास हरयेक जागा ठिकाणी ठेऊन किला आपले स्वाधीन होत असेल तरी करून घ्यावा. तुमचे स्वाधीन होत नसेल तरी पष्ट लेहून पाठवणे. त्याचा विचार करण तो आम्ही करून, म्हणोन मुजरत जोडा पाठऊन उतर आणावे, आणि कर्तव्य विचार तो करावा. आजिचा मान पुढे

---

१ हिल्ला = युक्ति.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

येणार नाहीं, याजकरितां सविस्तर लिहिले असे. येविसीचा विचार आपण करणे तो केलाच असेल; परंतु इग्रज सामील होईल, यास्तव पुनरुक्त विचार करून उतर लेहून पाठवावे. आपण विचार लेहून पाठवितील तोच आम्हास कर्तव्य. कलले पाहिजे. जाणिजे रा छ २० माहे सफर. बहुत काय लिहिणे कृपा असो दीजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Sekhoji's advice to Bajirao as regards the movements of Siddi Sat, the Pratinidhi and the British and their mutual understandings.*

No. 26] [*23-7-1733*

(वर फाटलें आहे)

राजश्री स्वामीकडे राजश्री अंबाजीपंत व राजश्री जिउबा व राजश्री येसवंतराव व जखोबा (?) पाठविले. त्यास अद्याप त्यांजकडून प्रत्योत्तरे येत नाहीं; यास्तव राजश्री फतेशिग भोसलेयाही हुजूर जावयाचा विचार योजिला आहे ; व खानजादे सेखजी बराबर घेऊन जाणार म्हणौन लेख केला, तरी मारनुले राजश्री स्वामीं-संनिध गेलेयाने अद्ययावत सविस्तर वृत निवेदन होऊन कर्तव्यविचाराचे बोली-चालीचा निर्वाह व सरंजाम होऊन येईल. खानजादे व सेखजीची रवानगी केली म्हणजे स्थल शुधहि होईल. मारनुले यांचे रवानगीचा विचार आपण योजिला हे गोष्ट उतमच. अगत्याअगत्य फौज समागमे देऊन रवानगी करावी. अविलंबेच कार्यसिधी करून येतील. तेथे गेलियावरी येतील न येत हे न कले म्हणौन लिहिले; तरी प्रयोजनप्रसंगे मारनुले यांचा गुता होऊन येणे न जाहाले तरी आपण आहेत तेथे अवघेच आहेत. कोणेक विचाराचे संकट आहे यैसे नाहीं. आम्हीं आपणाजवली आहों. जे आपण आज्ञा करितील त्यास सर्वथैव अंतर आहे यैसे नाही. येविशीचा काही यक संशय मानावा यैसें नाही. कलले पाहिजे. जाणिजे रा छ २२ माहे सफर. बहुत काय लिहिणें. कृपा असें दीजे हे विनंती.

कान्होजीचा
शिक्का.

मोर्तब
सुद.

¶*Mutilated letter of Sekhoji to Bajirao intimating that Fatesing Bhosle was going to Satara with Sekhji of Janjira.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 27] *[23-7-1733*

छ २९ सफर.

श्री.

पुरवणी राजश्री बाजीराव पंडित
प्रधान दाजी गोसावी यांसी.

विनंती उपरी. ता॥ नागोठणे येथील जुईवर शामलाकडील लोक ठाणे यास होते, त्यास येथून कौल दिला होता, त्यास आपले लोकानी लुटिलें म्हणोन लिहिले तरी इकडील लोक जुईस गेले नाहीं व ते प्रांते स्वारी ठेविली नाहीं. सुधागडकरी ते जागा जाऊन ठाणे याचे लोकांस लुटून रसदेची पटी होते ते घेऊन गेले. जाते समई इकडील चौकीस दखल जाहले हालीमाजीच्या प्रसंगात हरकोणी लुटालूट करून इकडील नाव सांगतात. आपण ये गोष्टीची चौकशी करून शासन केले म्हणजे पुन्हा मुलकांत उपद्रव करणार नाहींत. ता॥ मारचा हवालदार व मजमदार यास कौल दिला आहे. यैशास आपणाकडे त्याची गुरे व बटकी नेल्या आहेत त्या सोडून द्याव्या म्हणोन लिा त्यावरून थाग लाविला आहे. मनास आणून देविली जातील. जाणिजे रा॥ छ २२ माहे सफर बहुत काय लिहिणे. लोभ असो दीजे हे विनंती

मोर्तब
सुद.

¶Sekhoji to Bajirao, informing him that it was not the writer's men that plundered Nagothna but by people from Sudhagad.

No. 28] *[23-7-1733*

हें पत्र अर्धें आहे.

राजेश्री स्वामीकडे राजेश्री आबाजीपंत व राजेश्री जिउबा व राजेश्री येसवंतराव व जखोबा पाठविलें, त्यास अद्याप त्याजकडून प्रत्योतरें येत नाहीं. यास्तव राजेश्री फत्तेसिंग भोसले याही हुजूर जावयाचा विचार योजीला आहे व खानज्यादे सेखजी

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

बरोबर घेऊन जाणार म्हणोन लेख केला. तरी मशारनिल्हें राजेश्री स्वामीसंन्निध गेलेंयानें अद्ययावत सविस्तर वृत्त निवेदन होऊन कर्तव्य विचाराचें बोलीचालीचा निर्वाह व सरंजाम होऊन येईल. खानज्यादे व सेखजीची रवानगी केली म्हणजे स्थल शुद्धही होईल. मशारनिल्हेमुळें यांचे रवानगीचा विचार आपण योजीला हे गोष्ट उत्तमच, अगत्याअगत्य फौज समागमे देऊन रवानगी करावी. अविलंबेच कार्यसिद्धी करून येतील. तेथें गेलीयावरी येतील. न येत हे न कळें म्हणोन लिहिलें तरी प्रयोजन प्रसंगे मजकुरामुळें यांचा गुंता होऊन येणें न जाहाले. तरी आपण आहेत तेथें अवघेच आहेत. कोणेक विचाराचें संकट आहे ऐसें नाहीं. आम्ही आपणाजवळी आहों. जे आपण आज्ञा करितील, त्यास सर्वथैव अंतर आहे ऐसें नाहीं. येविशीचा कांहींएक संशय मानावा ऐसें नाहीं. कळले पाहीजे. जाणिजे रवाना छ २२ माहे सफर. बहुत काय लिहिणें, कृपा असो दीजे हे विनंती.

श्री०
श्रीशाहूनृपतिप्रीत्या
तुकोजीतनुजन्मनः कान्होजी
सरखेलस्य मुद्रा जयति
सर्वदा.

मोर्तब
सुद.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 29] *[23-7-1733*

छ २९ सफर

श्री.

पुरवणी राजश्री बाजीराव पंडित

प्रधान दाजी गोसावी यासी.

विनंती उपरी. माडले येथील तर व जकातीच्या हशीलाविसी लेहून पाठविले; यैशास सुदामत तरी वेसवीस आपले तर्फेने होती. शामलाचा बिघाड आलाकडे जाहाला ते प्रसंगी शामलाने तर मांडले येथें आणिली. पूर्वापार दुतर्फा निमे अमल चालत आला आहे. पेशजी आपण लेहून पाठविले होते. त्याजवरून रा बकाजी नाइक यास पूर्ववत् प्रा तरीका व जकातीचा अमल करणें. नौदिगर करावया प्रयोजन नाहीं म्हणोन लिहिलेच आहे. कललें पाहिजे. जाणिजे, रा छ २२ माहे सफर. बहुत काय लिहिणें. लोभ असों दीजे हे विनंती.

मोर्तब सुद.

¶Sekhoji Angre to Bajirao writes that he has made no change in the management of the ferry and its duties at Mandle.

No. 30] *[23-7-1733*

छ २९ सफर

श्री.

पुरवणी राजश्री बाजीराव पंडित

प्रधान दाजी गोसावी यासी

विनती उपरी. खानजादे व सेखजी यांचे रवानगीस भोई पाहिजेत, दोनसे पावेतो अगत्य जाणून पाठवावे म्हणोन लिहिले. ऐशास या प्रांते भोई नाहीत. खासा पालक्यांचे भोई काही रजेस सुवर्णदुर्ग व रत्नागिरी प्रांते गेले आहेत. तेवढियाने रवानगी होते यैसे नाही. गावगना वेठे व कोली दार्यावर्दी आणऊन डोल्याचा सज करून देऊन रवानगी करावी. गलबतांचे रवानगीविशी लिहिले तरी परजन्य बहूत तुफानाकरितां रवानगीची ढिली करावी लागली. गलबते लोटून ठेविलीच आहेत. उघाड पाहून येका रोजात तयारी करून रवानगी केली जाईल. जाणिजे रा छ २२ माहे सफर. बहुत काय लिहिणें. कृपा असो दीजे हे विनंती.

मोर्तब सुद.

¶Sekhoji to Bajirao that owing to storm he could not send his ships and that he would send them as soon as the storm abates.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 31] [*24-7-1733*

छ २४ सफर

श्री.

अखंडितलक्ष्मीआलंकत राजमान्य राजश्री

बाजीराव पंडित प्रधान यांसी.

प्रतीपूर्वक मातुश्री लक्ष्मीबाई उपर येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित असिले पाहिजे विशेष. पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन लेखनार्थश्रवणे बहुत संतोश जाहला. असेच सर्वदा पत्रीं कुशलोत्तर लेखन करून संतोष पाववीत असिले पाहिजे. सामग्री पाठविली ते बाणकोटी असो द्यावी, व आणीकहि च्यार शत यात्रांची सामग्री पाठवावी, म्हणो लिा; त्यासी सामग्री तयार करविली असे. पत्र आल्यावरी पाठऊन देऊन. जोडेकरी राजश्री बकाजी नाईक यांजकडे तुम्ही पाठविले होते. तिकडून आले. त्यांसी पाठविले असेत. तिकडील वर्तमान राजश्री बकाजी नाईक यांचे पत्रावरून कळो येईल. वरकड बकाजी नाईक यांसी निघोन यावयाचा विचार केला असे. तुम्हास कळावे म्हणोन लिा असे. बहूत काय लिहिणे रा छ २३ सफर हे विनंति.

¶*Laxmibai to Bajirao, offering to send supplies according to orders.*

No. 32] [*26-7-1733*

छ २६ सफर

श्री.

राजश्री बाजिराव पंडित प्रधान

दाजी गोसावी यासी

ऽ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रेा सेखोजी आंगरे सरखेल रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन केले पाहिजे विशेष. गलबतें पाठवायाजकरितां पूर्वीच लोटून ठेविली. त्यास परजन्य होता याजकरिता उघाडी * मार्ग लक्षिला होतां. प्रस्तुत उघाड पाहून आजीच भृगूवारी मुहूर्तें चहू गलबताची रवनगी केली आहे. राजश्री केशव लिंगोजी यांस

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
गलबतावरून रवाना करावे म्हणून ठेऊन घेतले होते. यांची रवानगी केली असे. आपणास कलले पाहिजे. जाणिजे रा छ २९ माहे सफर. बहूत काय लिहिणे. लोभ असो दीजे हे विनंती.

*

मोर्तब
सुद.

¶*Sekhoji Angre to Bajirao, communicates the dispatch of his ships.*

No. 33] [*27-7-1733*

छ २९ सफर

श्री.

सकल गुणालंकार अखडित-
लक्ष्मी आलंकृत राजमान्य
राजश्री बाजिराऊ पंडित
प्रधान गो यासि

प्रतिपूर्वक लक्ष्मीबाई कृतानेक दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करीत असिले पाहिजे विशेष. पत्रे पाठविली ती पावोन सविस्तर वृत कलो आले. अजनवेल गोवलकोटचे कार्येभागास रा बकाजी नाा याा रा केले. त्यास राजश्री प्रतिनिधी गेले. त्याचा व याचा येक हात होऊ देऊ नये म्हणोन विशदे लेहून पाठविले. त्याजवरून माारनिलेकडे आपली पत्रे आली. ते व तेथून लेहून पाठवणे ते पाठऊन. जमाव सहवर्तमान रा बकाजी नाा यास जजिरे सुवर्णदुर्गी आणविले. जे गोष्ट आपले चिती तेच आमचे चिती. सदैव पत्री कुशल वृत लेहून पाठवित असिले पाजे, येविसी बहूत काय लिहिणे. लोभ असो दीजे छ २६ सफर हे विनती.

¶*Laxmibai to Bajirao, informs that Bakaji Naik has been recalled.*

---

* येथें कन्होजी आंगऱ्याचा शिक्का.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 34] [*28-7-1733*

श्री.

पुरवणी राजश्री बाजीराव पंडित प्रधान

दाजी गोसावी यास

विनती उपरी. उंदेरीस इग्रजाने मदत केली असेल. येशास मार मना करावा येसे नाही. खांदेरीवरून व तडीहून माराचा जोरा करावा, आणि जागा आयास आणावा; किंवा येलगार करावयाचा विचार करून, बक्षिसे घ्यावयाची कबूल करून, जागा हस्तगत करावा म्हणोन लिहिले; येशास इकडून राजश्री बावाजी प्रभु व राजश्री गंगाधर कासी यास मुबेस तह निमित्य पाठविले होते. त्याचा आमचा तहचा मजकुर होत असता दरम्याने उदेरीचा प्रसंग त्याणे केला. बोलीचाली होत असतां मार केलियास इग्रजास बोलीस जागा होणार; याकरितां मार मना केला. हाली उभयेता मुबेहून आले. तहचा मजकूर होऊन आम्हाहि कितेक मार इग्रजाने सागोन पाठविले आहेत. त्याचा विचार जाहला पाहिजे. व मुबैस पत्र पाटविले आहे त्याचे उतर उदेक येईल. त्याचा मजकुर साद्यंत आपणास लेहून पाठवून त्याचा विचार आपले विचारे कर्तव्य तो करून. जोराचा पोहोचावयाचा अर्थ सिध जाहाला तरी विलंब आहे येसे नाही. कललें पाहिजे. जाणिजे रा छ २७ माहे सफर. बहूत काय लिहिणे. लोभ असो दीजे हे विनती.

¶*Sekhoji to Bajirao, explaining that he could not attack Underi as the subject was under discussion with the British : as soon as the result is known, he would take up the project.*

No. 35] [*28-7-1733*

पैवस्ता[१] जाहाला. याउपरी जंजिरे याचा उपराला करील येविशीचा आर्थ आपणास लेहून पाठविला होता. त्याचे प्रत्योत्तर पाठविले त्यावरून संपूर्ण आर्थ कलो आला. राजश्री जाधवराव यांचे प्रस्तुत प्रयोजन आहे यैसे नाही म्हणौन लिहिले; तरी मारनूले येथे आलियावरी कितेक विचार करणें तो करून आपणास सागोन पाठवावे म्हणौन रवानगीविशी लिहीले होते. त्यास अवघाच विचार आपण लेहून पाठविलाच आहे. याकरितां इंग्रेज फिरंगी यांचा विचार आपण करणे तो

---

१ आरंभीचा मजकूर फाटला आहे. पण शिक्क्यावरून व मजकूर ध्यानांत घेतां हें पत्र सेखोजी आंगऱ्याचें बाजिरावास असल्याबद्दल खात्री पटते.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
केलाच असेल. आम्ही मोर्चेबधी करणे ते करून जागाजागा जमाव ठेऊन + मुलकाची व गनिमाची राखवाली करीत असों. आजी दोघे दालदी उंदेरीचे सापडले. दस्त करून आणून डोकची मारिली. कललें पाहिजे. जाणिजे रा छ २७ माहे सफर. बहुत काय लिहिणे. लोभ असो दीजे हे विनती.

मोर्तब
सुद.

¶*Sekhoji to Bajirao, explains his vigilance and informs of his having killed the rogues from Underi.*

No. 36] [*28-7-1733*

छ २९ सफर

श्रीराम.

राजश्री पंतप्रधान स्वामी
गोसावी यासि.

ऽ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री बकाजी नाईक माहाडीक नामजाद प्रांत जंजिरे सुवर्णदुर्ग कृतानेक रामराम विनती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखनाज्ञा [पुढील एक ओळ फाटल्यांत गेली आहे] हरकारा याजबा व जासुदाबा पत्रें पाठविली ती प्रा होऊन लेखनार्थ श्रवणे बहूत काही समाधान जाहालें. पत्री सारांश आज्ञा कीं राजश्री प्रतिनिधी यांस सामील न होता जो कार्यभाग होईल तो करावा. आपण श्रम करून त्यास यशास पात्र न करावे म्हणौन आज्ञापिले, यैशास आगोदर जो प्रसंग जाहाला तो स्वामीस लेहून पाठविलाच आहे. त्या आलाकडील विचार तरी आम्ही श्रम करून जागे त्याणी घ्यावे हा त्याचा आशय दिसोन आला. यास्तव निघावयाचा निश्चय करून जमावानसी स्वार होऊन आषाढ बहूल यकादशी सौम्यवारी जंजिरे मारी आलो. स्वामीस विदित व्हावे यास्तव लिहिले असे. बहूत काय लिहीणे कृपा वर्धमान केली पाहिजे. रा छ २७ माहे सफर. हे विनंती.

¶*Bakaji Naik informs Bajirao of his having deserted the Pratinidhi and returned to Suvarnadurg.*

+ येथें कान्होजीचा शिक्का आहे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 37] [पो *30-7-1733*

छ २९ सफर

श्री.

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे सेवेसी

सेवक रघुनाथ हरी साष्टांग दंडवत विनती उपरी. येथील कुशल स्वामीचे कृपेने असे विशेष. स्वामीनी कृपा करून पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन सविस्तर कलों आलें. अजनवेलीकडील कार्यभागाचा विचार आपण लिहिला व आपण जो अन्वय लिहिला त्याप्रमाणें राजश्री सरखेलयाही आज्ञापि(ले). यैशास राजश्री प्रतिनिधीपंताची आमची भेटी जाहाली. त्याजवरी त्याणी या मनसबियाचा उपक्रम करून आद्यंत वर्तला वृत्तांत व पुढे कर्तव्य प्रसंग व आणिखी कितेक प्रकारें साहित्य करून देऊन अगर दोंहि जाग्यातून येक जागा तुम्हास पाहिजे तरी देतों. परंतु यासमई तुम्ही आमचें साहित्य करणें. कदाचित तुम्हीं या गोष्टीस मन घालीत नाही, तेव्हां राजश्री संभाजी आंगरे यांस लेहून पाठऊन त्यांस जमावानसी आणवावें लागेल, म्हणौन ते सांगत होते; तथापि आपल्ये आज्ञेप्रमाणे बकाजी नाईक सहवर्तमान निघोन आलों हें वृत खेडच्या मुकामींहून आपणास लेहून पाठविलें आहे, त्यावरून विदीत जाहालेंच असेल. आम्ही निघोन आल्यावरी ते बहुतच खटे जाहाले आहेत व राजश्री संभाजी आंगरे यांस पत्रें लेहून मुजरद जोडेकरी पाठविले आहेत. पुढें इकडील कार्यभागांत घालमेल करावी यैसीहि त्यास इच्छा निर्माण जाहाली आहे. वरकड मनसबियाचा विचार म्हणावा तरी सिदीसाद त्यांस जागे देतो यैसें नाही. जोरावारी करितील म्हणावें तरी त्यांचें तरतुदीप्रमाणें सध्या तोहि विचार दिसत नाही. आम्हास लाभ म्हणावा तरी त्यांची शतत वाढली. पुढें ते गोष्टीचा विचार होणें तसा होईल. स्वामीची आज्ञा ते प्रमाण परंतु उतम गोष्ट न जाहाली. येक गनीम राहिला; दुसरे त्याचा दावा पदरी पडिला. सर्व स्वामीस विदित आहे बहूत काय लिहिणें. कृपा आसों दीजे हे विनंती.

¶*Raghunath Hari communicates to Bajirao his disagreement with the Pratinidhi.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 38] [*31-7-1733*

श्री.

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ
स्वामीचे सेवेसी.

विनंती राजश्री रघुनाथजी व बकाजी माहाडीक येथून गेल्यावर राजश्री प्रतिनिधीनी विशालगडास राजश्री गंगाधरपंतास जमावानसीं आणविलें, ते काली श्रावण सुध प्रतिपदा सोमवारीं येथें आले. त्यावरून हे फारसे खुशाल होऊन खाडी पलिकडे जाऊन त्याची भेट घेतली; आणि मावारे आले तों गंगाधरपंतानी दोनप्रहरानंतर तयार होऊन खाडीचे मधें हबसी याची चौकी होती तिजवर घातलें; तों तेथील लोक हबसियाचे होते ते निघोन कोटाच्या असिरीयासी गेले, हें वर्तमान राजश्री प्रतिनिधीन कललीयावर हेहि तयार होऊन खाडी उतरोन पलिकडे जमावानसी गेले. त्यावर बालाकोटावर केलीकोटा अलिकडे चार आहे तेथ परियेंत मावले लोक वगैरे बरखंदाज गेले. तेथें ढासणें धरून बसले तों हबसीयाकडील पेठेंतून दोनसें माणूस बाहेर निघालें. त्याणी याचे लोक उधळून काढले ते बेजरब काहाडले. खाश्यासहि अवसान धरून दिल्हें नाहीं. खाडीच्या पलीकडील काठदरींत बरकंदाज वगैरे लोक मारित आले. हे पलोन मोठ्या संकटें अलिकडे आले, यैसें वर्तमान जालें हें तपसिलें आपणांस विदित व्हावें; यास्तव लिहिलें. असे आम्हांकडील जमाव उगाच भरणा मात्र आहे. शामलानें शोकी फारसी केली. परज्यन्यहि लागला. खाडीस पाणी यामुलें इलाजहि चालत नाहीं. कललें पाहिजे. स्वामीनी आपणाकडील कुशल वर्तमान ल्याहावयासी आज्ञापिलें पाहिजे. बहुत काय लिहिणे हे विज्ञापना.

¶*Mahadaji Purandare to Bajirao, informing the latter of the details of the attack which the Pratinidhi made against Gowalkot.*

No. 39] [*4-8-1733*

छ ५ रौवल.

श्री.

पुरवणी राजश्री बाजीराव पंडित
प्रधान दाजी गोसावी यांसी.

विनंती उपरी. राजश्री श्रीनिवास पंडित प्रतिनिधी यांणी इकडील नालीस हुजूर राजश्री स्वामीचे शेवेसी लेहून पाठविली आहे. त्याच्या प्रत्योप-

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

कारास्तव हुजूर जोडा रवाना करावा म्हणोन लिहिलें व अन्वय लेहून पाठविला त्याप्रमाणें राजश्री स्वामीस पत्रे लेहून मुजरद जोडा रवाना केला आहे. आपणांस कळावे म्हणून लिहिले असे. जाणिजे रा छ ४ माहे रबिलोवल. बहुत काय लिहिणे. लोभ असो दीजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Sekhoji to Bajirao: informs the latter of his having written a full account to Shahu explaining away the complaints brought forth by the Pratinidhi.*

No. 40] [*4-8-1733*

छ ९ रौवल

श्री.

पुरवणी राजश्री बाजीराव पंडित प्रधान
दाजी गोसावी यांसी.

विनंती उपरी. राजपुरीच्या रहदारीमुळें तमाम रयत तजावजा जाहली आहे. येथें येऊन करुणा करिते ते ऐकवत नाही. येथें येऊन तीन गोष्टी प्राप्त जाहल्या. या उपरी लोकांस ताकीद करऊन रयेतेस उपद्रव न लागे ते केले पाहिजे; म्हणोन आपण कितेक प्रकारे लिहिले. त्याजवरून रहदारीच्या रखवालीस नेहमी दाहा माणूस पाठऊन त्यास येकंदर आज्ञा केली आहे कीं, दस्तका खेरीज जो कोण्ही वेठ्या घेईल त्याच्या मुस्क्या बांधोन पाठवणे; व चिरंजीव मानाजी आंगरे यांसहि बरी ताकीद करून लिहिले आहे. ते तेथील लोकांस ताकीद करितील. आपणहि दाहा माणूस तिकडून रखवालीस पाठवावें. त्यांस येकंदर ताकीद करावी कीं दस्तकाखेरीज जो कोणी वेठ्या घेतां आढळेल त्यास दस्त करून कुलाबा पाठवावा. याप्रमाणे बंदोबस्त केला म्हणजे रयेतेस उपसर्ग लागणार नाहीं. वरकड सरकारचे सामान इकडून जाईल त्यास दस्तक दिल्हे जाईल. जाणिजे रवाना छ ४ माहे रबिलोवल
बहुत काय लिहिणे. लोभ असो दीजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Sekhoji to Bajirao, informing the latter of his having issued strict orders not to inflict forced labour upon the ryots.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 41] [*4-8-1733*

छ ९ रोवल

श्री.

पुरवणी राजश्री बाजीराव पंडित
प्रधान दाजी गोसावी यांसी

विनंती उपरी. राजश्री रघुनाथ हरी तिकडून येतील त्यांस याच मार्गे यावया-विसीं लिहिले आहे व आपणहि ल्याहावें म्हणोन व आरमारकरी लोक आहेत त्यांस आरमारावरी न्यावयाचे जाहलियावरी येथें अगोधर हजार माणूस पाठऊन द्यावें. तदुतर लोक आरमारकरी आहेत त्यांस न्यावें म्हणोन लिहिलें ते कलो आले. ऐशास मारनिले चिपुळणाहून स्वार जाहल्यानंतर कोणे मार्गे यावें म्हणोन लेहून पाठविलें होते, त्याजवरून राजपुरीस यावे आपली भेटी घेऊन कुलाबा येणे म्हणून लिहिलें आहे. आले (अ) सतील. किंबहुना येतील. आल्यानंतरी येका दोहो दिवसांत बोलीचालीचा उलगडा करून मारनिलेस आम्हाकडे पाठविले पाहिजे. पुनरुक्त मारनिलेची रवानगी आपणाकडे केली जाईल. वरकड आरमारकरी लोक आणणे तेसमई मुबदला दुसरा जमाव पाठऊन आरमारकरी लोक आणिले जातील. कलले पाहिजे. जाणिजे रा छ ४ माहे रबिलोवल. बहुत काय लिहिणे. लोभ असो दीजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Sekhoji to Bajirao, asking him to send back Raghunath Hari to the writer after he had seen the addressee.*

No. 42] [*4-8-1733*

छ ९ रौवल.

श्री.

पुरवणी राजश्री बाजीरावपंडित
प्रधान दाजी गोसावी यांसी.

विनंती उपरी. उदेरकराने उदेरी इग्रजास दिली. इग्रज तेथे आला. त्याचा आपला तह होतो. उदेरीत त्याणी राहावे. खुस्कीस उतरूं नये.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

चाबुर्जीत ठाणे आपले राहते यैसा तह होतो म्हणोन परस्पर यैकितो, तरी कैसा तह होतो तो लेहून पाठवावा म्हणोन लिहिले, तरी उदेरीस इग्रज पेवस्ता जाहल्याचे वर्तमान पूर्वी लेहून पाठविले, त्यावरून कळलेच असेल. इग्रज जजिरेयांत दाखल जाहल्यावरी खांदेरीवरील व चांबुर्जीवरील मार मना केला; निमित्य की, त्याचा व आमचा तह व्हावा, याकरितां त्याजकडील बंदीवान सोडून वीस पंचवीस हजार रु॥ यास तन्हा देऊन तहची बोलीचाली केली. करार दाद तहनामा करावा म्हणोन इग्रजाचे विचारे दरम्यान बोलीस कपितान होता. त्याणे कारभारी पाठवावे, म्हणोन लेहून पाठविले. त्यावरून राजश्री बावाजी बलाल व राजश्री गंगाधर कासी मुबैस रवाना केले. उभयेता तेथे जाऊन भेटीचे सौरश्य उत्तमच जाहला. प्रथम भेटीस इकडील व आपणाकडील बलाबल विच्याराच्या गोष्टी व स्थितरीत व शामलाकडील मनसबियाचा विचार पुशिला. उभयेता मारनुलेयांही समयोचीत उतर करणे ते समर्पक केले. दुसरे, भेटीस तह मामला कोणे रवेशीने कसा करणार? तेव्हा इकडील मतालिबचे मजकूर होते ते साद्यंत त्यास दखल केले. त्याचे उतर त्याणे केले जे सावकारीमुळे कोणता टका न मिले. तुम्ही तरांडी धरितां, गोरगरिबे नागवितां, यांत फायदा काय आहे? आपण सोदगारी करितो आपणास कोणते न्यून आहे? तुम्ही सौदगारी अमलावर नजर दिली तरी बदरोबंदरीचे सोदगारे बंदरी येतील. आपणहि तुमचे बंदरी वखार घालून तुम्हास हासील होऊन येई तेच गोष्ट करीन इत्यादिक परमार्थाच्या गोष्टी सागोन सारांश सांगितले कीं तरांडियास कौलावण न घ्यावे. तरांडी न धरावी. आरमार स्वारीस न पाठवावे. आपण आरमार सोदेगारीस लावितो. याप्रमाणे होईल तरी तह होऊन येईल म्हणोन बोली सांगितली. तदनंतर उदेरीचा कार्यभाग करणार याकरितां तरी मना करून आरमार रवाना केले आणि कार्यभाग संपादिला. त्याउपरी उभयतां मारनुलेयांस सदरहु बोलीचा करारदाद सांगोन रवानगी केली. तहचा मजकूर कळावा व इकडून उदेरीस इग्रज पैवस्त जाहलीयावरी मुबैस पत्रे पाठविली आहेत. त्याचे उतर काय येते तोहि अर्थ कळावा. यास्तव मार मना करावा लागला. उभयेता मारनुले आले. याणी त्याजकडील बोलीचा निश्चय विदित केला. याउपरी पत्र पाठविले आहे त्याचे उतर येईल. तदनुसार विचार करून आपणास लेहून पाठऊन. आपण भले माणूस व पत्रे इग्रजास पाठविली होती. ते फिरोन आलेच असतील. तरी त्याजकडील बोलीचा संदर्भ काय लागला आहे तो कोणा विचारावरी आहे. याचा जी * * * * आपणास कललाच असेल. तरी सविस्तर लेहून पाठविला पाहिजे. वरकड उदेरीच्या कारभारामुळें

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
इकडून इग्रजाकडेस तह मामलियाचे बोलीचा मजकूर जाहला नाहीं. कलले पाहिजे. जाणिजे र॥ छ ४ माहे रबिलोवल. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Sekhoji reports to Bajirao details of the peace that was being discussed with the British.*

No. 43] [*4-8-1733*

छ ९ रौवल

श्री

राजश्री बाजीराव पंडित प्रधान
दाजी गोसावी यांसी.

ऽ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो सेखोजी आंगरे सरखेल रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लेखन केले पाहिजे विशेष. आपण पत्रे पाठविली ती प्रविष्ट होऊन लेखनार्थ कलो आला. राजश्री आनंदराव सुमंत याची पत्रे राजश्री स्वामीस आली कीं, पातशाही किलेयावरी हला जाहल्या. याजकरितां निजामनमुलुक बहुत श्रमी होऊन पेडगावास यावे, हबशीयाची कुमक खामखा करावी हा विचार केला आहे. यास्तव राजश्री स्वामीनी आपणास आज्ञा केली जे, निजामनमुलुक याणी उपद्वाप आरंभिलाच तरी तुम्ही त्रिवर्ग मोहरे खाले गुतलेत; तेव्हा यास आटोपी यैसा कोण आहे? कोकणचा मनसबाहि सोडितां येत नाही. याकरितां दोन तीन विचार लेहून. सारांश आपणास राजपुरीस ठेवावे. आपण अवघा मनसुबा आटोपावा. व राजश्री फतेसिंग व प्रतिनिधी यांही वरघाटे यावे. पडेल प्रसंग तो निवाटवावा किंवा प्रतिनिधी याणी राजपुरीस राहावे. आपण व फतेसिंग वरघाटे यावें. विना येकजण राहून दोघे वरघाटे आल्याखेरीज दोनी मनसुबे राहात नाहीं. येविशीचा विचार असेल तो लेहून पाठवणे म्हणोन आज्ञा. येशास पुढे मनसुबा कैसा करावा, कोणत्या मनसुब्याने मनसुब्यास बलाबल पडते, तो विचार ध्यानास आणून लेहून पाठवावे, म्हणोन लेख केला. यैशास कोकणच्या मनसुब्यास येक सता असल्याविना परिणाम लागणार नाहीं. हाच विचार आपणास प्राप्त जाहला होता; त्यास श्रीकृपे राजश्री स्वामीची आज्ञा त्या उपयोग्यच

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

जाहली. परंतु राजश्री स्वामीनी दोन तीन विचार लिहिले आहेत. त्यास राजश्री चिमणाजी बलाल व राजश्री जगजीवन परशराम व राजश्री फतेसिंग यांजकडील व्यासराव यास ठेवावे म्हणोन तरी त्रिवर्गामध्ये घालमेल होऊन केला मनसबा विस्कळीत होऊन परिणाम लागणार नाहीं. अतैव कार्याचा विचार नव्हे. दुसरा विचार, राजश्री यमाजी सिवदेव व राजश्री आबाजी त्र्यंबक व राजश्री पिलाजी जाधवराव ठेवावे. त्यांचे साहित्य त्रिवर्गाही करावें. कनिष्ट-पक्ष आहे म्हणोन लिहिलेच आहे. तिसरा विचार, आपण अथवा प्रतिनिधी यांही राहावे, तरी प्रतिनिधीचा विचार घालमेलीचा व शामलाचे ममतेचा पहिल्या-पासून आहे तो आपणास अवगतच आहे. या कोकणच्या मनसुब्यास दोनी गोष्टी कार्याच्या नाहींत. शामलासारिखा शत्रु त्यांचेच वस्तु जिकिला जाईल की काय? आपला आमचा स्वछतेचा विचार व जिव्हाला आहे. आपणाजवळ आम्ही स्वछंदे अथवा आपले आज्ञेने वर्तणूक करून. यैसी त्याजपासी होणे दुरापास्त. त्यांचा आमचा बनाव न बसे तेव्हां मनसबा काय होणे आहे? कदाचित दुराभिमानास्तव स्वताच कबूल करितील. तरी परिणाम काय होणे? शामल दगेखोर जागजागा रातबिरात छपे घालून उपद्रव देईल; तेव्हा आजिपर्यंत जाहला मनसुबा कोसलोन जाईल. प्रतिनिधी उठोन जातील ते कळणार नाहींत. आपले बेत गोद्विजाचा उछेद केल्याचे श्रय आपले पदरी पडेल. याकरिता प्रतिनिधीस राहावयाचा विचार सर्वथी न करावा. हा मनसुबा आपणच कबूल करावा. सिरोपस्थाई आपणच व्हावे. आपले पदरी आम्हासारिखे असतां अगाध काय आहे. येवढे महद्यश संपादिले त्याचे कलशारोपण आपणच करावे. वर्ष लागो, दोन वर्ष लागोत. लक्षद्रव्य लागो, दाहालक्ष लागोत. इग्रज फिरगी सुरतवाला आदिकरून शामलास पाण्यातील साह्य करोत. इतकीहि संकटे प्राप्त जाहलीं तथापि कबूल करून मनसबियामध्यें दुसरीयाचा चंचुप्रवेश होऊ न देतां आपणच कबुलात करावी. द्रव्याची अनकूलता राजश्री स्वामीकडून करून घ्यावी. राइरी आदिकरून स्थळे आपणाकडे निर्व्याजरूप दुसरीयाची सता नाहीं यैसे करून घ्यावें. आणि मुलुकाची रखवाली करून टका निर्माण होईल तो व राजश्रीकडून बेगमी होऊन येईल ते करून घ्यावी. जुने लोकांस खर्च-वेचास देऊन हुशार राखावे. नवे आणखी लोक ठेवावे. आपण राजपुरीस मुकाम केला आहे तैसाच करावा. प्रतिनिधीकडील वेध्य चुकलियावरी अजन-वेलीस मोर्चे देतों. गोवलकोट घेतो. जंजिरेयाचे उद्योगास लागलोच आहो. श्रीकृपे व धणीयाचे पुण्येकरून आपणास यशच येईल. राजश्री स्वामीसहि लिहिणे तरी हाच विचार लिहावा. सबल विचार पाहतां हाच आहे. याकरितां

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

दुसरा विचार चितात नाणावा. व हे उभयता वरघाटे गेल्यानें निजामनमुलुकास परान्मुख करितील हा विचार कळतच आहे. त्याचाहि पराभवाचा विचार आपणास येथूनच करावा लागेल. राजश्री आपास लेहून त्याही विचारणेत त्यास कलावे येविशी विस्तार काय लिहावा. सुचला अन्वय लिहिला असे. कलले पाहिजे. जाणिजें रवाना छ ४ माहे रबिलोवल. बहुत काय लिहिणे कृपा असो दीजे हे विनती.

मोर्तब
सुद.

¶*This is an important letter in which Sekhoji gives a frank advice to Bajirao in view of the hostile activities of the Nizam and the measures proposed by Shahu in that connection.*

No. 44] [*4-8-1733*

पौ छ ६ रालोवल

श्री.

राजश्री राऊ पंडित प्रधान

स्वामी गो यांसि.

ऽ श्रीसकल गुणालंकरण अखंडितलक्ष्मी आलकृत राजमान्ये श्नेहाकित बकाजी नाा माहाडीक नामजाद प्राां जजिरे सुवर्णदुर्ग कृतानेक रामराम विनंती येथील कुशल जाणोन स्वानद लेखनाज्ञा केली पाजे विशेष. आपण पत्र पाा ते पावोन समाधान जाले. मुलकाची रखवाली होऊनू रयेत सुरक्षित राहे ते गोष्टी करणे म्हणोन आज्ञा. आज्ञेप्राा तोच विचार करीत असो. विदित जाले पाजे राा छ ४ माहे रबिलोवल हे विनंती.

¶*Bakaji Naik to Bajirao, informing him how assiduously he was guarding the country.*

No. 45] [*6-8-1733*

पौ छ ८ रालौवल

श्री.

राजश्री बाजीराव पंडित प्रधान

दाजी गोसावी यांसी.

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो सेखोजी आंगरे सरखेल रामराम विनती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

लेखन केले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ कलो आला. राजश्री प्रतिनिधी याणी विशालगडचा जमाव सामील करून घेऊन गोवलकोटावरी चालोन घेतले. शामलाची व त्याची झीटपीट होऊन प्रतिनिधी माघारे येता मुस्कील जाहाली. साप्रत चिरंजीव राजश्री संभाजी आंगरे याजकडे संदर्भ लाविला आहे, म्हणौन बातमी खबर आहे. म्हणौन व आरमारचे तयारीविशी व हेटच्या जमावाचे कबिले चिरंजिवानी अटकाविले आहेत. त्याजविशी चिरंजिवास लेहून पाठवावी, म्हणौन लेख केला. यैशास प्रतिनिधी याणी कोटावर चालोन घ्यावें. हे गोष्ट विचाराची केली नाही. कोट किले तोफखाने याने जेर करावे. पायच्या जमावानें काय होणे आहे? शामलाने त्याची मूठ जिकली. अतःपर त्याचा ते जागा टिकाव होऊ देत नाहीं. चिरंजिवाचा आपला येक हात करून कार्य करू म्हणतील अथवा चिरंजीव समत देतील तरी चिरंजिवास विचार आचार लिहिणे ते लेहून पाठऊन बनाव नव्हे तेच गोष्ट केली जाईल. तथापि येक हात करून ममतेस गुंततील तरी प्रतिनिधी याही वरघाटे जावे. हाच विचार सिधी जाहलियाने सहजेच संदर्भ उठेल. आरमारची तयारीची तर्तूद होतच आहे. गलबताची तामिरात करून तेल देऊन सिद्धता केली आहे. मागाहून गुराबाचीही तयारी होईल. हेटच्या जमावाच्या कबिलियास उपसर्ग न लागे ते करावे म्हणौन लिा तरी पूर्वी चिरंजिवास मुजरदपत्रे पाठविली होती. मनास आणिता कबिल्यास अटक आहे यैसे नाहीं. त्याप्रांते गल्याची नातवानी जाहाली. याकरिता थोडा बहुत गला वसूल घेतला. वरकड उपसर्ग कोणेविशीचा नाही. यद्यपि जाली असली तरी येथून लिा गेलें आहे ते पावतांज सोडून देतील. जाणिजे रा छ ६ * माहे रबिलौवल. बहुत काय लिहिणे. लोभ असो दीजे हें विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Sekhoji to Bajirao, assuring him that Sambhaji Angria had been ordered not to join the Pratinidhi.*

---

* ६ हा आकडा ५ चा खोडून केलासा दिसतो.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 46] [*6-8-1733*

छ ८ रबिलोवल

श्री

पुरवणी राजश्री बाजीराव पंडित प्रधान
दाजी गोसावी यांस

विनंती उपरी. काली रेवदंडेयाहून वर्तमान आले कीं, वसईहून व मुबेहून रेवदंडेयाचे कपितानास लिहिलें आलें कीं राजकोट चेऊल मराठ्यानी घेतला ते समई * मदत काय समजोन न केलीस ? तींहीं कोसावरी गनीम होता तो घरात आला. दारू गोला जमेत सर्व सामान तयार असतां कमी केलीयामुलें विजुरे इतराज जाहाले आहेत ; तरी तूर्त परस्पर सख्य चालतें तेसें चालोन यखलासी राखणें. पुढें लाडदिनास दाहा हजार माणूस बराबर देऊन गोवयाहून रवाना करविला आहे. ज्याहाजे चालतीं जाल्यावरी येईल. लाडदीन आल्यावरी प्रथम राजकोट घ्यावा. त्याउपरी हबशाची मदत करून हबशी हिकडील नूर राखावाच राखावा. व सुरतेस वीस हजार माणसाचा जमाव केला आहे. नेमा मार्ग चालता जाहाल्यावरी येणार येसे बीतम आतील खबर आहे. शामल, इग्रेज, फिरंगी, सुरतवाला येसे समदुखी जाहाले आहेत. येक वेल टकर हबिसी देईल. याजकरितां सुचनार्थ आढलेलें वर्तमान लिहिलें असें कलले पाहिजे. जाणिजे रा छ ६ माहे रबिलोवल बहुत काय लिहिणे. लोभ आसों दीजे हे विनंती.

¶*Sekhoji communicates to Bajirao the activities of the Portuguese and the combination of the Siddis with the latter.*

No. 47] [*6-8-1733*

छ ६ रौवल.

श्री

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत
राजमान्य राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान गो यांसी.

प्रतीपूर्वक लक्ष्मीबाई कृतानेक विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन केले पाहिजे विशेष. आपण पत्र पा ते पावोन समाधान जालें. यैसेच सर्वदां पत्र पाठऊनु कुशलवृत लिहित असिले पाजे. यानंतर राजश्री फतेसिग भोसले सेखजीस घेऊनु सातारा गेले म्हणोन लिाले त्याजवरून कळो आले. वरकड रा बकाजी ना स्वारीहून आले. याउपर मुलकाची रखवाली

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

करवणे कोणाचा प्रवेश होऊ न देणे म्हणोन लिा तर बहुत बरे. यापुडें तोच विचार होऊनु मुलकाची रखवाली करावयाचा अर्थ करून. वरकड नवल विशेष लिानेसी नाही. बहुत काय लिहिणे लोभ असो दिल्हा पाहिजे. छ ३ रौवल हे विनंती. राजश्री श्रीनिवास पंडीत प्रतिनिधी श्रीस्थली आहेत. चिपळूणात मारनिलेचा जमाव आहे. त्यास रा बकाजीना यांस ये जागा आणविल्यावर प्रतिनिधीकडील दोन तीनसे माणूस गोवला सनिध चालोन गेले. त्याउपर गोवलातून लोक येऊनु त्याचे याचे युध्य जाहलें. पंतप्रतिनिधीकडील लोकांचा मोड करून तीन चार जणाची सिरे छेदून गनिमाने नेली. त्याजकडीलहि येकदोघ पडले म्हणोन वर्तमान आले आहे. सते मिथ्या नकले. परंतु वर्तमान तहकाकत आहे. यैसे असे. हे वृत्त आपणांस कळाव म्हणोन लिा असे. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Laxmibai to Bajirao communicates details of the Pratinidhi's attack against Gowalkot after the return of Bakaji Naik.*

No. 48] [*7-8-1733*

श्री

सकल गुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत
राजमान्य राजेश्री बाजीराव पंडीत प्रधान यांसी.

प्रीतिपूर्वक लक्ष्मीबाई कृतानेक विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय लेखन केले पाहिजे विशेष. शुक्रवारापासून जंजिरियावरून मोर्चेयावरी मारितो. त्या मारामुळे मोर्चेयातील नव जण जखमी जाहाले. रात्रंदिवस मार बेसुमार करितो म्हणोन मोर्चेयावरी लोक आहेत त्यांहीं लहून पाठविलें; व अंजनवेलीस माहेगिरी गेली होती तेहि आली. सिदीकडील कारभारी आपणाकडेस आले आहेत म्हणोन कळो आले. यैशास गनिमाच्या माराखाले मुर्चे जाया जाहले असतील त्याची मजबुधी करवावी. भाऊ आणखीहि जोडून त्याचें मारापेक्षां इकडील अधिक मार होऊन गनिमास तंबी पोहोचें ते करावी. येथून राजेश्री रघुनाथजी यास व लोकास लेहून पाठविले आहे. मुर्चे जाया झाले असतील ते जागा नव्या करून मुर्चे नीट करविले आहेत ; व नवी भाडी आणखी जोडावयास सांगितले आहे. फटाकडीचा मोर्चा तयार करविला आहे. जलदीने मुर्चा तयार करवून फटाकडी जोडिली जाईल. आपणहि मशारनिल्हेस सांगोन फटाकडीचा मुर्चा तयार करवावा; व अंजनवेलीकडील संदर्भ काय कैसा आला आहे, चित्वृत्त

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
कोणीकडेस आहे, पुढे मुदा काय आहे. हे साद्यंत लेहून पाठवावे. चिरंजीव संभाजी आंगरे यांसी आणावयास गलबतें गेली आहेत. आज उद्या यावें यैसे आहे. आल्यानंतर सविस्तर लेहून पाठवून. कळलें पाहिजे. जाणिजे रवाना छ ७ माहे रबिलोवल. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Laxmibai encourages Bajirao in his fight against Janjira and assures him of her full support.*

No. 49] [*8-8-1733*

छ ११ रालौवल

श्री

पुरवणी राजश्री बाजीराव पंडित

प्रधान दाजी गोसावी यासी.

विनंति उपरी. गोलेयांचे प्रयोजनास व आरमारचे तामीरातीस लोखंड पाहिजे. संग्रही लोखंड नाही व तारू तरांडे फोडून लोखंड कांढावे तरी फोडायायोग्य तरांडीहि नाहींत; यैशास वरघाटी ठाणियास आज्ञा करून लोखंड खरेदी करून आणविले पाहिजे. जाणिजे रा छ ८ माहे रबिलौवल बहुत काये लिहिणे. कृपा असो दीजे हे विनंती.

¶*Sekhoji to Bajirao informs that iron was not available at Kolaba: it should be ordered from the up-country.*

No. 50] [*8-8-1733*

छ ११ रविलोवल

श्री.

राजश्री बाजीराव पंडित प्रधान दाजी गोसावी यासी.

ऽ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रीा सेखोजी आंगरे सरखेल रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लेखन केले पाहिजे. विशेष मुबैकराने आजी आठ रोज तरीचा बंद करून वीस पंचवीस गलबत तयार केले आहे. दोन अडीच हजार जमाव सिध केला. शामल व इंग्रज पौर्णिमेचा उधाणास पेण व वाशी प्रांतास येऊन उपसर्ग करणार. तैसीच वरकड आरमाराची तयारी करीतच आहे म्हणोन आजीच तहकीक वर्तमान आहे. यैशास

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

पेणेचे खाडीत गनीम खामखा येईल यास सवशय धरावा येसा नाहीं. तेथील रखवालीस कल्याण प्रांताकडील जमाव ठेवावी म्हणून पुर्वी आपणास लेहून पाठविले होते. आपण जमाव पोख्ता रवाना करविला आहे म्हणोन लिहिले. मनास आणिता नवद माणूस पेणेस आलें. त्याजमध्यें कोणाजवल हतेर आहे कोणाजवल नाही. सैती[1] आहे त्यास पान नाहीं. पान आहे त्यास बुडी नाही हाशिली जमाव आहे. प्रसंग पडिला, तरी गाठ पडो देतील न देत न कले, येसा विचार आहे. येथील जमाव जाग जागा गुतला. गनीमाने येक दोन गाव मारिले म्हणजे तमाम * प्रांत उजाड होईल. यास्तव राजश्री माहादाजी कृष्ण यांसी नेरलाहून आणऊन पेणेस रवाना केले आहेत. बंदरोबंदरीची चौकशी करणें ते करितील. परंतु पोख्ता जमाव ठेऊन रयेतीचे संरक्षण होऊन येईल ते गोष्ट केली पा. जाणीजे रा छ ८ माहे रबिलोवल बहुत काय लिहीणें. कृपा असो दिजे हे विनंती.

¶*Sekhoji informs Bajirao of the activities of the British in the districts of Pen and Washi and in consequence the writer has ordered Mahadaji Krishna to proceed to those parts from Neral.*

No. 51] [*8-8-1733*

छ ११ रालौवल

श्री

पुरवणी राजश्री बाजीराव पंडित
प्रधान दाजी गोसावी यासी.

विनंती उपरी. इंग्रजाने पेणेचे खाडीत यावयाचा विचार केला आहे व वरकडहि तरतूद करीतच आहे. ये गोष्टीचा व कितेक मनसबियाचा विचार करावा लागतो. तरी राजश्री रघुनाथ हरी यांसी त्वरेने रवाना केले पाहिजेत.

---

१ सैती=दोरीनें फेकून मारावयाचे बाणासारखे हत्यार. * येथें कान्होजी आंग्रे याचा शिक्का.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
मारानिले येथे आलियावरी आठा रोजाच्या अवकाशें आम्हीच आपले भेटीस येऊन. कललें पाहिजे. रा. छ ८ माहे रबिलौवल बहुत काय लिहिणें. कृपा असों दीजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Sekhoji informs Bajirao of the intentions of the British to march through the creek of Pen.*

No. 52] *[9-8-1733?*

छ १० रावल

श्री

राजश्री बाजीराव पंडित

प्रधान दाजी गोसावी यासी.

ऽ सकलगुणालंकरण अखांडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री सेखोजी आंगरे सरखेल रामराम विनती उपरी. येथील कुशळ जाणून स्वकीय लेखन केले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन लेखनाभिप्राय कलो आला. किले सरसगड फते केला आणि किल्याखालील बेवीस गावचा अमल शामलास देविला नाहीं. जबरदस्तीने बावीस गाव आटोपिले. शामलाने आपणाकडील अष्टमीचा अमल मना करून रयेतीपासून नख्त व गला वसूल घेतला. हाली आपण तर्फ माराकडे दुसाला हिसेब करून वसुलाचा कतबा लेहून घेतला आहे तरी रयतीने कोठून द्यावा.? हिसेबाची सरदावरद जाहालीच आहे म्हणौन विशदे लेख केला. तरी सरसगडचा तनखासी माहाल. परंतु धण्यांचे आज्ञेप्रमाणे ते समई बावीस गावचाच अमल येक तर्फा करून कटकट न वाढविली. पुढे किले मारच्या तनखियाची विल्हे होणच आहे. अष्टमी तर्फेच्या अमलाचा विचार सुदामत * चालतच आहे. सन इसनेपासून सालोसाल बाकी राहत आली त्याचा वसूल जाहल्याविना बाकी रयेतस कैसी सुटेल? आपण भोरपकराकडे

---

* येथें कान्होजी आंगऱ्याचा शिक्का.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

विल्हे करून देविली त्याजप्रमाणे इकडील बाकीची विल्हे करून देविली पाहिजे. म्हणजे रयतीस तगादा लागणार नाहीं. जाणिजे रा छ ९ माहे रबिलोवल. बहुत काय लिहिणे हे विनंती..

मोर्तब
सुद.

¶*Sekhoji informs Bajirao of the arrangement in regard to fort Sarasgad.*

No. 53] [*10-8-1733*

छ १२ रालौवल

श्री

राजश्री बाजीराव पंडित प्रधान

दाजी गोसावी यांसी.

ऽ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रो सेखोजी आंगरे सरखेल रामराम विनंति उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लेखन केलें पाहिजे विशेष. छ ८ रबिलौवली जंजिरियाहून गलबतें तीन रात्रींची निघोन रेवदंडियात आली. फिरंगियाचा व हबसियाचा हात यक जाहाला. फिरंगियानें सामान हरजिनस दिल्हा. मंगलवारी रात्रीस गलबतें निघोन जाणार म्हणौन येथील गलबते पाच तयार करून ठेविली आहेत व तेथील गलबतापैकी गलबतें पाच सा आणवलीं आहेत. तीं मंगलवारी प्रहर दिवसास निघोन मुरूड नांदगाव या माजी येतील व ही गलबतें गनीमाचे पाठीलागास मुरूड पावेतो पाठविलीं आहेत. मानमार्ग तुफानाचा पाहून गनिमास गाठून गनीम बुडवावयाची आज्ञा केली आहे. वडिलांचे पुण्यें व धण्याचे प्रतापतेजे काम फत्ते व्हावेसे आहे. श्रीछा प्रमाण. हे काम साधल्यास निमेगनीम घेतलासें होईल कलले पाहिजे. जाणिजे रा छ १० माहे रबिलौवल. बहुत काय लिहिणे. लोभ असो दीजे हे विनंती.

श्री ०
श्रीशाहूनृपतिप्रीत्या
तुकोजीतनुजन्मनः का-
न्होजीसरखेलस्य मुद्रा-
जयति सर्वदा.

मोर्तब
सुद.

¶*Sekhoji to Bajirao, gives details of the Portuguese succour to the Siddi.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 54] *[11-8-1733*

श्री.

सकलगुणालंकरण अखंडितलक्षुमी
आलंकृत राजमान्ये राजश्री
बाजीराव पंडित प्रधान गो यासी.

प्रतिपूर्वक लक्षुमीबाई विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकुशल लिहित असिले पाहिजे विशेष. प्रस्तुत तुम्हाकडील पत्र येऊन वृत कलत नाही. तरी सर्वदा लिहित असिले पाहिजे. यानंतर हिकडील वृत–

मागे आपण पत्र पाठविले तेथे लिहीले की रा बकाजी नाईक कोण्हे ठिकाणी आहेत? त्याकडील वर्तमान लेहून पाठवणे म्हणौन लिहिले. तरी चिपलुणाहून जंजिरा स्वारीनसी आले. त्याचे वर्तमान लेहून अगोधरच लेहून पत्रें पाठविली ते पावलीच असतील. त्यावरून कलो येईल. आलीकडे मुलकात अजनवेलकरानी रोखे करून आवाडाव आरभिली; यास्तव बकाजी नाईक याजबरोबर जमाव देऊन किले पालगडचे रोखे खबरदारीस रवाना केले असेत.

राजपुरीकडे भांडी दोन रोज भारी होतात. कायेनिमित्य हे वर्तमान कलत नाहीं. उडती खबर आली की इंग्रेजाचे अरमार आले म्हणौन बोली आली. याकरिता मुजरद जोडी समाचारास पाठविली असे. तरी काये वृत ते लिहिले पाहिजे.

राजश्री प्रतिनिधी चिपलुणास श्री-भार्गवाचे देवाली मुकाम करून राहिले आहेत. त्याकडील मुर्चा पांचसे माणसाचा खाडीकाठी झोतीवर होता. त्यावर सिदीसाद याणे रविवारी छपा घातला. त्यास तांबट व अमोलिक दोघे सरदार व पंचवीस माणोस ठार पडले. राहिले लोकास पिटालीत डोगरावर देऊलपर्येत घालविले. निशाण कर्णा व घोडी ४ पाडाव करून गोवलकोटास नेली. पुढें लस्कराने कल खादला असे. छपा मुख्य राहतात तेथे घातला तर तग निघता मुसकील असे यैसे जाहाले आहे.

किले उदेरीवर इग्रेज चढला. त्याजकडे तुम्ही पत्रे देऊन जोडेकरी रवाना केले होते. त्याचा जाब काये त्याणी पाठविला त्याचे वृत लिहिले पाहिजे.

बहुत काये लिहीणे. लोभ असो देणे छ ११ रालौवल हे विनंती.

¶*Laxmibai Angre, Kanhoji's eldest widow, writes to Bajirao about an attack by Siddi Sat against the Pratinidhi.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 55]

श्री.

पो छ १९ राखर.

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत

राजमान्य राजश्री बाजीराव पंडित प्रधान यांसी.

प्रीतीपूर्वक लक्ष्मीबाई कृतानेक विनति उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लेखन केलें पाहिजे विशेष. राजश्री श्रीनिवास पंडित प्रतिनिधि यांचे चिती वहमा निर्माण होऊन आम्हाकडील मुलकांत तोंड टाकावें या विचारें राजश्री बकाजी नाा माहाडिक यास लेहून पाठविले जे "लस्करचे घासदाणियाकरितां यैवज पाहिजे त्यास घेरा रसालगड व पालगड व हबसियाकडील माहाल यैसे माहाल पाहून आपले तर्फेचा कारकून पाठऊन वसूल देणें. नाही तर लस्करचा विचार कलतच आहे. वराता तोडून दिल्ह्यावरी तमाम मुलूक सुवर्ण दुर्ग पावेतों मोडून ताराज होईल. याकरितां देखील केलसी वेसवी, निमे प्राा वसूल देणे" म्हणून लेहून पाठविलें; यैशास ज्याजकडे जे जे जागे फते जाहाले त्या खालील मुलूक त्यांत्याजकडे लागला यैसे असता, नसती कक्षा काढून परस्पर सौरस्य चालत आहे त्याजमध्यें कलुषता वाढवावी यैसें त्यास विहित नाहीं. बकाजी नाा यांस येथून लेहून आज्ञा केली आहे जे "निर्वाहरूप प्रतिनिधीस लिहिणें ते पेशजी लेहून पाा आहे त्या प्राा सुप्रवृतिने वर्तणूक केली तर उतम कदाचित् श्वेतकृष्ण विचार चितात आणून यातर्फेचे मुलकात वरातदार पाठऊन रयतेचा आठ करू लागले तरी येकवेल साफ सांगोन वरादार हातीं धरून बाहेर घालणें. गल-मुगीर(?) जाले तर बेमुलाहिजा बाहेर घालणें. यामुले कल वाढली तर कबूल करणें." यैसे साफच लेहून आज्ञा केली आहे. प्रतिनिधीनी विवेक करून सुप्र-वृतीवर आले तर उत्तमच जाहालें. नाहीतर परस्पर कल निर्माण होऊन जाल्या मनसबियाची नासाडी होईल. हे सविस्तर तुम्हास कलावे म्हणून लिा असे जाणिजे. रा छ १८ माहे रबिलाखर बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंति

मोर्तब सूद.

¶*Laxmibai Angria to the Peshwa putting in a severe complaint against the Pratinidhi for exacting money from the people in her province.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 56] [*11-8-1733*

श्री

राजश्री बाजिराऊ बलाल पंडित
प्रधान गोसावी यासी

ऽ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रीो संभाजी आंगरे सरसुभेदार आरमार रामराम विनती. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन केले पाहिजे विशेष. आपण बहुतां दिवसीं पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन समाधान जाहाले. सारांश राजपुरीस आल्यास साडेतीन महिने जाहाले. परंतु स्मरणपूर्वक पत्र पाठऊन संतोषावाति न केली हे भाऊपणास विहित कीं काय? तीर्थरूप कैलासवासी घरोबा कैसा धरीत होते त्यामागें तीर्थरूप राजश्री बाबाहि आपणास वडील बंधू यैसे मानितात यैसे असोन तुम्ही तो अर्थ सोडून केवल अनास्थाच करून कागदपत्र पाठवीत नाही. हे गोष्टी उभयपक्षीच्या भाऊपणास दूर आहे म्हणौन कितेक विषदे शब्द लाऊन लिहीले. यैशास आपण आम्हास वडील बंधू. वडीलपणे शब्द लावावा हे गोष्टी उचितच आहे. परंतु वस्तुता पाहातां अंतराय आम्हाकडूनच आहे यैसें नाहीं. प्रथमतां आपण शत्रुशासनाचा मनसबा यौजिला ते समई सर्वांस व तीर्थरूप राजश्री बाबा यांस पत्रें पाठविलीं आणि आम्हीहि मार्ग लक्षीत होतों, परंतु लेख आला नाहीं. यावरून अपूर्व दिसोन आलें. मसलतेचा अर्थ उपस्थित जाहाला यांविशीं आपलें लिहिलें आम्हास जसें येईल तसें विचार करून आपल्या साहित्यानसी हाजीर व्हावे हाच हेतू होता; परंतु काय निमित्य आमचे ठाईं निष्ठुरता दर्शविली हे कलत नाहीं. आम्हीं तो परंपरागत स्नेह चालत आला त्याचा ठाई विकल्प काडीमात्र धरीत नाहीं. यैसे आसोन आमचाठाई पत्र लेख करावयाचा अनमान किंनिमित्य केला हे न कले. याउपरी हाली पत्रीं श्रावणी पौर्णिमा होतांच आपण आ(र)मार वगैरा साहित्यानसी येऊन उभयतां वडिलाच्या मनोगतानुरूप शामलास नतिजा देऊन *

---

* येथें मजकुराचे डावे बाजूस संभाजी आंगरे याचा शिक्का आहे.

श्रीमत्कान्होजिसंभूत-
शंभोशत्रूजिगीषतः ॥
वर्धिष्णु राजरेखेव
मुद्रा भद्रा विराजते.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

तमाम देशदुर्ग हस्तगत करून कीर्तीस पात्र व्हावे म्हणौन लिहिले. तरी यापेक्षा यशस्कर दुसरे काय आहे ? आपल्या लिहिल्यावरून आरमारचे तामिरातीचे काम चालीस लावलें आहे. सत्वरीच आरमार सिध होईल. आपल्या वचनाखेरीज आम्हांस दुसरी जोड आहे यैसें नाही. कलले पाहिजे. रा छ ११ माहे रबिलौवल बहुत काये लिहिणे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Sambhaji Angre promises Bajirao that he would soon prepare his Navy and come with it against the Siddi.*

No. 57] [*14-8-1733*

श्री.

पुरवणी राजश्री बाजीराव पंडित
प्रधान दाजी गोसावी यांसी.

विनंती उपरी. आपण कुलाबा आले ते समई जमिदारांच्या पालणुका इनामती देखील वसूल घेतला. त्याप्रमाणें सन सलासची बाकी काढून सालमारी राजश्री वासुदेव हरी यांणी जमीदारास वसुलाची निकड केली आहे. तेविसी पूर्वी आपणास लेहून पाठविले आहे, त्याचा जाबसाल काहींच आला नाहीं. यैशास जमीदाराच्या इना(म)ती पालणुकीचा वसूल घ्यावा ऐसे आपले विचारास येत असिले तरी आम्हासहि तैसेच लेहून पाठवावें. त्याप्रमाणे इकडून वसूल घेतला जाईल. या पत्राचे उतर काय तें साफ पाठऊन द्यावें. आपले उतर येईल तदनुसार सालगुदस्त व सालमजकूरचा वसूल इकडेसहि घेविला जाईल. यामुळे पुरवेल तो राहेल; नपुरवे तो राडपोरे विकत देऊन जिकडे पोट भरेल तिकडेस जाईल. कळले पाहिजे. जाणिजे रा छ १४ माहे रबिलोवल बहुत काय लिंहिणे. लोभ असो दीजे हे विनंती

मोर्तब
सुद.

¶*Sekhoji Angre asks Bajirao whether and how reductions were to be made in disbursing the emoluments to the Jamindars.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 58] *[14-8-1733*

श्री

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य राजेश्री बाजीराव पंडित प्रधान यांसी प्रीतिपूर्वक लक्ष्मीबाई विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन केलें पाहिजे विशेष. चिरंजीव राजश्री संभाजीबावा यांजकडे गलबत रवाना केले होते, ते प्रविष्ट जाहालियावरी भाद्रपद शुध शष्टी इंदुवारी विजयेदुर्गाहून स्वार होऊन जंजिरे रत्नागिरीस आले. तेथील लोकांचे सामाधान करून जयगडास येऊन मुजरत माहेगिरी गलबत, पत्रें देऊन पुढे रवाना केलें. त्यास शामलाची गलबतें राजापुरीच्या नस्तावर आंगावर आली याजकरिता जोडेकरी कुभारूस उतरोन आले. गलबत सुवर्णदुर्गास गेले. चिरंजीव सुवर्णदुर्गास येऊन दोन चार रोज जाहाले असावें. परजन्याकरितां राहाणे जाहाले असेल, अविलंबेच येतील. आपणांस पत्रे होती तोच लखोटा पाठविला आहे. त्याजवरून सविस्तर कळो येईल. वरकड तेथील गलबताची भर्ती जाहाली पाहिजे. याजकरितां आरमारकरी लोक व तुकोजी कडू व दर्यावर्दी दोन गलबताची भर्ती पाठविलें आहेत. गलबते तयार करावयाविशी राजेश्री रघुनाथ हरी यांसी लेहून पाठविलें असें. आरमाराची तयारी करतीस आपणाल कलावें म्हणोन लिहिलें असें. बहुत काय लिहिणें ? लोभ असो दिला पाहिजे. रवाना छ १४ माहे रबिलावल हे विनंती

मोर्तब
सुद.

¶Laxmibai Angre informs Bajirao of Sambhaji having arrived at Ratnagiri and from thence at Suvarnadurg and that he was preparing his Navy.

No. 59] *[14-8-1733*

श्री

राजश्री बाजीराव पंडित
प्रधान दाजी गोसांवी यांसी

ऽ सकल गुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री सखोजी आंगरे सरखेल रामराम विनती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लेखन केलें पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन लेखनार्थ अवगत

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

जाहाला. दुर्बिनीचे जरूर प्रयोजन आहे. संग्रही असिली तर पाठऊन दिली पाहिजे म्हणून लिा. यैशास संग्रही म्हणावयास खुद आमची पाहावयाची होती तेच पाठविली असे. या प्रांती काही मिलत नाही. कधी ज्याहाजे पैदास्त जाली तरी सापडतात. कललें पाहिजे. रा छ १४ माहे रबिलोवल बहुत काय लिहिणें? लोभ असों दीजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Sekhoji sends his binocular to Bajirao.*

No. 60] [*16-8-1733*

श्री.

राजश्री पंडित प्रधान स्वामी गोसावी यांसी.

ऽ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो बकाजी नाईक माहाडीक नामजाद प्रांत जंजिरे सुवर्णदुर्ग कृतानेक रामराम विनंती. येथील कुशल जाणून स्वकीय कुशललेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामीनी पत्र पाठविले ते प्राा होऊनु बहुत समाधान जाहालें. जासुदाची जोडी अंजनवेलीस रवाना केली असे. यांस सोबत देऊन पुढे रवाना करणे म्हणोन आज्ञा. आज्ञे प्रो दाभोलपर्यंत बाा माणसे देऊन रा केले. गोवलकोटास जासूद जाऊन सिदीसाद याची भेट घेऊन जाबसाल घेऊन आले आहेत. तिकडील सविस्तर वृतांत विदित करितील. बहुत काय लिहिणे? कृपा वर्धमान केली पाहिजे रा छ १६ माहे रबिलोवल हे विनंती.

¶*Bakaji Naik informs Bajirao of his having dispatched the latter's communications to Anjanvel.*

No. 61] [*16-8-1733*

श्रीराम.

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत
राजमान्य राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान गोसावी यांसी.

प्रीतिपूर्वक लक्ष्मीबाई दंडवत विनंती. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन केले पाहिजे विशेष. सिदीसाद यास पत्रे देऊन जासुदाची जोडी रवाना

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

केली असे. अजनवलीस रवाना करावी म्हणोन लिहिले होते त्यावरून जासुदास दाभोळेस पाऊन दिल्हे. त्याणी गोवलकोटास जाऊन सिदीसादाची भेट घेऊन जाबसाल घेऊन आले. यांची रवानगी आपणाकडे केली असे. राजश्री श्रीनिवास पंडित प्रतिनिधी यांचे व सिदीसाद यांचे भाडण जाले. त्याचे वृत जासूद सांगता अवगत होईल. बहुत काय लिहिणे लोभ असो दिल्हा पाहिजे. रा॥ छ १६ माहे रबिलौवल हे विनंती.

¶*Laxmibai Angre reports to Bajirao the quarrel of Siddi Sat and the Pratinidhi.*

No. 62] [*16-8-1733*

श्री

राजश्री बाजीराव पंडित प्रधान

दाजी गोसांवी यांसी

ऽ सकल गुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रीो सेखोजी आंगरे सरखेल रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लेखन केलें पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन लेखनार्थ अवगत जाहाला. पेण प्रांताचे रखवालीबद्दल दोनसे माणूस पाठवून देतो, गनिमाचे खबरेंत असावें, वर्तमान वरचेवर लेहून पाठवावें, म्हणोन लिा॥. येशास आपणाकडील जमाव येऊन पोहचे तावत्काल रयतेस धीर न निघे. गनिमाची दाटीची खबर आइकोन रयत तंकवेतूट[1] होऊन परागंदा जावयास लागली. याजकरितां इकडील जमाव वासीप्रांताचे रखवालीस पाठविला व पेणप्रांताचे रखवालीस कोंडाजी सिंदे यांजबराबर सवासें माणूस देऊन आंतोरियाचे बंदरी ठेविले. कल्याणाहून नवद माणूस पेणेस आले. ते पेणचे कोटांतच असते. बंदरचे रखवालीस जावयाची आज्ञा केली; परंतु त्याचे वस्तु ते होत नाहीं. आपण त्यास ताकीद करून बंदरोबंदरी राहून चौकसी रखवालीची करीत ते करावें. वरकड मुबैकडील वर्तमान तरी पनासक सीलेसिले[2] लाहान थोर पाणी फाटी सामान किले देखील चढऊन तयारी केली आहे. पाहावे. कोणी-

श्री
श्रीशाहू नृपति प्रीत्या
तुकोजी तनुजन्मना का-
न्होजी सरखेलस्य मुद्रा-
जयति सर्वदा.

---

१ तकवेतूट = तजावजा, घाबरी. २ सिलसिला = काफला.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

कडेस उतरेल तें नकले. इकडून रखवाली व चौकसी मुलकाची करणें ते केलीच आहे. कललें पाहिजे. जाणिजे रा छ १६ माहे रबिलौवल. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶Sekhoji Angre to Bajirao: informs him how he was vigilant in obtaining news of the enemy's movements and in guarding the various stations.

No. 63] [*17-8-1733*

श्री.

पुरवणी राजश्री बाजीराव पंडित

प्रधान दाजी गोसांवी यांसी

विनती उपरी. इंग्रेजाकडील बोलीचालीचा निर्वाह होऊन यावा या विचारे येथून राजश्री बावाजी बलाळ यासी पाठविले व मशारनिलेस बहुत दिवस जाहाले व मध्ये उंदेरीचाही प्रसंग जाहाला म्हणून मुजरद जोडेकरी याजबराबर पत्रें रा केली. त्यास इंग्रेजाने मुदा घालतां हाच घातला कीं तुमचा आमचा सला जाल्याची सार्थकता हेच आहे कीं साहुकार लोकांची साहुकारी चालावी, गोरगरीब-देखील बेपारियांपासून तुम्ही कौलावण घेता तें न घ्यावे, म्हणजे तुमचे आमचे सौरश्य होऊन येईल. अन्यथा आम्हास प्रयोजन काय? इत्यादिक गोष्टी सां [गो] न व लेहून पाठविल्या. यैशास जंजिरा आदिकरून शामलाकडील मनसबा जाहा (ला) पाहिजे त्यास इंग्रेजाचा शह असिल्याने काहीच सिधी होणें नाही. आजीपर्यंत श्रमसाहास केले त्याचें कलशारोपण हेंच की समूल शामल उपडून टाकावा, हे गोष्ट नंव्हे[1] तेव्हा अवघेंच व्यर्थ. व आमच्या मनसबियाची उपजीविकाहि हेच! ज्याहाजाती पैदास्त न होये तेव्हा मनसबा कैसा कैसा चालू पाहातो? येवंक्रमेण दोहोकडूनहि संकटच प्राप्त जाहालें. या करितां याचा विचार कैसा काय करावा? आपण ये गोष्टीचे मनन बरेसे करून काय उतर तें पाठवावें. ज्याहाजाती पैदास्तीविना यां जलदुर्गाची उपजीविका चालो पाहाते यैसें नाहीं. यास्तव सत्वर उतर पाठवावें. आपलें उतर येई तावत्काल मुबैकडील पत्रांची रवानगी तटली आहे. आपलें लिहिलें येईल तदनुरूप विचार करणें तो करून. कललें पाहिजे. आमचे मनसबियाची उपजीविका सर्व

---

१ नव्हे—न होई.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
कौलावण, तें दूर करावे तेव्हा काय करावे ? इंग्रेजाचा सला न करावा तरी जंजिरेयाचा उपाय अरमाराविना होणे नाही. यास्तव काय विचार करावा तो अविलंबे लेहून पाठवावा. त्याप्रो करून. कलले पाहिजे. बहुत काय लिहिणे. रा छ १७ माहे रबिलौवल हे विनती.

मोर्तब
सुद.

¶*Sekhoji Angre reports to Bajirao his negotiations with the British of Bombay.*

No. 64] [*August 1733*

श्री.

मुख्य

सुा आर्बा सलासीन मया आलफ. तुम्ही पत्र पाठविले ते पावलें. अजम जनराल याचे बोलीचा आर्थ लेख केला की शामलाचे जागियाचा उपराला करणे त्यास मदत खर्च लागेल तो आम्ही देऊन म्हणोन परवाना येऊन पोहचला आहे. त्याजवरून मदत करणे जरूर. दुसरे पाबाचे जागियाची मदत केली तर कार्याची. म्हारष्टाची मदत करून होणे काये ? तथापि मदत केलीच तरी याचे आम्ही काये घ्यावे ? कुल सरखलीचे हवाली होऊन दर्यातील साहुकारी मना करितील म्हणौन तपसिले लिहिले ते कलले. ऐशांस पातशाहाचा परवाना आला कोठून ? पातशाहाजवल दादफिराद आहे ते आम्हास ठावकीच आहे ! पातशाहाचे पडोसी[1] आम्ही आहो. रवाहित्यास (?) वाकीफ असो. पातशाहाचे नाव घेऊन उगीच मदत करीत असतील तरी सुखे करोत. पात [शा] हाचे जागियास मदत खर्च लागेल तो पावेल हे ताहाकीक आहे. या तर्फ समत केलियाचा फाइदा नाहीं. म्हणोन पेशजी मुबैची मदत इकडूनच जाहाली व मुबैई मुबई म्हणावयांस कोण्हाचे उपरालियानी राहिली ते ईश्वरास दखल आहे व तमाम आलमावर रोशन आहे. जनराल मारनिले यांचे खातरेत कीं पैकियावर मदत जाली तरी याकूतखाना-सारिखा गनीम तेथे येऊन जीवपेणे आसान नव्हे पैका तर बहुत जवल आहे ते ज्याणी जो उपकार केला तो भले आठवितात. जनराल मारनिले नाचीज करू म्हणतात हेहि त्याचे थोरपणास योग्य व पुढे हबसियाची कुमक करावी म्हणून म्हणत असतील. असों. सरखेलीचे मुकदमियांचा मजकूर तरी माहाराजानी आम्हांस या मसलतीस रवाना केले. या वख्ती सरखेलीकडे व आणिखी कोण्हा-

---

१ पडोसी = शेजारी.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

कडे गडकोट तरांडे आले तरी त्यास संमध नाहीं. सरकारचे असे. सरखेल आदि करून माहाराजाचे चाकर आहेत. या गोष्टीचा व(स)वांस जनराल माारनिलेयाही चितात धरावासा नाही. गुराबा पाच छ्यावणीकरितां कुलाबा पाठविल्या म्हणौन म्हणत असतील, तर गुराबाची तामरात व छ्या [व] णी जाली पाहिजे. सबब गुराबा पाठविल्या आहेत. खावदाचे हुकुमा ताबे आहेत. ज्यास खावदाचा हुकूम होईल जिकडे, तिकडे गुराब व किलेकोट आहेत. खातरजमा असो देणे. सावकारी सरखेल बंद करितील म्हणौन तरी तुमचे आमचे येकदील जालियावर सरखेल सावकारी बंद करितील हे होणे नाही. तथापि सावकारीस अटकावच करू लागले तरी तुम्ही आम्ही मिलोन सावकारी दुरुस्त चाले ते करून. जनराल माारनिले यांचे मते तह करावा तरी माहाराजाच खातरेत तह करावा हे नाहीं. कुल हबसी काढावा हे त्यास जरूर असे.

¶*This is a draft letter of Bajirao suggesting the ways how the points raised by the British General were to be met with.*

No. 65] [*21-8-1733*

छ २३ रावल

श्री

राजश्री बाजीराव पंडित प्रधान
दाजी गोसावी यासी.

ऽ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रो सेखोजी आंगरे सरखेल रामराम विनती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लेखन केले पाहिजे विशेष. आपण पत्रें पाठविलीं ती प्रविष्ट होऊन लेखनार्थ अवगत जाहाला. अजनवेलीकडील लाग आला आहे. त्यास आपण आम्ही येकत्र होऊन ये गोष्टीची तजवी [ज] करून. बराबर राजश्री रघुनाथजी यास आणावे. तेथें कोणास ठेवणे ते ठेवावे. खामखा यावेच यावें इत्यादि विशदें लेख केला. यैशास आपली आमची भेटी व्हावी. तदुतर कर्तव्य पदार्थ करावा. कितेक मनसबियाचे विचार आहेत. याच अन्वये आपणास लेहून पाठविलें. त्यास आपणहि यावयाचाच विचार लिहीला. प्रस्तुत इग्रेजाकडील मनसबा पूर्वील बोलीप्रमाणे जाला तरी करावा याच विचारें कागदी पत्रीं राबिता न तोडितां आपणास बोलीचा अर्थ लेहून पाठविला. त्याचा विचार आपण लेहून पाठविला त्याप्राा इग्रेजास लेहून पाा आहे. शामलाकडील मदत त्याणें न करावी, उदेरी आमचे हवाला करावी इत्यादिक लिा आहे. त्याचें उतर काय येतें त्याचा मार्ग

---

१ वसवास—भीति, शंका.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

पाहावा लागतो. व सांप्रत शरीरी भागवटीयामुळे शरीरी अनारोग्य ज्वरादिक पीडा जाहाली आहे. + श्री कृपे लौकरीच आरोग्यता होईल. सात आठ दिवस श्रावणाचे आहेत. हे सरलियानंतर भाद्रपद शुध प्रतिपदा द्वितीया यामध्ये स्वार होऊन येऊन. आपली आमची भेटी जालियानंतर जो मनसबा विचारें करणें तो केला जाईल. राजश्री रघुनाथजीसहि बराबर घेऊन येऊन. कलले पाहिजे. जाणिजे रा छ २१ माहे रबिलोवल बहुत काय लिहीणें. लोभ असों दीजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Sekhoji Angre discusses the plan of the Campaign with Bajirao.*

No. 66] [*21-8-1733*

छ २३ रालोवल

श्री.

पु॥ राजश्री बाजीराव पंडित

प्रधान दाजी गोसांवी यांसी.

विनती उपरी. अजनवेलीकडील मनसबा करावा म्हणौन प्रथम पत्री आपण लेहून पाठविलें. सवेंच मागाहून लेहून पाठविले जे, नवाबाकडून मुतवरखान यास घेऊन राजश्री आनंदराव सुमंत येतात. नवाबाचे मर्जीप्रा॥ केले जाईल म्हणौन राजश्री स्वामीचे उतर नवाबास गेलें आहे. नवाबाकडील मनुश्य येऊन तह होतो तेव्हा आपण नस्ता उपद्वाम करून नफा काय? यास्तव राजश्री स्वामीस लिहीता मोघमच लिहावे म्हणोन लिहीलें त्याजवरून आम्ही राजश्रीस लिहिणे तें मोघमच लिहिले आहे व नवाबाकडील बोलीचाली होणे ते राजश्री स्वामी आपल्या विचारावेगल करितील यैसें नाही, व आपणासहि आजीपर्यंत केल्या मनसबियाचा सेवट केल्याविना टाकितां येतें यैसें नाही, व टाकिल्याने लौकीकहि विरुध्ध होऊन येईल हे आपण जाणतच आहेत.

+ शिक्का आहे.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

आठा रोजी आम्ही तेथें येतों. आपले आमचे भेटीनंतर जो विचार होणें तो होईल. कलले पाहिजे. जाणिजे रा छ २१ माहे रबिलौवल बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Sekhoji offers to visit Bajirao in a week in order to settle the plan of action.*

No. 67] [*21-8-1733*

छ २३ रालोवल

श्री

पुरवणी राजश्री बाजीराव पंडित
प्रधान दाजी गोसावी यासी.

विनती उपरी. अजनवेलीकडील मनसबा मान्य करावा म्हणून राजश्री स्वामीनी आज्ञा केली. येविसीचा विचार आपणास लेहून पा. त्यास आपण लेहून पाठविले कीं, मनसबा मान्य करून खामखा करावा. राजश्री प्रतिनिधी यास वरघाटे न्यावे, आपण मनसबा करितो म्हणौन राजश्री स्वामीस लेहून पाठवावे म्हणौन लिहिले. यैशास राजश्री प्रतिनिधी यांणी मनसबियाचा आगेज केला आहे. त्यास इरे प्राप्त जाहाली असता आपण मान्य करावें तरी उचित दिसत नाही. राजश्री रघुनाथ हरी व बकाजी नाईक माहाडीक यासी आपले लिहिल्यावरून आणविले. अन्यथा आजीकारणे[1] अजनवेलीचा मनसबा विलेस लाऊन जंजिरेयाचा पक्ष तोडिला जाता. अतैव भगवत् इछा प्रमाण. तदनुरूप जे समई जो प्रसंग होणे तो होऊन येतो. वरकड राजश्री प्रतिनिधी आले आहेत ते कृतकार्य जाहाल्याविना निघतात यैसे नाही. त्यांजकडून कार्य सिधीते न पावविले तरी त्याचा विचार कर्तव्यता आपले भेटीस आठा दिवसा येऊन तदनंतर आपले आमचे विचारे करणे ते करून. कार्य सिधीते पावविले जाईल. जाणिजे रा छ २१ माहे रबिलोवल बहुत काय लिहीणे लोभ असो दीजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Sekhoji discusses with Bajirao the plan of starting an expedition against Anjanwel.*

---

१ आजीकारणे-आतांपर्यंत, हा वेळपर्यंत.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 68] *[21-8-1733*

छ २३ रालौवल

श्री

पुरवणी राजश्री बाजीराव पंडित
प्रधान दाजी गोसावी यांसी.

विनंती उपरी. चिरंजीव राजश्री संभाजी आंगरे यासी लेहून राजश्री प्रतिनिधी यांजकडे येणे नव्हे ते गोष्ट करावी म्हणून लिहिले. येश्यास पंडित मारनुले यांही चिरंजिवास लेहून पाठविले होते. परंतु त्याच्या लिहिल्यास बघले नाहीत. राजश्री स्वामीची पत्रे आली तरी येऊन म्हणौन त्यांस लेहून पाठविले. त्याजवरून राजश्री स्वामीची पत्रे आणऊन बजाजी कदम यास चिरंजीव मारनुले यांजकडे पाठविला आहे. त्या प्रांतीचे माहाल घ्यावे यैसा विचार केला आहे म्हणून सुवर्णदुर्गाहून लेहून आले. त्याजवरून मुजरद गलबत रवाना करून चिरंजिवास विचार आचार लेहून त्यास सामील न व्होवे म्हणौन विशदे लिहिले असे. तद-नुरूप विचार करून येणार नाहीत. विचार न करिता आले तरी येतीलहि! कललें पाहिजे. जाणिजे. रा छ २१ माहे रबिलौवल बहुत काय लिहिणे लोभ असों दीजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Sekhoji to Bajirao: assures him that Bajaji Kadam would not let Sambhaji join the Pratinidhi.*

No. 69] *[21-8-1733*

छ २३ रालोवल

श्री

पुरवणी राजश्री बाजीराव पंडित प्रधान
दाजी गोसावी यांसी.

विनंती उपरी. इग्रजाचे आरमार तयार जाहाले आहे. अजनवेलीस जाऊन सिदीसाद यास जंजिरेयांत आणून पावावा, संबूल अंजनवेलीस पावावा येसा विचार जाहाला आहे. सुरतेचा जमाव पटणेस दीड हजार आला आहे म्हणोन कल्याणच्या पत्रावरून आपण लेहून पाठविले. तरी आम्हाकडील माणसे सुर-

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

तेहून आली. सुरतेस सिदी आहे. त्यास आजार जाहाला आहे. जमाव त्याजबराबरी अथवा नवाही केला नाही. इग्रजाच्या ग्याल्या आजीच तीन खांदेरीबाहीर आल्या आहेत. परंतु अजनवेलीस जावयाचा विचार दिसत नाहीं. वरकड अरमार मुबैस तयार होत आहेच. शामलाकडील साहित्यास अंतर करणार नाही. जाणिजे. रा छ २१ माहे रबिलोवल. बहुत काय लिहिणें? लोभ असों दीजे हे विनंती.

मोर्तब
सूद.

¶ *Sekhoji informs Bajirao that the British Navy of Bombay was going out to help the Siddi.*

No. 70] [*22-8-1733*

श्री

श्रीमत् राजश्री पंतप्रधान
स्वामीचे शेवेसीं.

सेवक रघुनाथ हरी सा॥ दंडवत् विनंती. येथील कुशल स्वामीचे कृपेकरून श्रावण बहुल नवमी पावेतो असे विशेष. स्वामीनी पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन सविस्तर कलो आले. राजश्री सरखेल यांस घेऊन भेटीस यावे म्हणौन आज्ञा केली. यैशास साप्रत राजश्री सरखेल यांचे शरीरी समाधान नाही. श्रीकृपे सत्वरीच आरोग्य जाहालियावरी भाद्रपद शुध पक्षी स्वार होऊन येऊन. भेटीनंतर सविस्तर विदित होईल. बहुत काय लिहिणे कृपा वर्धमान करावी हे विनती.

¶ *Raghunath Hari informs Bajirao that Sekhoji would go to meet him when he recovers from his ailment.*

No. 71] [*23-8-1733*

छ २३ रबिलोवल.

श्री

पुरवणी राजश्री बाजीराव पंडित प्रधान दाजी गोसावी यासी. विनती उपरी. चिरंजीव राजश्री संभाजी आंग्रे यासी लेहून राजश्री प्रतिनिधी याजकडे येणे नव्हे ते गोष्ट करावी म्हणून त्यास लेहून पाठविले होते, परंतु त्याच्या लिहि-

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ण्यास बधले नाहीत. राजश्री स्वामीची पत्रे आली तरी येऊन म्हणोन त्यास लेहून पाठविले; त्याजवरून राजश्री स्वामीची पत्रे आणवून बजाजी कदम यास चिरंजीव माकुरनिले याजकडे पाठविला आहे. त्या प्रांतीचे महाल घ्यावे ऐसा विचार केला आहे म्हणून सुवर्णदुर्गाहून लेहून आले, त्याजवरून मुजरद गलबत रवाना करून चिरंजिवास विचार आचार लेहून त्यास सामील न व्हावे म्हणोन विशदे लिहिले असे. तदनुरूप विचार करून येणार नाहीत विचार न करिता आले तरी येतीलहि कळले पाहिजे. जाणिजे रा छ २१ रबिलावल. बहुत काय लिहिणे लोभ असो दिजे हे विनंती +

¶ *Sekhoji assures Bajirao that he has asked his brother Sambhaji not to join the Pratinidhi.*

No. 72] *[25-8-1733*

श्री

राजश्री पिलाजी जाधवराव

गोसावी यांसी.

ऽ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रो सेखोजी आंगरे सरखेल रामराम विनती उपरी. येथील कुशल जाणौन स्वकीये लेखन केलें पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ अवगत जाहाला. येथे कितेक मनसबियाचा विचार करावयाचा आहे, तरी आपण आले पाहिजे म्हणौन लिहिले. यैशास आज नव रोज शेरीरीं अनारोग्यता जाहाली आहे. तीन दिवस ज्वरातिशय होऊन त्या उष्णतेमुलें रुधिरश्राव नासिकद्वारें व्हावयास लागला. त्याचा उपाय करणे तो करीत आहों. श्री कृपेने आरोग्य लौकरीच होईल. आरोग्य लौकरीच होईल. आरोग्यता जाहालियावरी स्वार होऊन येऊन. कललें पाहिजे. जाणिजे रवाना छ २५ माहे रबिलोवल बहुत काय लिहिणें, लोभ असों दीजे हे विनती.

मोर्तब
सुद.

¶*Sekhoji Angre informs Pilaji Jadhav of his ill-health.*

+ वरील पत्र दुबार छापलें गेलें आहे. पहा प. नं. ६८.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 73] [*25-8-1733*

श्री

राजश्री बाजीराव पंडित प्रधान दाजी गोसावी यांसी.

ऽ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रीो सेखोजी आंगरे सरखेल रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लेखन केले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ अवगत जाहाला. येथे शंभर विचार संभराप्रकारीचे होतात. याकरितां येका दिवसाचे अवकाशें आले पाहिजे म्हणून लिा. येशास आजि नव रोज शरीरी अनारोग्यता जाहली आहे. तीन दिवस ज्वरातिशय होऊन त्या उष्णतेमुळे रुधिरश्राव नाशिक द्वारें होऊ लागला उपाय करणे तो करीत आहो. श्रीकृपे वडिलांचे पुण्येकडून आरोग्य लवकरीच होईल. आरोग्यता जाहलियावरी आपले भेटीस येऊन. कललें पाहिजे. जाणिजे. रा छ २९ माहे रबिलोवल. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

मोर्तब
सूद.

¶ *Sekhoji Angre informs Bajirao of his ill-health.*

No. 74] [*26-8-1733*

श्री

राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान
दाजी गोसांवी यांसी

ऽ सकल गुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रीो सेखोजी आंगरे सरखेल रामराम विनती उपरी. येथील कुषल जाणून स्वकीय कुशल लेखन केलें पाहिजे विशेष. आपण पत्रें पाठविली तीं प्रविष्ट होऊन लेखनार्थ अवगत जाहाला. काजीच्या कबिल्याविसी व किलेदाराकडील कर्जाचा अर्थ राजश्री आपा यांस लिहिला होता. त्यानी किलेदारास लिहिलें होतें त्याचें उतर आलें व निजामनमुलकाकडून किलेदारास लिहिलें आलें तेविसीचा तपसील लिहिला. येशास सध्या आमचे शरीरीं अनारोग्य आहे. श्रीकृपेनें आरोग्य जाहाल्यावर आपली आमची भेट होईल. भेटी नंतर याचा कर्तव्य विचार आपलेच विचारे केला

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

जाईल व आपण या गोष्टीचा अभिमान धरिल्याविना हें कार्य होणें नाही. कलें पाहिजे. जाणिजे. रा छ २६ माहे रबिलोवल. बहूत काय लिहिणे लोभ असो दिल्हा पाहिजे हे विनती

मोर्तब
सुद.

¶*Sekhoji Angre informs Bajirao that he would come to his visit as soon as he gets better.*

No. 75] [*26-8-1733*

छ २६ रोावल.

राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान
दाजी गोसावी यांसी.

ऽ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो सेखोजी आंगरे सरखेल रामराम विनती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन केले पाहिजे विशेष. शरीरी अनारोग्यता प्राप्त जाहालेयाचे वर्तमान आपणास लेहून पाठविले आहे त्यावरून कललेच असेल. दिवसेदिवस व्यथा अधिकोतर होत गेली. पिशाचपीडाहि आहे. येशास राजश्री पिलाजी जाधव राऊ यास पत्र पावतांच आम्हाकडेस पाठऊन द्यावे. येक घडीचा विलंब न करावा. श्रीकृपेने आरोग्य जाहलेयास जाधवराऊ यास आपणाकडेस पाठऊन देऊन. अगत्यरूप पाठवावे. आताचें घटकेवरी न नेतां रवाना करावे. कळले पाहिजे. रा छ २६ माहे रबिलोवल. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶ *Sekhoji Angre requests Bajirao to send Pilaji Jadhav to him at once, as the writer was on his death-bed.*

No. 76] [*26-8-1733*

छ २६ रौावल.

श्रीराम.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेसी.

सेवक रघुनाथ हरी साष्टांग दंडवत प्रमाण विनंती उपरी. येथील कुशल स्वामीचे कृपेने असे विशेष. राजश्री सरखेल यांचे शरीरी व्यथा जाहली आहे.

---

* कान्होजीचा शिक्का.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

ते दिवसे दिवस भारी होत चालिली. ईश्वर कल्याण करील. राजश्री पिलाजी जाधवराऊ यास पाठवावें म्हणोन राजश्री सरखेल यांनी आपणास लिहिले आहे, त्याप्रमाणे त्यांची रवानगी अविलंबे करावी. येक घटिकेचा विलंब न करावा. बहुत काय लिहिणे, कृपा वर्धमान करावी हे विनंती.

¶ *Raghunath Hari informs Bajirao of Sekhoji's illness.*

No. 77] [*27-8-1733*

श्री

राजश्री राऊ गोसावी
यासी

ऽ सकलगुणालंकरण आखंडितलक्षुमीआलंकृत राजमान्ये श्रो लक्षुमीबाई विनंती उपर. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असिले पाहिजे. तुमचा निरोप घेऊन आलो. ते * * कोठीस छ २७ रावल पावलो. साला * * हून जमाव मागे रवाना केला असे. आपणास कलावे म्हणोन लिंहिले असे. बहूत काय लिहिणे कृपा असो दीजे हे विनंती.

¶ *Laxmibai Angre to Bajirao communicates her arrival.*

No. 78] [*28-8-1733*

श्री

राजश्री पंतप्रधान गोसावी यांसी.

ऽ श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मी अलकृत राजमान्य सेवक पिलाजी जाधव राम (व) दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये लेखन केले पाहिजे विशेष. आम्ही आपली आज्ञा घेऊन स्वार जाहालों ते इंदु-वारी मध्यरात्रौ कुलाबियास आलों. दुसरे दिवसी अमावाश्यस दोन तास दिवसास राजश्री सेखोजी आंगरे सरखेल यांस वैकुठवास जाहला हे वर्तमान अगोधर लिंहिले आहे त्यावरून कललच असेल. त्या अलाकडील वर्तमान तरी सो चिरंजीव आनंदीबाई व राखा तिघी येा चौघीजणीनी अग्नप्रवेष केला. आपणास कळावे म्हणोन लिा असे. दिवस होत तोंपर्यंत आम्हासं यावयास

Ca 2—9

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

अनकूल पडत नाहीं. राजश्री संभाजी आगरे यासहि यावयाविसी विजेदुर्गी पत्रे पाठविली आहेत. इतकियांत तेहि अविलंबेच येतील. तदुतर यावयाचा उद्योग करून. जाणिजे रा छ २८ माहे रबिलोवल. बहुत काय लिहिणे हे विनती

मोर्तब
सुद.

(डावे बाजूस शिक्का.)

¶ *Pilaji Jadhav informs Bajirao of the circumstances of Sekhoji's death.*

No. 79] [*28-8-1733*

श्री

राजश्री पंत प्रधान स्वामी गोसावी यांसी.

ऽ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो पिलाजी जाधवराऊ रामराम विनंती उपरी. आजी भोमवारी राजश्री सेखोजी आंगरे सरखेल यांस तिसरे तासी देवाज्ञा जाहाली. ईस्वरे बहुत गोष्ट फटकाल केली. होणारास यत्न नाही. येथील उद्योग करणे तो करून. राजश्री मानाजी आंगरे यांसी पाच लोकानिसी पाठऊन दिले पाहिजे. बहुत काय लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनंती. फ+ष. (?)

¶ *Pilaji Jadhav informs Bajirao of Sekhoji's death.*

No. 80] [*28-8-1733*

श्री

राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान यांसी.

प्रति लक्ष्मीबाई विनंती, उपरी. श्रावण बहुल अमावाश्या भोमवारीं चिरंजीव राजश्री सेखोजी आंगरे यासी देवाज्ञा जाहली. श्री ईछेस यत्न नाहीं. ईस्वरे मोठे सकटात घातले. आपणास कळावे म्हणोन लिहिले आहे. चिरंजीव मानाजीस पांच लोकानिसी येथ पाठविल पाहिजे. बहुत काय लिहिणे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶ *Laxmibai communicates to Bajirao the news of Sekhoji's death.*

+ खाशाचें अक्षर.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 81] [*30-8-1733*

श्री

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत

राजमान्य राजश्री बाजीराव पंडित प्रधान गोसावी यांसी.

प्रीतिपूर्वक लक्ष्मीबाई दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये लेखन केले पाहिजे विशेष. चिरंजीव राजश्री मानाजी आंगरे यास यावयाचे लिहिले आहे त्यास ते जागा जमाव आहे त्यांत कोणही सरदार असावा याकरितां येथून राजश्री बाजी नाईक साटम व पिलाजी नाईक साटम जमावानसी पाठविले आहेत. हे तेथें जमावात राहतील. चिरंजीव राजश्री मानाजी आंगरे यांस येथें पाठविले पाहिजे. जाणिजे रा छ १ माहे रबिलाखर. बहुत काय लिहिणे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶ *Laxmibai Angre to Bajirao asking him to send Manaji Angre to Kolaba and Baji Naik and Pilaji Naik Satam have been sent to take over his charge.*

No. 82] [*1-9-1733*

छ ३ रालाखर

श्री

तीर्थरूप राजश्री राऊ स्वामी

वडिलाचे सेवेसी.

विनंती राजश्री प्रतिनिधी यानी येथे उपद्राप मोठासा माडिला आहे. रोजबरोज स्वार येतात. अजनवेली घेऊन तरीच उठेन म्हणतात. खटाटोप फारसा केला आहे. शामलानी आपला जमाव घेऊन गोवळांत आहे. अजनवेलीस तीनेकसे माणूस आहे म्हणून अजनवेलीचे बातमी येतें. दादोबा नाा यांचे व यांचे येकचित आहे. गोवलास आर्युभाव दाखऊन अजनवेलीचे दुचते (?) काम करावें असे याचे मानस आहे. होईल ते वृत लेहून पाठऊन. दादोवा नाईक याचे हातून भेद जाहाला आहे. प्रतिनिधी महाराजांस लिहितात की अजनवेली घेऊन तरीच उठोन; अन्यथा उठतो ऐसे नाहीं म्हणून लिहिले याजवरून राजश्री स्वामी याजवरी फारसे संतोषी आहेत. आपणास कलावे म्हणून लिहिले असे हे विज्ञापना.

¶ *News letter to Bajirao describing the Pratinidhi's doings.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 83] [*About 1-9-1733*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेसी.

सेवक रघुनाथ हरी कृतानेक साष्टांग दंडवत प्रणाम विनंती उपरी. येथील कुशल स्वामीचे कृपे करून असे विशेष. स्वामीनी कृपा करून पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन बहुत समाधान जाहले. जाहले गोष्टीचा खेद न धरितां मामलियाचा बंदोबस्त करावा. आम्ही साहित्यास आहों म्हणोन कितेक विशदे स्वामीनी आज्ञा केली तरी उचितच आहे. भवितव्यानुरूप होणे ते होते त्याचा खेद धरिल्यास काय होणे ? मामलियाचा बंदोबस्त करणे तो करीत आहों. सर्वांची समाधाने करून यथापूर्व कार्याचे ठायी योजणूक होणे ते होते. राजश्री संभाजी बावाही दों चहू दिवसीं आल्यावरी सविस्तर आपणास लेहून पाठऊन. वरकड राजश्री सुभेदारानीं लिहा आहे त्यावरून विदित होईल. स्वकीय वृत तरी स्वामीस सर्व विदित आहे. व राजश्री बालाजीपंत याजवल सांगितले होते त्याणी विदित केलेच असेल. ये प्रसंगी स्वामीच्या पायाविना दुसरा आश्रय नाहीं. प्रतिक्षणी आमचा परामर्श करावा. आमचे विशई विस्मरण न करावें हे प्रार्थना लक्ष प्रकारे असे. बहुत काय लिहिणे कृपा वर्धमान करावी. हे विनंती

¶ *Raghunath Hari assures Bajirao of the whole-hearted support of the Angrias.*

No. 84] [*2-9-1733*

श्री

राजश्री पंडित प्रधान स्वामी गोसावी यांसी

ऽ श्री सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित बकाजी नाईक महाडीक नामजाद प्रांत जंजिरे सुवर्णदुर्ग कृतानेक रामराम विनंती. येथील कुशल जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले ते पावोन वर्तमान कळो आले. राजश्री सरखेलास देवाज्ञा जाहाली. तुम्ही लोकांची दिलभरी करून देशदुर्ग संवरक्षण करणे. मुलकांत कोणी उपसर्ग के(ला) तर मुलाजा न करणे. तुमच्या साहित्यास अतर होणार नाही म्हणोन कितेक आज्ञा लेहून पाठविली. येशास राजश्री सरखेलास या वख्तसमई येसा प्रसंग व्हावा हे न होते, परंतु होणारास काय करावे ? स्वामीचा व राजश्री सरखेल साहेबाचा रुणानुबंद जसतसा नाही. समई स्वामीने दशदुर्गाविसी आज्ञा

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

केली तर बहुत बरे. आम्ही लोक त्यांचें नवाजीस[1]-खावंदाचा नकश होई तितके गोष्टीस अंतर किमपि पडणार नाहीं. सारांश या यैसे प्रसंगात स्वामी आहेत. नुन्य पदार्थ तो स्वामीचा आहे येसे आम्ही समजत असो. त्याच प्रो सर्वविसी स्वामीचा भरोसा आहे तेथे विस्तार काय लिहिणे? सदैव कागदीपत्री परामर्श घेणार आपण समर्थ आहेत. नवल विशेष असल्यास वरच्यावर आपणास लेहून पाठउनु. बहुत काय लिहिणे. कृपा वर्धमान केली पाजे. रा छ ४ रबिलाखर हे विनंती. राजश्री मानाजी आगरयांही लाखोटे आपणाकडील राजश्री बाबा-साहेबाकडे विजेदुर्गी रा करावयास पाठविले. ते वरच्यावर रवाना केले. तीन च्यार रोजी विजेदुर्गीहून राजश्री बाबासाहेब जजिरे मारी येतील. येथून फुडें कुलाबा दाखल जाल्यावर आपणासहि विदीत होईल हे विनंती.

¶ *Bakaji Naik informs Bajirao that Sambhaji Angre had not yet arrived at Kolaba.*

No. 85] [*2-9-1733*

श्री

राजश्री पंतप्रधान गोसावी
यासी.

ऽ श्रीसकलगुणालंकर्णः अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रो पिलाजी जाधवराव कृतानेक दंडवत विनंती उपरी. येथील कुषल ता छ ४ राखर पर्येत येथास्तित असे. यानंतर गोसावीयांही पत्र पाठविले. पावोन वर्तमान विदित जाहाले. तेथे लिहिले गगाजान्हवी लक्ष्मीबाई व राजश्री रघुनाथजी यांचे बहूत प्रकारे सामाधान करणे म्हणऊन आज्ञा. तरी ज्या प्रकारे समाधान करावयाचे त्या प्रकारे केले व राजपुरीस लोकाची भरती नाई म्हणऊन लिहिले; तरी येथून राजश्री बाजी साटम सवाशा माणसानिसी रवानगी केली, तेहि येऊन पोहचलेच आसतील. आरमारी लो(क)हि लौकरच रवाना करितो. येथील बंदोबस्ती करावयाची ती केलीच आहे. रामराज व राजकोट चेऊल येथीलहि बंदोबस्ती बहूत केली आहे. सर्व वर्तमान जबानी राजश्री बालाजी माहादेव सांगतां

---

१ नवाजीस=आश्रित.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

× विदीत होईल. राजश्री कृष्णाजी राम मुंबईहून भला माणूस घेऊन जळमार्गें येतील. त्याचे वाटेस कोन्ही जाईल तरी वाटेस जाऊ न देणे म्हणऊन लिहिले, तरी त्याहि गोस्टीची बंदोबस्ती केली आहे. बहुत काये लिहिणे. कृपा लोभ असो दीजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶ *Pilaji Jadhao to Bajirao: sends fighting men to Rajpuri from Kolaba and assures him of steady effort on the part of the Angrias.*

No. 86] *[3-9-1733*

श्री

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मी-
आलंकृत राजमान्य राजश्री
बाजीराऊ पंडित प्रधान यासी.

प्रीतिपूर्वक गंगाजलनिर्मल लक्ष्मीबाई कृतानेक विनती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन केले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन लेखनाभिप्राय अवगत जाहाला. चिरंजिवानी परमपदवास केल्यानु-अन्वये समाधान विशई लेख केला. व लोकाची समाधाने करावीं इत्यादिक लेहून पाठविलें. येशास होणार प्रसंग जे समई तें होतच आहे. ते गोष्टीचा खेद अविलंबिलियाने सिधी काय? दुखाचे परिमार्जन करून पूर्वीपासून लौकीक संपादिला आहे, त्याचे संरक्षण करावें, हाच स्वधर्म आहे. यास्तव पुत्रशोकाचें दुख अपहारून तमाम किलोकिला व मुलुकामध्यें जागजागा जमाव आहेत त्यास समाधानपत्रें पाठऊन आवघियाचे म(नो)धारण केले असे. आपण चिंता न करावी. राजपुरीहून जमाव मानाजी आगरे याबराबर पनास माणूस (आले) त्याचा मुबादला रा॥ बाजी ना॥ साटम व पिलजी ना॥ साटम सवासे माणसानसी रा॥ केले. ते प्रविष्ट जाहालेच असतील व सुवर्णदुर्गाहून दर्यावर्दी रा॥ करविलेच आहेत. गोलंदाज दोघजण हाली येथून पा॥ आहेत. प्रविष्ट होतील. वरकडहि साहित्यास अंतर किमपि होणार नाही. कललें पाहिजे व कितेक अर्थ रा॥ सुभेदार-

---

+ याठिकाणीं पिलाजीचा शिक्का आहे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

याही लेहून पाठविले आहेत त्याजवरून कलो येईल. येथील आरमारहि तयार करविले आहे. त्याजवरून तुकोजी कडूस रा करू. जाणिजे रा छ ५ माहे रबिलाखर बहूत काय लिहीणे लोभ असों देणें हे विनंती

मोर्तब
सुद.

¶ *Laxmibai Angre assures Bajirao of her endeavours to keep all men loyal and active in the state service : there would be no remission of effort owing to Sekhoji's death.*

No. 87] [*5-9-1733*

श्री

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मी-
आलंकृत राजमान्य राजश्री
बाजीराव पंडित प्रधान यांसी.

प्रीतिपूर्वक लक्ष्मीबाई कृतानेक विनती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लेखन केले पाहिजे विशेष. सुक्रवारापासून जंजिरियावरून मोर्चेयावरी मारितो. त्या मारामुळे मोर्चेयांतील नवजण जखमी जाहाले. रात्रदिवस मार बेसुमार करितो म्हणौन मुर्चेयावरी लोक आहेत त्यांही लेहून पाठविले व अजनवेलीस मांहेगिरी[1] गेली होती तेहि आली. सिदीकडील कारभारी आपणाकडेस आले आहेत म्हणौन कलो आले. येशास गनिमाच्या माराखाले मुर्चे जायां जाहाले असतील त्यासी मजबुदी करवावी. भाडी आणिखीहि जोडून त्याचे मारापेक्षा इकडील अधिक मार होऊन गनिमास तंबी पोहचे ते करावी. येथून राजश्री रघुनाथजी यास व लोकास लेहून पा आहे. मुर्चे जाया जाहाले असतील ते जागा नवे माला करून मुर्चे नीट करविले आहेत व नवी भाडी आणिखी जोडायास सागितले आहे. फटकेडीचा[2] मुर्चा तयार करविला आहे. जलदीने मूर्चा तयार करऊन फडिकडा जोडिली जाईल. आपणहि मारनिलेस सागोन फटकडीचा मूर्चा तयार करवावा व अजनवेलीकडील संदर्भ काय कैसा आला आहे चित्वृत कोणीकडेस आहे पुढें मुदा काय आहे हें साद्यंत लेहून पाठवावें. चिरंजीव संभाजी आंगरे

---

१ मोठे जहाज. २ एक तऱ्हेची तोफ.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

यांसी आणावयास गलबतें गेली आहेत. आज उद्या यावे यैसें आहे. आल्यानंतर सविस्तर लेहून पाठऊन. कललें पाहिजे. जाणिजे रा छ ७ माहे रबिलाखर बहूत काये लिहीणें हे विनती

मोर्तब
सुद.

¶ *Laxmibai Angre writes this to Bajirao. The letter shows how earnestly she is doing her part in the war.*

No. 88] [*5-9-1733*

श्री

पुरवणी राजश्री बाजीराव

पंडित प्रधान यासी

विनती उपरी. तख्ते वगैरा सामान आणावया निमित्य गलबते साहा रवाना केली आहेत. लोखंडाचे प्रयोजन असे तरी ते जागा पावडे आहेत; त्यापैकी लोखंडाच्या प्रयोजनाचे पावडे देविले पाहिजेत. हाली गलबते रवाना केली आहेत. याजवरून घेऊन येतील. कलले पाहिजे. जाणिजे. रा छ ७ माहे रबिलाखर बहूत काय लिहिणे हे विनती.

मोर्तब
सुद.

¶ *The writer asks Bajirao for iron for the Navy.*

No. 89] [*6-9-1733*

श्री

पुरवणी राजश्री बाजीराव पंडित प्रधान

यासी.

विनंती उपरी. आरमारच्या प्रयोजनास चवटेयांचे प्रयोजन आहे. येशास ते जागा चवटे दास्तान आहेत त्याजपैकीं प्रस्तुत चवटे (?) ५०० पांचसे देविले पाहिजेत. पेशजी चवटे आपण दिल्हे होते ते खर्च जाहाले. हली गुराबची

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

अवजारे घड करावी लागतात. यास्तव अगत्य जाणून लिहिले असे. गलबते रवाना केली आहेत याजवरी पाठविले पाहिजेत. बहुत काय लिहिणे. लोभ असो दीजे. रा छ ८ रबिलाखर हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶ *The writer asks Bajirao for supplies being sent for his ships.*

No. 90] *[6-9-1733*

छ ११ रबिलाखर

श्रीशंकर

राजश्री पंत प्रधान स्वामी गोसावी यासी.

ऽ श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडीतलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेहांकित बकाजी नाईक माहाडीक नामजाद प्रांत जंजिरे सुवर्णदुर्ग कृतानेक रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणऊन स्वकीये स्वानंदलेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. कृपा करून पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन सविस्तर अर्थ श्रवणे-करून संतोष जाहला. स्वामीनी आज्ञा केली कीं यामागे स्वामीकार्य प्रसंग कितेक संपादिले. पुढें सर्वथैव अंतर न करावे म्हणून कितेक विशदे लेख केला, ऐशास आम्ही सेवक लोक, थोरले सरखेलसाहेब कैलासवासी याणी लहानाचे थोर करून सेवा यथाज्ञाने घेतली. त्यामागे राजश्री सखोजीबावा यांही सर्व प्रकारें साभाळ करून सेवा घेतली. त्यास श्रीचे चितास येऊन लोकांचे (प्र) जेचे दुराद्रेष्ट[1] तदनरूप येसा विचार घडोन आला. होणीरास यत्न नाहीं. या उपरी राजश्री संभाजी बावा त्यांचे जागा आहेत. आम्ही सेवक लोक काया वाचा मने करून दुसरा अर्थ नाहीं. त्यांचे ठाई वडिलाचे पुण्य समर्थ आहे. श्री कृपेने यशाची अभिवृधीच होणे ते होईल. संदेह आहे ऐसा नाही. आपण सर्व प्रकारे वडील आहेत. बुधीवाद विचारे लेख केला तो उचीत आहे. राजश्री सरखेलीचा आपला स्नेहानुबंध वडिलापासून अकृत्रिम चालिला आहे. तदनरूप ऐक्य विचारे स्नेहानुबंध चालोन येशाचा विस्तार होय ते गोष्टी कराव्या. आपण सर्वज्ञ आहेत. बहुत काय ल्याहावे. कृपा वर्धमान केली पाहिजे. रा छ ८ रबिलाखर हे विनंती.

¶ *Bakaji Naik communicates to Bajirao his attachment and loyal endeavours in the cause of Maratha arms.*

---

१ दुर्दैव.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 91] [*9-9-1733*

छ १३ राखर.

श्री

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मी-
आलंकृत राजमान्य राजश्री बाजी-
राव पंडित प्रधान गोसावी यांसी

प्रीतिपूर्वक लक्ष्मीबाई कृतानेक विनती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लेखन केले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन लेखनाभिप्राय अवगत जाहाला. चिरंजीव संभाजी आंगरे यास भेटीस रवाना करावे. उभयपक्षी भेटी गोष्टी होऊन पहिल्याप्राा किंबहुना ततोप्यधिक परस्पर सौरस्य चालोन पुढे मनसबीयाचा विचार होऊन शत्रू पादाक्रांत करावे या अन्वये विशदपूर्वक लेख केला. येशास कैलासवासी सरखेल यांमागे तुम्ही चौघे पुत्र च्यारी दिशाधिपती, पूर्वील यशकीर्तीची अभिवृधी दिन प्रतिदिनी होऊन शत्रू पराङ्मुख होतील यैसें निश्चयात्मक मानून गतशोकाचे अपहरण करून संतोषरूप होतों. त्यास श्रीने अकस्मात मोठासा घाला घातला केवल दुखाचे पर्वतच प्राप्त जाहाले. भवितव्या-नुसार होणीर तें जाहालें. चिरंजीव संभाजी आंगरे यासि आणावयास गलबतें पाठविली तीं प्रविष्ट होऊन दाहा रोज जाहाले. अद्यापि कांहीच अर्थ कलत नाही. याकरितां तेहि चिंताच वाटते. येकां दों दिवसी आले म्हणजे येथील लोकांची समाधाने करऊन लौकरीच तेथें रवाना करून. कैलासवासी तुम्हास वडील होते. हरयेक लेकूरपण तुमचे चालवीत होते. तो वडीलपणाचा टिका तुम्हास आहे. भलेतसे लले चिरंजिवाचे पालावे उचित आहे. वरकड तुम्ही उभयतांहि परस्पर येकश्चित असोन शत्रू पादाक्रांत करून लोकोतर कीर्ति उतम संपादून घ्यावी हेंच श्रीजवल अहिर्निशी इछित असों. जाणिजे रा छ ११ माहे रबिलाखर. बहूत काय लिहीणे? लोभ असो दीजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶ *Laxmibai Angre bewails the death of Sekhoji and implores Bajirao to continue his regard for Sambhaji.*

---

१ विचित्र किंवा निरनिराळे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 92] *[9-9-1733*

छ १३ राखर

श्री

राजश्री पंतप्रधान
गोसावी यासी.

ऽ श्रीमत् सकलगुणालंकरण अखंडितलक्षमीआलंकृत राजमान्य श्रीो पिलाजी जाधवराऊ दडवत विनती. येथील कुशल ताा छ ११ राखर मुकाम कुलाबा येथास्थित असे विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावले. लेखनार्थ कलो आला. येशियासि राजश्री संभाजी आगरे तो आद्यापि आले नाहीत. आजी उदैक आले म्हणिजे त्यास आम्ही समागमे घेऊन येतो. आपली व त्याची भेटी होऊन पुढे कर्तव्य मनसबा उभयताच्या विचारे उतम योजून येईल आणि शत्रूचा नाश होये ते गोष्टी करावी. गंगाजान्हवी मातुश्री लक्षमीबाई यासीहि जे सांगावयाचे ते सांगितले. त्यास येथील विचार आहे तो आपले आज्ञेखेरीज दुसरा आर्थ आहे यैसे नाही. राजश्री रघुनाथजी तो आम्ही येथून रवाना राजपुरीस केलेच आहेत. तेथील लोकांची समाधाने व बंदोबस्ती करावयाची ते आपले आज्ञेप्रमाणे करितील वरकड कितेक अर्थ राजश्री धोडो पद्माजी याजसमागमे जबानी सागोन पाठविला तो त्यानी निवेदन केला. त्यास आपण आर्थ सागोन पाठविला तो खराच आहे. यैसियासि ते येथे आले म्हणिजे बरा शोध घेऊन जे पुढे परिणामी उतम लौकिकार्थ दिसोन येई तेच गोष्टी करून आपले आज्ञेप्रमाणे आम्ही जे करू ते वावगे येकंदर करणार नाही. ये गोष्टीचा आपण खामाखाय भरोसा आसो द्यावा. कितेक अर्थ माारनिले आपणाजवली निवेदन करितील त्यावरून विदीत होईल. विशष काये लिहिणे हे विनती.

मोर्तब
सुद.

¶ *Pilaji Jadhav to Bajirao proposing a personal discussion with the writer and Sambhaji Angre and the addressee.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 93] [*11-9-1733*

श्री

राजश्री पंत प्रधान गोसावी

यांसी

॥ ७ श्रीसकलगुणालंकर्णः अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रीो पिलाजी जाधवराव कृतानेक दंडवत विनंती उपरी. येथील क्षेम ताा छ १३ राखरपर्यंत येथास्तित असे. यानतर राजश्री संभाजी आगरे आले नवते म्हणऊन चिता वाटत होती. त्यास ते बुधवारी जयेगडास आले. तेथील लोकांची बंदोबस्ती समाधाने करून भृगुवारी स्वार होऊन जंजिरे सुवर्णदुर्गास येणार. तेथील लोकांचे समाधान करून येका दो रोजी येतो म्हणऊ[न] लिहिले आहे. ते आलियावर येथील लोकाचे समाधान करून यास घेऊन येतो. ते पाये मार्गे आले तरी गोसावी याची भेट होईल. विशष काये लिहिणे ? लोभ आसो दीजे हे विनती.

मोर्तब
सुद.

¶ *This and the preceding are letters addressed to the Peshwa by Pilaji Jadhav. He proposes to visit the Peshwa with Sambhaji Angre and discuss about the Janjira campaign. The writer assures the addressee of his full support.*

No. 94] [*12-9-1733*

श्री

सकलगुणालंकरण अखडितलक्ष्मी-
आलंकृत राजमान्य राजश्री बाजि-
राव पंडित प्रधान यांसी

प्रीतिपूर्वक लक्ष्मीबाई विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन केले पाहिजे विशेष. चिरंजीव राजश्री संभाजीबाबा यांजकडे गलबत रवाना केले होते ते प्रविष्ट जालियावरी भाद्रपद शुध शष्टी इंदुवारी विजयेदुर्गाहून स्वार होऊन जंजिरे रत्नागिरी आले. तेथील लोकांचे समाधान करून जयगडास येऊन मुजरद माहेगिरी गलबत पत्रे देऊन पुढे रवाना केले. त्यास शामलाची गलबतें राजपुरीच्या नस्त्यावर आगावर आली. याजकरिता जोडेकरी कुभारूस उतरोन आले. गलबत सुवर्णदुर्गास गेले. चिरजीव सुवर्णदुर्गास येऊन दोन

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

च्यार रोज जाहाले असावे. परजन्याकरिता राहाणे जाहाले असेल. अविलंबेच येतील. आपणास पत्रे होती तोच लखोटा पाठविला आहे. त्याजवरून सविस्तर क(लो) येईल. वरकड तेथील गलबताची भर्ती जाहाली पाहि(जे) याजकरिता आरमारकरी लोक व तुकोजी कडू व दर्यावर्दी दोन गलबताची भर्ती पाठविले आहेत. गलबत तयार करावयाविशी राजश्री रघुनाथ हरी यासी लेहून पाठविले असे. आरमारची तयारी करितील. आपणास कलावे म्हणोन लिहिले असे. बहूत काय लिहिणे लोभ असो दिला पाहिजे. रा छ १४ माहे रबिलाख (र) हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶ *Laxmibai writes to the Peshwa that she is refitting her ships with men and ammunition.*

No. 95] [*11-9-1733*

छ १३ राखर

श्री.

राजश्री पंत प्रधान गोसावी यांसी.

ऽ श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलकृत राजमान्य स्नो सटवोजी जाधव दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. आम्ही लस्करांतून आल्यावरी आ(प) ले भेटीस भाद्रपद मासीं यावे हा हेत फारसा धरून राजपुरीस यावयासी सिध जालो होतो, तो इतक्यांत राजश्री सेखोजी आगरे सरखेल यासी कैलासवास जाला हे वर्तमान वाघोलीस यैकोन तेथून निघोन कुलाब्यास आलो. सरखेलाचा घात ईस्वरे थोरसा केला. बरे ये गोष्टीस उपाय आहे यैसा विचार नाहीं. भव्यतव्यानुसार होणे ते जाहाले. राजश्री संभाजी आगरे अद्यापि कुलाब्यास आले नाहीत. येका दो रोजा येतील. त्याचीहि भेटी होईल. उप्रांतीक तीर्थरुपांसमागमे स्वार होऊन आपले भेटीस राजपुरीस येऊन. विदित जाले पाहिजे. विशेष काय लिहिणे नलगे. लोभ असो दीजे हे विनंती.

¶ *Satwoji Jadhav, son of Pilaji, to Bajirao informing him of the death of Sekhoji Angre. He further adds he would see the Peshwa with his father at Rajapuri.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

N. 96] [*16-9-1733*

छ १९ राखर

श्री

पुरवणी राजश्री रघुनाथ हरी यांसी

उपरी राजश्री प्रतिनिधी यांणी राजश्री बकाजी नाइकास लेहून पाठविलें की लस्करची फौज जमा जाहाली आहे त्याचे रोजमुरेयास यैवज पाहिजे. त्यास घासदाणां व हबसियाकडील यैवज केलसी वेस्वी देखील माहालची निंमे येणे. त्यास कारकून कारभारी पाठऊन यैवज करून देणे, नाहीतर परभारें रोखे फौजेस करून दिल्हे जातील. मुलकात फौज जाऊन गाव लुटितील. याजकरितां आगोधर लेहून पाठविले आहे म्हणोन पंडित मारनुले यांही लेहून पाठविले. त्याच पत्राची नकल येथें पाठविली व राजश्री बाबास जयगडी लेहून पाठविले आहे. त्यांचेकडून उतर आल्यावरी जाबकरी रवाना करून म्हणोन लेहून पाठविले. यैशास त्याचे उतर चिरंजिवानी सुवर्णदुर्गास लेहून पाठविलेच असेल व पंडित मारनुले यांजकडे पत्रे रवाना केली असतील येथून बकाजी नाइकास लेहून पाठविले आहे की त्याजकडून रोखे परभारे होऊन वसुलास येतील त्यास वाटेस लावणें. वसूल करूं न देणे. कटकटेस आले तरी बेमुलाहिज्याने बाहेर घालवणें म्हणौन आज्ञा केलीच असे. त्यांजकडील वृत राजश्री प्रधानपतास कलावे याजकरिता लेहून पाठविले असे. प्रस्तुत त्याजकडून कटकटेस प्रारंभ होणार यैस आहे. जाणिजे रा छ १८ माहे रबिलाखर बहुत काय लिहिणे?

मोर्तब
सुद.

¶ *Laxmibai Angre to Raghunath Hari complaining of the Pratinidhi's exactions in the Kolaba territory.*

No. 97] [*18-9-1733*

श्री

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मी-
आलकृत राजमान्य राजश्री बाजीराऊ
पंडित प्रधान यांसी

प्रीतिपूर्वक लक्ष्मीबाई दंडवत विनति उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल-लेखन केलें पाहिजे विशष. चिरंजीव राजश्री संभाजी आंगरे आजी भोमवारीं

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

कुलाबां येऊन भेटी जाहाल्या हें वृत्त आपणास कलावे या करितां लिहिलें आहे. वरकड राजश्री रघुनाथ हरी यांसी दर्शनास बोलाविले आहेत. त्यांची रवानगी अविलंबे केली पाहिजे. रा छं २० माहे रा॥खर बहुत काय लिहिणें? लोभ असों दिल्हा पाहिजे हे विनती

मोर्तब सुद.

¶ *Laxmibai Angre to Bajirao, telling him that Sambhaji Angre had arrived at Kolaba.*

No. 98]

श्री

पुरवणी राजश्री बाजीराव पांडित प्रधान
दाजी गोसांवी यांसी

विनंती उपरी. अजनवेलीकडील मनसबा प्रतिनिधीनी कबूल केला आहे. त्याचा दम पुरों द्यावा. राजश्री रघुनाथजी यांसी लेहून जमावानसी आणवावे, रा बकाजी नाईक यास सुवर्णदुर्गास न्यावे म्हणोन पेशजी प्रतिपत्री लेहून पाठविले त्याजवरून आपल्या लिहिल्या प्रा मारनिलेस जमावासहवर्तमान कुलाबा आणविले. बकाजी नाइकास सुवर्णदुर्गी ठेविले. त्या गोष्टीचे परम वैशम्य प्रनिनिधीस वाटोन राजश्री स्वामीकडेस आमची नालीस कितेक प्रकारे लेहून पाठविली. रा(ज)श्रीहि, कां निघोन गेले? भलतसे स्वामीकार्य करावें, गनीम बुडवावा, ते गोष्ट न करितां उगेच उठोन गेले याचा विचार काय? यैसे कितेक प्रकारे बोलत होते व हाली राजश्री अंताजी बावाजी याजबराबर सांगोन पाठविले कीं, आजीपर्यंत जाहालें तें जाहालें याउपरी खामखा अजनवेल फते करून जजिरा आयास येईल ते गोष्ट करणें म्हणौन सांगोन पाठविले आहे. याचा विचार कसा करावा? प्रतिनिधीकडील तो केवल द्वेशच पदरीं पडिला. राजश्रीचेहि चिती येक प्रकार गेलें. आम्ही तों आपले बाहबलयोगें इतकाहि विचार संपादिला. पुढे कैसा मनसबा करावा याचा विचार काय तो ध्यानास आणून उतर पाठवावें. अजनवेलीची मोहीम आम्ही कबूल केलीवरी राजश्री प्रतिनिधीस सातारियास न्यावे यैसा विचार माहाराजाचा आहे व आम्हासहि सागोन पा आहे. याकरितां याचे उतर सत्वर पाठवावे. आपलें लिहिलें येईल त्याप्रा राजश्री स्वामीचे शेवेसी लेहून पाठऊन. कललें पाहिजे. जाणिजे छ १६ माहे रबिलोवल बहूत काय लिहीणे? कृपा असो दीजे हे विनती

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आम्ही आजनवेलीकडील मुनसबा मान्य केला. तरी प्रतिनिधपंतास हुजूर बोलाऊन आणऊन यैसे राजश्री स्वामीनी सागोन व लेहून पाठविले आहे. याचे उतर काय ल्याहावे ते लेहून पाठविले पाहिजे हे विनती.

मोर्तब
सुद.

¶ *Sekhoji Angre asks Bajirao how to reconcile his efforts at Anjanwell with contradictory orders from Shahu.*

No. 99] [*August-September 1733*

श्री

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मी-
आलंकृत राजमान्य राजश्री बाजीराव
पंडित प्रधान गोसांवी यांसी.

प्रीतिपूर्वक गंगाजलनिर्मल लक्ष्मीबाई कृतानेक विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लेखन केले पाहिजे विशेष. आपण लिलिले की लोकानी हातपाय गाठऊन बसले व मानाजी आंगरे गेलियापासून उठउठून जातात. लोकाची समाधाने करावी म्हणौन त्याजवरून राजश्री रघुनाथजी पाठविले आहेत. लोकांची समाधानें करून गनिमासहि नतिजा देतील. आपण कोणे गोष्टीची चिंता न करावी. दिवस जाल्यावरी मानाजीस पाठऊन मारनिलेस आणऊन. कलें पाहिजे. फटकडीस मोर्चेयाचें काम चालीस लाविलें आहे. ते पुरते जाहलें नाही. तेहि काम चालीस लाऊन मूर्चा तयार करऊन फटकडी जोडावयास मारनिलेस सांगितले आहे. तेहि काम जलदीने करऊन फटकडीचे माराखाले गनिमास आयास आणिला पाहिजे. जाणिजे रा छ * * माहे रबिलाखर बहूत काय लिहिणे? लोभ असो दीजे हे विनती.

मोर्तब
सुद.

¶ *Laxmibai Angre to Bajirao, encouraging him to fight the Siddi to a finish.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 100] [*30-9-1733*

पा छ २ जालोवल

श्री

राजमान्य राजश्री बाजीराव पंडित प्रधान यांस आज्ञा केली यैसी जें इंग्रेजांकडून येक भला माणूस आला होता; मध्यस्त होऊन तह करून देऊन म्हणतात म्हणोन तुम्ही राजश्री अमृतराउ त्रिंबक यांस लिहिलें. त्यांणीं विदित केलें, ऐशियास तह करावा हें स्वामीचें मानस आहे. इंग्रेजाचे विद्यमानें जाल्यानें उत्तमच आहे. नवाबाकडूनहि राजश्री सुमंत भला माणूस घेऊन येतच आहेत, तेहि येतील. त्यास घेतलीं स्थलें न द्यावीं; राहिलीं तीं त्याजकडे ठेऊन मुलकाचा तह करावा, यैसाच विचार नवाबाकडील आहे. इंग्रेजाचे मार्फतीनें तह होत असेल तरी त्याकडे माणसें कागद पत्र पाठऊन बोलीचाली मनास आणणें; बोली केलीया कांहीं नुकसान होत नाहीं. नवाबाकडील बोली कळेल तेहि तुम्हांस लेहून पाठउं. इंग्रेजाची बोली तुम्ही करून हुजुर लिहिणें. दोन्ही विचारांतील अर्थ मनास आणून बलाबल पक्ष पाहून जो उत्तमसा दिसेल तोच प्रसंग केला जाईल. जेणेंकडून केला तह अक्षतमरिष्ट चाले ऐसा विचार असेल त्यासच मध्यस्त देऊन तह करून. तुम्ही इंग्रेजाचें अनुसंधान रक्षणे

सूदन असा * * * * * * * *
* * * * * * * * *

¶*Shahu to Bajirao, ordering negotiations with the Siddi through the English.*

No. 101] [*14-10-1733*

श्री

तीर्थरूप राजश्री राऊ व तथा आपा स्वामी
वडिलांचे सेवेसीं

अपत्यें महादाजी अंबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशेल ताा. छ १६ जमादिलोवलपर्यंत स्वामीच्या आशीर्वादेंकरून येथास्थित असे विशेष. राा गणेश संभाजी यांजकडे पांयेचे लोक दोनतीनशें आहेत. ऐशास दोनशें लोक महिपतगडाकडे आहेत, परंतु तूर्त सेंभर माणूस तयार हे आपले बराबर घेऊन स्वामीकडे आले आहेत. तरी स्वामीनीं लोक पाहून तैनात करून यांजपासून

+12 miles north-east of Khed facing Hatotghat.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

सेवा घ्यावयास स्वामी समर्थ आहेत. हे सेवेयोग्य माणूस आहेत. माणूस पाहून स्वामींच्या विचारें जाहलें तरी चाकर ठेवावे. विदित जाहलें पाहिजे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶The whole letter is in Mahadoba Purandare's handwriting addressed to Bajirao and Chimaji Appa. Mahadoba recommends the services of Ganesh Sambhaji and his men for employment. Ambaji Purandare died on 25th August 1734 and was away for a year on pilgrimage before death. Hence Mahadaji must have written the above letter in the Janjira Campaign.

No. 102] [*27-10-1733*

छ २९ जमादिलोवल.

श्री

विशेष. दोन च्यार पत्रें आपणास पाठविली कीं, भेटीस यावें; त्यास आपण मान्य केले कीं अविलंबेच भेटीस येतो. त्यास दसरा जाहाला, दिवाली जाली, अद्याप आपले येणे न जाहाले. मनसबियाचा आगाहू[1] आमचे नजरे येणे तो येऊन गेला. त्याजवरूनच आपणा (स) पत्रे पाठवीत गेलो. निमित्य आपली आमची भेटी होऊन आपला आमचा एक विचार करून कर्तव्य ते करावे. प्रस्तुत राजश्री प्रतिनिधी गोवलकोटीहून कुल उठोन गेले. छ २७ जमादिलोवल राजदर्शन जाहले. सिदीसाद मोकला जाहला. येथे येईलच. अतःपर येथे पाये ठहरतात ऐसे नाही. शामलास इंग्रेज फिरंगी साह्य जाहाले. सिदीसाद येतो तेव्हां त्याचा जोरा बराच जाहला. या उपरी बळ धरीन म्हटल्या मनसबियास बळ पडते ऐसे नाहीं. तेव्हां सटाबटा दावा करून यश रक्षावेच लागते. जरी तहची गोष्ट न करी म्हटले तरी नंक्ष राहत नाही. तह करणे प्राप्त जाहले. सा महिने आमची घरे कर्जखाली बुडाली आहेत. हुजुरून राजश्री आनंदराव सुमंत तह करावयास येतच आहेत. ऐशास शामलास काही मुलूख दिल्याखेरीज तो तह करितो ऐसे नाहीं. ते काही देणे पडेल त्यास मुलूक तुम्हा-आम्हाखालीं व प्रतिनिधीखाली आहे. द्यावे कोणते, न द्यावे कोणते, हा विचार करावा लागतो. तरी आपण लक्ष प्रकारे अविलंबे यावे. आपली आमची भेटी होऊन विचार करणे तो करूं. हा उत्तम विचार आहे. कदाचित आपणास यावयास अनकूल न पडे तरी येविसीचे उतर तपसीलवार लिहिले पाहिजे. जरी हा विचार आपणास न ल्याहावा व विचारांत आपणास न घ्यावें तरी आपण म्हणतील कीं, सटाबटा करून आपला उलगडा करून आदावल आम्हावरी घालून

---

१ अंदाज; आगाही = माहिती.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

गेले. यास्तव आपणा खोलून विचार लिहिला आहे. जे कर्तव्य ते बरे. दूर देश विचारे ध्या(ना)स आणून तपसीलवार उतर पाठवावे. मुख्य गोष्ट आधी आपण येथे यावे. हा लक्षा विचाराचे जागा हा विचार आहे. जरी आपणास यावया अनकूल न पडे तरी तपसीलवार वर्तमान लिहिले पाहिजे त्या प्रमाणे केले जाईल.

येथे च्यार सरदाऱ्या, चौघाचे लोक, त्यात निमे दोन तक्षीमा[1] दुखणियानी पडले आहेत; येकात येक नाहीं, तेथें मनसबियास बळ कैसे पडते ? नक्ष कैसा राहील ?

¶*This letter, the writer and the addressee being unknown, mentions how the Marathas failed to win the war. It is proposed that Shahu should make approaches to the Siddi for peace.*

No. 103] [*29-10-1733*

श्री

श्रीमंत राजश्री पंत नाना स्वामीचे सेवेशी विनंती. सेवक जनार्दन बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम ताा छ १ जमादिलाखर पावेतो स्वामीचे कृपेकरून यथास्थित असे विशेष. स्वामीनीं दया करून आज्ञापत्र पाठविलें तें उत्तम समयीं पावोन परम समाधान झाले. तेथे आज्ञा कीं, नवल विशेष वर्तमान लिहिणें म्हणून. ऐशियास राजश्री अनंतराऊ पंडित सुमंत आज स्वार होऊन राजपुरीस गेले. बराबरी नवाबाकडील भला मनुष्य नेला आहे. ते लौकरीच जाऊन पोहचतील. मग तहरहचा विचार जो होणे तो लौकरच होईल. कलले पाहिजे. येविषयी श्रुत होय, हे विज्ञापना.

विनंती सेवक विसाजी दादाजी कृतानेक साा नमस्कार विनंती. राजश्री बाबांनी लिहिले आहे त्यावरून विदित होईल, हे विज्ञापना.

¶*Janardan Ballal (Fadnis) to Nana, informing him of Anandrao Sumant proceeding to Rajpuri to open negotiations for peace.*

---

१ तक्षीम – तुकडी.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 104] *[12-12-1733*

पौ छ २१ रजब. जाबसुद

श्री

तीर्थरूप समान माहराज राजश्री
पंतप्रधान वडिलाचे सेवेसीं.

आपत्य बाबाजीराव साष्टांग नमस्कार विनंती उपरि. येथील कुशल मार्गसीर वद्य त्रितीया बुधवार मुकाम करवीर जाणौन वडिलीं आपलें स्वानंदलेखन करीत असिलें पाहिजे विशेष. आपण वार्तिकासमागमें पत्र पाठविलें, प्रविस्ट होऊन चित सुधाभरित होऊन परम आल्हाद जाहला. पत्रीं ममत्वसौहार्दपणाचा विचार राजीव व राजीवबंधूचा दृष्टांतपुरःसर लिहिलें तें येथार्थच. उभयेपक्षीचा रणानबंद याच अन्वयें चालत आला आहे. नवीन पत्रीं उपचार ल्याहावा हा अर्थ कांहीं नाहीं. ममत्व उभयपक्षींचा आहे तो मनोमन साक्ष आहे. शामलाचा निग्रह करून मुख्य मुख्य स्थल हस्तगत करून घेतलें, ते पुरुषपराक्रम केला तो येंजमानाचे पुण्यप्रतापें होऊन आलें म्हणोन विशेषण येजमानाचा ठाई श्रीरघुनाथजीने स्वेतें बांधिला आहे. दर्शुन श्रीचा आवतार असा कांही विशेषत करून लिहिलें तें खरेच. पुण्य येजमानाचेंच, परंतु कर्तुत्वकरणी कांहीं सर्वाचे ठाई असत नाहीं. मावें थोरथोर पराक्रमी जाहाले त्यामधें अर्जुनाचे विख्यात त्रैलोकीं होऊन कीर्ती जाहली. ईश्वरी सतावाचून हें कर्तुत्व इत्यादिकास होत नाहीं. दंडाराजपुरी अरमारसहित घेऊन राहिरी प्रभृति मुख्य स्थल घेऊन जंजरियास परिवेष्टन केलें, हे वर्तमान आइकून दक्षण देशस्थ येवनमुख्यानी शामलाकडील अस्पद धरून राजश्री अनंदराव सुमंत व जवाबकसखान व शामलाचे वकील आदीकरून सतरुपीस आले आहेत. सत्वरीच आपणांकडे येणार. ते आलेनंतर राजश्री स्वामीचे आज्ञेप्रमाणे जो विचार करायाचा केला जाईल. इदंमिथं यैसा आर्थ जाहालियावरी तुम्हांस विशदे लिहून पाठूं, म्हणोन आज्ञा केली होती. त्यावरी कांहीं पत्र येऊन वर्तमान कलत नाहीं. आम्हांस राजश्री स्वामी आज्ञा करून दर्शनास येणे म्हणोन पत्र सादर केले. आज्ञानुसार सामानगडास येऊन दर्शन घेतलें. समागमें करविरास घेऊन आले. करविरीं स्वामींसंनिध आहे. वर्तमान आपणांस विदित होवें म्हणोन लिहिलें आहे. करविरास आपणांसपासोन वो हरिभट गोरे निसबत नारायण दीक्षित हे आले. तेही वर्तमान सांगितलें कीं राजश्री आनंदराव सुमंत व येवनाकडील वकील येऊन

---

१ जासूद. २ सेतु बांधणें, वरदहस्त ठेवणें. ३ जवानबक्ष.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

शामलाकडील सख्य जाहले. राहिरी आदिकरून प्रभृतस्थलें हस्तगत जाहलें तें आपणांकडे करून घेऊन शामलासी कृतोपकारीकरून कूच करून आले म्हणोन वर्तमान आइकिलें. बहुत कांहीं संतोष जाहला. हे कीर्ती कांहीं सामन्य नव्हे. दुष्टास शासन करायाचें करून मागती त्या अस्वासन देऊन कीर्ती संपादिली. थोर गोष्टी जाहली. पत्र येऊन निश्चयात्मक कलला नाहीं. सविस्तर अर्थ-लेखन करावयास आज्ञा करावी. निरंतर चितवृत्ति आपलेठाईंच आसक्त आहे. दुसरा विचार चित्तास होत नाहीं. सदैव आपणांकडील कुशल वृत्त लिहून परामृष करायास आपण वडील आहेत. बहुत काय लिहिणें ; निरंतर प्रतिदिनी वडिलांचें स्मरणरहित दिवस जात नाहीं. वडिलांचे चरण पाहूनहि बहुत दिवस जाहले आहेत. दर्शन होणे तेहि वडिलांचे आसीरवादे होणार. वडिलीं साकल्यार्थ व बुद्धिवाद लिहून संतोष पवीणार सर्वज्ञ आहेत. बहुत काये लिहूं, कृपा वर्धमान असावी, हे विनंती.

¶*The writer some Babajirao, writes to Bajirao a flowery letter full of compliments on the latter's achievements in the campaign against the Siddi.*

No. 105] [पो *13-12-1733*

छ १६ रजब.

श्री

राजश्री पंतप्रधान गोसावी यांसी

ऽ श्रीसकलगुणाळंकर्ण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये स्नेहांकित संताजी जाधव दंडवत विनंती. येथील कुशल जाणोन स्वकीये लेखणआज्ञा केली पाहिजे विशेष. आम्ही माहाराज राजश्री स्वामीची आज्ञा घेऊन प्रगणियांत जावयास जात होतो, तों मार्गी मौजे येवत येथे गोसावियाचे जासूद व निजामन-मुलुकाकडील जासूद जंजिरियाहून आपली पत्रे घेऊन जात होते. त्यानी वर्तमान सांगितले कीं, शामलाचा स्नेह संपादोन आपण कूच करून तळेघोसाळे येथे येऊन मुकाम केला आहे. सत्वरच सतरुसीस येणार हे वर्तमान ऐकोन परम समाधान जाले. आम्ही गतवरसापासोन बहुत उमेदवार आहो कीं, गोसावि-याची सेवा करून कृपा संपादोन घ्यावी, हे मनोगत ईस्वरास आमचे पूर्ण करावयास आपलेहि येणे जाले. राजश्री आपा यानीहि आम्ही निरोपास गेलो होतो तेव्हां बहुता प्रकारे आमचे समाधान केले कीं, राजश्री राऊ आलियावर मुलूक(क)गिरीस खामखा जातील. तेव्हा तुमचे मनोदयानरूप तुमचे बेगमी करून तुम्हास फोजेनसी

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

समागमे नेतील. चिंता न कीजे. त्यावरून आम्ही बेफिकर राहिलो आहो, तो हे वर्तमान आइकोन मुजरत जासूद सेवेसी पाठविला आहे. तर गोसावियास आमचे ऊर्जित करणे हे अभय गतवर्षी दिल्हे आहे, ते साच करणे. चितात मन:पूर्वक असिले तर सत्वर उतर पाठविजे. राजश्री मल्हार प्रभु जमेनवीस यास सेवेसी पाठवितो. जे आज्ञा कर्तव्य ते त्यास कीजे. तेणेंप्रमाणे आम्ही प्रगणियात कमावीसदार ठेऊन चिरंजीव मानाजी जाधव व आम्ही सारे फौजेनसी देखील हती सरंजाम सुधा जिकडे आपले जाणे होईल तिकडे समागमे येऊन सेवा करून. पुढे आमचे ऊर्जित करणार आपण समर्थ आहेत. पत्राचे उतर ये तवपरंत आम्ही गंगातीरी मुकाम करून मार्ग लक्षित आहो. कलल पाहिजे. बहुत काये लिहिणे, कृपा असो दीजे, हे विनंती.

¶*Santaji Jadhao, Dhanaji Jadhao's son, writes to Bajirao requesting some work being given to him in the Campaign, and thus giving him an opportunity to distinguish himself.*

No. 106] [*12-4-1734*

श्री

श्रीमत राजश्री पंतप्रधान स्वामीचे

सेवेसी

पो बापुजी श्रीपत कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल चैत्र बहुल पंचमीसह शष्ठी भृगवासरपर्यंत स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. स्वामीनी पत्र पाठविलें तें पावलें. राजश्री संभाजी राजे जेजुरीस श्रीच्या दर्शनास येतात. चैत्र बहुल पंचमीस कोल्हापुरीहून श्वार होणार; तर तुम्ही फांटेलाकूंड, पानपत्रावल व किरकोल साहित्य करावयाचें तें करणे म्हणून आज्ञा. यैसियास आज्ञेप्रा पानपत्रावल, फांटेलाकूड वगैरे साहित्य करावयाचें ते करितों. वैरणीचें व वेठ्याचे दों गोष्टीचें संकट आहे. गतवर्षी त्यांचे माहाल आले होते तेव्हां साहित्य काये करावें लागलें, वेटे, वैरण किती लागली तें स्वामीस विदितच आहे. अंवदा खासा व माहाल देखील येणार याकरितां साहित्य पोख्तें करावें लागेल. त्यास वरकड करणे ते आम्ही करीतच आहो. परंतु वेठे फार लागतील, याकरिता जुनर मावले इकडील वेटे आणविले पाहिजेत. किरकोली साहित्य करणें ते आम्ही स्वामीचे आज्ञेप्रमाणे करितो. वेटियाचे साहित्य स्वामीनी करवांवे. वरकड थोक साहित्य पाहिजे ते करणार स्वामी खावंद आहेत. आम्ही स्वार होऊन जेजुरीस जातो. शेवेशी श्रृत जाले पाहिजे, हे विनंती.

¶*Bapuji Shripat informs the Peshwa of the intended visit of Raja Sambhaji to Shahu at Satara.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 107] [*14-5-1735*

छ ६ मोहरम.

श्री

गणती लस्कर मुकाम बाणकोट,
छ २ मोहरम सु॥ खमस सलासीन मया अलफ.

	अजघोडी	थोर	यारदी[1]
दर्याजी वागमोडे	६	६	०
सिवजी भोसला	१०	८	२
फकीर महमद	२	१	१
आबाजी रणनवरे	१	१	०
लखमाजी खंडाजी कोकरे	९	९	०
राणोजी भिवजी कोकरे	१	१	०
(सिवाजी) आपदेऊ	१	०	१
राणोजी बरगे	८	८	०
खंडोजी सेळके	९	७	२
चांदजी खोपडे	९	८	१
येसवंतराऊ भोसले	३२	३०	२
आनंदराव जाचक	२	२	०
नरसिंगराऊ गायकवाड	१२	९	३
त्रिंबकराऊ ढमढरे	१४	१२	२
येसवंतराऊ सिलिमकर	५	४	१
संताजी कोकडे विठोजी सिलिमकर	१३	१२	१
भिवजी भोइटे	१	१	०
गिरजोजी आटोळे	७	७	०
संताजी घाटगे	७	५	२
मानाजी घाटगे	२७	२५	२
पिराजी बरगे	१	१	०
आपाजी विथापे	१	०	१
माणकोजी आटोळे	१३	११	२

1 Ponies for carrying loads.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

पदाजी धुमाळ	४	३	१
जिवाजी गायकवाड	१	१	०
सेव्याजी भोइटे	१५	१३	२
मानाजी सिंदे	१	०	१
मुरारजी सिंदे	२	२	०
राणोजी सिंदे	१	१	०
दरवेस आगा	३	३	०
हुसेनशा	४०	३७	३
बापोजी पासलकर	६	५	१
रखमाजी मोहिते	१	१	०
दि॥ आमरसिंग सिर्कें	५	४	१
संभाजी माने	१	१	०
बापुजीचंद	२	२	०
तानाजी धायबर	१३	१०	३
विठल सिवदेऊ	३	२	१
मल्हारजी पवार	१	०	१
मालजी इंगळे	१	०	१
सटवोजी इंगळे	१	१	०
त्रिंबकजी सिंदे	२	२	०
	२९४	२५६	३८

पैकी छ ३ रोजी रविवार प्रातःकाळी उठोन गेले

पहाटेस स्वार :

१०	दि॥ हुसेनशा
२	दर्याजी वाघमोडे
१२	

बाकी आजी संध्याकालपर्यंत आहेत. उद्या पहाटेस किती जातील हे कलत नाहीं. कलले पाहिजे.

¶*As the troops were fast deserting, having been tired of the fight, a roll was taken of all the horses in the campaign. The total is 294 made up of 256 horses and 38 ponies.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 108] [*1-9-1734*

श्री

राजश्री सुभानजी सिंदे नामजाद
किले बाणकोट गोसावी यांसी

ऽ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रीो बाजीराव बलाल प्रधान आसीर्वाद. सु॥ खमस स(लासीन) मया अलफ. बाबाजी न्हावी (फाटले) सरकार याची माणसे हुजूर येतात. बाणकोटास येतील त्यास माहागरी (पाठ)ऊन महाडास सुरक्षित पाऊन देणे. बाा लोक देऊन पावणे. व यांची गुरेढोरे तुम्हाजवळ राहतील, त्यास कोणेविसी उपसर्ग न देणे; सुखरूप राहू देणे. आंगरियाकडील कोणी तोष्ट लावील तरी त्यासहि ताकीद करून तगादा लागो न देणे. जाणिजे. छ १३ रालाखर. बहुत काये लिहिणे.

लेखन
सीमा.

¶*Bajirao orders Subhanji Sinde to help Babaji Nhawi to proceed to Mahad.*

No. 109] [*24-10-1734*

पो छ १६ जाखर.

श्री

राजश्री सुभानजी सिंदे नामजाद
किले बाणकोट गोसावी यांसी.

ऽ अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रीो बाजीराव बलाल प्रधान आसीर्वाद. सुा खमस सलासीन मया अलफ. राजश्री सरखेलीकडून कारकून राजश्री स्वामी-सनिध आले आहेत. बाणकोट व मंडणगड येथील तनाखियाचा विचार राजश्री स्वामी निवडणार. यैशास तूर्त दुतर्फाहि वसूल बारा तेरा रोज महकूब केला असे. तरी तुम्ही उपसर्ग न करणे. राजश्री स्वामी आज्ञा करितील त्या प्रो त्याणी तुम्ही वर्तावे. जाणिजे. छ ७ जमादिलाखर. बहुत काये लिहिणे.

लेखन
सीमा.

¶*Bajirao's orders to Subhanji Sinde to stop exacting dues from Bankot and Mandangad until the dispute is settled at Satara.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 110] [*23-12-1734*

श्रीगणपति

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे शेवेसी

विनंती. सेवक रामचंद्र हरी नमस्कार विनंती. येथील वर्तमान तागाईत छ ८ शाबान मंगलवारी नवमी, मोकाम नजीक दलवटण्याचा मेढा, सूखरूप असो. स्वामीनी दारूगोली पाठविली ते पावली. छ २ शाबानचे पत्र, छ ३ शाबानची पत्रे, येकून दोनहि पत्रे आज छमजकूरी पावली. ऐसियास शेवकाकडील वर्तमान तर आज्ञेप्रमाणे साहावे दिवसीं गोवलकोटानजीक दलवण्याचा मेढा कोस दीड कोस टाकिला व इकडे दामणीचा मोर्चाहि कोस दोन कोस टाकून राहिलो. त्यास राजश्री कर्णाजी सिंदे कोईनकाठ हेलवाक येथे राहिले. तेथून कृस्णाजी हरी यास आम्हाकडे रवाना केले. यास जे दिवसी आम्ही आलो तेच दिवसी तेहि येऊन पोचले. त्यास नऊ पतकापैकीं उतम माणूस दोनशेहेपर्यंत निवडक करून ते घेऊन गेले. बाकी माणू (स) आजारी वगैरे हजीर व मेढे यास राहिले. त्यास ते लोक त्यापासी पावलेवर त्याचा मोकाम तेथेच होता. त्याची पत्रे वरचेवर येत होतीं. त्यास ते शुक्रवारी रात्री निघोन मोरगिरीच्या रोखे सभापूर पेठ आहे त्यामार्गे गेले. आणि झोलणेकरी व तटे व पालखी व दुम मनुश चालणार नव्हे ऐसे लोक शेहेदीडशेहे व कृष्णाजी गोले याबरोबर देऊन आम्हाकडे पाठविले. त्यास ते रविवारी दोनप्रहरा येऊन पोचले. त्याबरोबर पत्र लिहिले त्याची तालीक ठेवून घेऊन असल पत्र पाठविले आहे, त्या तागाईत त्याकडून पत्र यावे तेहि आले नाहीं. अगर हवी[1] पाठवितो तेसमई निघोन येणे म्हणोन लिहिलें. येखादे समई हवी चालेनात तर त्यास घोडी बैसावयास देऊन टाकोटाक मंगलवारी च्यार घटिकेस पोचणे म्हणोन लिहिले. त्या हवियाचा मार्ग रविवारी सारी रात्र पाहिला, परंतु हवी आला नाहीं. सोमवारी प्रातकाले भोजन करून कबाडे मना करून सिध होऊन बैसलो, परंतु हवी आला नाहीं. त्यास आज मंगलवारी भोजन करून दलवटण्याचे मेढियांवरून कुटरियावरून पोढे जावे म्हणोन तजवीज करून निघालो. त्यास राजश्री कानोजी सिरकेराजे आम्ही येक जागा बैसोन तजवीज केली कीं, येखादे समई ते रानांत थारा धरून राहिले असिले आणि आम्ही गेलेवर रान हुशार होयेल याकरितां आज कुटरे पाच कोस

---

१ वाटाडे, माहितगार.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

टाकून मोकाम केला. आणि हवी चौघे माणसे इनाम देऊन करून दवरुखा-पावेतो खबरीस पाठविली. त्यास सांगितले कीं, कार्यसिध जाहाली हे खबर तुम्हास कळताच तु (अपूर्ण.)

¶*Incomplete letter of Ramchandra Hari to Chimnaji Appa with reference to an attack on Gowalkot.*

No. 111] [*26-12-1734*

श्रीगणपति

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी.

विनंती. सेवक रामचंद्र हरी साष्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान तागाईत छ ११ माहे शाबान शुक्रवार मोकाम माथा किले भैरवगड फौजेसह वर्तमान यथास्थित असे. यानंतर स्वामीनी पत्रे पाठविली ते छ १० शाबानी पावली. ऐसियास शेवकाकडील वर्तमान तर छ८ शाबानीं पत्र लिहिले होते ते पावलेच असेल. त्यानंतर राजश्री कर्णाजी सिंदे याकडील वर्तमान मंगलवारपर्यंत कलेनासे जाहालें, तेव्हा चित बर देईनासे जाहाले की, यानीं आम्हाकडे हवी पाठ-वितो म्हणोन पत्र लिहिले; दुसरे लिहिले कीं मंगलवारी येऊन पोचणे. त्यास मार्गी हवीयास दगा जाहाला की काय म्हणोन तेथून कूच करून कुटुरेचे अली-कडे कोसावर मोकाम केला. त्यास बुधवारीहि याकडील मनुश यावे ते न आले. त्यास आम्ही पहिलीच मनुशें मंगलवारी देवरुखाकडे रवाना केली. त्यास ती मनुशे खबर घेऊन ब्रहस्पतवारी साइंकाली आली. त्यानी खबर सांगितली की, तो मुलूक तमा (म) हुशार. स्वारी येऊन रानांत दबा धरिला होता. त्यास ते लोक माघारे चादलच्या घाटास गेले. अमक्या कार्याबद्दल आले होते ऐसी बोली विस्वतोमुखी. दुसरी गोस्ट, फौजा घाटमाथा आल्या म्हणोन तमाम मुलूख पळत होता, ऐसे वर्तमान सांगत होते. त्यास ब्रहस्पतवारी मध्यानरात्री राजश्री कर्णाजी सिंदे याचे पत्र आले की, आम्ही माघारे आलो, तुम्हाजवल लोक आहेत ते पाठवणे, म्हणोन लिहिलें, विदित होय. यानंतर स्वामीनी लिहिले कीं, जर-करून कार्य योजिले ते राहिले तर उगेच माघारे फिरोन आले तर याच गोस्टी-करितां आले म्हणतील. याकरिता यावयाचा विचार जाहला तर दोन मजली अंजणविलीकडे जाऊन मग यावे म्हणोन लिहिले. त्यास लोक जैसे हेळवाकावर होते व आम्ही गोवलकोटाजवळ होतो तैसेच अस्तो, आणि हा मतलब करितो,

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

तर युक्तस पडता. आता आम्ही माघारे जावे तर सर्वत्र लहानथोराचे मुखी हे वर्तमान. याकरितां तिकडे न जाता घाट चढोन आलो. पुढें बामणोलीवरून बावधनावरून खांबटकीचे घाटे येतो. शेवेसी विदीत होय, बहुत काय लिहिणे, हे विनंती.

¶*Ramchandra Hari's letter to Chimaji Appa, returning from the Konkan.*

No. 112] [*7-1-1735*

श्री

ऽ राजश्री

° श्री ˘
राजा शाहु नरपति हर्ष-
निधान बाजीराव बलाल
मुख्य प्रधान.

यांसी बाजीराऊ बलाल प्रधान. सु॥ खमस सलासीन मया व अलफ. छ १८ शाबानी मसीदीवर जुझ जाहाले तेथे तुम्ही कस्त मेहनत फारसी केली, म्हणून राजश्री शंकराजी केशव याणी लिहिले. उतम केले, शाबास तुमची! साहेबकामास तुम्ही न चुका. फिरंगी आहे तो काय? मारून ताराज करणे. तुमचे सर्व प्रकारे ऊर्जित केले जाईल. जाणिजे छ २३ साबान.

लेखन
सीमा.

¶ *Bajirao's assurances of reward to fighting men.*

No. 113] [*Jan. 1735*

श्री

बाजी भिवराव याचे
कागदाची नकल; आबाजीपंत
यास होती त्याची नकल.

विनंती उपरी. राजश्री स्वामीचे आज्ञापत्र व आपले पत्र आले ते छ २६ साबानी प्रविष्ट जाहले. तेथें आज्ञा कीं, पाचवडी बुनगे ठेऊन सडी स्वारी मतगडाकडे जाऊन शामलाकडील लोकांचे कबिले धरून आणणे म्हणून आज्ञा केली. त्यास येथें पाचजण आहेत, त्याचा विचार पत्र आले त्यापासून आजी छ २९

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

साबानपर्यंत होते. आतां अद्याप सिधांत जाहला नाही. आज्ञा हाली आली; ते पूर्वी वाडीवरी मुकाम असतां आली असती तरी उत्तम होते. वाडीहून कूच जाहले ते पाचवडी मुकाम करावा, तरी तेथें उदक नाहीं याजकरितां घाटाखालीं आलों, तो तेथें उदक नाहीं आणि जागा नाही. झाडी फार. याजकरितां नातेयावरी मुकाम जागा मैदान पाहोन केला. तो तेथें पत्रे आलीं. त्यासी येथील विचार एकाचे हाती आहे ऐसे नाहीं. बहुनाईकीचा विचार आहे. आणि पाचवड टाकून अडीच कोस पुढें आलो व पुढें दोन कोस महाड आहे. शहस येऊन गुंतलो. ऐसेच आणिखी कितेक रोज गुंतावे आणि विचार कोणास पुसावा आणि येथें राहून काय करावें? आजीपर्यंत भाताड थोडेबहुत मिलत होते, परंतु याज उपरी मिलत नाहीं. वैरणी तरी कांही शामलानी अंगरी दग्ध केल्या. उरल्या होत्या त्या आमच्या सैन्यानी जालिल्या. कहीस जावे तरी लांब फार जावे लागतें आणि पाणीहि मिलत नाहीं. ऐसे कितेक अर्थ पत्री लिहितां पुर्वत नाहींत. याजवरी आम्हांस आज्ञा करितात. आम्ही काय करावें ते लिहिले पाहिजे. आपण लिहिले कीं, त्याची मिर्जीमाफक राहून त्याचे विचारांत आसोन, आपली सिफारस राजश्री स्वामीस लिहित ते करणे म्हणोन; तरी येथें विचार पुसावा कोणास, विचार सांगावा कोणे, ऐसा विचार आहे. कोणी कोणाच्या स्वाधीन आहे ऐसे नाहीं. इतके असोन अजम सेखमिरा व लिंगोजी हवलदार यांचे विचारे कर्तव्य ते करीत आहो. मतगडाकडे स्वारीस जावें त्यास सर्वांच्या विचारें जाले जे, खासेयाने न जावें. याकरितां आम्ही राहिलों. आम्हाकडील राजश्री माणकोजी आटोळे याजबराबरी राऊत सरदार व ऐसे व राजश्री हरी गणेश याजबराबर हसम ऐसे रवाना केले. राजश्री सरलस्कर याजकडील फौज व राजश्री हिंदुराऊ याजकडील राजश्री आपाजी सोमवंसी ऐसे व हुजरातची फौज व पवाराकडील फौज ऐसे आजी रवाना केले. रा॥ खंडोजी मानकर यासी येथे बोलाऊन आणून त्यासी यासी गाठी घालून स्वारीस रवाना केले. खंडोजी मानकर त्या मुलकामध्यें माहीत आहेत, आपणांस विदित आहे. आम्ही तो चाकरीकरितां पुढे महाराजांचे पुण्यप्रतापे होईल तो करून. राजश्री आनंदराऊ बहिरव दि॥ रा॥ सचिवपंत हे आम्हा समागमे आहेत, ते आपणास ठाऊकच आहेत. याजकडीलहि हसमाचा जमाव हरी गणेश गेले याजबराबर रवाना केला आहे. जमाव तो भारी रवाना केला आहे. पुढे होणे जाणे राजश्री स्वामीचे प्रतापे होईल. बहुत काये लिहिणे, कृपा असो दीजे, हे विनंती.

¶*Baji Bhivrao writes to Ambajipant Purandare about the mismanagement of the Campaign and about the contemplated attack on Matgad.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 114] [*25-1-1735 ?*

नकल

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री छत्रपती
स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक हरी मोरेश्वर राजाज्ञा कृतानेक विज्ञापना. ताा छ ३० साबान मु॥ नाते माहाराजांच्या कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विज्ञापना. बहिरो नरसिंह व भानाजी व सेख महमद हुजरे याबराबर आज्ञापत्रे सादर केली ती पावोन सनाथ जाहलो. बुलगे पाचाडात ठेऊन सडे स्वारीने दिवे, श्रीवर्धन, म्हासले, या माहालात जाऊन शामलाकडील लोकांचे कबिले व गुरेढोरे व माणसे धरून मुलूक लुटून नस्तनाबूद करणे म्हणून पत्री आज्ञा केली. ऐसियास युध जाहल्यानंतर दाहा दिवस पाचाडानजीक मुकाम केला होता. त्याउपर आज्ञापत्र सादर जाले कीं, पाचाड राजश्री यमाजीपंताच्या स्वाधीन करणे, त्याप्रमाणे केले. व उदकाचे संकट जाहाले व वैरण लस्करास मिलेनासी जाहाली. बहुतेक रान वणव्याने जलाले व शामलानेहि जालले. याजकरितां तेथून कूच करून दो कोसावर येथे नात्यास येऊन मुकाम केला, तो आज्ञापत्रें सादर जालीं. ऐश्यास हा शह टाकून अगदी फौज गेल्याने कार्यास येत नाहीं. हा शह राखून काम करावे ऐसा साऱ्यानी बसोन विचार केला. गनीमास इकडील शह जबरदस्त असावा याजकरितां हुजरातपैकीं व राजश्री पवाराकडील, राजश्री बाजी भिवराव याजकडील, राजश्री खंडोजी मानकर व आणखी फौज राजश्री चिमणाजीपंत धायेगुडे याजकडील व सरलस्कर व हिंदुराव ऐसे साऱ्याकडील मिळोन च्यार हजार फौजेची स्वारी त्या माहालांत पाठविली असे; विदित जाहले पाहिजे. याउपर ज्याप्रमाणें माहाराज आज्ञा करतील त्या प्रमाणे वर्तणूक करूं. हुकुमाप्रमाणे आम्हीच स्वारीस जाण्याचा निश्चय केला होता, परंतु पाचाडची बेहबुदी पोक्ती नाही, तो जागा जोरावर असेल त्याणेच राखावा, ऐसा आहे. जागा जोरावार नाही, राखणार जोरावार पाहिजे, याजकरितां या शाहावर राहून स्वारी रवाना केली असे. पाचाडची बेगमी माहाराजानी पोख्ती केली पाहिजे. राजश्री यमाजीपंत पाचाडाहून सातारियास जाणार आहेत, ऐसी माारनिलेनी आम्हाकडे चिठी पाठविली त्यावरून लिहिले असे; विदित जाले पाहिजे. विनंती. राजश्री गोविंदराव पवार यास पंचवीस स्वा(र) नसी पाठवणे म्हणून पत्री आज्ञा केली. ऐसियास राजश्री उदाजी पवार याच्या विचारें त्यास जे पाठवावे. गोविदरायास पाठविल्यानें फौजेचा बंदोबस्त होतो ऐसे नाहीं. ही मोहीम माहाराजांच्या हुकुमाप्रमाणे सारेजण

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

मिळून करूं. यातून कोणी जात नाही ऐसा त्याचा मनोदय आहे. याकरितां त्यास पाठविले नाहीं. येविसी मारनिलेनी सेवेसी विनंतीपत्र लिहिले आहे त्यावरून विदित होईल. राजश्री आनंदराव सोमवंसी सरलस्कर याजकडील व राजश्री देंवजी सोमवंसी हिंदुराव व याजकडील सरदार राजश्री बाजी भीवराव यांबराबर आहेत. यांची याद सेवेसी अलाहिदा पाठविली असे त्यावरून विदित होईल. सेवेसी श्रुत होय. लोकांची खर्चाची बेगमी करून पाठवावी म्हणून पेसजी विनंतीपत्रे सेवेसी लिहिली आहेत. माणसाने च्यार रुपये आणिले होते ते मह-र्ग(ते)मुले खर्चोन गेले. याउपर कोणाजवळ पैसा नाहीं व आम्ही द्यावे तर यैवज नाही. कर्जवामहि येथे कोठून मिलणार ऐसा प्रसंग आहे. खर्चविणे लोक हुजरातचे बहुत हैरान होतात. रोज उठोन येऊन गवगवा करितात. या अरण्यात इलाज नाहीं. येकमाहे रोजमुरा हुजरातीस दिल्हा होता परंतु महर्गता लस्करात जाहली याजकरिता तो यैवज पुरता महिनाभर न पुरेसे जाहालें व महिन्याच्या रोजमुऱ्यातून लोकांनी कांही घरी खर्चास देऊन काही बराबर आणिले ते सरोन गेले. याउपरी माणसाचा इलाज नाहीं. उपवास कितेकास पडो लागले. तर या लोकांची बेगमी करून सत्वर पाठवणार महाराज धणी आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. लस्करांत गुरेढोरे आली, त्याची तहकीकात करून ज्याचे त्याचे आंगी लावावी यैसा हुकूम केला. त्यास हुजरातीत तो गुरे बहुतसी आली नाही. वरकडाकडे गुरे आली, त्याची चौकसी येथे पुरती होणार नाहीं. तर घाट आहेत तेथे माहाराजांनी चौक्या पाठऊन तहकीकात करावयासी आज्ञा केली पाहिजे. सेवेसी श्रुत होय, हे विज्ञापना.

¶*Hari Moreshwar Rajadna reports to Shahu an account of his operations and those of the other Sardars in the vicinity of Raigad.*

No. 115] [*March-April 1735*

श्री.

पुरवणी राजश्री गोविंदपंत स्वामी गोंसावी यांसी.

विनंती उपरी. संभाजी आंगरे याजकडील सख्य होऊन यावें येतद्विसी सर्वांचे अभिष्ट सिधीस जातें व खावंदाचेहि कार्य होते. अशास तुम्ही येकांती आम्ही ये गोष्टीचा विचार सांगोन पाठविला म्हणोन खामखा सांगोन त्याचे सख्य होयसा प्रसंग करवणे. म्हणजे येक हात वाडीकर व येक हात संभाजी आंगरे ऐसे जालियास टोपीकरांचा उपमर्द होईल. दीर्घ यत्न आंबीचा करितात आणि हे आपले पूर्वापार स्नेहाची जागा त्याची कलुशता वाढविल्याने प्रसंगोचित स्वहित

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

काये संपादिले हा अर्थ प्रसिधच आहे. यास्तव पूर्व स्नेहवृधि बेकिलाफ जाली म्हणजे शामलादिक टोपीकर देखील सहजातच ठाई ठेविले जातील.. एतद्विसीचा प्रसंग दुसरियानें सांगावे ऐसा काये ? खावंदास ध्यानात येत नाहींसे काये ? परंतु कोणे गोष्टीने भासेस गुंतले ते न कले. या उपरी हे गोष्टीस बल देऊन त्यांचा यांचा निर्विकल्प स्नेह होय ते गोष्टी करणे. एतद्विसीं राजश्री वासुदेव जोशी यांसहि बल देणे व महादोबास बल देऊन खामखा कार्य करणें. आमचाहि निरोप उभयेतांस सांगणे, हे विनंती.

¶*Letter to one Govindpant, strongly urging upon the attention of the Peshwa the necessity of befriending Sambhaji Angre, if the campaign was to be made successful.*

No. 116] [*8-4-1735*

श्री नकल.

श्रीमंत महाराज राजश्री छत्रपति
स्वामीचे सेवेसी.

विनंती. सेवेसी सेवक बावाजी म्हसके हवालदार किले ज्ययेगड सेवेसी विज्ञापना. ताा छ २५ माहे जिलकादपर्यंत महाराजांचे पुण्यप्रतापेकरून मुकाम माखजन येथें जमावसहवर्तमान असो विशेष. माहाराजानीं गोवलकोटचे मोर्चे-बंदीविषीं राजश्री सरखेलास आज्ञा करून आज्ञापत्रें पाठविलीं त्याप्रमाणें मोर्चे-बंदीचा जमावाचा जडाव[1] नालातोफादेखील देऊन राजश्री सरखेलानी गोवसकोटचे मोर्चेबंदीस जावयाविषीं सेवकास आज्ञा करून पाठविले ते छे[2] २१ जिलकादीं शुक्रवारी माखजनीं येऊन पुढें नौला[3] तोफा घेऊन जावे लागले. जमावाचा जडाव लस्करांत किती आहे ? गोवलकोटीं तोफा घेऊन जडावे तेव्हां जमाव बरा पोख्ता पाहिजे, मोर्चेबंदी करणे ते जमावाचे बळेकरून केली पाहिजे, जमाव मनमुदेसारिखा असिला पाहिजे, म्हणून लस्करांत राजश्री संताजी जाधवराव व दुर्गोजी भोइटे यांस कागद लेहून येथून गणाजी गुजर पाठविले. त्यास लस्करांतून आजच गणाजी गुजर कागदाचे जाब घेऊन आले. लस्करामधें पाईचा जमाव तों नाहीं. राऊत मात्र दीड हजारपर्यंत आहेत. पुढें जमावाची बरी पोख्ती बेगमी जाली पाहिजे. मोर्चेबंदी करणे तेव्हां गोवलकोटची कर्मेवर्मे[4] मनास आणून

---

१ रचना, तर्तूद. २ (४-४-१७३५)
३ गरनाळा. ४ लागभाग, माऱ्याच्या जागा.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

मोर्चे घालावे लागतात. जमाव तो भारी असावा. जागा जेर होणे, तेव्हां तीन मोर्चे घालून, तोफा जोडून, मारगिरी करावी लागेल. पाऊस जवळ आला. यांत जमावाची बेगमी लौकर जाहली पाहिजे म्हणून सेवेसी विनंतीपत्र लिहिलें आहे. मोर्चेयास जमाव पाइचा जडाव बरा असावा. राऊत दोन हजारपर्यंत व पाईचा जमाव दाहा हजार, एकूण बारा हजार जमावाचा जडाव होऊन आल्यास तीन मोर्चे घालून, भांडी जोडून, मारगिरी करून, जागा जेर माहाराजांचे पुण्य-प्रतापे सत्वरच होऊन येईल. मुख्य पदार्थ माहाराजानीं जमावाचा पोख्ता जडाव करून द्यावा. इकडील राजश्री सरखेलाकडील जमाव म्हणावा तरी कुलाबा प्रांतीचा जमाव तिकडे गुंतला. वरकड इकडील जमाव भांडीदेखील घेऊन आलों. जमावाची पोख्ती बेगमी करून पाठवणे ते माहाराजांनी करून पाठवावी. गतवर्षी अंजनवेल, गोवलकोटी, दोन जागेयांस शह माहाराजानीं दिले होते. गोवलकोटी राजश्री उदाजी पवार फौजेचे जडावाने होते, ते सर्व वर्तमान सेवेसी विदितच आहे. प्रस्तुत गोवलकोटी येक शह जाहला तेव्हा जडाव जमावाचा बरासा जाहला पाहिजे. सर्व पदार्थ माहाराजानीं गोवलकोटचे मोर्चेबंदीची आज्ञा केली तेव्हा सेवेसी लिहिल्याप्रमाणें फौज व पाईचा जमाव याचा जडाव करून खाले पाठविणार माहाराज समर्थ आहेत. सेवेसी विदित जाले पाहिजे, हे विज्ञापना.

¶*Bawaji Mhasake writes to Shahu that under orders from Angre he is marching towards Gowalkot. In the letter to Chatrapati he explains the difficulties of his situation and makes a request to send him more men and guns.*

No. 117] [*30-4-1735*

पौ छ २० जिल्हेज.

श्री.

पु॥ तीर्थरूप राजश्री राऊ व तथा
राजश्री आपा स्वामीचे शेवेसी,

विनंती. आजी छ १७ जिल्हेजी बुधवारी राजश्री संभाजी आंगरे याजकडील पत्रे आली. त्यात मजकूर की गोवलकोटास लोक व तोफा पाठविल्या, त्याणी काळुस्तियाच्या टेंभीवर[1] मुर्चेबंदी करून मार करितात. यैसियासी प्रजनकाल समीप आला. माहाराजानी हशम व लस्करचे सामान मातबर पाठवावे म्हणजे

---

१ टोंक, टेकडी.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

स्वामीकार्य होऊन येईल, म्हणून वारंवार सेवेसी लिहित गेलों. परंतु अद्याप जमाव येत नाहीं, तेव्हा कार्य कसे होते ? व तूर्त लोकास पोटासहि नाही. यास्तव सेवेसी लिहिले असे. तरी जमाव, खर्चास, पाठवावे. नाही तरी लोक उठोन जातील, यास्तव लिहिले असे, म्हणून लिहिले आहे. पत्राची नकलहि मागून लेहून पाठऊ. स्वामीस वर्तमान कलावे याकरितां लिहिले असे. सेवेसी श्रुत होय, हे विज्ञापना.

¶*Nana Saheb Peshwa writes to his father the contents of Sambhaji Angre's letter to Shahu.*

No. 118] [*26-6-1735* ?
नकल

श्री.

श्रीमंत महाराज राजश्री छत्रपति
स्वामीचे सेवेसी.

विनंती. सेवक संताजी जाधव कृतानेक विज्ञापना यैसीजे. ताा छ १५ सफर मु ॥ पागा चिपलोण माहाराजांचे कृपेकरून लस्करचे व सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. लस्करचे व मोर्चेबंदीचे व हसमाचें सविस्तर अलाहिदा पत्रीं लिहिले आहे त्यावरून सविस्तारें निवेदन होईल. माहाराजानी कृपेने आपणास गोवलकोटास रवाना केलें, तेव्हां आज्ञा केली कीं, दोन महिनियानी घाटावर यावयास रजा देतों, काहीं फिकीर न करणे. त्यास तेरा महिने जाले. कुलीं स्वामीनी सरदारांच्या * * जा येथें रवाना केल्या. त्यास दोन * * तां उठोन गेले. दाहादाहा विसांविसां राऊतानसी नांवादाखल राहिले. आपण आपली सर्वस्वें खराबी करून लक्ष रुपयाखालीं कर्जदार जालों. सोला सतरा सिरा[1] घोडी मेली व पडलीं. याखेरीज च्यार भले माणूस खर्च जाले. यैसें असोन आपले जमावानसीं हा कालपावेतों निदान सोसोन राहिलों. परंतु माहाराजास सेवकाची काहीं दया न आली. घरीं कर्जदार रोज उ (ठो) न येऊन बसत आहेत व येथें पोटास काहीं यावयास अनकूल नाहीं. लोकाचे समजाविसीचा गवगवा पडला आहे. त्यानी हैरान केले आहे. माहागाई दोन आडीच पाइलीची जाली आहे. तेहि मिलत नाहीं. यैसा प्रसंग संकटाचा जाला आहे. निदान जाणून हा कालपावेतों गुजरान केली. आपलेहि लोकांस हे मोहिमेस(दिवसगत) जालीं. तेहि

---

१ उत्तम.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

राहात नाहीं. निदान जाणोन विज्ञापना लिहिली आहे. तरी स्वामीनी कृपा करून येथें कोणी येक मातबर माणूस पाठऊन बेहबुदी करावी. आपण आठ रोज मार्ग लक्षितो आणि स्वार होऊन सेवेसी येतों, माहाराज शब्द लावितील याजकरिता हे विज्ञापना लिहून उतीर्ण जालों. काये ते बंदोबस्ती करून हर कोणास येथे पाठवावे. सेवेसी श्रृत होये, हे विज्ञापना.

¶*Santaji Jadhao informs Shahu of the heavy strain and expense he had sustained during 13 months of fighting and requests to be relieved within eight days.*

No. 119] [*23-9-1735*

छ १९ जोवल.

श्री.

तीर्थरूप राजश्री राऊ व तथा राजश्री आपा स्वामीचे सेवेसी.

आपत्ये माहादाजी अंबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान ताा छ १६ जमादिलवल मंगलवार परियेंत येथास्थित असे विशेष. येथील वर्तमान आलाहिदा पत्री लिहिले आहे त्यावरून विदीत होईल. गोपाल राऊ व जानोजी जाधव यैसे गोवलकोटास राजश्री स्वामीनी कासीबंदरचा मोर्चा बसवावयासी रवाना केले. त्यास गोपालराऊ पाऊणेकसे माणूस, राऊत पनासेक, इतक्यानसी काळुस्तियावर बाबाजी म्हसके याचे सेजारी राहिले आहेत. शामलाची गलबते अंजनवेलीहून सात (एक ओळ फाटली) वे यास्तव लिहिले असे. हे विज्ञापना.

¶*Mahadaji Ambaji communicates to Bajirao the progress of fighting in Janjira.*

No. 120] [*23-9-1735*

श्री.

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ व तथा राजश्री आपा स्वामीचे सेवेसी.

विनंती. काली सोमवारीं प्राथःकालीं दरबारास गेलो होतो. तेव्हां राजश्री स्वामी बोलिले कीं, राजश्री पंतप्रधान प्रस्तुत कोठें आहे? मनसबा काये योजिलाहे? कोकणातील कर्नाला व माहुलीचें वर्तमान काये? व शामलाचें

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

वर्तमान काये? व उमाबाई प्रस्तुत कोठवर गेली तें कांहींच कलत नाहीं. तुम्हांस कललें असेल तर सांगा, यैसें पुसिलें. त्यावर आम्ही विनंती केली कीं कर्नाल्यावर शामलाचे लोक आहेत व किलेदारहि आहे. आम्हांकडील हशम व राजश्री बाजी भिवराव गेले आहेत. केवल शामलाचा उपद्रव कोठें होऊं देत नाहींत. व माहुलीचें वर्तमान तर, कोणें घेतली हें अद्याप पुतें ठिकाण लागत नाहीं. त्यावर राजश्री स्वामी बोलिले कीं, कोणीतऱ्ही घेऊं, परंतु मोगलाची फौज दोन हजार रवाना झाली आहे तरी तुम्हीं राजश्री प्रधानपंतास लिहिणें कीं, तुम्हीं आपणांकडील येक शहाणें माणून पाचसें राऊत यैसें पाठऊन मोगलाचे फौजेची कुमक करणे. येविसीं ढील येकंदर न करणें व मोंगलाइतील बातमी नवाबाकडील व शहरची (व)गैर खबरदारीनें राखून तरतूद जे करणें ते करावी, म्हणून लिहिणें, यैसी आज्ञा केली. त्यावरून हें पत्र सेवेसीं लिहिलें असे. तरी स्वामीनी राजश्रीचे आज्ञेप्रमाणें तरतूद केली पाहिजे व वरचेवर कोंकण प्रांतींचे व येवनाकडील वर्तमान येत जाईल तें येथें ल्याहावयासी आज्ञापिलें पाहिजे. सेवेसीं श्रुत होये, हे विज्ञापना.

¶*Mahadaji Ambaji communicates to Bajirao discussions at Shahu's court with reference to the capture of the forts Mahuli and Karnala.*

No. 121] [*Sept.-Oct. 1735*

पो छ १३ साबान.

श्री.

विनंती उपरी. चिठी पाठविली ते पावली. लिहिलें कीं, करनालीयावर लोक चढायाचेविशयीं जुन्नरकरानें लेहून पाठविलें आहे. त्यास मोगलाचे लोक चढलियास अथवा शामलाचे लोक चढलियां दोहीतून विचार येक लिहोन पाठवून तदुनसार केल जाईल. त्यास जुनरकराचे लोक अवशमेव चढवावे. शामलाचे लोक काही कार्याचे नाहीत. आवरंगाबादेजवल उपरालियाचें लिहिले तरी नवाब (फाटले.....) वर्तमान मुरार केशव यांनीं लिहिलें होते ते पत्र बजिनस सेवेसी पाठविले आहे; त्यावरून विदित होईल. व जुन्नरकराचे लोक बरंच (फाटले) चढवावें कीं मागेंती शामलाचे लोकच (फाटले) पावत ऐसी मजबुती केली पाहिजे. जुनरकराचे लोक आपणाजवळ आनावे व आपले लोक त्या समागमें देऊन किलियावर चढवावे आणि शामलाचे लोक उतरावे, ऐसें केलें पाहिजे, विशेष काय लिहिणें, हें विनंती.

¶*The officer responsible for the Karnala fort advises that Moghul forces may be admitted into that fort, but not those of the Siddi.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 122] [*7-10-1735*

पो छ ४ जमादिलोवल.

श्री.

तीर्थरूप राजश्री राऊ व तथा राजश्री आपा
स्वामीचे सेवेसीं.

आपत्ये माहादाजी अंबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान ता छ १ जमादिलाखर भोमवार परियेंत येथास्थित असे विशेष. गोवलकोटीहून पत्रे आली आहेत. त्याच्या नकला करून सेवेसी पाठविल्या आहेत, त्यावरून तेथील वर्तमान कळो येईल. गोपाळराऊ[1] येथून राजश्रीनी कासी बंदरचा मोर्चा बसवावयासी पाठविले त्याचे वर्तमान राजश्रीनी भास्कर वैद्य यासी पुसिले. त्याणी सांगितले कीं, गोपाळराऊ या पासी लोक जमा जाले. तेथून कासी बंदरावर मोर्चा बसवावयासी येत होते. तो बावाजी म्हसके त्यास म्हणो लागले की, तुम्ही येथून जातां आणि आम्हापासी कुमकेस तुमचा जमाव कोणीच राहत नाहीं, तर आपण उठोन जाऊ. यैसे बोलोन गोपाळराऊ[1] यासी जमावसुधा राहाऊन घेतले यैसे वर्तमान सागोन फडसमजावीस केली. स्वामीस कलावे याकरितां लिहिले असे. स्वामीनी लिहिले की, राजश्री सरलस्कर याच्या सरंजामाचे व राजश्री आनंदराऊ सोमवंसी याचे काय वर्तमान जाहले ते लिहिणे म्हणून लिहिले. यैसियासी सरलस्करचा सरंजाम पूर्ववत प्रो द्यावासा मान्य राजश्रीनी करून सनदास परवानगी दिल्ही व जुना सरंजाम राजश्री देवजीबाबाचे धाकटे पुत्र माधवराऊ याच्या नावे करून सनदास परवानगी देविली. रा आनंदराऊ सोमवंसी याचे काही अद्याप निवडले नाहीं. स्वामीस कलावें याकरितां लिहिले असे. स्वामीनी जिनाविसी लिहिले होते त्यावरून बारा जीन घेतले आहेत. मागून पाठऊन देतो. कलले पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Mahadaji Ambaji Purandare informs Bajirao and Chimaji Appa, in reply to their queries, how Raja Shahu had dealt with several individuals who had taken part in the War.*

No. 123] [*17-10-1735*

पो छ १६ जमादिलाखर.

श्री.

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ व तथा राजश्री आपा स्वामीचे सेवेसी विनंती. गोवलकोटीहून पत्र छ ११ जमादिलाखरी भृगुवारी आले. त्यात मजकूर की,

1 Can this be Gopalrav Khandekar of the Pratinidhis?

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

कालुस्तियावर आंगरे यानी मोर्चाहा दिला होता. त्यास रात्री अवाई जाहाली की शामल आला. त्यावरून त्याणी मोर्चियासी आगी दिल्ह्या व तोफा काढून चवबुरजी जालिली. त्यावर मोर्चे काढून तोफा घेऊन चालिले. तेव्हा दणगे[1] होऊन संताजी जाधव व दुर्गोजी भोईटे व जयेसिंग सिरके हे धावोन बावाजी म्हसके याजवल गेले आणि त्यासी बोलिले की, तुमचा सर्वाविसी भरोसा असता मोर्च्यास आगी लाऊन तोफा घेऊन जावे हे उचित नव्हे. शामल आला तर काये चिंता आहे? तुम्ही आम्ही येकत्र होऊन जागा बलाऊन राहू. यैसे बोलिल्यावर बावाजी म्हसके बोलिले की, तुमचा आम्हास भरोसा येत नाही व आमच्या खावंदाचा आम्हास हुकूम आहे की, राजश्री भगवंतराऊ रामचंद्र याणी मुलकात उत्पात मांडिला; त्याचे येकदोन वेल पारपत्य करणे ते केले. त्याच्याने काही होईनासे जाहाले, तेव्हा राजश्री संभाजीराजे यापासी वर्तमान सांगोन बहुत बजीद होऊन येसाजी थोरात याचे लेक चाकर ठेऊन फौज कोकणात उतरली. याउपर ते फौजेच्या बले आमच्या मुलकास उपद्रव देतील व आजी वरीसभर पर्यंत आम्ही लिहित गेलो की, मातबर फौज पाठवावी म्हणजे साहेब काम करितो यैसे सांगोन व लेहून पाठवितों. परंतु काहीच सार्थक होत नाहीं. आतां काही आम्ही राहात नाही यैसे साफ सांगितले. त्यावर संताजी जाधव व दुर्गोजी भोईटे याणी त्यासी दोही दिल्ही की, तुम्ही बगरहुकमी तोफा न नेणे. त्यावरून दोचौ कोसावर जाऊन राहिले आहेत. याउपर मोर्चे उठले. शामल सेर जाहाला, अशामधी माहाराज मातबर फौज पाठविता (त) तर मागती गेले मोर्चे बलाऊन पुन्हा शामलास तंबी पोहचाऊ, यैसे वर्तमान राजश्री स्वामीपासी भास्कर वैद्य याणी सांगितले. सिकारीमधी त्रितीये प्रहरी वर्तमान राजश्रीस विदित जाहाले. तेथेच बावाजी म्हसके यासी कागद राजश्रीनी लिहिला की, तुम्ही बगरहुकमी[2] उगेच मोर्चे काहाडिले व शामलाची अवाई खादली, हे कोण शहाणपण केले? याउपरी दुसरा विचार न करिता मागती पूर्वी मोर्चे काईम करणे तरीच तुमची अबरू अहे. फौजहि मागाहून अति सत्वर पाठवितों, म्हणून कितेक निषेध करून लिहिले. त्यावर राजश्री तसेच घरास आले. मार्गी येता राजश्री प्रतिनिधीच्या घरास गेले. त्यास वर्तमान सांगितले आणि याउपर विचार काये यैसे पुसिले. त्यास प्रतिनिधि बोलिले की, माहाराजास इतके संकट आहे तरी आम्ही चाकर लोकानी काये करणे आहे? माहाराजानी उत्तम रीतीने आमचे संगोपन केले ते संकटास कार्यास यावयासच केले. आम्हास हुकूम होईल तर

---

१ दणगे होणे – मोठा आवाज होणे. (तोफांचे गाडे वगैरे नेताना).

२ बगरहुकमी—हुकुमाशिवाय.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

अम्ही जाऊ. त्यावर राजश्री बोलिले की, तुम्ही जावेसे काये आहे? पाचसे राऊत तुम्ही आठदहा दिवस देणे. इतक्यामधी आमची फौज येईल. मग तुमचे लोक आणऊ. तेव्हा महादाजी घाटगे येथेच होते त्याचे नाईकजी घाटगे दोनसे राऊत व नागोजी घाटगे याचे राऊत यैसे तीनएकसे राऊत जमा जाहाले व पवार सोमवंसी याचे सेदीडसे राऊत हजीर होते ते, यैसे पाठवावयाचा विचार जाहाला. परंतु मातबर माणूस तरतुद्या कोण पाठवावा यैसे राजश्री बोलिले. तेव्हा येमाजीपंत बोलिले की, हुकूम होईल तर आपण जाऊ. यावरून प्रतिनिधीचे घरची वस्त्रे घेऊन येमाजीपंतास व नाईकजी घाटगे यासी दिल्ही. राजश्री मंत्रि व सुमंतहि तेथे बोलाऊन नेले होते. त्यावर राजश्री घरास आले. तुलसीचे पूजन करून सदरेस आले. मागती मंत्रि व सुमंत व येमाजीपंत बोलाविले. येमाजीपंतास आताच जावे म्हणून अज्ञा केली. त्यावर येमाजीपंत बोलिले की राजश्री प्रतिनिधीस येथे बोलावावे. त्याचे रूबरू आपण अज्ञा करावी म्हणजे जातो. त्यावर राजश्री बोलिले की त्याचा काही अनमान आहे की काये? त्यावर येमाजीपंत बोलिले की, काही अनमान नाही, परंतु येथे आल्यास उतम आहे. त्यावर राजश्रीनी राजश्री बावापासी व सुमंतापासी दोघापासी दोन सले[1] दिधले की, तुम्ही जाऊन रायास सांगोन येमाजीपंताची रवानगी करून येणे. येसी आज्ञा केली. त्यावर राजश्री उभयेता जाऊन येमाजीपंताची रवानगी केली. याउपरी राजश्री संभाजी राजे याजकडे पत्रे लेहून बालोजी डुबल पाठविले की, तुमचा सुदामत तह असेल त्याप्रमाणे संभाजी अंगरे यासी तुम्हासी निखालस वर्तऊ. तर तुम्ही भगवं(त) राऊ यासी सांगोन मुलकात धामधूम न करणे. हे गोष्टी भगवं(त) राऊ तुमची न अईकत तरी आम्हास सांगणे. आम्ही पारपत्य करू. कदाचित तुमच्या ध्यानास न ये अणि मुलूकच लुटाल तरी आम्हास आंगरेयाचे साहित्य करणे लागेल. तुमचे धामधुमेस्तव आंगरे याचे लोक गोवलकोटीहून मोर्चा काहाडून गेले. यात शामल सेर होतो. आम्ही शामल मारून राज्य मेलविल्यास तुम्हास उपयोगी आहे. तरी आंगरेयासी येकंदर घसघस न करणे, यैसे सांगोन त्यासहि तिकडे पाठविले व संभाजी आंगरे याजकडे गोविंदराऊ चिटणीस व भास्कर वैद्य पत्रे देऊन पाठविले. व त्यास अज्ञा केली की, तुमच्या बापानी व बंधूनी स्वामीकार्ये केली, त्यावरून तुम्हीहि तैसीसा पूर्ण असता येकायेकी शामलाची अवाई खाऊन बावाजी म्हसके जमावसुधा उठोन गेले, हे गोस्टी मर्दुमीस अगर येकनिस्टतेस योग्य नाही. तुमचा मामला मानाजी आंगरे याणी घेतला, त्याविसी कितेक प्रयेत्न करणे तो करीत असता व

---

१ सले दिधले = राजमुद्रा दिल्या (?)

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

कितेक तुमच्या ऊर्जिताचा विचार करीत असता हे तुम्हास उचित नाही. याउपरी मार्गती[1] बावाजी म्हसके यासी सांगोन व त्याचे साहित्य करोन पूर्ववत-प्रमाणे मोर्चे बसऊन स्थल हस्तगत होये ते करणे, यैसे कितेक सामदानभेददंड-पुरस्कर वचने सांगोन उभयेतांची रवानगी विजयेदुर्गास केली व येक बंदुख व येक तरकसकमान[2] हे त्यास पाठविले. राजश्री स्वामी राजश्री प्रतिनिधि याची बहुतसी सिफारस करीत होते की, प्रतिनिधि मर्द माणूस; याणी मागेहि येकदोन महत्कार्य केली, पुढेहि निदानचे[3] प्रसंगी कदापि चुकणार नाहीत, यैसे बोलिले. त्यावर राजश्री बोलिले की, राजश्री प्रधानपंतानी व खंडेराऊ दाभाडे यानी निजामाच्या विघाडाचे वेलेस निसीम महत्कार्ये केले. स्वामीकार्य म्हणता तितकेच केले. वरकड केली ती आपले उपयोगी केली, यैसे बोलिले. स्वामीस विदित व्हावे यास्तव लिहिले असे. भास्कर वैद्य याणी वर्तमान सांगितले ते तपासिले लिहिले व त्यास पत्र आले त्याची नकल पाठविली आहे, त्यावरून विदित होईल. सेवेसी श्रुत होये, हे विज्ञापना.

¶ *An important and full letter describing the personal interest that Raja Shahu was taking in the campaign and the threat he administered to Sambhaji of Kolhapur for secretly helping the Siddi. The whole letter is in the hand of Mahadoba Purandare.*

No. 124] [*25-10-1735*

पा छ २४ जमादिलाखर.

श्री

पुरवणी राजश्री राऊ व ता राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी.

विनंती उपरी. छ १९ जमादिलाखरी शनवारी त्रितीय प्रहरी राजश्री येसवंत राऊ दाभाडे सेनापति यास निरोपाचे विडे दिल्हे. त्यांनी पाचसे राऊत गोवल-कोटास पाठवायास मान्य केले. विदित जाले पाहिजे. सांप्रत गोवलकोटीची मसलती पडिली. या करिता दरमाहे कार्तिक व मार्गसीर्ष मासीचे पोत्याच्या चिठ्या करिताती. तर दरमाहेचा यैवज पाठऊन दिल्हा पाहिजे. सेवेसी श्रुत होये, विज्ञापना.

¶ *Shahu appoints Yashwantrao Dabhade to help in the conduct of the fight of Gowalkot.*

---

१ मागती = पुन्हा. २ तरकसकमान – भाता आणि धनुष्य.
३ निदान – आणीबाणीची वेळ; अवघड प्रसंग.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 125] [*5-11-1735*

नकल

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री छत्रपती
स्वामीचे सेवेसीं

विनंती. सेवक संभाजी आंगरे सरखेल सेवेसी विज्ञापना. येथील वर्तमान ताा मागसीर्ष सुध द्वितीया सौम्यवार पावेतों स्वामिच्या कृपावलोकनेकरून येथास्थित असे विशेष. स्वामीनी आज्ञापत्र पाठविलें तेथें आज्ञा जे, गोवलकोटचा मुर्चा करार करावा. आज्ञा ते प्रमाण. गोवलकोटचा मुर्चा करार करून सविस्तर राजश्री गोविंद खंडेराव व भास्कर वैद्य यांचे बरोबर सेवेसी लेहून पाठविलें आहे त्या वरून विदित होईल. श्रुत जालें पाहिजे, हे विज्ञापना.

¶ *Sambhaji Angre informs Shahu of his readiness to join his effort in the Janjira Campaign.*

No. 126] [*7-11-1735*

पो छ २० रजब. तालीक

श्री

श्रीमंत महाराज राजश्री छत्रपति स्वामीचे सेवेसीं

विनंती. सेवक मानाजी जाधव व दुर्गोजी भोईटे कृतानेक विज्ञापना यैसीजे ताा छ १२ रजब पावेतो मु॥ पागा चिपळोण महाराजांचे कृपेकरून सेवकाचे व लस्करचें वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीनी कृपा करून राजश्री येमाजीपंत यांजकडील हसमाची रवानगी केली, त्यापैकीं जीवनराऊ येलेकर याजसमागमें छ ११ रजबीं रविवारी अस्तमानी जमाव पोंहोचला, त्याची हजिरी घेऊन मागून सेवेसी लेहून पाठऊन. पुढें वरचेवरी जमावाची भरती येईल तदनरूप तेहि सेवेसी लेहून पाठऊन. छ १० रजबी शणवारीं सिदीसाद कुली जमावानसी बाहीर निघाला. त्याजवरी आम्ही कुली फौजेनसी गेलों होतों. त्यांनी तीन टोल्या केल्या होत्या. त्यास येके टोलीचे तोंडावर परसरामाचे खाडीकडील आम्ही होतों. मीठबंदरचे खाडीकडील टोलीवर सोलोसकर वगैरे सारी फौज होती. याजवर हबसियानें चालोन घेतलें. याजवर सोलोसकरानें घोडी घातलीं व राा उदाजी आटोले दिा रघोजी भोसले व भुलोजी गाजरे व हणगोजी बोरगे व आणिक कितेक लोक होते. आम्हाजवळ राा द्वारकोजी सोमवंसी मात्र होते.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

यैसियास त्याची याची झीटपीट[1] झाली. त्यामध्यें उदाजी आटोळे दिा रा रघोजी भोसले याची जमावाची घोडी गोलीने ठार पडली. सोलोसकराकडील दोन घोडी जखमी जाली. गनिमानी यांस रेटोन पाठीवर आला. तिकडून आम्ही आलों, तों गनीम अवघा एकवट होऊन मारगिरी बरखंदाची व रेहकलियाची बहुतसी केली. अस्तमान जाला. आमचा इलाज गवतामुळे नाहीसा जाला यामुळे सारी फौज लस्करांत आली. गनीम रिकामटेकडी पावेतो चालोन आला. जमाव बहुत भारी आहे. आमचे जमावाची तों सारी भरतीच आहे. आम्ही हें वारंवार लेहावें यैसे नाहीं. याउपरी साहेब लस्करची पुस्तवानी[2] फौज उतम व दारु सिसे पाठवितांत तर उतम आहे. नाही तर गनीस सेर जाला आहे. लस्करचा धीर निघणार नाहीं. (फाटलें) दाणा मुतलख[3] मिलत नाहीं. मागती मंदी पडिली आहे, यामध्यें माहाराज धणी आहेत. सेवेसी श्रुत होय, हे विज्ञाप्ति.

¶ *Manaji Jadhav and Durgoji Bhoite write to Shahu an account of the three divisions of the Siddi's army and the encounters they had with them.*

No. 127] [*4-12-1735*

नकल

श्री.

श्रीमंत महाराज राजश्री छत्रपति

स्वामीचे सेवेसी

सेवक संभाजी आंगरे कृतानेक विज्ञापना. येथील कुशल पौष बहुल दसमी भृगवार (४-१२-१७३५) पावेतों स्वामीच्या कृपादृष्टीकरून सेवकाचें व या प्रांतीचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीनी आज्ञापत्र पेशजी त्रिंबक विष्णु याजबराबरी व दुसरें विठल केशव, तिसरें संभू हरकारा याजबराबरी पाठविलीं तीं प्रविष्ट होऊन आनंद जाहला. आज्ञा कीं, रायेगड प्रांते पवार व हुजरात पांच हजार फौजेनसी उतरले आहेत. याउपरी इकडील मनसुबियास दिवसगत लाविता कार्यास येत नाहीं; व सेवकाचे कुमकेस दीड हजार फौज तयार केली आहे. कोणे दिवसी जयेगडास याल हें सविस्तर लेहून पाठवणे म्हणून स्वामीनी आज्ञापिलें. तरी स्वामीची आज्ञा ते सेवकास प्रमाण आहे. आज्ञेप्रमाणे जमावाची व आरमाराची तयारी करून माघ शुध प्रतिपदा भृगवारी (२-१-१७३६) निघावयासी मुहूर्त पाहिला आहे; तेच दिवसी स्वार होऊन जयेगडीं येतों तेथून स्वामीचे सेवेसी विनंतीपत्र लेहून रा रघो नारायेण यांस सेवेसी पाठवितों. फौजेची रवानगी करणार स्वामी धणी आहेत. गोवलकोट व अंजनवेलीस जाऊन बसावें तेव्हां पुढील पाये मागें काढितां कार्यास

---

१ झटापट. २ पाठराखणी. ३ मुळींच.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

न ये. सा चार मास किंबहुना पर्जन्यकाळ आला, तथापि त्याचा पिछा सोडितां न ये. जाऊन नतिजा द्यावा तरीच गेल्याचे सार्थक. मागें फौजा गेल्या आणि दोन चार मास राहोन निरार्थक होऊन उठोन गेले तेव्हां शत्रू शेर जाहला. यैशास याउपरी खासा फतेसिंगबाबा भोंसले फौजेनसी येतील तेव्हां एक निशा करून उठावे आणि दोन्ही जागे महाराजांच्या शासनाक्रांत करावे, तरीच जाऊन बसावें. ये गोष्टीचा विचार स्वामीनी चितात आणून टक्यापैक्यानसी सर्व साहित्य फौजेचे जाहले पाहिजे. लस्करास दाणा देखील वरघाटीहून आणावा लागेल. मुलूक अगदी भयान जाहला. सेर दाणा मिळणार नाहीं. कोठे लुटीसहि जागा नाहीं. हमेशा पदरचा शेर व रोजमुरा देऊन भांडावे लागेल. अंजनवेली व गोवलकोट दोन्ही जागे शामालाने मजबूत केले आहेत. तेथे टकर देऊन, भांडी जोडून, मारगिरी करून, आयास आणावा, मुर्चे चालवावे, बेलदार लाऊन सुरूंग द्यावे, यैसे नाना उपाये योजावे लागतील, तेव्हा कार्येसिधि होईल. आरमारचा इलाज नाहीं. यास कारण काये स्वामी म्हणतील तरी, इंग्रेजास शामलानें साध्य केले आहे. सा तरांडी विजयदुर्गचे बेनावरी हमेशा गुराबाचे जपणीमधे आहेत. कोठे जाणे तेव्हा पाठीवरी आहे. तैसाच फिरंगी सामील आहे. इंग्रेज फिरंगियास स्वामी कोणे एके विचारे बंदावरी ठेवितील तरी शामलाचा हिसाब नाहीं; मारून मोकळाच स्वामीचे सेवक करितील. इंग्रेजाने मोठा अपाये केला आहे. इंग्रेजास स्वामी कांहीं शकटभेद करून च्यार दिवस आरमारासी पाठी न घाली ऐसा कांही स्वामीनी मंत्र योजिला पाहिजे. आरमार अंजनवेलीचे खाडीत घालून, खुस्कीने व आरमाराने शह दिल्हा तरीच स्वामीच्या मनोदयानरूप कार्ये होऊन येईल. सेवकास सुचला अर्थ सेवेसी लिहिला आहे. पारपत्य करणार स्वामी समर्थ आहेत. सेविषीं इंग्रेजामुळे स्वारीसिकारी साधली नाही. जमावास तों दिल्हे घेतलें पाहिजे. अन्यथा माणूस पाये घेत नाहीं. वोढीचा प्रसंग विशेष जाला आहे. जमावाची व सेवकाची बेगमी करून सेवा घेणार स्वामी धणी आहेत. वडिलांनी सेवा केली आणि आपले ऊर्जित करून घेतले, त्याचप्रमाणे कायेवाङमनसा स्वामीची सेवा करून आपले ऊर्जित संपादावे हाच सेवकास निजध्यास आहे. मायबाप धणी स्वामीचे पाये आहेत. सेवा घेऊन सर्फराजी करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत व्हावे, हे विज्ञापना.

¶*Sambhaji Angre writes a full and informing letter to Shahu, telling him frankly the difficulties of the campaign and how they could be got over. He also mentions how the English and the Portuguese have been helping the Siddi and how they must at once be restrained in order to achieve success.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 128] [*4-12-1735*

श्रीराम.

सेवेसी विज्ञापना विशेष. बाणकोटासंनिध वेसवी केलसी माहालीं शामल आरमारसहवर्तमान येऊन मुलूक उपद्रविला म्हणौन किले मारीहून छ २७ रजबचें पत्र छ २९ तेरखेस आलें. त्यावरून गनीम दगेखोर आहे, वेळास चुकणार नाहीं, हें जाणून तेच क्षणीं आडीचतीनसें हशमाचा जमाव भवानजी कदम व बावाजी जाधव वगैरा सरदार यांजबरावरी दारुगोलीचे साहित्य देऊन बाणकोटच्या उपरालियास रवाना केले. आणि त्यांस सांगितले कीं, तुम्ही रात्रीचा दिवस करून जाऊन किलेमारचा उपराला करणें. कदाचित तुम्ही पोहचलेस नाही तों गनीमानें जबरदस्ती पोंहचविली तरी बाणकोट जागा नामर्द हबशाजवळून जबरदस्तीनेच घेतला आहे. याकरितां ये प्रसंगी त्याची जबरदस्ती जाहाल्यावरी टिकाव धरणें मुसकील होईल. यास्तव तुम्ही जमावानसी माहाडास जाणें. धण्याचे पुण्येकरून बाणकोटास अपाय न जाहाला तरी बरेच जाहले. नाहीं तेव्हां माहाडास गनीम खामखा येऊन अपायास प्रवर्तेल. तरी तुम्ही माहाडचा उपराला करून गनीमास तंबी पोहोचे आणि जाण्याचा जागा जतन होये ते गोष्टी करणें, म्हणोन सांगोन त्यांची रवानगी केली. ते घाटमाथां गेले. मागाहून आणखी हशम व स्वारांचा जमाव पाठवावयाची तरतूद करावयास लागलों इतकियांत छ १ शावानी हबशी व इंग्रेज येक होऊन आरमारच्या तोफखानेयाचा मार व खुशकीस दोन हजार माणूस उतरून चहूंकडून यालगार करून जागेयास अपाय केला, म्हणोन छ ३ शावानी पत्र आले. तेव्हां बाणकोटास तो अपाय जाहालाच ; परंतु माहाड जागा जाण्याचा शामल संजुंदा[1] व इंग्रेजाची मदत, येणेकरून हावभरी होऊन माहाडचे गळां येऊन पडल्यावरी दगा करील ; तेव्हा हे गोष्टी कांही कामाची नव्हे. याकरितां रामाजी माहादेव याजबरावर तीनशें माणूस पोंहचे व तीन साडेतीनशे राऊत देऊन माहाडच्या उपरालियास रा केलें. ते रातबिरात करून घांटाखाले गेले, तों माहाडीहून पदाजी कारके याचे पत्र रामाजी माहादेऊ यांस आले कीं, तुम्ही घाटाखाले आलेस हे वर्तमान आइकिले त्यावरून बहुत समाधान जाहाले. याउपरी तुम्ही येक घटिकेचा विलंब न करिता माहाडास येऊन पोहचणें. त्यावरून रातोरात हशमाचा जमाव छ ६ सावानी माहाडास जाऊन पोहचला. मागाहून राऊतहि गेले. येवढियांत स्वामीनी राजश्री पिलाजी जाधवराव यांस सेवकाकडेस पाठऊन फौजसहवर्तमान कोकणात सेवकाने जाऊन गनीमास तंबी पोहचवावी, यैसी आज्ञापत्री आज्ञा केली व मुख्यच जी ही स्वामीची आज्ञावचने मारनिलेनीं सांगितली त्यावरून स्वामीची आज्ञा ते शिरसा लक्षून

---

१ तयार.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

हशमाची तरतूद करविली व राऊतास जागजागा कागदपत्र पाठऊन राऊत आणावयाचा यत्न केला. खंडोजी माणकर याचे उपरालियास राऊत अगोधर दीडदोनशें तलाघोसाला प्रांती पाठविले होते ते व हशमाचा जमाव माणकराकडून माहाडचे उपरालियास आणविले तेहि छ ९ शाबानी माहाडास येऊन पोहूचलें. राजश्री पिलाजी जाधवराव यांस पुढें जावयास सांगितले. ते छ १० शाबानी नांदेडाहून स्वार होऊन येक मजल पुढे गेले. सेवकाने मुहूर्तेंकरून शनवारी डेरे बाहेर दिल्हे. हशमाचा व स्वाराचा जमाव जमा जाहाल्यावरी स्वामीचे आज्ञेप्रा गनीमास जर्ब पोहचवावी, यापेक्षां अधिकोतर काय आहे, हे जाणून तदनुसार उद्योगहि करणे तो करीतच आहो. यैशियास सांप्रत पदाजी कारके याची पत्रें माहाडाहून स्वामीचे सेवेसी आली, त्याजमधें त्याणी लिहिले आहे की, बाणकोट शामलानें घेतला, तेथील लोक पलोन आले. ते पुण्यास जाऊन सेवकाजवळ वर्तमान सांगितले कीं, माहाडच्या कोटांत लोक थोडे आहेत, ये समयी आपला जमाव पाठऊन माहाडचा कोट हस्तगत करावा. त्यावरून हशमाचा जमाव व राऊत सेवकानें पाठवून जागा हस्तगत करावयाचे केले होते. परंतु धण्याचे पुण्येंकरून आपण खबरदारीने जागा राखोन दुसरिया प्रवेश होऊ दिल्हा नाहीं, म्हणोन स्वामीचे सेवेसी लिहिले त्यावरून स्वामीच्या चितात कारकेयाच्या लिहिल्याप्रमाणे येथार्थ भासोन बहुतच विषण्णता आली. व सेवकाकडील हशम व राऊत उपरालियास गेले आहेत तेहि उठऊन नेणे, माहाडास काही प्रयोजन नाही, यैसी आज्ञा स्वामीनी चिरंजीव राजश्री नाना यांस केली. हें सविस्तर वृत सेवकास श्रवण होतांच जन्मप्रभृतिक सेवाधर्माची साफल्यताच समजलो. दिनप्रतिदिनी सेवाधर्मानुरूप सेवा करून स्वामीस संतोषी करावे व येणेकरूनच सेवक लोकाचें कल्याण ; यैसें असतां धण्याचे चितांत याप्रकारे येऊन ठसावले. अतएव हा सेवक लोकांचाच भाग्योदय. वस्तुता सेवकाचे पदरी सेवकपणाचे नाते असतां धण्याचे जागेयास आपण अपाय करून आपले यख्तियारात स्थल ठेवावे, धण्याची इतराजी कबूल करावी हे गोष्ट कशी अनुकूल पडेल ? वारिशीचे नातें जे धरितील ते कदाचित या कर्मास प्रवर्ततील तरी न कले. आम्ही सेवक ; संपूर्ण राज्यभाराचे यख्तियार स्वामीनी आम्हावरी दिल्हे असता यैशा गोष्टी आम्हापासून होतील आणि आमचा बेइतबार याप्रकारे स्वामीच्या चित्तांत ठसावेल, तेव्हा आम्हा सेवकापासून स्वामीसेवा काय होणें व महत्पदे स्वामीनी आम्हास सागितली आहेत ती काय निमित्य सांगावी ? कोकणचा मनसबा केल्यापासून सातआठ स्थले कोकणातील आमचे स्वाधीन जाहाली आहेत. त्याचे रखवालीस हशमाचा जमाव ठेऊ (न)दुसाल दरसाल च्यार लक्ष रुपयाचा खर्च आंगावरी भरितों. मुलकांत उपेद्र काय आहे ते स्वामीस विदित होतच असेल.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

तथापि स्वामीचा संतोश तेच गोष्ट सेवकलोकी करावी. यास्तव कर्ज घेऊन या भरीस घालीत गेलों. पाचसात वेळ विनंतीहि केली कीं आमचेच कांहीं वतन नाही. राज्यात आमचे प्रतीचे सेवक बहुत आहेत. हर कोणाचे स्वाधीन जागे स्वामीनी करावे. या खर्चामुळे आमचें घर बुडते. परंतु स्वामीनी सेवकाची विनंती न आइकिली. या जागेयामुळे सेवकास कोणता फायदा जाहला जे धण्याची बेमर्जी कबूल करून धण्याचा जागा माहाड बेकैदीनें आपले तालुक करून घ्यावा व लिहिणारांनी काय समजोन स्वामीचे सेवेसी ल्याहावे व विदित करणारानी विदित करावें ? स्वामीनी तो चित्तांत आणणें ते आणिलेच असेल की कोणा चाकराचा करीना काय आहे व कोणापासून कोणती गोष्ट होईल; तेथें दुसरियानीं सांगणें काय आहे ? परंतु दरयेक गोष्ट स्वामीचे सेवेसी विदित करितां करणारानीं समजोन विदित करावी कीं, आपले पदरी लटिकवाद न ये. यैसे असोंन लटिकपणाचे भय न धरितां विदित करितात. तस्मात प्रसंगोपात दरबारांत भलत्याने भलते बोलिल्यास चिंता नाही. हे बोलणार समजोन बोलत असतील तरी सुखेनैव समजोत व स्वामी ईश्वरस्वरूप आहेत. स्वामीच्या चित्तात ज्याची जसी वर्तणूक असेल तैसेच येईल. आमचाहि कृतसंकल्प हाच कीं, स्वामीच्या पायाविना आम्हास दुसरे दैवत नाही. हेच यथार्थ आहे, आणि तदनुरूप आम्ही वर्तणूक करीत आलो असोन अथवा पुढेंहि निष्टेने वर्तणूक करून; तरीच आमचे कल्याण होऊ. स्वामीचे पुण्यप्रतापें यशकीर्तीस पात्र जाहालो व पुढे होऊं. अन्यथा याजमागें ज्याही धण्याचे पायाजवळी अमर्यादा केल्या त्याचे परिणाम काय जाहाले आहेत व पुढे करितील त्यांचे काय होतील हें बरे ठावके आहे. तदनुरूप जे वर्तणूक होणे ते होते व होईल. प्रस्तुत महाडी हशमाचा जमाव व राऊत गेले आहेत, त्याचें प्रयोजन तेथे नाही, उठऊन नेणें, म्हणोन स्वामीनी चिरंजीव राजश्री नाना यास आज्ञा केली आहे त्यावरूनच उठऊन आणवावें. परंतु त्याचाहि शब्द स्वामी लाविंतील कीं गनीम जवळ असतां हशम व राऊत कसे उठऊन नेले ? लेहून पाठऊन मग न्यावे होते. यास्तव विनंती सेवेसी लिहिली असे. आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक करून. वरकड जागा धण्याचा गनीम दगा करील यास्तव स्वामीचे आज्ञे आगोधर उपरालियास हशम व राऊत रवाना केले. हे पोहचले नव्हते तों जागेयाची अवस्था काय जाहाली होती व स्वामीनी उपरालियास हुजुरून हशम व फौज रवाना केली, ते कोण कधी येऊन पोहचलें हें स्वामीनी मनास आणिल्यावरी अवघेच विदित होईल. आम्हाकडील उपराला आधी जाऊन पोहचला यैसे आम्ही म्हणावें तरी जागेयास दगा करावयाकरितां जलदीनें आम्ही हशम व राऊत पाठविले ऐसाच स्वामीचा निशा जाहाला आहे. तेथें आधीं जाऊन पोहचलें अथवा त्यामुळे जागेयाचा

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

आब राहिला यैसे म्हणावे हेच अनुचित. स्वामीच्या चितात जे गोष्टी आली असेल तेच यथार्थ. माहाडास गनीम येऊन येक दोन वेळ युध्य करून गनीमाचा पराभव केला. आपलेकडील लोक जखमी जाहाले. हबशी दोघे धरून आणिले म्हणोन माहाडाहून स्वामीचे शेवेसी लिंहिले आहे. हे तों लटिके नसेल. व हबशी दोघे धरून आणिले तेहि सेवेसी पाठविलेच असतील. परंतु येचविशी स्वामीनी तहकिकात करावयाची आज्ञा करावी कीं, युध्य कोठे जाहाले व कोण कोण होतो व जमाव किती होता, म्हणजे अवघेंच विदित होईल. इतकेहि सेवकाने ल्याहावे यैसे नाही. स्वामीचे सेवेसी लिहितात ते याप्रकारें लिहितात, आणि तेंच यथातथ्य स्वामीस भासोन सेवक बेइतबारी आणि लटिके लिहितील व सांगतील तेंच इतबारी यैसे होतें. यास्तव विस्तरेंकरून सेवेसी लिहिले असे. आमचे आचरण धण्याचे पायाजवळ जैसे असेल तैसेच आम्हास फल होईल. सर्वाविशी स्वामी सर्वज्ञ आहेत.

¶*Chimaji Appa describes in detail what services he has all along rendered in the campaign against the Siddi. The letter is addressed to Shahu at Satara.*

No. 129] [*6-12-1735*

पा छ ९ साबान.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामीचे सेवेसी.

विनंती. स्वामीनी राजश्री स्वामीच्या रिकीबदाराबराबर पत्रे राजश्री व राजश्री मंत्री व सुमंतास व आम्हास पाठविली ती काली छ २ साबानी मंदवारी त्रितीय प्रहरी राजश्रीपासी पावली. दरबारी राजश्री मंत्री व सुमंत होते तेव्हा रिकीब-दारानी लाखोटे नेऊन गुजरले. त्यावर आम्हास बोलाऊ पाठविले. आम्ही दरबारास जाऊ तो राजश्री मंत्री याणी आमचा व आपला लाखोटा फोडिला. त्यास त्याच्या पत्रात तो काही स्वामीनी लिहिले नाही. परंतु आमच्या पत्रात सेवट राऊत पाठऊ असे लिहिले होते. त्यावर आम्ही दरबारास गेलो. राजश्रीनी राजश्री मंत्री यासी पुसिले की, कागदात मजकूर काये आहे? त्यावर बावानी सागितले की, आपले पदरी नेहमी खर्च कोकणच्या किल्याचा आहे. यैसे असता गोवलकोटास राऊत मागावे यैसे नाही. तथापि महाराज म्हणतील तरी तल्या-घोसाल्याकडे शामलाचा शह राखावयासी राऊत पाठविले आहेत तेच पाठऊ यैसे लिहिले आहे. यैसे सांगितल्यावर राजश्री बोलिले की, मागती त्यास ल्याहावे

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

की, राऊत पाठवा यैसे ल्याहावे. मग ते कोठून तऱ्हि पाठऊन देऊत. त्यांच्या जिल्ह्याची चिंता आम्ही करावी यैसे नाही. आपला मामला राखू जाणतात. या उपर दुसरा विचार न करिता राऊत पाठवणे, यैसे ल्याहावे यैसे बोलिले. त्यावर गोविंदराऊ चिटणीस यासी राजश्री बोलिले की, आम्हास कागद काये लिहिला आहे तो वाचा. त्यावर मागती बोलिले की, खुलासा मजकूर असेल तो सांगा. त्यावर गोविंदराऊ याणी स्वामीच्या पत्राचा अर्थ संकलित सांगितला. वर्तमान यैकोन राजश्री बोलिले की, संपूर्ण राज्यभाराची इमारत तुम्हावरच आहे. सर्वविसी स्वामीस तुमचाच भरवसा आहे. जे स्वामीस अगत्य तेच तुम्ही कराल. ह्या राज्यातील सुभासुभ वोझे तुम्हावरच आहे. यैसे असता वारंवार लिहिता हेच अपूर्व आहे. तरी आता किमपि विलंब न करिता राऊत पाठविणे, म्हणून समाधानपूर्वक पत्र लेहून मागती दुसरे रिकिबदार रवाना करा म्हणून आज्ञा केली. त्यावरून पत्र लेहून मागती रिकिबदार स्वामीकडे रवाना केले. विदित जाहाले पाहिजे. सेवेसी श्रुत होये, हे विज्ञापना.

¶*Mahadaji Purandare to Chimaji, communicates discussions from the court of Shahu at Satara.*

No. 130] [*6-12-1735*

छ ५ साबान.

श्री

पुरवणी तीर्थरुप राजश्री आपा स्वामीचे सेवेसी.

विनंती. काली छ २ साबानी त्रितीय प्रहरी राजश्री स्वामीपासी राजश्री सुमंतानी वर्तमान सांगितले की, पहिले आम्ही नवाबास लिहिले होते जे कर्नालियासी हबशी आला आहे. किलेदाराने किला त्यास द्यावासा केला आहे. यैसियासी शामलाने किला घेतल्यास आम्हास त्यासी खटखट करावी लागेल. किला पातशाही आहे ; तर नवाबानी आपले लोक रवाना करावे आणि किल्यावरील हबशाच्या लोकास खाली घालवावे, किला आपल्या तालुकियांत राखावा, यैसे राजश्री प्रधानपंताच्या विचारे आम्ही लिहिले होते. त्याचे उत्तर आम्हा आजी आले की, कर्नालियासी लोक तीनसे माणूस येथून रवाना करविले आहे. परंतु मार्गी जाता लोकांचा निभाव होणार नाहीं. यास्तव तुम्ही आपले दस्तक एक नाईकवाडी पाठऊ (न) हे लोक तेथे पोहोचावणे म्हणजे हे जाऊन किला आपले जफ्तीत राखतील. त्यावर राजश्री आम्हास बोलिले की, येविसीचा काये विचार? त्यावर आम्ही उत्तर दिल्हे की, नवाबाचे लोक किल्यावर असिल्यास आम्हास

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

उतम. परंतु त्याणी शामलाकडील एक माणूस वर ठेवू नये, यैसे बोलिलो. राजश्री बोलिले की, नवाबाचे लोक येथे आणवावे. आम्ही येथून हुजरे व पत्रे देऊन किले मजकुरास पाऊ. त्यावर सुमंत बोलिले की, नवाबाचे लोक येथे आणवावे, यैसे काये आहे? राजश्री चिमाजी आपा यासी लेहून दस्तक व नाईक (वा) डी देऊन लोक किले मजकुरास पावावे. त्यावर राजश्री उतम म्हणोन बोलोन सदरहू प्रमाणे नवाबास पत्र ल्याहावयासी आज्ञा केली. विदित जाहले पाहिजे. सेवेसी श्रुत होये, हे विज्ञापना.

¶*Shahu orders Chimaji Appa that the Siddi should be prohibited from capturing the fort of Karnala 6 miles south of Panvel. Shahu is willing to allow the fort to remain in the possession of the Nizam.*

No. 131] [*6-12-1735*

श्री

सेवेसी विज्ञापना. आज्ञापत्र सादर जाहाले तेथे आज्ञा कीं, महाड काईम आहे. बाणकोट शामलानी घेतला आहे यामुळे त्यास वह(मा)निर्माण जाहाला आहे. त्यास सासन केल्याविना उत्तम नाहीं. तरी तुम्हीच जाऊन गेला जागा हस्तगत करावा. सरलस्करची फौज आणून पारघाटे रवाना केली. गोवलकोटची फौज आणविली. तुम्ही घाटाखाले कोणे दिवसी येता व फौजेने कोणे दिवसी यावे हा निश्चये कलला पाहिजे. तरी नियतात्मक लिहून पाठवणे, येसी आज्ञा. त्या(स) महाडचा उपराळा करून बाणकोट गेला हस्तगत करावा हे उतमच. त्यास माहाडास तो उपराला जलदीने पोहोचला, यामुळे त्या स्थलास अपाये नाहीं. बाणकोट घेतला परंतु जतन करवेना. जबरदस्ती पुन्हां घेतीलच यैसा विचार शामलानी चितांत आणून बाणकोट पाडावयास प्रारंभ केला हे वर्तमान आले आहे. महाराजासहि वर्तमान आलेच असेल. वस्तुता पाहाता शामलाच्याने मेली जागा बाणकोट राखवतच नाहीं. हशमाचा व स्वाराचा जमाव येथून गेलाच आहे व तिकडूनहि येईल. या सलाबतीने सिदि सात खुस्कीस राहात नाहीं. गलबतावरी चढून जाईल. फौजेची गाठ पडूं देतो यैसा अर्थ नाहीं. वरकड सेवकानी तो महाराजाचे आज्ञेप्रमाणे डेरा बाहेर केला आहे. पुढे आज्ञा होईल तैसी वर्तणूक करून.

¶*News-letter informing Chimaji of the Siddi's move in levelling the fort of Bankot.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 132] [*7-12-1735*

पैा छ ३ साबान.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी.

विनंती. बाणकोटकऱ्यानी च्यार जाहाजे घेतली व खंडोजी माणकर व माहाडीहून पदाजी कारके व पाचाडकरी ऐसे मतगड, दिवे, श्रीवर्धन, या माहालात स्वारीस गेले. त्यास ते पुढे गेल्यावर मागे डोंगराची खिंड कोठे आहे ते शामलाकडील लोकानी धरिली. परंतु पुढे काये वर्तमान जाहाले ते कलले नाही, यैसे वर्तमान येथे आले आहे. तरी बाणकोटकऱ्यानी जाहाजे कोणाची धरली, वर काये होते, जाहाजावरील लोक काये जाहाले, ते व खंडोजी माणकर याजकडील तप (सीलवार) वर्तमान स्वामीपासी आले असेल ते लिहिले पाहिजे. सेवेसी श्रुत होये, हे विज्ञापना.

¶*Mahadaji Purandare asks news from Chimaji Appa about the capture of ships by the garrison of Bankot.*

No. 133] [*7-12-1735*

छ ३ शाबान.

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री राऊ व राजश्री
आपा स्वामीचे सेवेसी.

विनंती उपरी. प्रतिनिधीनी च्यालीस हजार रुपये दिल्याने रायगड राखावासे कबूल केले. त्यावर आम्हास राजश्री बोलले की, याणी तो च्यालीस हजार रुपये घेऊन कबूल केले. तुम्हाकडील किल्याचे बेहबुदीस कितीक पैका लागेल? दीड हजार माणसास च्याळीस हजार रुपये घेतले. तुम्ही साहा हजार माणूस ठेविले आहे, यास काये मागतां? त्यावरी आम्ही याच हिशेबाप्रमाणे विनंती केली. परंतु पनाससाठीं हजार रुपयेपर्यंत आले आहेत. पर्यायेकडून आम्हीहि निशा करून घेतों. परंतु हे शाश्वतसे नाही. परिणामास काये जाईल ते पाहावे. दुसरी गोष्टी तुम्ही रुपये घेता आणि बेगमी करू म्हणता, तरी सारेच आमचे हवाली करा; आम्ही राखूं; वरघाटे बेगमीस जे मागूं ते सारे मिलोन द्या हेहि प्रतिनिधीचे पाठीमागे बोलले आहेत. आजितागाईत

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

रुपया आपला खर्च जाला त्याची वाट करा, नाहींतर मुलकात वसूल करून घेईन म्हणतात. सेवटास जाईल ते खरे. प्रतिनिधी तो आजी प्रस्थानी शाहुपुऱ्यापलीकडील माळावर डेऱ्यामध्ये गेले आहेत. एक दिवस तेथे राहणार. पवाराची वाट पाहतात. दाती बल धरून जात आहेत. तुम्ही कोणें दिवसी घाट उतराल, प्रधानानी कोणते दिवसी उतरावें, हे लेहून द्या म्हणून आम्ही राजश्री स्वामीजवळ व प्रतिनिधीजवळ बोललो; परंतु निश्चये जाला नाही. उदैक निश्च (य) जाहाल्यावर लेहून पाठविले जाईल. त्यावरी स्वामीनी उतरावयाचे करावे. उतावली न करावी. कृपा केली पाहिजे, हे विनंती.

¶*Purandare gives Bajirao and Chimaji news of the Pratinidhi's professions at the court of Shahu and advises them to guard their interests against the Pratinidhi.*

No. 134] [*7-12-1735*

पैा छ ४ साबान.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामी वडिलांचे सेवेसी.

विनंती. खुशमहमद याचें वर्तमान स्वामिनी लिहिलें व बाणकोटचे वर्तमान लिहून पत्रे पाठविली ती छमजकुरीं सायंकाली वेणेवरी पावली. यैशास खुशमहमद याचे वर्तमान बाणकोटकरी यानी महाडकरियास लिहिलें; महाडकरी यानी राजश्री स्वामीस लिहिलें, ते काली छ २ साबानी मंदवारी राजश्रीस वर्तमान कललें. त्यावरून राजश्री स्वामीनी सरखेलीस पत्र लेहून त्रिंबक विष्णु कलमदानबारदार टाकोटाक रवाना केला कीं, प्रस्तुत आम्ही वर्तमान आइकतो कीं, किले मंडणगड व विजयेगड शामलास देऊन सला करणार म्हणून आइकिलें; तरी हे कोण गोष्ट आहे? तुमच्या वडिलानी कितेक जागे नवे घेऊन एकनिष्टपणे चाकरी केली, त्यांचे पुत्र तुम्ही आहां. तुम्हापासून हे गोष्ट व्हावीसे काये आहे? तरी याउपरी तुम्ही दुसरा विचार चितांत न आणितां जाग्यांची बेहबुदी करून शाबूत राखणे आणि स्वामी संतोषी करून घेणे, यैसे लेहून पाठविलें आहे. स्वामीस विदित व्हावें याकरितां लिहिलें आहे. * सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

* येथून अक्षर निराळ्या वळणाचें.

¶*Balaji Bajirao writes to Chimaji Appa how Shahu had sent a severe warning to Sambhaji Angre against making any approaches of peace to Siddi.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 135] [*8-12-1735*

पौ छ ४ साबान.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी.

विनंती. आम्ही काली रविवारी आम्ही (?) साईकाली आलो, तो सा घटका दिवसास अगोधर प्रतापगडीहून कागद आला. तेथे वर्तमान की, सुक्रवारी, बाणकोट शामलाने घेतला आणि पाचतरीवर खासा सिदी सात आला. पुढे माहाडाच्याहि गला पडेल यैसे वर्तमान आले, त्यावरून राजश्री स्वामीनी राजश्री माहादोबास बोलाविले आणि सदरहू कागद दाखविले. त्यावर राजश्रीनी माहाडचे कुमकेस हुजरातपैकी तोफखाना तीनसे माणूस, जेजाल बारदार संभर, यैसे रातोरात पाठविले आणि येकांती राजश्री माहादोबाचे कानी राजश्री बोलिले की, हा कालपर्यंत राजश्री प्रधानपंताच्या स्थलास दगा जाला नाही. यैसे असता हे शोखी शामलाने केली. तरी आता (खा) सा राजश्री चिमाजी आपाने उतरावे. आम्हीहि कुमक करितो. हुजरात व आणिक फौज गोवल-कोटास पाठविणे तीहि त्याचेच कुमकेस देऊ. परंतु फिरोन शामलास प्रत्योपकार केल्याविना लौकिक राहात नाही, यैसे बोलिले. हा कारभार होत होता तोच आम्ही दरबारास आलो. राजदर्शन जाहले, तो हे वर्तमान कलले. त्यावर राजश्री स्वामी महादोबास बोलिले की, बाणकोट शामलाने घेतला व आपण सदरेस इतक्या इरेच्या गोष्टी बोलिलो, परंतु तुम्ही काहीच बोलिले नाहीस यावरून आम्हास बहुत अपूर्व वाटले. त्यावर महादोबानी उतर दिल्हे की, वरकडाचा कारभार महाराजापासी बोलावे फार आणि करावे थोडे; आणि आमच्या खावंदाचा दंडक, करावे फार आणि बोलावे थोडे, हे पहिल्यापासून महाराजास विदित आहे. तथापि बाणकोट जागा तो जबून[1]; परंतु शामलाने घेतला तर त्यास काही जिरो देतो यैसे नाही, यैसे बोलिले. त्यावर राजश्री स्वामी बोलिले की तुम्ही हे जाहले वर्तमान राजश्री चिमाजी आपा यासी लिहिणे आणि आम्ही काही बोलिलो हे न लिहिणे. ते आपले इरेनेच जे करणे ते करतील. जिवाचा सतका[2] माल व इजतीचा सतका जीव यैसे आहे. राजश्री चिमाजी उमदे मनुष्य आहेत. ते काही बाणकोटास गेल्याविना राहात नाही. वरकड परमुलकी तरवारा मारिल्या व लौकिक संपादिला तो कोणे पाहिला? परंतु शामलाने

---

१ जबून = दरिद्री, वाईट, अर्थात् कठीण. २ सतका = कुरवंडी, ओवाळणी.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

बाणकोट घेतला आहे हा घ्यावा यातच उतम लौकिक आहे. यैसे असताहि राजश्री चिमाजी खाले जावयासी अनमान करितील तेव्हां लौकिक यैसा होईल की, येक राजश्री बाजीराऊच हिमतीस मानुस, बरकड कोणी नाही, यैसे होईल. यास्तव जे होणे ते सुखे होऊ. परंतु खासा राजश्री चिमाजीने उतरावे यैसे आहे. यैसे राजश्री सदरेस बोलिले आणि सदरहूप्रमाणे त्याहावयासी आज्ञा केली आणि बोलिले की, केवल आम्ही बोलिलो यैसे न लिहिणे. तुम्हीच त्यास लिहिणे. त्यावरून हें पत्र लिहिले असे. साराउश राजश्रीच्या चितात की, स्वामीनी खासा बाणकोटास उतरावे यैसे आहे. राजश्रीनीहि आपले हुजरातीस व हशमास व राजश्री फतेसिंगबाबास आज्ञा केली की, तमाम लवकर जमाव होणे, यैसी केली. विदित जाहाले पाहिजे, हे विनंती.

¶*Letters to the Peshwa at Poona since the end of 1735 from Satara, began to be addressed in the name of young Balajirao, then only 13 years of age, although they were drafted by Mahadoba Purandare. This letter describes Shahu as greatly agitated over the advancing Siddi. He induces Chimaji Appa to take up the campaign and conduct it to success.*

No. 136] [पैा*10-12-1735*

छ ६ साबान

श्री

पुरवणी राजश्री राऊ व ता राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. राजश्री स्वामीनी आज्ञा केली की, तुम्ही खासा घाटावर राहणे, मातबर मनुश्य त्यासमागमे फौज देऊन रायेगडास पाठऊन द्यावी म्हणून आज्ञा केली आहे. त्याप्रमाणे स्वामीनी फौज रवाना करावी. आपण गडाच्या आश्रियाने खालते आगर राजगडच्या माचीस राहावे. विदित जाले पाहिजे. कृपा केली पाहिजे, ही विनंती.

¶*Shahu orders forces against Raygad.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 137] [पौ *10-12-1735*

पौ छ ६ साबान.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामी
वडिलांचे सेवेसी

विनंती. काल प्रतापगडावरून बाणकोटचे वर्तमान आलें होतें ते स्वामीकडे लेहून पाठविले होते. त्यावरी आजी कांगोरीहून बाणकोटचे वर्तमान आलें. त्या पत्राची नकल लेहून स्वामीकडे पाठविली आहे. दुसरें पत्र राजश्री पंतसचिव यांचे आलें. तेथें लिहिलें की, बाजी भिलारा याचा भाऊ बाणकोटी चाकर होता तो पडला. त्याचे कोणी सिपाई पलोन आले, त्याणी वर्तमान सांगितलें कीं, हरी गणेस यास जखमा लागल्या, ते शामलाकडे हस्तगत जाहाले, म्हणून पत्र आलें. कांगोरीचें पत्र व राजश्री पंतसचिव यांचे पत्राचा अर्थ राजश्री स्वामीनी आइकिला; त्यावरून राजश्री स्वामीनी राजश्री सुभेदारांस निरोप देऊन स्वामीकडे पाठविले आहेत. राजश्री स्वामीचें मानस पूर्ण आहे की, स्वामीनी खासा राजश्री सुभेदारांस समागमे घेऊन फौज हाशम घेऊन बाणकोटाकडे उतरावें. प्रस्तुत हबसियानें शोखी फार केली आहे. बहुत शेर जाला आहे. त्यास येक वेल नतिजा द्यावा म्हणजे उतम गोष्ट आहे. सारांष राजश्री स्वामी बोलिले की, राजश्री चिमाजी आपानी खासाच फौज घेऊन कोकणांत उतरावे, हबसियास नतिजा द्यावा, यात नांवनंग सर्व गोष्टी आहेत यैसे बोलिले. तरी स्वामीनी लक्ष प्रकारे उतरावें यैसी मर्जी राजश्रीची आहे. यांत जे स्वामीच्या विचारें होईल ते करावे. येथील सकल अर्थ राजश्री सुभेदार सांगतील त्यावरून विदित होईल. आपण तेथून स्वार जाले म्हणजे लेहून पाठवावें. स्वामीच्या कुमकेस तीन च्यार हजार फौज देखील गोवलकोटची व हशम तिकडेच पाठवितो, म्हणून राजश्री बोलिले आहेत. सेवेसी श्रुत होये, हे विज्ञापना.

¶*Shahu hearing that Bankot had fallen into the Sidi's hand, orders Chimaji Appa at once to lead a strong invasion against him.*

No. 138] [*12-12-1735*

पौा छ १२ साबान.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामीचें सेवेसी

विनंती. स्वामीनी छ ८ साबान सुक्रवार च्यार घटका रात्रीची पत्रें पाठविली तीं छ ९ मिनहूस सायेकालीं पावलीं. स्वामीनी लिहिलें कीं, जे क्षणी पत्रें पावतील तेच

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

क्षणी दरबारास जाऊन राजश्री स्वामीस दाखवणे म्हणून आज्ञा लिहिली. त्या-वरून पत्रें पावतांच घेऊन दरबारास गेलों. राजश्री स्वामीस दाखविलीं. परंतु त्यानी पुरतीं पाहिलीं नाहीं; मग मुखेकडून सांगितलें कीं, तीर्थरूप राजश्री आपा याहीं माहाडच्या उपरालियास (रा) माजी माहादेव याजबराबर पायेच्या लोकांचा जमाव देऊन पाठविलें ते दाखल जाले. प्रस्तुत कडू व धायेभर वगैरे पथकें च्यारसें राऊत रवाना केले आहेत तेहि घाटाखालीं गेले. आजी माहाडास दाखल होतील यैसे सांगितलें. त्यावरी राजश्री स्वामी बोलिले कीं, अद्यापि राऊत कोण्ही गेले नाहीं. राजश्री खंडोजी माणकराकडील मात्र दोनसे लोक माहाडास आले आहेत म्हणून वर्तमान आइकतों. इतकी बोली जाल्यावरी राजश्री स्वामी उठोन माहालांत गेले. आम्ही घरास आलों. त्यावरी राजश्री स्वामी भोजन करून माहालांतून बाहेर आले. तेव्हां राजश्री येसवंतराव पोतनीस माहाडच्या कार-क्याची पत्रें घेऊन आले. तीं येकांती राजश्रीस वाचून दाखविलीं. त्यात लिहिले आहे कीं, बाणकोट शामलाने घेतला, तेव्हां तेथील पले राजश्री चिमाजी आपाकडे गेले. त्यानी सांगितलें कीं, माहाडांत काहीं फार लोक नाहीं, मजबुदी नाहीं, अशांत महाड काईम करावयाचें आहे. त्यावरून राजश्री चिमाजी आपानी माहाड घ्यावयाचा विचार करून लोक पाठविले. ते येथें आले. त्यांची नजर पारकी देखोन आम्ही आपले जागां खबरदार जाहालों आणि त्या लोकांस सेडांवच्या डोहा-जवळ राहविले, यैसें वर्तमान आहे. तरी साहेबीं राऊत व पायेचे लोक आमच्या कुमकेस सत्वर पाठऊन द्यावे यैसें लिहिलें आहे. हें वर्तमान राजश्री स्वामीनी आइकोन परम विषमता चितात आणून राजश्री फतेसिंगबावाकडील सेंभर राऊत व मुधोजी नाा निंबाळकर याजकडील पनास राऊत व आणीक कितेक राऊत मिलोन तीन च्यारसें पाठवावे यैसा विचार करूं लागले. तेव्हां राजश्री भिकाजी प्रभु दरबारीं होते त्यांस माहाडाच्या पत्राचा अर्थ ते समई कलला नव्हता. राजश्री स्वामी राऊत पाठवावयाचा विचार करू लागले तेव्हां हे बोलिलें कीं, तिकडून राजश्री आपानी लोक व राऊत माहाडच्या उपराळ्यास पाठविले आहेत आणि हेहि गेले म्हणजे बरीच बलकटी होईल. त्यावरी राजश्री स्वामी बोलिले कीं, खंडोजी माणकर काहीं कुमकेस नाहीं आला; तो माहाड घ्यावयासच आला आहे. माहाडांत लोक आहेत त्यांसी काजिया करावा, त्यांस मारून बाहेर घालावें, आणि माहाड आपण हस्तगत करून राहावें यैसी दुर्बुधी धरून आला. परंतु माहाडातील लोक सावध जाहले. त्यानी खबरदारी केली म्हणून उतम गोष्टी जाहाली; नाहीं तरी तेथे काजिया जाहला असता. म्हणजे राजश्री चिमाजी आपांत व आम्हांत मोठासा पेंच पडता यैसें वर्तमान आहे. तरी

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

तुम्ही माहाडच्या लोकांस कागद व राजश्री चिमाजी आपास कागद पाठऊन ते लोक उठऊन घेऊन जाणे. तेथें राहावयास प्रयोजन नाहीं. आपला बाणकोट गेला म्हणून दुसरियाची जागा घ्यावी यैसे नाही. बाणकोट जाणे आणि तुम्ही जाणा. माहाडास यावयास प्रयोजन नाही, यैसे परिछिन्न बोलून माहाडचे लोक उठऊन लावावयाबद्दल भिकाजी प्रभूसच पाठवीत होते, परंतु तूर्त यांस राहविले. इतकें बोलिल्यावरी याणी उतर केले कीं, हे गोष्टी कसी होईल? आणि लिहिणारानी कसे लिहिले? त्यांचें पदरीं सात किले आहेत, त्यास बेजार जाले आहेत. कोणाचे स्वाधीन करीत असले तरी हे घटकेस सिध आहेत; यैसे असोन माहाड घेऊन काये करावे? अवघे जागे धन्याचे असोन लिहिणारानी लिहिले असेल तरी सुदें लिहूत. परंतु ही गोष्टी कल्पांतीं होणार नाहीं. त्यांवरी राजश्रीनी उत्तर केले कीं, आम्हीच लबाड बोलतों, लबाड लिहितों, आमचें बोलणे गलथ आहे, यैसे बोलिले. जालें वर्तमान लिहिलें आहे. तरी बाणकोट आपल्यापासून गेला आहे त्यासच जो येत्न करणे तो करून घेऊन धण्याचा धण्याच्या स्वाधीन करावा. माहाडच्या उपरालियास राऊत व लोक जे स्वामीनी पाठविले आहेत त्यांस आतिसत्वर पत्रें पाठऊन महाडाहून न्यावे. माहाडास कसे तऱ्ही होऊ लोक व राऊत पत्र पावतांच उठविले पाहिजेत. जालें वर्तमान कलावें याकरितां लिहिलें आहे. सदरहू प्रमाणे वर्तमान राजश्री नारबास श्रुत करून लिहिलें आहे. त्यानीहि सांगितलें कीं धण्यास जे गोष्टीनें विपर्यास वाटेल ती गोष्टी कशास करावी? महाडासी आपल्यास काये प्रयोजन आहे? बाणकोटाचा होईल येत्न तितका करून येक वेल घेऊन स्वाधीन करावा, यैसे बोलिले. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाति.

¶*The letter shows how confused Shahu had been over the whole situation at Bankot.*

No. 139] [*13-12-1735*

पा॥ छ ९ साबान.

श्री

पु॥ तीर्थरूप राजश्री आपा
स्वामी वडिलांचे सेवेसी

विनंती. राजश्री पिराजी सितोले याची बोली जाहाली नाही की काय ? बोली जाहाली असली तरी त्यास पाठविले पाहिजे व राजश्री दादोबासहि सत्वर पाठवणे. काल साईंकाली च्यार घटिका दिवस होता तेव्हा दरबारास गेलो होतो. तेव्हा

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

राजश्री बोलिले की, माहादोबास पाठविले, वाईट केले. याचा अर्थ जो मी लाहान, मजसांघाते बोलावयास कामास न ये. इतकियाकरिता ऐसे बोलिले; व काल माहाडचे कागद आलियावर राजश्रीनी माहाडकरी यासाठी रुपये १००० येक हजार व वस्त्रे पांघुरणे २०० दोनसे रुपयाची ऐसी पाठविणार. आज जातील. सेवेसी श्रृत होये, हे विनंती.

¶*The whole letter in Balaji's own hand, shows how he was getting into Shahu's favour.*

No. 140] [*6-12-1735*

नकल.

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रतिनिधी

स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक रुद्राजी कासी सां नमस्कार विनंती. ता छ २ साबान पावेतों वर्तमान येथास्थित असे विशेष. हबसियाने केलसी वेसवी जालिली. बाणकोटावर गलबतें आली म्हणून सेवेसी लिहिलें होतें; त्यास हालीं छ १ साबानी लगट करून बाणकोट घेतला. रा हरि गणेश सरदार राजश्री पंतप्रधान यांजकडील होते ते ठार पडिले. त्या समागमें वीस सरदार भले माणूस पडले. दोनतीनसें माणूस पडलें. तेथून हबसी निघोन आंबोतावर आला. आज उद्यां माहाडावर लगट होणार. आजचे रात्रीस माहाड घेईल यैसें वर्तमान जाहालें. याकरितां सेवेसी लिहिलें असे. विदित होये. माहाडचे मदतीस पांचसें स्वार येका दों रोजा पावले तर बरें, नाहींतर बुडलें. विदित होय, हे विज्ञापना.

¶*Rudraji Kashi informs the Pratinidhi of the details of the fight at Bankot.*

No. 141] [*December 1735*

श्री

पुा. राजश्री आपा गोसावी यांसी.

विनंती उपर. बाणकोटचे वर्तमान पूर्वी राजश्री माहादोबा याणी लि॥ होत; व हली रुद्रो कासी याचा कागद माहाडीहून राजश्री प्रतिनिधीस आला आहे, त्याची नकल राजश्री नाना याणी आपणाकडे पाठविली आहे, त्यावरून निवेदन होईल. सा [रां] श आपण घाटाखाले उतरावे आणि शत्रूस नतिजा द्यावा यैसे

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

राजश्रीचे मानस आहे. आपणास कलावे याजकरिता लि॥ आहे. सविस्तर भेटीनंतर निवेदन करून. विशष काये लिहिणे, कृपा केली पाहिजे, हे विनंती ?

मोर्तब
सुद.

¶*Shahu's orders to Chimaji Appa to proceed against the Siddi personally.*

No. 142] [*10-12-1735*

पैा छ ९ साबान.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामीचे सेवेसी.

विनंती. किले रायेगडकरी यांचे छ ४ साबानचे पत्र छ ६ साबानी राजश्री स्वामीस आलें त्यांत लिहिलें आहे कीं, शामलाने बाणकोट घेऊन पाडावयास लाविला आणि मंडणगडास वेढा घातला होता तोहि घेतला. वरील भेद होता त्यामुलें घेतला. आज उद्यां माहाडावरी येणार म्हणून लिहिले आहे. हें वर्तमान राजश्री स्वामीनी आईकिल्यावरी बोलिले कीं, हे वर्तमान काहीं तथ्ये नाही म्हणून बोलून बातमीस उतेकर पाठविले. विदित जाहाले पाहिजे. + सेवेसी श्रृत होये, हे विज्ञाप्ति.

+ अक्षर नानासाहेबाचें.

¶*Shahu inquires how far the news was correct that Bankot had fallen to the enemy.*

No. 143] [*11-12-1735*

पौ छ ७ साबान.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी.

विनंती. राजश्री स्वामिनी स्वामीस कोकणात जावयाविसी सागितले त्यावरून राजश्री नारबावास विचार पुसिला. त्याणी सागितले की, राजश्री आपानी खाली उतरणे. तेव्हा मातबर सामान पाहिजे व शामलास नतिजा द्यावा हे उतम. यैसियासी प्रस्तुत त्यापासी मातबर फौज नाही. यास्तव जे फौज व हशम आहे ते राजश्री पिलाजी जाधवराऊ याजबराबर देऊन पुढे रवाना करावे आणि खासा

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

आपानी नसरापूर वगैरे खेडेबारियानजीक राहावे. पुढे राजश्री स्वामी फौज कैसी रवाना करितात हे व विचारप्रसंग कैसा होतो तो पाहून खासा कोकणात उतरणे तर उतरावे. तूर्त उतावली न करावी, यैसे सांगितले. त्यावरून हे पत्र लिहिले असे. यात आपल्या विचारे होईल ते करावे. राजश्री स्वामीनी संताजी नाईक जासूद व दाहा जोडे जासूद यैसे आपणाकडे रवाना केले. आणि आज्ञा केली की, राजश्री चिमाजी आपा पुण्याहून कूच करितील ते व पुढे वर्तमान होईल ते त्याचे व तुमचे जासूद बराबर येथें घेऊन येत जाणे. यैसी आज्ञा करून पाठविले असेत. विदित जाहाले पाहिजे, हे विनंती. +

+ सबंध पत्र माहदाजी अंबाजीच्या हातचें असून "हे विनंती" हे शब्द नानासाहेबांच्या हातचे आहेत.

¶*Shahu consults as to the best way of leading an attack against the Siddi.*

No. 144] [*13-12-1735*

पा॥ छ ९ साबान.

श्री

पु॥ तीर्थरूप राजश्री आपा
स्वामी वडिलांचे सेवेसी.

विनंती. राजश्री स्वामी तो फारशा गोष्टी वाईट बोलतात. तरी कोट जो गेला आहे तो आपलाच गेला आहे व राजश्री स्वामीचाहि. स्वामीनी खालते उतरावे, या गोष्टीचा हेत फारसा आहे. तरी आपण अगत्यरूप आपण खालते उतरावे. सुचला अर्थ सेवेसी विदित व्हावा याजकरिता सेवेसी लिहिला आहे. माहाडकर जुझले. येकायेकीच बाणकोट गेला म्हणून फार खुशम (?) जाहाले आहेत. सेवेसी श्रुत होये, हे विज्ञापना.

+ पत्र नानासाहेबांचें.

¶*Balajirao writes how Shahu was getting restless about the campaign.*

No. 145] [*13-12-1735*

पैा॥ छ ९ साबान.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा
स्वामी वडिलांचे सेवेसी.

विनंती. राजश्री स्वामी बाणकोटचे वर्तमान बोलिले कीं, आमचा तिकडून हुजऱ्या आला त्याणे वर्तमान सांगितलें कीं, बाणकोट कांहीं जुंझला नाहीं. शामल

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

गलां पडिल्यावरी तमाम लोक पलाले. पंचवीस तीस माणूस मारले गेले. खासा आजारी होता त्यास जखमा लागल्या. तो शामलाकडे पाडाव जाहाला. ठार जाला नाहीं म्हणून बोलिले. विदित व्हावें याकरितां लिहिलें आहे. सेवेसी श्रुत होये, हे विनंती.

¶*Letter of Balajirao informs Chimaji the news of the fall of Bankot and of the garrison not having fought properly.*

No. 146] [*13-12-1735*

पैा छ ९ शाबान.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी.

विनंती. राजश्री शंभुसिंग जाधवराव याणी दोन हजार फौज ठेविली आहे म्हणून राजश्री स्वामीस वर्तमान कोणे सांगितलें आहे. त्यावरून राजश्रीच्या चितांत भर भरला आहे कीं, प्रस्तुत दोन हजार फौज मोजदाद तयार ये घटकेस त्याजवल आहे. त्यास फौजेसहवर्तमान आणून समाधान करावें. चालीस पनास हजार रुपये खर्चास द्यावे आणि कोकणचे मसलतीस पाठवावे. पुढे त्याचे जें ऊर्जित करणे तें करावें. यैसा विचार मंत्रीयासीं करून राजश्री देवराव मेघश्याम व मंत्रीयांकडील बहिरोबा यास पाठवून त्यास आणावें यैसा विचार केला आहे. पुढे होईल वर्तमान ते लेहून पाठऊं. + सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

+ येथून अक्षर नानासाहेबांचें

¶*Shahu is pleased to learn that Shambhusing Jadhao had collected two thousand troops for the campaign.*

No. 147] [*14-12-1735* (?)

पाा छ १२ साबान.

श्री

तीर्थरूप राजश्री आपा स्वामीचे सेवेसी. अपत्ये महादाजी अंबाजी कृतानेक सास्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान ताा छ १० साबान सोमवार मुकाम निंबगाव ताा पेडगाव येथास्थित असे विशेष. स्वामीनी पत्र पाठविले तेथे लिहिले

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

की "शामलाने बाणकोट पाडिला. माहाडी मजबुदी व्हावयाची ते जाहली. याउपर खासा आपण उतरावयाचे प्रयोजन आहे यैसे नाही. राजश्री स्वामीनी तो वरच्यावर पत्रांचा स्वेतें[1] लाविला आहे. येविसींचा विचार राजश्री सुमंतास पुसोन लिहिणे," म्हणून स्वामीनी लिहिले. त्यावरून राजश्री सुमंतास पुसिले. त्याणी सांगितले की, आता आपण खासा जावे यैसे प्रयोजन नाही. याउपर फौजहि आणिक पाठवावी यैसेहि नाही. राजश्रीचा आगृहच आहे तरी स्वामीनी बाहेर निघोन दोन तीन कोस पुढे जाऊन राहावे म्हणजे राजश्रीचाहि हुकूम प्रमाण केला यैसे होईल. बाणकोट पाडला असिला तरी आता काही जाऊन प्रयोजन आहे यैसे नाही. जुनरकर मोगलानेहि आपले ठाई गुरूरी[2] आणिली आहे. त्याच्या पारपत्यास स्वामीनी ये प्रांती असिल्याविना त्यास शह पडणार नाही यैसे सांगितले. व आमच्या विचारेहि हाच विचार आहे तरी स्वामीनी कोस दोन कोस राजश्रीच्या आगृहास्तव बाहेर निघोन राहावे; पुढे जसा विचार पडेल तसे करावे, यैसे आहे. यात स्वामीच्या विचारे होईल ते करावे. चाकणेजवल स्वामीची गढी आहे ती पाडावयासी नवाबानी हुकूम केला आहे. यास्तव सैदलस्करखान दोन हजार फौजेसहवर्तमान येतात. जुनरी दोनच्यार हजार फौज जमा जाहाली आहे म्हणून पेडगावचा किलेदार सादतखान याणे राजश्री सुमंतास सांगोन पाठविले. सैदलस्करखान व पेडगावकर हे दोघे मेहुणे आहेत. यास्तव शादतखान यासी तथ्य वर्तमान आले आहे. त्याणी येथे सांगोन पाठविले. यास्तव इकडीलहि शाहा राखोन जो विचार करणे तो करावा यैसे आहे. राजश्रीचे मानस जे, स्वामीस फौजसुधा कोकणप्रांते उतरावे म्हणजे वरकडहि फौजा उतरतील आणि गोवलकोटचे कार्य स्वामीच्या हाते करून घ्यावे यैसे आहे. हे च्यान्ही विचार ध्यानात आणून जे करणे ते करावे. सेवेसी श्रुत होये, हे विज्ञापना.

¶*Shahu is naturally keen on relieving the west coast by putting down the Siddi of Janjira, a task involving a sacred legacy left by the great Shivaji. There is also the mention of Sayad Lashkarkhan who figures from this time in the service of the Nizam who later confined him for several years for his complicity in the rebellion of Nasirjung. While thus imprisoned, Lashkarkhan employed his leisure in writing the famous history of the Mussalman Grandees* मासिरुल् उमरा. *Salabatjung appointed him his minister after the death of Ramdas pant. He died in 1757.*

---

१ स्वेत = निकड. २ जोर.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 148] [*14-12-1735*

पा छ १४ साबान. तालीक

श्री

महाराज छत्रपती स्वामीचे सेवेसी.

आज्ञाधारक पदाजी कारके मो कोट महाड सेवेसी विज्ञापना. छ १० माहे साबानपर्यंत कोट मजकूरचे व सेवकाचें वर्तमान महाराज स्वामीचे पुण्येप्रतापें करून हा कालपर्यंत येथास्थित असे विशष. महाराज स्वामीने हुजरून कुमक कोट मजकुरी रवाना केली ते छ ८ साबानी संध्याकालीं येऊन पावली. संताजी सिर्के हुजरे व खंडोजी खोंपडे दिा जेजालबारदार वगैरे २०० दोनसें माणूस येऊन कोट मजकुरी पावले व राजश्री पंतप्रधान याकडील राऊत रा चिमणाजी छ मारीं येऊन पावले असेत. शामल छ ९ साबानी बारा गलबते व हजार माणूस मौजे दासगावी माहाडापासून दीड कोसावर आला. त्यावर कोट मजकूरची भरती राखून खुद आपण व महाराज स्वामीचे हुजरे व कोटमारचे सरदार व लोक घेऊन शामलावर उपरालेयास गेलो. तेथें त्याचे व आपलें युद्ध दोन प्रहरपर्यंत जालें. शामलास ठेचगा देऊन खाडीभर वण केला. वीस माणूस जखमी ठार जालें. आपले तर्फेचे रा पंतप्रधानाकडील बाराजण जखमी जाले व येक ठार जाला. कोटमारापैकी अबदलाखान देसमूख पा कोंढवी याच्या पथकाचे दोन जखमी जाले. वरकड लोक माहाराज स्वामीचे पुण्यप्रतापें करून शामल माघारा मुरडोन लाविला आणि कोट मजकुरीं सुखरूप आलों. महाराज स्वामीचे पायांजवल आम्ही चाकर येकनिष्ठ असिलों तर आम्हास जये येईल हा निश्चये धरून माहाराज स्वामीचे पायांजवल येकनिष्ठपणे सेवा करीत असों. लोकांचे व सेवकाचे ऊर्जित करणार माहाराज स्वामी खावंद आहेत, हे विज्ञापना.

¶*The Siddi was repulsed at Dasgaum on 15th January 1733 by the garrison of Mahad and Khandoji Khopade.*

No. 149] [*15-12-1735*

पा छ १४ साबान.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामीचे सेवेसी विनंती. माहाडास स्वामीनी पांवलोक व राऊत पाठविले आहेत त्याचा अर्थ राजश्री स्वामी बोलिले होते तो मजकूर छ १० साबानी रविवारीं दोन प्रहर दिवसा लेहून पाठविला आहे. तीं पत्रें पावलीं असतील. यैशास छ ११ साबानी राजश्री दादोबा आलियावरी दर-

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

बारास गेलो. तेव्हां राजश्री येसवंतराव पोतनिसानी राजश्री स्वामीस वर्तमान सांगितलें कीं, साहेबीं येथून माहाडचे कुमकेस लोक पाठविले ते अद्यापि पावले नाहीं. त्यांतील येकजण पारचे मुक्कामीहून वाघाने नेला, त्याचें ठिकाण लागलें नाहीं म्हणून सांगितलें. त्यावरी राजश्री दादोबा बोलिले कीं, येथून माहाड किती आणि पुण्याहून किती? तेव्हां लोक बोलिले कीं, येथून माहाड सात गांवें आणि पुण्याहून नव दाहा गांवें आहे. त्यावरी राजश्री दादोबा बोलिले कीं, येथून लोक पाठविले त्यांस आठ दिवस जाले, अद्यापि पावले नाहीं आणि पुण्याहून पाठविले ते दुसरे दिवसीं टाकोटाक पावले. आम्हीं काहीं चाकरी केली कीं नाहीं? यैसें असोन माहाराजानी आमच्या लोकांविषीं आज्ञा केली आहे कीं, त्यानी माघारे जावें. तेथें राहावयास प्रयोजन नाहीं म्हणून बोलिले. त्यावर राजश्री स्वामी बोलिले कीं, लोक केवल उठऊन न्यावे यैसे आम्हीं बोलिलों नाहीं. कारके व खंडोजी माणकर पहिले तुम्हाकडे चाकर होते तेव्हांपासून कारक्यांत व माणकरांत पेंच पडिला आहे, त्यावरून खंडोजी माणकर माहाडास कजिया करावयाबद्दल आला आहे. त्यास ताकीद करून कारक्याच्या आज्ञेंत वर्ते ती गोष्ट करणें. कजियाच करूं लागला तरी काहीं कार्याचा नाहीं यैसें बोलिलें. ते दिवसीं तसें बोलिले, आजी असे उलटी घेऊन बोलिले; आणि आम्हास आज्ञा केली कीं, लोकांस व राउतांस लेहून पाठवणे कीं, तुम्ही माहाडास राहणे; तेथून आज्ञेविना येकंदर न जाणे म्हणून सांगितलें. त्यावरून चिमणाजी बापूजी व रामाजी माहादेव यांस पत्रें राहावयाचीं लेहून राजश्री येसवंतराव यांजपासीं देऊ. आपणहि त्यांस राहावयाची आज्ञा लेहून पाठविली पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञप्ति.

¶*Shahu adjusts differences between the different commanders.*

No. 150] [*15-12-1735*

पा छ १४ साबान.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामी वडिलांचे सेवेसी विनंती. आजी छ ११ साबानी इंदुवारी राजश्री दादोबा येथें आले. त्यावरी दरबारास गेलों. यांनी पांच रुपये नजर केली. राजश्री नारबावा व अवघे सरकारकून बसले होते. यैशास आम्ही जाऊन बसल्यावरी राजश्री स्वामीनी राजश्री दादोबास पुसिलें कीं, राजश्री चिमाजीआपाजवळ फौज किती आहे, जातांत कधी म्हणून विचारिलें. त्यावरी यानी उतर दिल्हें कीं, जाण्याच्या मजकुराचें पत्रच माहाराजांस आलें असेल. फौजहि थोडीबहुत असेल म्हणून सांगितलें. तेव्हां नाखूष जाले आणि

---

१ एक गाव म्हणजे चार कोस.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

फिराऊन बोलिले कीं, मिलमिलीत बोलतां, जातांत की नाही यैसे परिछिन्न सांगा. त्यावरी फिरोन यानी उतर केलें कीं, काहीं फौज कोकणांत गेली ती माहाडाच्या उपरालियास पावली आहे, काहीं त्यांजवल असेल यैसें बोलिले. आहे असेंहि नाहीं आणि नाहीं असेंहि नाहीं; मोघम गोष्ट बोलिले. राजश्री दादोबानी पांच रुपये नजर केली तेव्हां प्रथम नाखूशच बोलिले, उतम बोलिले नाहीं. + सेवेसी श्रुत होये हे विज्ञाति.

+ येथून अक्षर नानासाहेबाचें.

¶*Shahu suspects whether Chimaji Appa was in earnest about the fight.*

No. 151] [*15-12-1735*

पौ छ ११ साबान.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामी

वडिलांचे सेवेसी.

विनंती. माहाडचा मजकूर जाहलियावरी राजश्री येसवंतराव बोलिले कीं, हबसी कांहीं आपण होऊन बाणकोट घ्यावयाचे मुद्याने आला नव्हता. बाणकोटकरी यानी दोनच्यार गलबतें सजून जाऊन हबसियासीं आवाडाव करून दाणागला आणीत असत. त्यावरून सिदी सात बाणकोटकरियांस ठेचगा द्यावयास आला होता. केवल बाणकोट खामखा घ्यावा असा अर्थ नव्हता. परंतु यानी आव सोडिला, त्याणे घेतला, यैसें वर्तमान सिदी साताने माहाडकरी यांस लिहिलें होतें. तुम्ही आम्ही मुलकास कौल देऊन मुलुक + दउनीमे + णे निमे आम्ही घेऊं म्हणून लिहिले होतें. ते बोलिले, स्वामीस कलावें म्हणून लिहिले आहे. + सेवेसी श्रुत होये हे विज्ञाति.

+ अक्षर नानासाहेबाचें.

¶*Shahu heard the news that Bankot did not fight: it deserted to the enemy through perfidy.*

No. 152] [*17-12-1735*

पौ छ १५ साबान.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा

स्वामीचे सेवेसी.

विनंती. स्वामीनी राजश्री स्वामीच्या जासुदाबराबर पत्रे पाठविली छ १३ साबानी बुधवारी प्राथःकालीं राजश्री स्वामीस जासुदानीं प्रविष्ट केलीं. राजश्रीनी

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

आपला लाखोटा ठेऊन आमचा लाखोटा आम्हाकडे पाठविला. ऐशास तेव्हाच दरबार व्हावा तरी राजश्री हजामत करवीत होते यास्तव ना जाला. त्यावरी तृतीये प्रहरी राजश्री नारबावास व आम्हास बोलाऊन दरबारास नेले. त्यावरी राजश्रीनी आम्हास पुसिले की राजश्री चिमाजी आपानी तुम्हास कागद पाठविला आहे त्यांत काय लिहिले आहे? त्यावरी आम्ही बोलिलो की माहाडाजवळ हबसियाची स्वारी आली होती. त्याजवरी माहाराजांचे लोक व आमचे लोक चालोन जाऊन युद्धप्रसंग केला. शामलास नतिजा देऊन नामोहरम केला हें वर्तमान लिहिले आहे. व तिकडे लस्करास व लोकास दाणा गला व तंबाखू मिळत नाहीं. तरी साहेबी वाणी उदमी यांस ताकीद करून दाणा गला व तंबाखू वगैरे हर जिनस तिकडे घेऊन जात ते करावे, म्हणून लिहिले आहे. ऐसे बोलून स्वामीचे पत्र राजश्री मंत्री याजवल वाचावयास दिले. त्याणी वाचून दाखविले. त्यावरी राजश्री बोलले की राजश्री चिमाची आपा जातात की नाहीं हे सांगणे. त्यावरी राजश्रीचे जासूद स्वामीकडून आले. ते बोलिले कीं 'डेरा मात्र बाहेर उभा केला आहे परंतु जावयाची गडबड कांही दिसत नाहीं.' हें वर्तमान आइकोन उगेच राहिले. त्यावरी अवघियांस सदरेसच बसऊन आपण वाडियांत जाऊन फिरोन आले आणि स्वामीस व राजश्री पिलाजी जाधवराव यांस ऐसी दोन पत्रे लेहून आम्हाजवळ दिल्ही. आज्ञा केली कीं टाकोटाक पावती करून जाब आणवणे म्हणून सांगितले. त्यावरून दोन्ही लाखोटे स्वामीकडे पाठविले आहेत. त्यास जाधवरावाचा लाखोटा जाधवरावाकडे पावता करावा आणि त्यांचे उतर आणऊन पाठऊन द्यावे. परंतु प्रस्तुत दोन्ही लाखोटे पावतील तेच क्षणी स्वामीनी आपले उतर पाठऊन द्यावे आणि जाधवरायाचा लाखोटा आपणाजवळ पावला तो त्यांजकडे पाठविला आहे, उतर आणऊन पाठऊन देऊं म्हणून लेहावे. राजश्री स्वामीस एक पत्र व आम्हास एक पत्र सदरहुप्रमाणे पाठऊन द्यावे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Balajirao writes from Satara to Chimaji at Poona telling him how anxious Shahu was to know whether Chimaji was proceeding against the Siddi or not.*

No. 153] [*18-12-1735*

पौ छ १४ साबान.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामीचे शेवेसी.

विनंती. राजश्री स्वामी बोलिले कीं राजश्री चिमाजी आपा खामखा कोकणात उतरत आहेत, हा आमचा निशा पूर्ण आहे म्हणून बोलतात आणि स्वामी खोकरी

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

पावेतो मारीत जाऊन हबसियास बरा नतिजा देतील यांत संशय नाही, ऐसे मानस जाणून राजश्री देवजी सोमवंसी व राजश्री संभुसिंग जाधवराव यांस सत्वर बोलाविले आहे. वरकडहि किरकोळ फौजास ताकीद करून आणवीत आहेत. तरी स्वामीनी ये गोष्टीचा विचार पुरता करून राजश्री स्वामीस व राजश्री नारबा-वास पत्रें लेहून पाठवावी. विचारे जो परियाये निवेल तो लेहून पाठविला पाहिजे. आपले चितात जो विचार सुचला असेल तो वरचेवर लेहून पाठविला पाहिजे. राजश्रीच्या चितांत मनसबा असा आहे कीं स्वामीस कोंकणात उतरावें. हरेश्वरा-कडील व हबसियाचा मुलुक अगदी मारावा आणि अगदी फौजेसुधां गोवलकोटा-कडे जावें. तथापि स्वामी गोवलकोटाकडे जावयास अनमान करतील तरी तेथून राजश्री नारबावास पाठऊन स्वामीस गोवलकोटास पाठवावे असा विचार दिसतो. प्रस्तुत हा मनसबा बोलून दाखवीत नाही. स्वामी घाट उतरले म्हणजे उपक्रम करणार. स्वामीनी काये विचार तो अगोधरीच लेहून पाठवावा. फौजा कोणी अद्याप जमा जाल्या नाहीत तोंच काय विचार तो लेहून पाठविला पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Shahu's anxiety about Chimaji proceeding to Gowalkot.*

No. 154] [पो *18-12-1735*

पो छ १४ साबान

सनसीत.

श्री

राजश्री चिमाजीपंत आपा स्वामी गोसावी यासी.

श्री सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो पिलाजी जाधवराव दंडवत विनंती. येथील कुशल जाणून स्वकीयेलेखनआज्ञा केली पाहिजे. यानंतर आपले पत्र व राजश्री नानाच्या पत्राच्या नकला पाठविल्या त्या पावल्या. वर्तमान साकल्य कळले. ऐसियास जीव तोडून स्वामी कार्यावरी कस्त मेहनत करावी त्याचा फलादेश हाच आहे. त्यांनी भलत्याच च्यार गोष्टी विक-ल्याच्या लिहिल्या तरी त्याच आपणास खऱ्याच वाटतात. बरे धणी आहेत. प्रसंगासारिखे वर्तावें. महाडी जमाव आहे तो उठवावा म्हणऊन लि॥ हे उत्तम जालें. आपला जमाव महाडी आहे; त्यापैकीं मानगड व तळा घोसाळा याजकडील जमाव असेल तो तिकडे जावयास आज्ञा करावी व इकडे आणावयाचे असतील तर वरते आणावे, याउपरी तेथें ठेऊन सार्थक नाहीं. महाडी युध्यप्रसंग जाला.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

लोक जखमी जाले व मयतहि जाले. कस्त मेहनत केली त्याचा फलादेश चांगलाच जाला. याउपरी राजश्री स्वामीची पत्रे आलीं आणि जाबसाल देणे तो इतकाच द्यावा जे, महाडीहून जमाव उठवावयाची आज्ञा जाली, त्यावरून उठऊन पेण कर्नाळा या प्रांती गनिमाची धामधूम जाली, याजकरितां तिकडे कुमकेस पाठविले असे ल्याहावें. आम्हाकडे हुजरे आले तरी आम्हीहि कर्नाळ्याच्या उपराळियास गनीम आला आहे तिकडे धामधूम जाली आहे, तिकडे जातों ऐसें लेहून देऊं. काल मंगळवारीं राजश्री स्वामीचे आज्ञापत्र आम्हास उंटाविसी आलें. त्यावरून दोन उंट डेऱ्याचे होते तेच दिले. आणिक कांही लि॥ नव्हतें. उंटाकरितां आपल्याकडे राऊत येणार आहेत कळावें. विशेष काय लिहिणें? लोभ कीजे हे विनंती.

¶*Pilaji Jadhao's letter to Chimaji Appa complaining of his difficulties and desiring to proceed against the Siddi in the region of Karnala and Pen.*

No. 155] [पौ *18-12-1735*

पौ छ १४ साबान.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामी
वडिलांचे सेवेसी.

विनंती. राजश्री येसवंतराव पोतनीस आजी मंगळवारी प्रहर दिवसा येथे आम्हाकडे आले होते. त्यांनीं वर्तमान सांगितले कीं बाणकोटचे वर्तमान आपलेकडे आले आहे जे 'हबसी बाणकोट बांधत आहे. बकाजी माहाडीक याणे चौबुर्जी घातली आहे त्यास मेढा घालून खंदक खणून कातल काढून पाठीसी भर घालून मजबुदी करीत आहे' म्हणून सांगितले. तरी स्वामीनी दोघे माणसे विस्वासू पाठऊन तथ्य वर्तमान आणून लेहून पाठऊन द्यावें. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Letter from young Nana to Chimaji Appa, giving news and activities of Shahu at Satara.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 156] [पो *18-12-1735*

पौ छ १४ साबान.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी.

विनंती उपरी. पदाजी कारके यांचा कागद माहाडीहून आला त्याची नकल करून पाठविली आहे. त्यावरून विदित होईल. राजश्री श्रीपतराऊ प्रतिनिधी पुढे सावेलीस आले. सातारियास येणार म्हणून वर्तमान आले. राजश्री येमाजीपंत व माहादाजी घाटगे मागे ठेविले आहेत. राजश्री उदाजी चव्हाण याची समजावीस करून येतील. कलले पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Nana to Chimaji communicating news from Satara about Pratinidhi and Mahad.*

No. 157] [पो *18-12-1735*

पौ छ १४ साबान.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामी
वडिलांचे सेवेसी.

विनंती. स्वामीकडून राजश्री स्वामीचे रिकिबदार छ ११ साबानी सोमवारी प्राथःकालीं आले. त्यांनी जबानी राजश्री स्वामीस वर्तमान सांगितले कीं 'राजश्री चिमाजी आपा जवळ फौज दोन हजार व हशम दोन अडीच हजार आहे. पुण्याहून कूच करून खासाच महाडचे रोखे जाणार आहेत' म्हणून सांगितले. ते आइकोन, स्वामी खासाच जातात, म्हणून राजश्री स्वामी बहुत संतोषी आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Nana to Chimaji communicating how pleased Shahu was to learn of Chimaji's move against Mahad.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 158] [पो *18-12-1735*

पा छ १४ साबान.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामी
वडिलांचे सेवेसी

विनंती. महाडाहून रामाजी माहादेव व चिमणाजी बापूजी यांची पत्रें आलीं होतीं. त्यास जाब लेहून पाठविला आहे कीं 'राजश्री स्वामीची आज्ञा आहे तरी तुम्ही महाडच्या उपराल्यास राहाणे. तीर्थरूप राजश्री आपांचे उठून जावयाविसीं पत्र आलें तऱ्हीं येकायेकी न जाणे. दुसरीया पत्राची वाट पाहणे. तथापि गनीम आपल्या किल्याकोटाच्या गला पडिलाच तरी प्रसंगानुरूप जिकडे बनेल तिकडे उपराला करणे' म्हणून पत्रें पाठविलीं आहेत. स्वामीस कलावे म्हणून लिहिलें आहे. + सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

+ पत्र नानासाहेबांचें.

¶*Shahu orders succour for Chimaji in his move against Mahad.*

No. 159] [पो *19-12-1735*

पा छ १५ साबान.

श्री

पुरवणी. तीर्थरूप राजश्री आपा स्वामीचे सेवेसी विनंती. बाणकोट शामल पका बांधत आहे. बहुत मजबुधीचें काम करीत आहे म्हणून दरबारास वर्तमान लाहानथोराचे तोंडे आहे. आणि राजश्री स्वामीहि बोलतात. तरी स्वामीनी बरी चौकसीने खबर आणवावी. वरील काम पाडून खालतें बांधत असेल ते आइते समई येकदांच दिसों लागेल. मग काहीं शामल आटोपणार नाहीं. जरी बाणकोट बांधत असिला तरी अल्पांकुर आहे तोंच त्याचा विचार करावा. पुरती मजबुदी जालियावरी बहुत प्रेत्न लागेल. तेथें विस्वासू माणूस पाठऊन बरी चौकसीने बातमी आणून लेहून पाठविलें पाहिजे. येथे जें लोक बोलतांत तें आम्ही लिहितों. विदित जालें पाहिजे * सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

* येथून पुढील अक्षर निराळ्या वळणाचें.

¶*Nana communicates to Chimaji the news received at Satara of the Siddi strengthening the fort of Bankot.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 160] [पो *21-12-1735*

पा छ १७ साबान अस्तमान.

श्री

पु॥ तीर्थरूप राजश्री आपा स्वामी वडिलाचे सेवेसी विनंती ऊपरी. राजश्री स्वामी कोकणात जावयाविसी स्वामीस वरचेवर लिहितात. याचे उतर राजश्री स्वामीस ल्याहावे की आपणाजवळ भारी फौज नाही. दुसरियाचे भरवसियावर गेलियाने स्वामीकार्य होते ऐसे नाहीं. उगेच खालते जावे आणि कार्य न होता फिरोन यावे, या पर्याये जे स्वामीस सुचेल ते राजश्री स्वामीस ल्याहावे. आम्हासहि याच विषई येक पुरवणी ल्याहावी. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*Nana to Chimaji asking the latter how he was unable to proceed on the campaign without proper preparation.*

No. 161] [पो *21-12-1735*

पौ छ १७ साबान अस्तमान.

श्री

पु॥ तीर्थरूप राजश्री आपा स्वामी वडिलाचे सेवेसी विनंती उपरी. ह्या ज्या पुरवणिया लिहिल्या आहेत त्या राजश्री नारबावा मंत्री याचे विचारे लिहिल्या आहेत. उतरे सत्वर पाठविली पाहिजे. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

No. 162] [पो *21-12-1735*

पौ छ १७ साबान,

अस्तमानी.

श्री

पु॥ तीर्थरूप राजश्री आपा स्वामी वडिलाचे

सेवेसी.

विनंती उपरी. आज प्रातःकालीं राजश्री नारबावा मंत्री दरबारास गेल होत ते समई राजश्री स्वामी बोलिले कीं 'राजश्री देवजी सोमवसी, हिदुराव दोन अडीच हजार फौज घेऊन आले. त्यास त्यापैकी देखील पथके सरलस्करची फौज कोकणात उतरावी. वरकड फौजेस पोट भरावयास निरोप द्यावा. राजश्री सभाजी सरखेल सुवर्णदुर्गास आले. या उपरी राजश्री चिमाजीआपा याचा कोकणात

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

उतरावयाचा अनमान दिसतो. याजकरितां राजश्री आनंदराऊ पंडित सुमंत यास त्याजकडे पाठऊन द्यावे' इतके सांगून स्नानास गेले. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Shahu orders the Somvanshis to proceed to Konkan against the Siddi.*

No. 163] [पौ *21-12-1735*

पा छ १७ साबान,
अस्तमान.

श्री

पु॥ तीर्थरूप राजश्री आपा
स्वामी वडिलाचे सेवेसी विनंती उपरी.

राजश्री स्वामी आपणास लिहितील जे 'राजश्री पिलाजी जाधवराऊ यास पाठवणे' म्हणून पत्र लिहितील. त्याचे उतर राजश्री स्वामीस त्याहावे जे 'राजश्री संभाजी आंगरे सरखेल गोवलकोटास येतील तेव्हा राजश्री पिलाजी जाधवरायास पाठऊ.' या पर्यायाविषई जे राजश्रीस लिहिणे ते लिहिले पाहिजे. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*Nana keeps Chimaji informed of Shahu's inclinations.*

No. 164] [पौ *24-12-1735*

पौ छ २० साबान.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामी
वडिलांचे सेवेसी.

विनंती. बाणकोटचे वर्तमान येथे बहुत करून हबसी बांधून बळकटी करितो म्हणून आहे. सत्य मिथ्या न कळे. ऐशास बाणकोट बांधतच असिला तरी घ्यावयाचा विचार स्वामीनी काय केला आहे ? दिवसे दिवस मजबुदीच होत असेल. त्याचा येत्नाचा प्रसंग कसा काय केला आहे ? राजश्री पिलाजी जाधवराव यांस पाठऊन बाणकोट घ्यावयाचा विचार केला आहे, की आणिक कांही मनसब केला आहे ? कसाकाय विचार स्वामीनी केला असेल तो स्वामीनी लेहून पाठविले पाहिजे. येथून राजश्री स्वामीची पत्रे दिनप्रतीने तीन च्यार

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

स्वामीस गेली, त्याचें अद्यापि एक उतर स्वामीनी पाठविले नाहीं. राजश्री स्वामी सकाल संध्याकाल आम्हास नित्य पुसतात, 'उतर काय निमित्य येत नाहीं ?' तरी स्वामीनी अविलंबे उतरे पाठविली पाहिजेत. स्वामीस जो मनसबा सुचला असेल तो सविस्तर लेहून पाठविला पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*News of Bankot and of Shahu's Court communicated to Chimaji.*

No. 165] [*25-12-1735*

पौ छ २२ साबान.

श्री

तीर्थरूप राजश्री राऊ व ताा राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी.

आपत्ये मल्हार तुकदेव कृतानेक सांा नमस्कार विनंती उपरी. स्वामीच्या आशीर्वादेकरून ताा छ १९ जमादिलाखर शनवार संध्याकाळचा च्यार घटका दिवसपर्यंत कुशल असो विशेष. आजी त्रितीये प्रहरीं दरबारी कारभार जाला. गोवलकोटीहून वर्तमान आले की राजश्री संभाजी आंगरे सरखेल याजकडील मोर्चे उठोन गेले. त्यावरून राजश्री स्वामीच्या चितात बहुत एक प्रकारे भासले. खासाच स्वार होऊन जावे परंतु वाडियात दोन दिवसे बरे वाटत नाहीं, याकरितां आठ दिवस स्वारी तकूब जाली. आणि स्वामीस पत्र व राजश्री आनंदराऊ पंडित सुमंत यास पत्र व चिरंजीव राजश्री बाबास पत्रे लेहून आम्हाजवळ दिल्ही कीं 'पत्रे ती दिवसामध्ये पावती करून पाचवे दिवसी उतर आणून देणे. जरी राजश्री पिलाजी जाधवराऊ आले तर उत्तमच जाले. त्याचे येणे होत नाहीं तेव्हा खासा आम्ही व हुजरात कोकणांत जाऊन. आम्ही गेलियावर आमचे सेवक असतील ते आम्हा समागमे येतील' ऐसें बोलिलियावर राजश्री नारबावा मंत्री यांनी उतर दिल्हे कीं 'माहाराज बोलतात ते येथार्थच आहे.' तरी स्वामीनी पिलाजी जाधवराऊ यास पनासा राऊतानी पाठऊन द्यावे, म्हणजे स्वामीची जावयाची मोकळीक जाली. स्वामी ये गोष्टीस अनमान करितील तर राजश्री स्वामी कोकणामध्यें निश्चयरूप जातील. तेव्हां स्वामीस फौजेसहवर्तमान खासा यावे लागेल. आणि नेहमी मसलेत गला पडेल. हा विचार स्वामीनी पुरता ध्यानास आणून राजश्री पिलाजी जाधवराऊ यास पाठऊन द्यावे. स्वामी म्हणतील कीं त्यास नारू जाले आहेत, बरे वाटत नाहीं, तरी पालखीत बसोन सातारियास राजश्री स्वामीपासी राहतील. येथे आलियावर राजश्री सभाजी

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

आगरे सरखेल यास पत्रे पाठवितील कीं राजश्री पिलाजी जाधवराऊ सातारियास आले. त्यावरून माारनिलेस विश्वास येऊन जमावानसी गोवलकोटास येतील. राजश्री स्वामीचे कार्य होऊन संतोषी होतील. तरी स्वामीनी राजश्री पिलाजी जाधवराऊ यास पाठऊन द्यावें. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापाना.

¶*Shahu arranges about the relief of Gowalkot. Letter from Satara by Malhar Tukdev Purandare.*

No. 166] [पौ *26-12-1735*

पौ छ २२ साबान.

श्री

राजश्री आपा साहेबाचे सेवेसी.

सेवेसी विनंती. बाणकोटाहून काल एक ब्राम्हण ठिकाणाहून आला. त्याणे वर्तमान सांगितले कीं 'सिदी साद बाणकोटास आहे. बाणकोटातील कुली सामान दाणागलादेखील तोफा सारे आरमारावरी चढविले. जरोरा[1] राहिला आहे. फौजाचा जोरा जाहला तरी फौजा मंडणगडपर्यंत आल्या म्हणजे बाणकोट सोडून जाऊन कर्णालियाच्या खाडीस जाऊन किल्यास दाणागला पोहचवावा. वेढा आहे तो उधळावा' ऐसी बोली बाणकोटची आहे. ब्राम्हण ठिकाण सूध राजपुरीहून दिवे श्रीवर्धनावरून हरेश्वराकडून बाणकोटास आला. तेथून इकडे आला. त्याणे सांगितलें त्यावरून सेवेसी लिहिले असे. स्वामीनी कर्णालियाकडे लोक आहेत त्यास सावधतेची आज्ञा केली पाहिजे. राजश्री विठल सिवदेऊन काल राा खंडोजी माणकर याजकडे पोहचले. दुसरे वर्तमान भटानें सांगितले कीं बाणकोटाकडे फौज न गेली तर चौकीदाखल हबसियानें व आंगऱ्यानीं राखावा ऐसा करार जाला आहे. सविस्तर वृत राजश्री सरखेलीकडील निवेदन करावया दूत पाठविले आहेत त्यावरून विदित होईल. हे विनंती.

¶*News of Siddi Sat's movements near Bankot is communicated to Chimaji Appa.*

---

१ सडा.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 167] [पौ *29-12-1735*

पौ छ २९ साबान.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामी
वडिलांचे सेवेसी.

विनंती उपरी. राजश्री विसाजी राम राजश्री सरखेलीकडून येथे आले आहेत. त्यांसी राजश्री स्वामीनी बोली केली कीं 'सरखेलीस दर्शनास घेऊन यावें. येथें आलियावरी पंचवीस हजार रुपये खर्चास देऊं. नजरेस पैका व वस्त्रें देखील आपण देऊं. त्यास नजरेचे देखील संकट पडूं देणार नाहीं. राजश्री मानाजी आंगरे याचें सख्ये करून देऊं. हे वडील भाऊ ते धाकटे भाऊ ऐसें करून त्याचे याचे मनोदयानरूप एकत्रता करून देऊं. पंचवीस हजार रुपये गोवलकोटचे मसलतीस खर्चास देऊं. दर्शनांती रवानगी करून' बराबर सरलस्करची फौज द्यावी सरखेलीनें व सरलस्करानें गोवलकोट अंजनवेल घ्यावी ऐसा सिधांत करून विसाजीपंतास सरखेलीस आणावयास आजी रवाना केले जातील. सरखेल येत तोवर सरलस्कर व हिंदुराव फौजेसुधां येथेंच असावे ऐसे बोलिले. त्यावरी सुमंत बोलिले कीं इतके दिवस खर्च खात काय म्हणून त्यांनी बसावें ? त्यावरी राजश्री बोलिले कीं आजिच कोकणांत गेल्यास खर्च बहुत लागेल कीं येथे राहिल्यास बहुत लागेल ? कोकणांतील खर्चापेक्षां येथे राहिल्या काही तरी सरफेवार पडेल ऐसी बोली जाली. त्यावरोन दिसोन येते कीं सरखेल येत तोंवर यांचे राहणे येथेच जालें. प्रस्तुत जाले वर्तमान विदित व्हावे याकरितां लिहिलें आहे. पुढें होईल वर्तमान तें लेहून पाठऊं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*This and the following four letters are from young Balaji to Chimaji Appa, all detailing the consultations and plans going on at Shahu's court.*

No. 168] [पौ *29-12-1735*

पा छ २९ साबान.

श्री.

पुा तीर्थरूप राजश्री आपा स्वामी वडिलांचे सेवेसी विनंती. आज राजश्री आनंदराऊ सुमंत याचे घरास भोजनास गेलो होतो. ते समई त्यानी सांगितले जे, 'आपास पत्र लिहिणे जे.—कल्याणाकडे खबरदारी करवणे. सिदी साद दगेखोर आहे. कोणे समई काय करील ऐसा भरवसा येत नाही' म्हणून सांगितले, त्याजवरून सेवेसी लिहिले आहे. हे विज्ञापना.

¶*News of Shahu's court communicated to Chimaji.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 169] [पौ *29-12-1735*

पा छ २९ साबान.

श्री.

पुा तीर्थरूप राजश्री आपा स्वामी वडिलांचे सेवेसी विनंती. काल रामाजी माहादेव व चिमणाजी बापूजी यांची पत्रे आली, तेथे लिहिले आहे जे, 'रा संभाजी आंगरे सरखेल याचे व हबसियाचे सख्य होते' म्हणून लिहिले आहे. सेवेसी लिहिलेच असेल. स्वामीस कलावे म्हणून लिहिले असे. सारांश पाणकोट शामलाने वसवावा, बाणकोट आंगरीयाने वसवावा. परंतु चौकीदाखल लोक ठेवावे. घाटावरून फौजाचा जोरा जाहाला तरी बाणकोट शामलाने सोडून जावा. फौजा न आल्या तरी दोघानी राखावा ऐसा करारदाद जाहाला म्हणून लिंहिले आहे. त्यानी लिहिलेच असेल. विदित व्हावे म्हणून लिहिले असे हे विज्ञापना.

¶*News of negotiations of peace going on between Sambhaji Angre and the Siddi.*

No. 170] [पौ *31-12-1735*

पौ छ २७ साबान.

श्री.

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामी
वडिलांचे सेवेसी.

विनंती उपरी. रा. देवराव मेघशाम व बहिरोबा राजश्री संभुसिंग जाधवरायास आणावयास गेले आहेत. त्यांचे पत्र छ २३ साबानी आले. त्यांत लिहिले आहे कीं 'कबुलातीची फौज मुलुकगिरीस जावयास ठेविली आहे. त्यास मसलतीस जावयास बोलाविले तरी त्या फौजेस पैका रोख दिल्याविना कोकणचे मसलतीस जावयास येते ऐसे नाहीं. तरी तूर्त दाहा हजार रुपये रोख पाठवावे. व दीड लक्ष रुपयाचा सरंजाम द्यावासा कला आहे. त्याच्या सनदा सिध करवाव्या म्हणजे यांचा अनमान नाही. हे येतच आहेत.' ऐसे कितेक प्रकारें बहुत लिहिले आहे त्यावरून राजश्री स्वामीनी त्यांस व राजश्री संभुसिंग जाधवराव यांस लिहिलें की, 'हा समय पुन्हा येतो ऐसे नाहीं. तुम्ही खातीरजमा राखोन येणे. सरंजाम दिढालक्षाचा कबूल केला आहे तोहि देऊं. आणि ठिकाण सोडिल्याचें वर्तमान येईल, अलीकडे याल तेव्हां, पांचसात हजार रुपये तूर्त खर्चासहि पाठऊन देऊं.' ऐसे बहूत प्रकारे समाधानपूर्वक आपली पत्रे व राजश्री फत्तेसिंगबावाचे

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

पत्र व राजश्री सिवाजी पांडुरंग यांचे पत्र ऐसी पाठविली आणि बोलिले कीं येथे येऊन कोकणात उतरलेच तरी पनास हजार रुपये नक्त खर्चास द्यावे लागतील, म्हणून बोलिले. जाले वर्तमान कळावे याकरितां लिहिले आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*News of discussions at Shahu's court sent to Chimaji Appa by Nana.*

No. 171] [पौ *31-12-1735*

पा छ २७ सावान.

श्री

पुा तीर्थरूप राजश्री आपा स्वामी वडिलांचे सेवेसी विनंती. रा नारोजी कडू याजकडून माहाडाहून पत्र आले. तेथे वर्तमान लिहिले जे, 'सिदी साद च्यार गलबते व दोनतीनसे माणूस जरारे बाणकोटी ठेऊन आपण कर्णालियाकडे येऊन गला चढवावा. आवाई घातली आहे जे सुर्तेकडे जाणार' ऐसे वर्तमान मारानिलेनी सविस्तर लिहिले होते ते पत्रार्थ राजश्री स्वामीस विदित संकलित मात्र केला. त्यावर राजश्री बोलिले जे तुमची फौज कोकणात उतरवितो ती राबवावी याजकरिता ऐसे सांगता. त्यावर आम्ही बोलिलो जे. माहाडचे पत्रामध्ये वर्तमान लिहिले आहे जे ते विदित केले. हा विचार काही आपानी लिहिला नाही. मग बोलिले जे 'आपापासून तेथे पत्र जाऊन येथे लिहिले असेल' ऐसे उगच स्वामीसी विनोद करून बोलिले. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना. ये गोष्टीचा विपर्यास काही चितात न आणावा. सेवेसी श्रुत होय हे विनंती.

¶*News of Shahu's court communicated to Chimaji.*

No. 172] [*2-1-1736*

छ ४ रमजान.

श्री

पुरवणी राजश्री राऊ व ता राजश्री
आपा स्वामीचे सेवेसी.

विनंती उपरी. छ २९ सावानी प्राथःकालीं तीर्थरूप राजश्री तात्या व राजश्री नारबावा मंत्री व राजश्री आनंदराऊ पंडित सुमंत दरबारी असतां राजश्री स्वामीनी राजश्री अंताजी सिवदेऊ यास बोलाऊन आज्ञा केली कीं तुम्ही पाचाडी जाऊन

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

राहणें. हुजूरचे निसबतीनें त्यांनी मान्य केले. अगोधर मान्य केले नवते. मागती राजश्री पंतप्रतिनिधी व अंताजी सिवदेऊ यानी विचार करून राजश्री स्वामीकडे निरोप पाठऊन बोली खरी करून मान्य केले. विदित जाले पाहिजे. सोमवारी स्वार होऊन जाणार विदित जाले पाहिजे. सेवेसी विज्ञापना.

¶*Purandare writes to Bajirao and Chimaji that Shahu had ordered Antaji Shivdeo, brother of Yamaji Shivdeo (Pratinidhi's Mutalik) to take his post at Pachad near Raigad.*

No. 173] [*9-1-1736*

छ ९ रमजान.

श्री

पुरवणी राजश्री राऊ व ताा राजश्री आपा स्वामीचे सेवेसी.

विनंती उपरी छ ६ रमजानी संध्याकाळीं देवराऊ मेघशाम याचे पत्र राजश्री स्वामीस आले. त्याची नकल करून स्वामीकडे पाठविली आहे. त्यावरून सविस्तर वर्तमान कळो येईल. राजश्री कृष्णाजी पवार व उदाजी पवार यानी स्वारा समागमे पत्रे पाठविली ती छ ६ रोजी संध्याकाळीं प्रविष्ट जाली. त्याच्या नकला करून पाठविल्या आहेत त्यावरून कळो येईल. माारनिलेनी पंचवीस स्वार पाठविले त्यापैकीं दोघे सिपाई शहाणे बोलके दरबारास राा आपाजीपंत व नरसीपंत घेऊन आले होते. त्यास जबानी वर्तमान राजश्री स्वामीनी पुसिले. यांनी सांगितले कीं कुल लस्करांत हिमत बरी आहे. राजश्री बकाजी महाडीक जमावानसीं आले आहेत. त्याच्या मतें मुर्चे लाऊन महाड हस्तगत करावें. कार्य खायेनखाये होते. कितेक गोष्टी पवाराच्या सांगितल्या. त्यावरून राजश्री स्वामी संतोषी होऊन कुल सरदारांस आज्ञापत्रे पाठविली की माहाडास मुर्चे लाऊन हस्तगत करणे. पाचाडीहून तोफा आणून मोर्चे लावणे म्हणून पत्रे पाठविली. राजश्री येमाजी सिवदेऊ यास पत्र पाठविले कीं पाच उची भाडी देणे. स्वामीस वर्तमान कळावे याकरितां लिहिले. राा अंताजी सिवदेऊ पाचाडास जाणार होते. परंतु अद्याप त्याची रवानगी जाली नाहीं. बहुधा त्याचे जाणे होता दिसत नाहीं. विदित जाले पाहिजे. सातारियास फौज दीड दोन हजार स्वार जमा जाले आहेत. बारा पंधरासे मावळे लोक नवे चाकर

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ठेविले आहेत. दो चौ दिवसांनी त्यांची रवानगी गोवळकोट अंजनवेलीकडे रवाना करावी ऐसी तजवीज आहे. त्यामध्ये राजश्री बावामंत्री यांचा यावयाचा मार्ग पाहत आहेत. विदित जाले पाहिजे, सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Letter to Bajirao and Chimaji Appa from Shahu's court, dealing with the suggestion of Bakaji Mahadik to reduce Mahad with guns.*

No. 174] [*21-2-1736*

पौ छ २२ सवाल.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामीचे सेवेसी.

विनंती उपरी. छ १९ सवालीं मदवारी प्रातःकालीं राजश्री जिऊबा व गोविंदराव व भास्कर वैद व आणीकहि दाहापाच जण छोटेखानी दरबारी होते. राजश्री प्रतिनिधी व मंत्री हे नव्हते. आम्हीही नव्हतों. तेव्हा दरबारी चर्चेवरून चर्चा राजश्री भास्कर वैद्यानी चालविली कीं सरखेलीनी महाराजांस जिनस पाठविला आहे तो घ्यावा. माघारा दिल्हा न पाहिजे. तेव्हा राजश्री स्वामीनी त्यास झिडकाविले. आम्हास कांही नलगे. ज्यास पाहिजेसारखा असेल त्याणे विकावा. अगर भलते करावे. आम्हास नलगे. त्यावरी भास्कर वैद्यानी कांहीं सरखेलीची स्तुती आरंभिली. बोलिले कीं तो साहेबकामावर एकनिष्ट आहे. असे बोलतात की गोवलकोट आहे काय? राजश्री पिलाजी जाधवराव दोन हजार फौजेनसी गोवलकोटास आलियावर ते कार्ये लक्षप्रकारे होईल. आपणहि साहेबचाकरीस चुकणार नाहीं म्हणून सरखेल बोलतात, ऐसे भास्कर वैद्य बोलिले. त्यावरून राजश्री स्वामी बोलिले कीं पिलाजी जाधवरायास हुजूर तूर्त यावयाची आज्ञा करावी. ऐसे बोलून दस्तकाचे पत्र लेहून राघोबा राजिवडा कलमदानबारदार यास राजश्री सुभेदारास आणावयास पाठविले. स्वामीस कळावे याकरितां लिहिले आहे. विदित जाले पाहिजे. स्वामीपासून राजश्री जाधवरायास पत्र लेहून घेतले होते तेहि राघोबा राजिवड्याबराबर पाठविले. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Letter containing news of the events at Shahu's court conveyed by Purandare to Chimaji Appa.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 175] [*30-3-1736*

पैा छ २९ मोहरम.

श्री

राजश्री पंतप्रधान गोसावी
यांसी.

ऽ श्रीमत् सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलकृत राजमान्य श्रीो पिलाजी जाधवराऊ कृतानेक दंडवत विनंती. येथील क्षेम ताा छ २७ जिलकाद जाणोन स्वकुशललेखनार्थ आज्ञा करीत आसिले पाहिजे विशेष. सांप्रत काही दिवस स्वामीकडील वृत कळो येत नव्हते. त्यास आपली पत्रे राणाजीचे भेटीनंतर राजश्री आपास आली. त्यावरून साकल्य वृतांत कळोन बहुत समाधान जाले. आम्हाकडील वर्तमान तरी आम्ही आपली आज्ञा घेऊन माघारे आलियानंतर सातारियास येऊन राजश्री स्वामीचे दर्शन घेतले. तदोतर येक मास संन्निधच होतो. त्यानंतर बाणकोटास शामलाने आघात केला, हे वर्तमान राजश्री स्वामीसन्निध आलियाउपर आम्हास तळघाटे उतरावे यैसी आज्ञा करून पुणियास रवाना केले. आज्ञेप्रमाणे राजश्री आपाचा निरोप घेऊ [न] कोकणांत स्वार होऊन जाऊन बाणकोट शामलाने घेतला होता तो पुनरोक्त त्याजपासून हस्तगत करून माहाड व किले रायगडच्या उपरालियास्तव गोरेगाव तपियांत[1] मुकाम करून दोन मासपर्यंत राहिलो आसता राजश्री स्वामी याणी पुनरोक्त हुजूर दर्शनास बलाविले. त्यावरून आज्ञेप्रमाणे येऊन राजदर्शन घेतले. राजश्री आपासहि दर्शनास यावयाची आज्ञा केली. त्यावरून सातारियास येऊन त्याणीहि राजदर्शन जाले. दर्शनांती आम्हास फौजसहवर्तमान गोवलकोटच्या मोर्चियास रवाना करावे येसी आज्ञा केली. त्यास मोर्चियास तरतुदेचा विचार तरी येथे सामान जे आहे ते विदितच आहे. (आ) णि पुढे पर्जन्यकाल समीप. पुढे राजश्री राऊ आलियानंतर जे आज्ञा कर्तव्य ते करावी. विनास्वामीकार्य ये समई सेवक लोकाचा आब घ्यावा यैसे नाही, म्हणौन राजश्री आपानी बहुतसी विनंती केली. परंतु खावंदाची मरजी दुराग्रहाची देखिली. आपणहि त्या प्रांते गेलेत यास्तव येथील मरजीनुरूप राजश्री आपानी दोन मास मोर्चियास पाठवावे यैसे मान्य केले. वैशाख शु ७ सप्तमीस सुमुहूर्त करून जाऊन. स्वामीचे पुण्येकरून नक्षच होईल. राजश्री बाजिराऊ याची फौज आपल्या सन्निधच

---

१ तपे – तालुक्याचा भाग.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आलियास चिरंजीव आपा आहेत. त्याचा परामर्ष करणार स्वामी आहेत. आम्ही ल्याहावे यैसे नाही. परंतु सूचनार्थ लि॥ आसे. वरकड येथील दरबारचा व घरचा सविस्तर वृतांत राजश्री आपानी आपणास लि॥ आहे त्यावरून साकल्य निवेदन होईल. आपणाकडीलहि साकल्य कुशलार्थ येणा (रे) वार्तिकासमागमे लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष काये लिहिणे? कृपा केली पाहिजे हे विनती.

* अस्पष्ट.

[मोर्तबचा अस्पष्ट शिक्का].

¶*Pilaji Jadhav's letter to Bajirao informing him how Shahu was intent on the Janjira expedition.*

No. 176] [*13-4-1736*

श्री

राजश्री पिलाजी जाधवराव गोसावी यासी.

ऽ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेा बाजीराव बलाळ प्रधान आशीर्वाद. सु॥ सीत सलासीन मया अलफ. तुम्हास कोकणात राजश्री स्वामीनी रवाना केलियाचे वृत चिरंजीव राजश्री आपा यानी लिहिले त्याजवरून सविस्तर कळलें. तुम्ही विचारे करून खटबट करणे ते करालच. येथील मनसुबियाचा विचार चिरंजीवास लिहिला आहे. तुम्हास लिहितील त्याजवरून कलेल. तुम्ही तिकडील वर्तमान लिहित जाणे. जाणिजे छ १२ जिल्हेज. बहुत काय लिहिणे.

लेखन सीमा.

¶*Bajirao to Pilaji Jadhao, asking him to act in concert with Chimaji Appa.*

---

* पिलाजीचा अस्पष्ट शिक्का, जोडगिरीवर पाठीमागे मोर्तब.

१ वार्तिक = जासूद. २ खटपट.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 177] [*April 1736*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री अपा स्वामीचे सेवेसी.

विनंती उपरी. 'राजश्री स्वामीची आज्ञेवरून, स्वामीची स्वारी कुलाबा प्रांतास जाहाली. सिदि सात व सिदि याकूब व कृष्णाजी घाटगा व सुभानजी घाटगा, कोडा परवरी, तेरासे माणूस याचे कंदन करून भूमंडलास सुखी करून मोठा कीर्तिघोष करून येष घेतले. या उपरी आस्टमी प्रांती स्वारी जाहाली आहे' म्हणून वर्तमान यैकिले. त्यास कोणा मनसबेयावरी स्वारी जाहाली ते स्वामी जाणत. परंतु विचार्यमाणें पाहाता आजी पाऊसालाचे दिवस समीप आले. कोकण प्रांतीचा पाऊस सर्वास ठाऊक आहे. यैसियामध्यें त्या प्रांती कोणाची मसलतेन पुढें जावे यैसा अर्थ नाहीं. राजश्री पिलाजी जाधवराव गोवलकोटास रवाना करितां जो विचार केला असेल तो केलाच (असेल.) त्याप्रमाणें ते वर्ततील. इतकेहि असोन पुढें कांहीं कार्यसूचक अंतर-भाव-गर्भ हाती लागला आसिला तरी सुखी कार्यसिद्धीते पावो. यामध्यें स्वामी श्रीकांत-स्वरूप आहेत. तेथें सेवकाची बुद्धि कांहीं कार्यास यावी यैसा अर्थ नाहीं. क्षमा केली पाहिजे. बहुत काय लिहिणे. कृपा लोभ असो दीजे हे विनंती. मुलकांत बाकी राहिली त्याची ताकीद आज्ञेप्रमाणें केली आहे. वसूल होऊन येईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति. *

¶*Chimaji Appa is congratulated by the writer on the fall of Siddi Sat and his associates on 19th April 1736.*

No. 178] [*17-4-1736*

श्री

राजश्री चिमाजीपंत आपा गोसावी यांसी.

ऽ श्रीसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंती. येथील क्षेम ताा छ १६ जिल्हेज मु॥ नजीक कसबे चिपुळण जाणोन स्वकीय कुशल लेखनाज्ञा करीत असिले पाहिजे विशेष. आपण छ १२ मिनहूचे पत्र पाठविलें तें छ मजकुरी प्रविष्ट होऊन लि॥ वर्तमान कळो आलें. राजश्री मानाजी आंगरे याजकडील पत्रें छ १? रोजीं आपणास आलीं. त्यानीं लि॥ होते कीं "शामलाचा व आमचा दाखला होऊन युद्धप्रसंग बहुत जाला. परंतु शामलानें जबरदस्तीनें रेवसेची गढी कबज करून पुढें दिवसंदिवस

---

* हें पत्र प. नं. १८४ चें आधीं वाचावें. चुकीनें अगाऊ छापले गेले आहे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

बळावत चालला आहे व पुढेहि उपद्व्याप करावा ऐसे त्याचे मानस आहे. याजकरितां कुमकेस हशम व जमाव ऐसा लौकर येऊन पावे ते करावे म्हणोन मार निलेनी लि॥, त्यावरून हे वर्तमान आपण राजश्री स्वामीस निवेदन करून आपला कुलाबियास जावयाचा निरोप घेतला आणि आजी प्रातःकाळीं सातारियाहून स्वार होऊन गेलो म्हणून लि॥. पुढें घाटमाथियास जाऊन घाटमाथाहून राजश्री चिमणाजी भिवराऊ जामखेडाहून फौजसहवर्तमान आले. त्याची रवानगी कुलाबियास करून पुढें जैसा विचार होईल त्याप्रमाणें तरतूद केली जाईल." म्हणोन लि॥ ऐसियास शामलाची गुंज तेथे बलाविलियानें कार्याची नाहीं. आपण येथून घाटमाथियास गेलियानंतर जमावाची रवानगी करतील. आणि तेहि जैसे कळल तैसे साहित्य करून तेथून गुंज उखले तो अर्थ केला पाहिजे. वरकड येथील सविस्तर वृत्तांत तो पुर्वी संताजी म्हसके खासबारदार याजसमागमें लि॥ आहे त्यावरून विदित होईल. विशेष काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंती. सारांश शामलाचा उत्कर्ष विशेषच जाला आहे. त्यास आपण घाटमाथा गेलियानंतर फौज व हशम रवाना करतील. आपले पुण्ये करून त्यास शाशन होऊन नक्षच होईल. परंतु आपण खासा खालते उतरावयाचा विचार केला न पाहिजे. पुढें तेथील विचारानुरूप जो विचारकर्तव्य तो केला पाहिजे. आपण न जातां भ्रम राहूनच कार्य होय तो अर्थ केला पाहिजे. विशेष काय लिहिणे हे विनंती.

शिका जाधवाचा

मोर्तब सुद.

¶*Pilaji Jadhao writes to Chimaji Appa that he has been appointed by Shahu to lead succour to the fighting forces in the campaign.*

No. 179] [*22-4-1736*

श्री.

राजश्री ————————

ऽ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो चिमणाजी बलाळ आशीर्वाद सु॥ सीत सलासीन मया अलफ. शामलाने आरमार व तीन च्यार हजार लोक घेऊन येऊन गढी रेवस घेतली व मुलकांतहि उपद्रव करू लागला हे वर्तमान साताऱ्याच्या मुकामी विदित जाले. त्यावरून खासा स्वारी जाली. चऱ्हे नजीक कुलाबा येथे पांच मजलीनी येऊन मुकाम केला. छ १८ जिल्हेजी शामल सिधीसाद वगैरे सरदार जमावानसी खुसकीस आले. त्यासी गाठ पडोन

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

जूझ बारेनिव्या तोडें [बरे नीट या] तोंडे तीन प्रहर जाले. सिदी साद वगैरे सरदार ठार पडले. दीड हजार माणूस शामलाचे पडले. हे तपसिले वर्तमान राजश्री भिवराव याच्या पत्री लिहिले आहे त्यावरून कळेल. जाणिजे छ २१ जिल्हेज.

¶*A circular letter addressed by Chimaji to principal Maratha Sardars communicating the news of Siddi Sat's fall.*

No. 180] [*23-4-1736*

छ २९ जिल्हेज.

श्री

राजश्री चिमाजीपंत आपा गोसावी यांसी.

ऽ श्रीसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंती. येथील क्षेम ता छ २२ जिल्हेज मुकाम धामणी जाणून स्वकीये लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. सांप्रत आपणाकडील पत्रें येऊन कुशल वृत कळत नाहीं तरी सविस्तर वृत लेखन केले पाहिजे. रेवसाकडे फौज हाशम रवाना केले होते, ऐशास तिकडील काय विचार आहे तो लिहिला (पा)हिजे. आम्ही काल छ २१ मिनहूस आबडसेहून कूच करून धामणीच्या मोर्च्यामागें मुकाम केला आहे. छावणी करणे लागती. घरें बांधावी दाणागला घ्यावा लागेल. याजकरितां नेहमी जागा येथें धरिला आहे. घरें बांधावयासी आरंभ केला आहे. आम्ही हेगैखाली घालून त्यांचा मार्ग लक्षिला आणि ते विल्हे करून आले तरी घरे कोपटे जाली पाहिजेत. याजकरितां नेहमीच छावणीच्या जागा मुकाम केला. कळले पाहिजे. प्रजन्यकाळ समीप आला. दाणागला घेऊन बेगमी केली पाहिजे. ऊष्ण काळ आहे तों दाणागला येईल तेवढाच. पुढें प्रजन्यकाळीं दाणा मिळणार नाहीं. तरी आपण वाणीउदमियांकरवी पांच सातशें बैलाचा पठारा येथें पोहचे ते करावें. प्रजन्य काळीं येथें लोक येतील त्यासहि दाणा गला पाहिजे; तरी येविसीचा विचार कर्तव्य तो केला पाहिजे. काळोस्तियाचा मोर्चा अद्यापि हुजरातीचा कायम जाला नाहीं. होईल तव्हां खरा. आपले मोर्चेयास जजाला असिल्या पाहिजेत तरी आपले (ज)जालदार बार व दाहा जजाला ऐशा पाठविल्या पाहिजेत. बेलदाराविसीं व सुताराविसीं व लोहाराच्या दुकानाविसीं आपणास पेशजी लिहिले होते परंतु अद्यापि दुकान आले नाहीं. व सुतार बेलदारही आले नाहींत. तरी बेलदार सुतार व लोहाराचे एक दुकान ऐसे अविलंबे येथे पोहचे ते केले पाहिजे. ऐवजाविसीं व कापडाविसीं

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

पेशजी लिहिले होतें त्यावरून रवानगी केलीच असेल. रवानगी जाली नसिली तरी ऐवज व कापड सत्वर पोहचे ते केले पाहिजे. विशेष काय लिहिणे? कृपा केली पाहिजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶Pilaji Jadhao writes to Chimaji Appa asking for provisions and other necessaries for the monsoon campaign of Gowalkot.

No. 181] *[25-4-1736*

पौ छ २८ जिल्हेज मुा कुलाबा.

श्री

राजश्री चिमाजीपंत आपा गोसावी यांसी.

ऽ श्रीसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेहांकित पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंती. येथील क्षेम ताा छ २४ माहे जिल्हेज मु॥ मौजे धामणी जाणोन स्वकीये कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. आपण घाटा खाले गेलिया * * * * * चे वर्तमान. (एक ओळ फाटली आहे) आपलीं पत्रे छ १९ मिनहूची रवाना जाली ते आजी दोन प्रहरा पावली. आपण त्या प्रांते गेलियाउपर सिदी साद याचे व आपले युध्य होऊन सिदी साद याचे लोकांनी हत्याराची शर्त करावयाची ते रीतीने करून खासा सिदी साद व घाटगे दोघे व कोंडनाक यैसे युध्यात कामास आले म्हणोन लिा ते कळो आले. यैसियास हे येश श्रीने मोठेसे दिल्हे. पूर्वीपासून आपणास श्री येश देतच आहे. सांप्रत हे येश आगाध[1] श्रीने आपले पदरी सर्वोत्कर्ष[2] घातले. याउपर गोवलकोटातीलहि लोकांस धीर पुरतो यैसे नाही. यानंतर आम्हाकडील वर्तमान तरी आम्ही आपली आज्ञा घेऊन स्वार होऊन येथे आलियानंतर धामणीचा मोर्चा आपले जमावानसी कायेम केला. आम्हाकडील मोर्चियास लोक नेमिले त्याप्रमाणे राजश्री पंत प्रतिनिधी याजकडील राजश्री कृष्णाजीपंत पाचसे हशमानसी आम्हापासी आले व राजश्री नारोपंडित सचीव याजकडील राजश्री दामोजी कासी अडीचसे माणसानसी आम्हापासी आहेत. या

० ७
श्रीपांडुरंगचरणीं
दृढ भाव पिलाजी-
जाधवः ॥

---

१ मोठे. २ सर्वोत्कृष्ट.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

जमावानसी व आम्हाकडील लोकानसी धामणीचा मोर्चा कायेम करून लस्कर सहवर्तमान मोर्चियामागें मैदानजागा पाहून मुकाम केला आहे. * * * * हुजरातचे लोक व राजश्री फतेसिंगबावा याजकडील वगैरे लोक नेमिले आहेत त्याप्रमाणे अद्यापि आले नाहीत. त्या मोर्चियास लोकांची रवानगी सरंजाम सुधा होऊन कायम व्हावा, येतद्विषी आम्ही राजश्री स्वामीस दोन तीन विनंतीपत्रे पाठविली आहेत. आम्हाकडील मोर्चा आज्ञेप्रमाणे धामणीस कायेम जाला. त्यामुळे अलीकडील खाडीतील गलबत मना जाले. त्याप्रमाणे तिकडील मोर्च्या अलियाउपर येथील कार्यभाग अल्पकाळेच चितानुरूप होऊन येईल. विशेष काय लिहिणे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Pilaji Jadhao congratulates Chimaji on his victory at Charhai.*

No. 182] [*26-4-1736*

श्री

श्रीमंत राजश्री....आपा स्वामीचे सेवेसी

पोष्य जिवाजी खंडेराव दंडवत प्रणाम विनंती उपर. येथील कुशल तागाईत छ २५ माहे जिल्हेजपर्यंत येथास्थित असें. स्वामीचीं पत्रें राजश्री स्वामीस आलीं. युध्याचें वर्तमान तपशिलवार श्रवण बहुत संतोष पावलें. भांडीं मारिलीं, नोबत वाजविली, खुशाली केली. सिदीसादासारिखा गनीम मारिला हें कर्म सामान्य न केलें, ऐसा स्तुतिवाद वारंवार केला. पत्राचीं उत्तरें पाठविलीं आहेत त्यांजवरून विदित होईल. आपणांस वस्त्रें व पदक व तरवार बहुमान पाठविला आहे. राजश्री मानाजी आंगरे यासी वस्त्रें व पदक पाठविलें आहे. साखरोजी कुटा पत्रें घेऊन आला त्यास सोन्याचें कडें दिल्हें. राजश्री मानाजी आंगरे यांजकडील पांच शिपाई आले त्यांस रुप्याचीं कडीं पांच दिल्हीं. हबशा-कडील लोक जिवंत सांपडले असतील ते न सोडावें ऐसें राजश्री बोलिले आहेत; तरी जे सांपडले असतील त्यांतून येक न सोडावा. तिकडूनच मतगड प्रांतें स्वारी करावी; गड घेऊन पाडावा ऐसी चर्चा दरबारीं जाली. राजश्रीचें चित्तीं तोंच विचार येऊन आपणांस लिहिलें आहे. विचार होईल तें केलें पाहिजे. राजश्री संभाजी आंगरे सरखेल यांसी पत्रें लेहविलीं त्यांत राजश्री मानाजी आंगरे याचा बहुत उत्कर्ष लिहिला आहे. याउपर ते आले तरी बरें. नाहीं तर पद प्राप्त यासच

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

होईल ऐसें सभेमध्यें भाषण केलें. कळलें पाहिजे. सिदीसाद मेला; याउपर गोवलकोट आंजनवेली येथें लगट करावी ऐसें राजश्री येमाजीपंत बोलिलें. त्यावरून भर भरून राजश्री खंडोजी जगथाप राउत सुमारें १००, नागोजी घाटगे १००, इंदापूर जिंती जानोजी नाईक १००, बाळोजी डुबल ३००, किरकोळ २००, येकूण आठशें स्वार व हशम राजश्री येमाजीपंत १००० येक हजार व सचीवपंत ५०० पांचशें येकूण दीड हजार, यांसी पोटास राजश्री....स्वामीनी द्यावें आणि अंजनवेलीस पाठवावें, ऐसें विचार होत आहेत. सिद्धांत होईल तो मागाहून लेहून पाठऊ. राजश्री नाना यांसी राजश्री संभाजी राजे याजकडे पाठविले आहेत; काल आजीत्याच्या भेटी जाल्या असतील; लौकरीच येतील. विदित जालें पाहिजे. राजश्री पिलाजी जाधवराऊ धामणीवर गेले. याचे कोण्ही कालुस्त्यावरी अद्यापी गेले नाहीं. त्यावरून राजश्री रामाजी दामोदर याजवरी रागास आले कीं तुमचे लोक अद्यापि गेले नाहींत, याउपर लौकर न जात तरी तुम्हासच जावें लागेल ऐसी आज्ञा केली आहे. होईल तें पाहावें. बहुत काय लिहिणें? कृपा असों दिल्ही पाहिजे———

पुढें कोरी जागा असतां पत्र पुरें केलेलें नाहीं.

¶ *Jivaji Khanderao Chitnis communicates to Chimaji Appa Shahu's hearty congratulations on the victory he obtained over Siddi Sat.*

No. 183] [*26-4-1736*

श्री

राजश्री चिमाजीपंत आपा
गोसावी यासी.

ऽ श्रीसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रीो पिलाजी जाधवराव दंडवत विनंती. येथील कुशल ताा छ २५ जिल्हेज मु॥ मौजे धामणी जाणौन स्वकीये कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. आपण छ २१ मिनहूची पत्रे रवाना केली ती आज छ माारी प्रविष्ट होऊन लिा अभिप्राये कलो आला. 'कालचे युधी सिदीसाद व वरकड नामी सरदार अवघे व हजार बारासे माणूस यैसे खस्त[1] जाले, येतन्मुले शामलाचा उपमर्द[2] विशष जाला. याउपरी हबसियाचे लोकांत अवसान राहिले यैसे नाहीं. याप्रसंगी आपणापासी सात आठसे स्वार अडीच सहस्र पायेचा जमाव आहे. या सामानानसी खासा आलियास ते स्थळ

---

१ मेले. २ खासा पराभव.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

हस्तगत हला करून होईल न होये, येतद्विषीचा विचार सुचेल तो वाच्य[1] न करिता लेहून पाठवावा ' म्हणौन लि॥. यैसियासी अवंदा शामलास जरब पुर्तीच बैसली हे यश श्रीने आं (पणास) सर्वोकृष्ट दिल्हे. सांप्रत या स्थलाचा विचार लि॥. यैसीयास आपले पदरी लोक व साहित्य मातबर आहे. आणि जे कार्य आपण मनावर धरतील तेथे श्री यश देईल, तेथे संदेह नाहीं. परंतु या स्थलाचा मजबुदीचा विचार आम्ही येथे आलियाउपर नजरेने पाहिला. त्यास गोवलकोटाचे टेकडी भोवता चर आहे. त्यामध्ये भरतीचे समई पाणी भरू[न] जंजिरा होतो. खंदक भालाभर पावेतो खणोन खार्डाचे उदक मेलविले आहे. त्यात पाचा साता खंडियाचे गलवत फिरते आणि पाणियापासून सात आठ हात वरत्या डगरी आहेत त्यामध्ये मेढा आहे. त्याची पेटी[2] भरिली आहे व जागाजागा नाजूक स्थली चिरेबंदी बुरूज आहेत त्यापलीकडे सुम्याचा कोट आहे. त्यासहि खंदक आहे. थोरले किलियासहि सभोवता खंदक आहे. येदन्याये येथील मजबुदी आहे. सारांश हे स्थल हलेने येणे हे अगाध[3]च आहे. तथापि मातबर सामानानसी हला करून खंदकाजवल थडकालियास पुढे खंदकाची आटक, वरील मेढियाचा व दोही कोटातील मार, इतका मार सोसून माणूस तेथे जाईल तेव्हा थोडा राहील. यैसे असोन हे स्थल हालेने होणे अगाध आहे. आम्ही नजरेने पाहिल्याप्रमाणे लि॥ आहे. आपणापासीहि हे स्थलचे हैवी[4] ज्याणी स्थल पाहिले असेल ते विदीत करितीलच असतील. सारांश या प्रकारचे मजबुदीस हला करणे साहस आहे. सांप्रत येथील कार्यभाग होणे तो चितानरूप मोर्चेबंदीनेच थोडकेच दिवसात होऊन येईल. हा विचार आपल्याहि चितात येतच असेल. कदाचित कच खाऊन लि॥ यैसे आपण म्हणतील तर पूर्वीपासून कोण मनसबियास अथवा भलते[5] गोस्टीस कच खावी यैसा विचार नाही. परंतु येथील मजबुदीनरूप लि॥ आहे. यानंतर तेथे हशमात अथवा आणिक कोणी शाहाणा माणूस पाठवणे तरी पाठऊन द्यावा. त्यासहि येथील विचार नजरेने[6] दाखऊन जो विचार सांगणे तो सांगोन पाठऊन[7]. त्यानंतर जो विचार कर्तव्य तो केला पाहिजे. वरकड मोर्चेबंदीने अथवा राजकारणाने येथील कार्य कार्यभाग आपले पुण्येकरून थोडे दिवसीच अनयासेच सिधीस पावेल. आपण खासा आलियास आपले लौकिकानरूप कार्य होऊन आले तर उतमच आहे. पूर्वी रायेगडास शामलाचा वेढा आला. तेसमई हुजरात व पवार

---

१ वाच्यता न करिता. २ तळघर, बेंदरी आणि पाटथर यांमधील जागा.

३ कठीण. ४ मांहितगार. ५ अगाध, अवघड.

६ समक्ष. ७ पाठऊं.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

व राजश्री बाजी भिवराव रा जाले, ते समई शामलास पराभवाते पावऊन यश संपादून पुढे माहाडास येऊन ते कार्य सिधी पावऊन बाणकोटास रवाना केले. तेहि यश श्रीने दिल्हे. तन्मुले हावेभरी[1] होऊन गोवलकोटास रवाना केले. त्यास आज तीन वर्षेपरियत आवघे राज्यास मसलत पडली. परंतु अद्यापि सार्थक होऊन न आले. यैसा विचार आहे. श्रीने सांप्रत येश दिल्हे आहे तेच विशेष आहे. वरकड येथील कार्यभाग होणे तो आपले प्रतापे करून होऊन येईल. विशेष काय लिहीणे? कृपा केली पाहिजे हे विनती.

हें पत्र इ. सं. मध्यें ऐ. चरित्रें या भागांतील पिलाजी जाधवाचे चरित्रांत छापलेलें आहे.

¶*Pilaji Jadhao explains to Chimaji Appa the difficulties of capturing Gowalkot.*

No. 184] [*April 1736*

श्रीराम प्रसन्न

राजश्री चिमाजीराऊ अपा गोसावी यांसी.

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्रेहांकित द्वारकोजीराउ पाटणकर साष्टांग दंडवत विनंती. येथील कुशल जाणून स्वकीयेंलेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. गोसांवियांनीं दया करून पत्र पाठविलें, पावोंन बहुत संतोष जाहाला. ऐसे क्षणांक्षणां पत्र पाठऊन परामर्ष करी (त) जाणें. गोसांवियांनीं लिहिलें जे शामलांत व आपणांत युध्य जाहालें; शामलाकडील हजार दोन हजार माणूस ठार जाहलें व खासा सिदीसात पडला म्हणून लिहिलें; ऐसीयास पूर्वी वडिलांपासून येशस्वी आहेत. या माघें राज्यांतील सरदार व सरकारकून शामलांवर चालोन गेले; परंतु ईश्वरें त्यांस येश दिल्हें नाहीं. गोसांवियांस येश आलें त्यावरून अतिसंतोष जाहला. गोसांवी श्रीमंत आहेत. राज्यांतील लोकांचें पालग्रहण करणार आपणांविराहित कोणी आहे आहे ऐसें नाहीं. आम्ही गोसांवियांचें सर्वस्वे पदरीचे अंकित असों. सर्व मान अभिमान आमचा गोसांवियांखेरीज कोणास आहे ऐसें नाहीं. आपणांजवळ चिरंजीव आहेत. गोसांवी त्यांचे ममतेनें चालवीत आहेत. आम्हांस आपणांविराहित दुसरा अर्थ आहे ऐसें नाहीं. गोसांवियांनीं क्षणांक्षणां येणाराबराबर पत्रिकांप्रेषण करून सांभाळ करीत जाणें. सूज्ञां-

---

१ जास्ती हाव सुटून.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

प्रति विशेष काये लिहिणें. हें वर्तमान राजश्री जाधवराऊ यांणीं ऐकिलें. बहुत संतोष पावलें. गोसांवियांचा स्तुतिवादहि बहुतच केला, तें पत्रीं ल्याहावें ऐसें नाहीं. कळलें पाहिजे. बहु काय लिहिणें हें विनंती.

¶*Dwarkoji Patankar congratulates Chimaji on the fall of Siddi Sat.*

No. 185] [*19-4-1736*

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ
स्वामीचे सेवेसी.

विनंती. गोवलकोटीहून राजश्री पिलाजी जाधवराऊ याचीं पत्रें आली. त्याच्या नकला करून सेवेसी पाठविल्या आहेत. त्यावरून विदित होईल. सारा-उष सिदीसाद वारला यामुलें शामलाकडील लोकांत अवसान राहिले नाहीं व राजश्री स्वामीचे दैव विचित्र आहे; यास्तव गोवलकोट हस्तगत होईलसे दिसते. पुढें होईल (ते) वर्तमान लेहू. बहुत काय लिहिणें? कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Chimaji sends news to Bajirao of Siddi Sat having been killed in fight.*

No. 186] [पौ *26-4-1736*

पौ छ २५ जिल्हेज.

श्री

पुा राजश्री चिमाजीपंत आपा
गोसावी यांसी.

विनंती उपरी. येथे राऊत आहेत ते ऊष्णकाल पावेतो आहेत. पुढे दुसरे राऊत पाठऊन यांस आपण घेऊन जातील, यैशास ते राऊत प्रजन्य काळीं येतील त्यांस दाणागला पाहिजे. प्रजन्य काळीं रोजमरा देऊ म्हटल्यास दाणा मिळणार नाहीं. याजकरितां दाणा खरेदी करून ठेवावा लागेल. प्रजन्य काळीं आबरू राहिली पाहिजे. तरी सदरहु लिहिलेप्रमाणें * * * पाठविला पाहिजे. राजश्री श्रीनिवास पंडित प्रतिनिधी याजकडील रो। कृष्णाजी पंत पाचसे लोकानसी व राजश्री नारोपंडीत सचीव यांजकडील सवादोनसे लोक बा। राजश्री दामाजी कासी यैसे आले आहेत व राजश्री आनंदराऊ सोमवंसी सरलस्कर व आम्ही मिलोन खिर्डीहून कूच करून आंबडसेवरी मुकाम केला आहे. हुजरा-

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

तचा मोर्चा कालोस्तियावरी काईम जाला तरी आमचाहि मोर्चा धामणीचे टोंगीवरी जागा बांका आहे तेथे काईम होईल. आम्ही तो मोर्च्याचे मागे नेहमीच आहों. कळले पाहिजे. कानडे प्यादे हाली म्हणतात की प्रजन्य काळी आमचा टिकाऊ होणार नाहीं व कितेक (दुखणा) (ता) पाने पडिले आहेत. कितेक नारवानी श्रमी आहेत. तरी येथे नेहमी पाचसे माणूस उतम येऊन राहे ते केले पाहिजे. विशेष काय लिहिणें ? कृपा केली पाहिजे, हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶To Chimaji, from Pilaji Jadhao, communicating the progress against Gowalkot.

No. 187] *[27-4-1736*

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी.

विनंती सेवक मलार दादाजी साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत छ २६ जिल्हेज मुकाम कोठुरें स्वामीचे कृपेकरून यथास्थित असे. यानंतर कृपाळू होऊन छ २० मिनहूचें पत्र पाठविलें तें पावोन शामलाचा समूल निपात केला हें सविस्तर वर्तमान ऐकतां आनंद जाला तो पत्रीं कोठवरी लेहावा ? स्वदेशीं शामलानें गाय-ब्राह्मणाची छलणा अतिशय केली. श्रीभार्गवराम त्याजवर क्षोभोन स्वामीचे हातें निपात करविला. यश सामान्य प्राप्त जालें ऐसा अर्थ नाहीं. पूर्वीपासून स्वामी यशस्वी आहेत. दिवसेंदिवस श्री याहून विशेषात्कारें यशस्वी राखो. सिदीसात सामान्य शत्रू होता यैसें नाहीं. वडिलाचे पुण्यप्रतापें शत्रूचा निपात जाला हे कीर्त सर्वावरिष्ट स्वामीची जाली. राजश्री वासुदेव जोशी यांस आपलें पत्र हे वर्तमानाचें आलें त्याची नकल त्याणी आम्हांकडे काली पाठविली. त्यावरून वर्तमान ये प्रांते राजश्री देवजी सोमवंसी व संभाजी पवार व राजश्री कुंवर बहादर यांस लेहोन पाठविलें व तेच नकल बजिनस औरंगाबादेस शामजी गोविंद याजकडे पाठविली. श्रीमंत राजश्री पंत-प्रधान व चिरंजीव बाबूराव यांस पत्रें व जोशी यांचे पत्राची नकल यैसी औरंगाबादेस पाठविली. तेथून शामजीपंत लस्करास पत्रे रवाना करतील. राजश्री वासुदेव जोशी याकडे सेवेसीं पत्र लेहोन

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

त्यांचा जासूद आला होता त्या बराबर काली पाठविले; पावलेंच असेल. आजि स्वामीचेंच पत्र आलें. वाचितां चित्त आनंदमये जालें. पुढें नवल विशेष वर्तमान लेहावया आज्ञा केली पाहिजे. श्रुत होये हे विनंती.

¶*Malhar Dadaji Barve congratulates Chimaji on his victory over Siddi Sat.*

No. 188] [पौा *30-4-1736*

छ २९ जिल्हेज.

श्री

पुरवणी राजश्री चिमाजीपंत आपा
गोसावी यांसी.

विनंती उपरी. मोर्च्याच्या सामानाविसी पेसजी एकदोन वेला लेहून पाठविले होते. त्यास आपले आगमन तळघाटी जालें. तन्मुले सामान येऊन पोहचले नाहीं. याउपरी दाहा जजाला, समेत जजालबारदार व बेलदार व सुतार व लोहाराचे दुकान यैसे अविलंबे येऊन पोहचे ते केले पाहिजे. दोन तोफा बमये सरंजाम गोळे थैल्या व पाचसे माणूस यैसे पत्र पावताच अविलंबे रवाना करावे. येत * * * * [फाटले] रवानगी केली पाहिजे विशेष. * * * कृपा केली पाहिजे, हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Pilaji Jadhao to Chimaji giving the progress at Gowalkot.*

No. 189] [पौ *30-4-1736*

छ २९ जिल्हेज.

श्री

पु॥ राजश्री चिमाजीपंत आपा
गोसावी यांसी.

विनंती उपरी. येथील मोर्चेबंदीचा विचार तर आम्ही धामणीचा मोर्चा कायेम केला आहे. त्यास येथे पोख्ते[1] सामान असिले पाहिजे. आम्हापासी आपला

---

१ मातबर, भरपूर.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

हशमांचा जमाव सांप्रत च्यारसे मनुष्य आहे. त्यापैकीं कानडे येकसेपाच आहेत. ते * * (फाटले) ती च्या कार्याचे नाहीत व पर्जन्यकाली खपावयाचे आहेत यैसे नाहीं. आपल्याहि प्रयोजनाचे नाहीत. याजकरितां त्यास निरोप देऊन आपणाकडे सत्वरीच रवाना करितो. गोरेगावच्या ठाणियापैकीं शंभर माणूस येथे पाठवावयाचा निश्चय केला होता, तेहि माणूस आले नाहीं. कानडेयास निरोप दिल्ह्यास येथे तीनसे माणूस राहिले. त्यास देसीहून दाणा गला आला पाहिजे. याजकरितां कुभारला व तिवरियाचे घाटी चौकी बैसवावी लागली. तेथे पंनास पाऊणसे माणूस राहिले यैसा विचार आहे. त्यास गोरेगावीहून लोक रवाना करावयाचा विचार केला होता. त्याचे मुबादला व कानड्याचा मुबदला मिळोन आपणापासी जमाव आहे त्या पैकी दोनसे माणूस निवडक पाठविले पाहिजे व राजश्री मानाजी आंगरे याजकडील तीनसे माणूस व दोन तोफा दारुगोळा बेमये[1] सरजाम यैसे मागोन पाठविले पाहिजेत. लिहिले प्रो सरंजाम तोफासुधा सत्वर आलिया खाडीतून गलबत जावयाचे बंद होईल. पलीकडील काळुस्तियाचे मोर्चियास राजश्री स्वामीनी हुजरातचे लोक आनंदराऊ बकसींचे गुमास्ते व खंडोजी धुमाल व येसाजी आनंत व राजश्री फतेसिंगबावा याजकडील उदाजी फडतरे यैसे सात आठसे पायेचा जमाव व दोनसे राऊत समागमे हुजरे देऊन रवाना केले, ते जमाव-सहवर्तमान आजी दाखल जाले. याउपर तोहि मोर्चा का(यम) जाला. राजश्री संभाजी आंगरे सरखेल यांसहि तोफेविषीं व लोकाविषीं राजश्री स्वामीनी आज्ञापत्रे लिहिली आहेत. त्यांजकडीलहि (लोक) व तोफा येऊन पोहचतील. खाडंचे दुतर्फा मोर्चे कायम होऊन खाडा [खाडी] बंद जाली म्हणजे जे होणे ते अनयासे होऊन येईल. विशेष काय लिहिणे? कृपा केली पाहिजे हे विनंती. तोफा (व) लोकांची रवानगी पत्रदर्शनी होय तो अर्थ केला पाहिजे हे विनंती

मोर्तब
सुद.

¶*Pilaji Jadhao to Chimaji asking more forces and help against Gowalkot.*

No. 190] [*2-5-1736*

श्री.

विनंती उपरी. राजश्री पिलाजी जाधवराऊ यास गोवलकोटास पाठविल्यावरी त्याणी जाऊन तमाम ठावठिकाण पाहून धामणीचा मोर्चा खाडीकाठी घातला.

---

१ सहित ; सुद्धा.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

तेथून गलबत बंद आहे. याणी मोर्चा घातला या प्रमाणे काळुस्तियाचा मोर्चा बसल्यान तरी गोवलकोटास तरांडे येऊ पावणार नाही. त्यास हुजरातच्या लोकास मोर्चा बलावावयासाठी राजश्री जाधवराऊ सांगत आहेत. औघ्यास बाड देऊन तो मोर्चा बलावितील. सुभेदारानी धामणीचा मोर्चा बसविला आहे त्याची मजबुदी करावी, खंदक खणावा, चौबुर्जी बाधून कदाचित काही शामल जमाव पाठवील तरी जुमस न खावा यैसे आम्हीहि सुभेदारास लिहिले आहे. त्याप्रो ते मोर्चा मुस्तकीम करितील. पाचसे माणसाची भर आम्हास करून देणे लागते. पाचसे माणूस राजश्री प्रतिनिधीकडील आहे. सरलस्कर व सुभेदार याणी मोर्चाचे पाठीवर मैदान पाहून मुकाम करून उपराळियावरी राहिले असेत. गलबते बंदरात आली ती बंद जाहाली आहेत. पुढेहि होऊन ईश्वर ईछेन होणे ते होईल. मुख्य गोष्ट सिदी साद मेला. या प्रसंगी साहास जाहाल्याने ती स्थळे हस्तगत न होत सारिखे नाहीं. साहास मात्र जाला पाहिजे. काळुस्तियाच्या मोर्च्याविसी राजश्री फतेसिंगबावाकडील लोकास व हुजरातच्या लोकास राजश्री स्वामीनी ताकीद केली त्यावरून तेहि काळुस्तियास येऊन बसले म्हणून राजश्री पिलाजी जाधवराऊ याणी लिहिले आहे. धामणीवर सुभेदारानी मोर्चा घातला त्यास धामणी म्हणजे कासीबंदरचाच मोर्चा आहे. कळले पाहिजे. र॥ छ १ मोहरम बहुत काय लिहिणे? कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Letter from Chimaji. The letter reports the Maratha preparations for capturing Gowalkot.*

No. 191] [*2-5-1736*

श्री

विनंती उपरी. सिदीसाद मंडलीसहवर्तमान मृत्य पावला हे वर्तमान राजश्री स्वामीस राउतासमागमे लिहून पाठविले. त्यास तिसरें चौथें दिवशी राऊत सिकारीमध्यें जाऊन दाखल जाहाला. पत्र राजश्री स्वामीनीं वाचून परम आनंद जाहाला. वर्तमान आइकताच घरास येऊन तमाम भाडी सातारियावरील मारिली. लोकी नजरा गुजरानिल्या. राऊत गेला होता यास सोन्याचे कडे दिल्हे. राजश्री मानाजी आंगरे याजकडील पांचजण पत्रे घेऊन गेले होते त्यास पांचास पांच रुप्याची कडी दिल्ही. मानाजी आंगरे यास वस्त्रे व पदक, आम्हास वस्त्रे, पदक व तरवार यैसी रवाना केली आहेत. येऊन पोहचतील. सारांश शामलाचा निपात जाहला हा हर्ष राजश्री स्वामीस व जनास जाहाला आहे व कित्येकास

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

दु:खहि निर्माण जाहले आहे. तेहि स्वामीचे दृष्टीत आहेत. बहुत काय लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनंती. रवाना छ १ मोहरम हे विनंती.

¶Shahu distributes presents to the heroes of the victory over Siddi Sat, writes Chimaji Appa to Bajirao.

No. 192] *[2-5-1736*

श्री.

विनंती. सिदीसाद आरमार-सहित रेवसास येऊन उतरला. हल्ला करून गडी घेतली. साठ माणूस गडीत होते ते मारले गेले. तेव्हां मानाजी आगरे कुल जमावासहवर्तमान युद्धास गेले. युद्ध सख्त जाहाले. ते समई याजकडील चांगली माणसे पडली. सिकस्त खादली. शामल शोक जाहाला. त्या उपरी येक दोन युद्धे सख्तच जाहाली. पन्नास चौपन्न माणूस मानाजी आंगरे याचे पडले. शामलाचीच शेखी होऊन मुलूक लुटीत जाळीत पुढें चालला. थल राजकोट घ्यावा हा शामलाचा इरादा. राजश्री संभाजी आंगरे सरखेल याचेहि अनुमोदन त्यास. सदरहू वर्तमानाचे पत्र मानाजी आंगरे यांचे सातारियास आले तेच समई कूच करून, दरकूच स्वाराचा हशमाचा जमावासहवर्तमान सावत्रे मजली पोयेनाडास आलो. दुसरे दिवशी छ १८ जिल्हेजी सिदीसाद निवड माणूस व तमाम सरदार घेऊन दीड हजारानसी चरईकामारलें येथें चालून आला. आम्ही चालून गेलो. युद्ध सख्त जाहाले. सिदीसाद जातीनें मर्द. आगीचे सामान व तोफखाना हरभात, व तरतूद उत्तम. लडाई बहूत उत्तम केली. आम्हाकडील घोडे माणूस बहुत जाया जाहाले; परंतु स्वामीचे आशीर्वादे सिदीसाद जिवे मारला. सिदी-याकडील दवकोड नाईक व सुभानजी घाटगा व फाईम व बालाजी सेणवी हेहि मारले. बारा तेरासे माणूस कापून टाकिले. राजश्री मानाजी आंगरेहि युद्धसमई येऊन पोहचले. युद्धसमई त्याच्याहि लोकी कस्त केली हे वर्तमान तपशीलवार लिहिले आहे. पत्रे पावली असतील. कृष्णाजी घाटगा मारला म्हणून पूर्वी लिहिले आहे, परंतु कृष्णाजी उघडा बोडका पळून गेला. वरकड सरदार जमातदार मारले गेले. लोकहि पलाले ते उघडे बोडके खाडीत उड्या टाकून पळून तराडि-यावर चढले तितके गेले. शामलास मोठीसी जरब पोहचली. विदित जाहाले पाहिजे. रवाना छ १ मोहरम. बहुत काय लिहिणे; कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶Chimaji's own hand. Letter to Bajirao giving an account of the fight with Siddi Sat, at Charai Kamarle near Rewas.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 193] [*2-5-1736*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे सेवेसी.

पो वासुदेव जोशी कृतानेक नमस्कार विनंती. येथील कुशल ता॥ अधिक जेष्ठ शुध त्रितीया पर्येंत स्वामीचे कृपे करून येथास्थित असे विशेष. स्वामीनी पत्र पाठविले ते पावले. लिहिले वर्तमान सविस्तर कळले. जयेसिंगाची भेट जालियाचे वर्तमान लिहिले व राजश्री आपाचे पत्री कितेक वर्तमान लिहिले त्यावरून सविस्तर कळोन समाधान वाटलें. इकडील वर्तमान तर शामल राजश्री आपानी पराभवाते पाविला. ते वर्तमान त्यानी सविस्तर स्वामीस लिहिले आहे त्यावरून विदित होईल. वरकडहि कितेक अर्थ राजश्री आपानी लिहिला त्यावरून विदित होईल. आम्ही सांप्रत राजश्री आपासमागमे कोकण प्रांते आहो. आज अष्टमीस आहों. रा॥ आपा निरोप देतील तेव्हां कल्याणास जाऊं. बर्गामुळें (?) जकाती पडल्या. खर्चहि वाढला आहे. मुलकीहि कांहीं लुकसान येईल. कळावें म्हणून लिहिले असे. चिरंजीव पांडुरंग जोशी यांस श्रीस रवाणा करावें. बहुत काय लिहिणे. लोभ करीत गेले पाहिजे हे विनंती.

¶*Vasudeo Joshi of the Peshwa's confidence working in the Janjira campaign writes to Bajirao the news of Siddi Sat's fall.*

No. 194] [*4-5-1736*

पो छ ६ मोहरम मुा॥ तला.

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी.

विनंती. सेवक भिकाजी साबाजी कृतानेक विज्ञापना ता॥ छ ३ मोहरम भोमवार दोन प्रहर रात्रपर्येंत स्वामीच्या कृपावलोकनेकरून वर्तमान येथास्थित असे विशष. माहाराज राजश्री स्वामीस राजश्री खंडोजी जाधव व दुर्गोजी भोईटे यांची पत्रें गोवलकोटाहून आजी आलीं. त्याच्या नकला करून सेवेसी पाठविल्या आहेत. त्यावरून विदित होईल. राजश्री संभाजीराजे यांचा आजीचा मुकाम सुपनें[1] तांबवे[2] वसंतगडाखालीं[3] जाला आहे. उदईक पालीस[4] येतील. येथून

---

१ सुपने – कराडपासून अदमासे ५।७ मैल पश्चिमेस.

२ तांबवे – कराडच्या पश्चिमेस ५।७ मैल; सुपने व तांबवे यांच्यामध्यें कोयना नदी आहे.

३ वसंतगड – डोंगर, कराडच्या वायव्येस ५ मैल.

४ पाली – साताऱ्याच्या दक्षिणेस सुमारे १५ मैल.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

राजश्री स्वामी आजी मध्यानरात्रीं स्वार होऊन पालीस जाणार. उदईक बुधवारी आठ घटका दिवस आल्यानंतर भेटीस मुहूर्त आहे. त्यांकारणें राहावयास स्वामीच्या वाडियांत स्थल करविलें आहे. श्रीमंत राजश्री नाना स्वामीकडून लाखोटे हेच समई आले. ते लाखोटे न फोडतां आपणाकडे पाठविले आहेत. विदित जालें पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶The letter contains a new information that Shahu called Sambhaji of Kolhapur for a personal meeting, doubtless with the intention of obtaining the latter's co-operation against the Siddi of Janjira. This was the first visit of the two cousins after the celebrated treaty of the Warna in 1730. This visit may have been intended to settle the general policy of the Maratha Raj with reference to the Mohammadan powers. Shahu's arms had been fast expanding the Maratha Kingdom in all directions, and it was necessary to settle whether the Marathas were to establish a Hindu Empire in India or to remain confined to the Deccan. It is a pity that more definite information is not forthcoming to elucidate this point.

No. 195] [*6-5-1736*

श्री

राजश्री माहादाजीपंत गोसावी यासी

ऽ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रीो पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंती. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल-लेखन करीत आसिले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले प्रविष्ट होऊन लेखनार्थश्रवणे संतोष जाला. यैसेच सदैव येणारा वार्तिकासमवेत पत्री कुशलार्थ लेखन करून समाधान पावीत असिले पाहिजे विशेष. येथील वर्तमान तरी सतरुषीहून आलियानंतर आपण विचार सांगितला त्याप्रमाणे धामणीच्या मोर्चियाचे स्थल पाहून उपरालियाचे जागा टोंगावरी खाडी किनारियास मोर्चा मुस्तैकीम[1] केला. राजश्री त्रिंबकराऊ सोमवंशी सरलस्कर व आम्हीं सेनसहवर्तमान मोर्चियामागे परषरामचे डोंगरावरी मैदानजागा पाहून छावणी केली आहे. वरकड येथील मोर्चियाची जागा आपण सांगितल्याप्रमाणेच नक्षच राहावयाचीच आहे व सांप्रत सिदीसाद मारल्यामुळे गनिमाते कोणी डोईवर घेऊन जबरद(स्ती) पोहचावावी यैसा नाहीं. आणि आम्हीहि सावधतेस आथवा बंदोबस्तास चुकणार नाहीं. वरकड येथील तोफा व लोकाचे साहित्याविषीं राजश्री आपास लिहिलेच आहे. आपणहि विनती

---

१ कायम.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

करून तोफा व लोहार व सुतार व बेलदार यैसे रवाना करविले पाहिजेत. सर्व विचार आपणास विदितच आहेत. तेथे विस्तार काये लिहिणे? बहुत काये लिहिणे? लोभ असो दीजे. रा ५ मोहरम हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Pilaji Jadhav to Mahadaji Purandare, communicating progress of siege against Gowalkot.*

No. 196] [पो *7-5-1736*

पौ छ ६ मोहरम
मुा किले तलागड.

श्री

पुा तीर्थरूप राजश्री आपा स्वामी
वडिलाचे सेवेसी.

विनंती. स्वामीनी छ २० जिल्हेजचे पत्र पाठविलें ते पावले. सिदी साद याचे जुजात जखमी ठार व घोडी ठार व जाया जाहाली त्याचा जाबता पाठविला तो पावला. त्यावरून कळले जे तुंबल युध्ये जाहाले. बरे स्वामीचे पुण्य थोर, तेणे करून ही कार्ये होतात. हे विनंती.

¶*Nana Saheb to Chimaji, congratulates the latter upon his victory over Siddi Sat.*

No. 197] [*13-5-1736*
नकल

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसी.

ऽ श्रीसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेा पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंती. येथील क्षेम ता छ १२ मोहरम मुा मौजे धामणी नजीक गोवलकोट जाणोन स्वकीये कुशल लेखनाज्ञा करीत असिले पाहिजे विशेष. सांप्रत कांहीं आपणाकडील पत्र येऊन वर्तमान कळो येत नाहीं तर दरबारचे व आपणाकडील सविस्तर लेखन करीत असावें. येथील वर्तमान तर अलीकडे * * * र्चा धामणीचा मुस्त * * * च आहे. छावणी घरे कोपटेहि तयार

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

जाली आहेत, काही होत आहेत. पलीकडे काळुस्तियाचे मोर्चियास हुजरातचे व राजश्री फतेसिंग भोसले व जाधव व भोईटे व पवार व सेनापतीकडील जमाव मोर्च्यास गेले आहेत. परंतु अद्यापि नेहमी छावणीचा विचार दिसत नाहीं त्यास राजश्री स्वामीची आज्ञा आहे कीं पागेचा [जागा] न सोडणे. त्यावरून राा मानाजी जाधव व आणखी किते (क) लोक येसे पागेचेच जागियावर आहेत. काही मोर्चियास आहेत. परंतु शास्वत मोर्च्यावर छावणीचा विचार अद्यापि नाहीं. बहुनाइकी कारभार आहे. कोणाचा विचार कोणाचे चितास येत नाहीं. यैसा विचार आहे. राजश्री संभाजी आंगरे सरखेल यांचीहि पत्रे आम्हास एक दोन आली. त्याजकडीलहि लोक व तोफा तयार होऊन जयगडास रवाना होऊन आले आहेत. परंतु पलीकडील मोर्च्याचा विचार शास्वत नाहीं. यास्तव यावयास अनमान करितात. काळुस्तियावर नेहमी मोर्चा कायम जाल्याखेरीज ते लोक येतां दिसत नाहींत. सारांष काळुस्तियाचा मोर्चा बलाऊन राहिला म्हणजे × × × कडील लोक तोफ * * * * मी कार्ये होणे ते स्व * * * होईल. परंतु राजश्री स्वामीचे चितास येईल तदनरूप घडोन येईल ते खरें. आम्ही येथून परस्परें राजश्री स्वामीस येतद्विषीचे वर्तमान लिहिलें तर येथे लोक आहेत त्यांस नालीस[1] दिसोन येतें. सविस्तर आपणास विदित व्हावे याकरितां लिहिले असे. विशेष काय लिहिणे? कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Pilaji Jadhao to Nanasaheb, communicating progress of siege of Gowalkot.*

No. 198] [पो *23-5-1736*

पो छ २२ मोहरम.

श्रीशंकर.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी.

विनंती सेवक मलार दादाजी साष्टांग नमस्कार विनंती. तागायत छ जिल्हेज मुकाम कोठुरें गंगातीरीं स्वामीचे कृपें करून सेवकाचें व ये प्रांतींचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीकडील पत्रें चैत्र वद्य त्रयोदसीचीं राजश्री आपाकडे आलीं. त्याणी वर्तमान सेवकास लिहिलें होते. त्या अलिकडील वर्तमान कलत नाहीं. तरी सविस्तर वर्तमान लेहावयासी आज्ञा केली पाहिजे. ये प्रांतींचें वर्तमान तरी राजश्री संभाजी राजे यासी सातारियास आणावया राजश्री आपांस

---

१ नालीश = चहाडखोरपणा, दुष्कीर्ति.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

रवाना करावें या उदेशें राजश्री स्वामीनी राजश्री आपांस सातारियास नेलें. त्यास शामलानें कुलाबे प्रांतीं धामधूम करून राजश्री मानाजी आंगरे यासी कजिया केला. आंगरे याकडील रेवस आष्टागर प्रांते चेऊल येथील गढी घेतली. यास्तव उपराळियास राजश्री स्वामीनी राजश्री आपास रवाना केलें. छ १८ जिल्हेजीं मौजे चन्ही प्रांत मजकूर येथें राजश्री आपा फौजेनसी आले. सिदी सात खासा दीढ हजार माणसानसी चालोन मुकाम मजकुरा समीप आला. राजश्री मानाजी आंगरे राजश्री आपास सामील जाले. यांचें त्यांचें युध्ध बरे तुंबल हातघाईनें जालें. हबसियानी आरबां[1] काडून बरीसी दाटी केली. तेव्हां आपलियाकडील लोकानी सरमिसल करून शर्त केली. सिदी सात खासा व सिदी याकूब उदेरीचा किलेदार व कृष्णाजी घाटगे व सुभानजी घाटगा व कोंड नाईक परवारे, बालाजी सेणवाई यैसे ठार पडिले. मुर्दे सांपडले, दीढ हजार माणसांतून दोनसें माणूस पलोन गेलें. वरकड आवघें मारून चाकोर (?) बसविले शामलाकडील आवघी मंडली खपविली. आपलियाकडील माणूस व घोडे बहुत पडली व जायां जाली. सारांश राजश्री स्वामीचे प्रतापें व कैलासवासी नानाचे आसीर्वादें व स्वामीचे आसीर्वादें राजश्री आपांस यश थोर आले. सर्वदा याचप्रकारें उभयतांस श्री यशश्वी राखो ! संतोषाचें वर्तमान सेवेसी निवेदन व्हावें यास्तव लिहिलें आहे. सेवेसी श्रृत होये. राजश्री आपाचें पत्र राजश्री वासुदेव जोशी यास आलें. त्याची नकल त्याणी आम्हांकडे पाठविली तेच बजिनस पाठविली आहे. त्यावरून विदित होईल हे विनंती.

¶*Malhar Dadaji Barve congratulates Bajirao on the victory over Siddi Sat.*

No. 199] [*31-5-1736*

श्री

राजश्री आपासाहेबांचे सेवेसी

श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित यमाजी धुमाळ कृतानेक दंडवत विनंती. येथील कुशल तागाईत छ १ सफर स्वामीच्या कृपावलोकनेंकडून यथास्थित असें. यानंतर स्वामींनीं कुलाब्याच्या मुकामींहून आज्ञापत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन बहुत सामाधान जालें. शामलानें कुलाब्यास उपद्रव केला होता, त्याजवरी खांसा स्वारी करून सिदी सात आदिकरून पांच सात मातबर माणूस व दीड हजार पायीचे लोक ठार मारिलें. ईश्वरें आप-

---

१ आरबा—तोफा ; आरबांकडून असेहि होईल.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

णांस यश दिल्हें आहे. शत्रूवरी आपला प्रादुर्भाव याच प्रकारचा आहे. इकडील सविस्तर वर्तमान राजश्री आपांनीं आपणांस लिहिलें आहे त्यावरून निवेदन होईल. विशेष काय लिहिणें ? कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Yamaji Dhumal congratulates Chimaji on his victory over Siddi Sat.*

No. 200] [*6-6-1736*

श्री

राजश्री पिलाजी जाधवराऊ गोसावी यासी.

ऽ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो चिमणाजी बलाळ आशीर्वाद. सु॥ सबा सलासेन मया अलफ. तोफा दोन तुम्हाकडे पाठविल्या आहेत. याजब॥ हशम लोक पाठविले आहेत. यापैकी दि॥ येसजी बेरडे असामी १८ व रायनाक असामी च्यार या दोन जमावाचे लोक पेसजी तुम्हाजवळ आहेत, त्या लोकात यास ठेवणे. बाकी लोक माघारे पाठवणे व बाळाजी कदम याचे लोक व नाईकजी तावडे याचे लोक यास घरास जावयास आज्ञा दिली असे. हे तोफा पोहोचऊन घरास जातील. जाणिजे छ ७ सफर. बहुत काय लिहिणे.

लेखन सीमा.

¶*Chimaji to Pilaji Jadhav, sending two guns and men.*

No. 201] [*7-6-1736*

श्री

राजश्री पिलाजी जाधवराऊ गोसावी यासी.

ऽ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो चिमणाची बलाळ आसीर्वाद. सु॥ सबा सलासैन मया अलफ. तुमची पत्रे छ २४ मोहरमची आली ती पावली. त्याची उतरे पाठविली आहेत ती पावलीच असतील. सांप्रत तुमचे पत्र येऊन वर्तमान कळत नाही. तरी सविस्तर लिहून पाठवित जाणे. तीर्थस्वरूप राजश्री राऊ उजनीकडे आले आहेत. राजश्री भिवराऊ व राजश्री सटवोजी जाधव यास दर्शनास यावयाची आज्ञा जाहली त्यावरून ते सडे फौजेनसी दोन अडीच हजार स्वार घेऊन राजश्री राणोजी भोसले देखील रायाकडे

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

गेले. राजश्री अंताजी नारायण व राजश्री गोविंद हरी, संताजी मोरे, सतकर यैसे बुनगे सहवर्तमान देसास आले. * * * * * वेळीस येऊन पोहचले तु * * * * गी केली आहे * * * * तोफाची बातमी राखणे * * * येतांच पुढें स्वारी पाऊन मजबु * * * * ने घेऊन जाणें. तोफा व गोलंदाज काल रवाना केले. सातारियाच्या मार्गे तोफा येतील, त्याची खबर राखून स्वारी पाठवून घाटापासून घेऊन जाणे. रोजमरियास ऐवज रु॥ ५८०० अठावनसे काल रवाना केले आहेत ते तुम्हाजवळ येऊन पोहचतील. जाणिजे छ ८ सफर बहुत काय लिहिणे.

लेखन सीमा.

¶*Chimaji to Pilaji Jadhav, giving general news of Bajirao's movements in the north.*

No. 202] [*9-6-1736*

पौ छ १० सफर जाबसूद

श्री

पुरवणी राजश्री चिमाजीपंत आपा
गोसावी यांसी

विनंती उपरी. आंगरे यांकडील लोक आम्ही आणिले आहेत ते अद्यापि मोर्चा घालून नेहमी राहिले नाहीत. काय निमित्य कीं गुदस्ता त्याणी मोर्चे घालून श्रम साहास केले आणि लस्करच्यानी त्याचे किमपि साहित्यहि न जाले. आणि त्याच्याच नालिसी हुजूर लेहून पाठऊ लागले. याजकरितां लस्करची छावणी तेथें नेहमी जालियानंतर आगरे याकडीलहि मोर्चा घालून नेहमीच राहतील ऐसे वर्तमान आहे. सुवर्णदुर्गास आम्ही राजश्री हरजी नाईक कदम यास लिहिले होते. त्याणी जंजिरे मजकूरपैकी पांचजण सिपाई बा॥ गुणाजी ना॥ गावतलकर येथे नेहमीच पाठविले. ते घर बाधोन आम्हापासी सेवा करीत आहेत. प्रस्तुत त्यास पोटास आडिसेरी देऊन ठेविले आहेत. राजश्री संभाजी आगरे सरखेल याजकडून आम्ही आपले मोर्चास दोन तोफा आणिल्या आहेत. त्या नेहमी मोर्चास नेऊन ठेविल्या आहेत. त्याकडून सेपंनास भांडेयाचे गोळे आणिले व राजश्री दादोबास लेहून राजश्री स्वामीस अर्ज करून शेंभर गोळे

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

मागून घेतले. तेहि येथे आणविले आहेत. माणसे पाठऊन आणऊन. त्याजकडून सखलाद, धोत्रजोडे, कोरे कागद देविले होते ते सातारेयाहून आणिले. कळल पाहिजे. बहुत काय लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Pilaji Jadhav writes to Chimaji an account of the siege of Gowalkot.*

No. 203] [पौ *9-6-1736*

पौ छ १० सफर.

श्री

पुरवणी राजश्री चिमाजीपंत
आपा गोसावी यांसी.
जाबसूद

विनंती उपरी. आम्हास गोवलकोटास रवाना केले त्यापासून पंधरा हजार रुपये येथे आले व राजश्री नारोजी कडू याजकडे जिल्हेज महिनेयात सातारेयाहून तीन हजार रुपये पाठविले. येकूण आठरा हजार रुपये जमा जाले. त्याचा हिशेब गोपाळ बाबाजी बराबर पत्री लिहिलाच आहे. त्याजवरून आपणास श्रवण जालाच असेल. सारांश येथील यैवजाची तर्तूद करून यैवज पाठविला पाहिजे व स्वार जमावहि लौकर येथे पोहचे ते केले पाहिजे. विशेष काय लिहिणे? कृपा केली पाहिजे, हे विनती.

मोर्तब
सुद.

¶*Pilaji Jadhav to Chimaji, asking supplies of men and money.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 204] [*12-6-1736*

पो छ २२ सफर

श्री.

राजश्री पिलाजी जाधवराव

गोसावी यासी.

ऽ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो चिमणाजी बलाल आशीर्वाद सु॥ सबा सलासेन मया अलफ. तुम्हाकडे स्वार येणेप्रमाणे.

४ दि॥ राजश्री कानाजी राजे सिरके

१ येमाजी भोसले सारंगा घोडा
१ जानोजी कदम निला घोडा भालेकरी
१ गुणाजी महाडीक गोमासी निला भालेकरी
१ कृस्णाजी कदम घोडा निला भालेकरी

४

२ दि॥ राजश्री बाजी सिरके

१ सुभानजी माहाडीक घोडा निला भालेकरी
१ भिवजी सिरका भालेकरी घोडा बोर

२

६

० श्री ०
राजा शाहु नरपतिहर्ष-
निधान बाजीराववलाल
मुख्य प्रधान.

येकून सा स्वार पाठविले आहेत यांसी रोजमरा चौरोजा रुो १२ बारा प्रमाणे देवीत जाणे. जाणिजे छ १३ सफर.

लेखन
सीमा.

¶*Chimaji to Pilaji Jadhav, sending fresh reinforcements.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 205] [*26-6-1736*

पो छ ७ रावल.

श्री.

राजश्री पिलाजी जाधवराव गोसावी यांसी.

ऽ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो चिमणाजी बलाल आशीर्वाद. सु॥ सबा सलासीन मया अलफ. तुम्ही पत्रे दोन प्रतीने पाठविली ते पावली. गोवलकोटच्या मोर्चियाची बंदोबस्ती केली व राजश्री सरखलीकडील लोक व तोफा आल्या, मोर्चे काईम केले, तो अर्थ विस्तारे करून लिहिला त्याजवरून कलले. ऐशास तुम्ही मोर्चे काईम करून बंदोबस्ती केली असेल ते उतमच केली असेल. व पुढेहि करणे ते कराल. सारांश तुम्ही ते स्थळीं आहा. हरहुनरे स्थळ हस्तगत करणे ते करावयाची पैरवी[1] कराल. तुमची पत्रे आली त्यांचा जाबसाल वरचेवरी पाठवावा तरी आमचे शरीर सावकास नव्हते. येदननिमित्य जाबास गुंता पडला होता. प्रस्तुत श्रीकृपेने काही आरोग्य जाली असे. तुम्हास कळावे याजकरितां लिहिले आहे. जाबसाल आलाहिदा पुरवण्यांत लिहिले असेत, त्याजवरून कलेल. जाणिजे छ २७ सफर, बहुत काय लिहिणे.

० श्री ✓
राजा शाहु नरपतिहर्ष-
निधान बाजीराववलाल
मुख्य प्रधान.

लेखन
सीमा.

¶*Chimaji to Pilaji Jadhav, acknowledging previous letters.*

No. 206] [*8-7-1736*

पो छ २४ रोवल.

श्री.

राजश्री पिलाजी जाधवराव गोसावी यांसी.

ऽ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो चिमणाजी बलाल आशीर्वाद. सु॥ सबा सलासीन मया अलफ. तुम्ही पत्र पाठविले ते पावले. शरीरास सावकास वाटते न वाटते ते लिहिले पाहिजे म्हणोन तर प्रस्तुत शरीरी काही सावकास वाटते. किंचित भ्रम राहिला आहे तोहि परिहार होईल. राजश्री राऊ आले की नाही म्हणोन लिहिले, तरी तीर्थरूप आले तेचक्षणी तुम्हास पत्र

१ तरतूद.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

लेहून पाठविले. पावले असेल. वरकड मोर्चियाचे बंदोबस्ताचा मजकूर लिहिला तो कलला. तुम्ही बदोबस्त केला असेल तो उत्तमच केला असेल. वरकड तरतुदेचा विचार तरी जो होणे तो होतो. ईश्वरईच्छेने कार्य होईल तेव्हां होईल. तुम्ही (* * फाटलें) काय. दरबारचा प्रसंगच या रीतीचा आहे. आंगऱ्याचे लोकानीं मचवा पाडाव केला. उतम केले. ते स्वामीसेवेसी अंतर करितातसे नाहीं. राउताची हाजिरी पाठविली ते पावली. राजश्री कानोजी सिंकें याचे चौघे राऊत रवाना केले, त्याचा मजकूर लिहिला तो कलला. जानाजी कदम दि॥ मार यांचे घोडियाचा मजकूर लिहिला तो कलला. शामजी कोकर यास पडथ[1]ला बैल तटु पाहिजे म्हणोन लिहिले तरी येव्हा येथून पडथळास काय द्यावे. पुढे तेथे आलियावर पडथळास मेलविले जाईल. जाणिजे छ ९ रालोवल. बहुत काय लिहिणे ? येथून राऊत रवाना केले त्यापैकी तेथे पावले त्याची यादी लिहिली ते कलली. नेमणूकपैकी राऊत राहिले त्यास ताकीद करून रवानगी करितो. जाणिजे

० श्री ~
राजा शाहु नरपतिहर्ष
निधान बाजीराव-
बलाल मुख्य प्रधान.

लेखन
सीमा.

¶*Chimaji to Pilaji Jadhav, noting the progress against Gowalkot.*

[*12-7-1736*

No. 207]
पौ छ २४ रोवल

श्री

राजश्री पिलाजी जाधवराव गोसावी यांसी.

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो बाजीराव बलाळ प्रधान आशीर्वाद. सु॥ सबा सलासीन मया अलफ. तुम्ही पत्र छ ४ रालोवलचे पाठविले ते छ १२ मिनहूस प्रविष्ट जाहलें. पाये (* * एक ओळ फाटली आहे) स पायेच्या जमावात माणोस किती आहे आपणास विदित आहे. त्याहि-मध्ये दुखणेकरी जाऊन येक हिसा साबूत नाहीं. यैसा पायेच्याचा मजकूर आहे. राऊत रवाना केले तेहि आपणांस विदितच आहे. राऊत येथे ६८ आठसष्ट आहेत. त्यापैकी शाबूत चौसष्ट आहेत. येकात येक नाही. शरम[2] लोकीक

---

१ ओझ्याकरितां. २ अब्रू.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

राहिला पाहिजे म्हणोन लिहिलें ते कलले. यैशास तुम्ही लिला मजकूर येथार्थच आहे. पायेचे जमावाचा (* * फाटले) म्हाटी आहे खराच. यास्तव आणाजी साटम व गोदजी कदम दोनी पथके पाठविली आहेत ते उतमच असेत. माारनिले ब॥ तुम्हास पत्र पाठविले आहे त्याजवरून कलेल. राऊत चहुकडील च्यार आहेत खरेच. परंतु नेमणूकपैकी राऊत राहिले आहेत ते ताकीद करून पाठऊन देतो. जाणिजे. छ १३ रबिलौवल. राजश्री आपा याचे वेथेचे वर्तमान ल्याहावे म्हणोन लिहिले तरी येथेस उतार आहे. किंचित भ्रम आहे तोहि श्री (हरीकृपे) न दूर होईल. जाणिजे बहुत काय लिहिणे.

० श्री ∪
राजा शाहु नरपतिहर्ष-
निधान बाजीराव-
बलाल मुख्य प्रधान.

लेखन
सीमा.

¶*Bajirao to Pilaji Jadhav, encouraging the latter in his work of siege and adding that Chimaji was feeling better.*

No. 208] [*14-7-1736*

पौ छ १ जोवल.

श्री

राजश्री पिलाजी जाधवराव गोसावी.

ऽ अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नो बाजीराव बलाळ प्रधान आसिर्वाद. सु॥ सबा सलासीन मया अलफ. गोवलकोटास तुम्हाजवळ लोक आहेत त्यास च्यार च्यार पाच पाच महिने जाहाले त्यास मुबदला पाठऊन ते आणवावे व तुम्हाजवळ भरतीहि असावी याजकरिता सिवजी नाईक यादव याची पनास माणसाची बोली करून तुम्हाजवळ पाठविले असत. येथे आम्ही लोकाची गणती घेतली नाहीं. तुम्ही तेथे याचे लोकाची गणती घेणे. पनास माणोस चांगले बरकंदाज अडे-[1]हातेरी चाकरीचुकरीस कामास येई येसे घेऊन येतो म्हणोन यानी मान्य केले आहे. तरी

० श्री ∪
राजा शाहु नरपतिहर्ष-
निधान बाजीराव-
बलाल मुख्य प्रधान.

---

१ वाटेल त्या हत्यारांनीं लढणारे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

तुम्ही याची हजिरी घेऊन सेवा चाकरी घेणे. रोजमरियाचे पत्र आलाहिदा पाठविले असे त्याप्रमाणे रोजमरा देणे. जाणिजे छ १५ रालोवल.

लेखन सीमा.

¶Bajirao to Pilaji Jadhav, sending fresh men for the work against Gowalkot.

No. 209] [*15-7-1736*

पौ छ २३ सफर

श्री.

राजश्री पिलाजी जाधवराऊ गोसावी यासी.

० श्री ~
राजा शाहु नरपति-
हर्षनिधान बाजीराव-
बलाल मुख्य प्रधान.

ऽ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो चिमणाजी बलाल आसिर्वाद सु॥ सबा सलासीन मया अलफ. पेटेकरी व पोहणार प्रां पुणे पैकी.

१ माण माहार वस्ती मौजे माजरी बु.
१ सिता माहार वस्ती मौजे माजरी खुर्द.
१ सोनजी कडु कोळी मौजे खडकी.
१ हसा माहार मौजे ताथवडे.
१ विरा माहार मौजे फुलगांव.
१ फकिरा माहार मौजे मुढवे.
—
६

येकूण सहा असामी पेठी सहवर्तमान पाठविले आहेत. त्यास रोजमुरा दरमाहे दर असामीस रुपये ४ च्यार प्रो रुो २४ चोवीस ई॥ छ १६ रबिलावला पासून देवीत जाणे. जाणीजे छ १३ सफर. बहुत काय लिहिणे.

लेखन सीमा.

¶Chimaji to Pilaji Jadhav, sending more men as per list.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 210] [*5-9-1736*

पौ छ १० जमादिलोवल.

श्री.

पुरवणी राजश्री आपा स्वामीचे सेवेसी.

विनंती उपरी. आजी मौजे खंडलियाचे मुकामी वेदमूर्ती रा॥ विश्वनाथभट मेहंदळे कोकणांतून आले, त्याणी वर्तमान सांगितले की, आपलियास येक मुसलमान श्नेही तिकडील भेटला त्याणी वर्तमान सांगितले कीं कर्नाळकरानीं दीडसे माणूस आणिले ते कर्णाईचे देवळाजवळी आहे. त्यांत शामलाचे लोक पंचवीस माणूस मात्र आहे. वरकड सवासे माणूस किलेदारानी ताजुदी अलीखान याचे पुत्रास लिहिले होते. त्याणी सवासे माणूस रेवदंडियाहून घेऊन आला आहे. येकूण दीडसे माणूस मात्र आहे. हे विनंती.*

¶*Vishvanath Bhat Mehendale referred to in the letter is the son of Balaji Vishvanath's sister who was married to Bahiravbhat. Vasudeo Joshi writes this letter to Chimaji regarding fort Karnala.*

No. 211] [*6-9-1736*

छ ११ जमादिलोवल.

श्री

पुर्वणी राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी.

विज्ञापना एसीजे. शामलाची दिवसे दिवस कठीण अवस्था. यांणी तीन लक्ष रुपयेपावेतों दिले ते वसूल होत नाहीं. यावर आम्हास म्हणतात तुमच्या खावंदाच्या भरवशानें या चोराकडे आम्ही फसलों. नाहीतर आम्हास इतुके कशास द्यावे लागते ? अद्याप शामल बाटवील किंवा देवळें मोडील व जाजती जलल करील तर आम्ही जामीन राहतों. हर प्रयत्ने राजश्री स्वामीयांस युक्तीनें समजाऊन कडी बसवीत नाही. तेव्हां आम्ही दुसरा कुलावा सुचेल तो योजून मग शब्द लावाल. हा काळवर तुमच्या वचनाची विश्वासून वाट पाहिली. अतःपर यास काढणें तर तयार व्हा. कल्याणास आल्यानंतर कागदपत्र पाहिजेत तैसे केले जातील. हे ढिलीवर घालणें असेल अगर आमची समजावीस करावी हे

---

* कदाचित हें पत्र प. नं. १३० जवळहि बसेल.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

मनांत असेल तर स्पष्ट कळों द्यावें. निमित्य जे अंगारकानें सल्याविसी लिहिले आहे कळेल ते रीतीनें सला करून घेतला जाईल. या करितां पत्र पावतां अंगारखाकडील जाब आल्यापूर्वी स्वामीकडील उतर इछितांहेत. यानंतर याचे उतर व राजश्री स्वामीचे मनीं कोण्हे प्रकारें सला करावा हा इत्यर्थ ठीक आम्हास मनास आणून लिहून येईल तर त्याप्रमाणें उपाय योजिला जाईल. बोलिले आहेत, या लोकांस खबर बखर हमेशा लिहावी विचारावी म्हणजे आप्तिकता दिसते. परंतु ठीक लिहावी. निमित्य की यास वरचेवर खबरी कळतच आहेत. आम्हास रवाना कसे केले राजश्री आपासाहेबी दुसरे मनुष्य योजिले ते खबर आम्हापूर्वी यास कळली. याकरितां काय यास तथ्य उतर सागावे ते आज्ञा करावयास स्वामी समर्थ आहेत. कोंडनाक महार तिकडे सांपडलाहे की काय ? इकडे मारला म्हणून खबर उडाली आहे.

¶*Letter to the Peshwa about conditions in Konkan after the battle of Charhai.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh



CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh